भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन लेखापरीक्षण अहवाल....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक, क्रमांक क. भानिम २०२६ / प्र.क्र.६५ /लोलेस,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक १४ जुलै, २०२६.

परिपत्रक

संदर्भ :- शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक भानिम १२००/प्र.क्र.२०५ / लोलेस दि.१८ जानेवारी २००१.

१. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन लेखापरीक्षण अहवाल. महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना दिनांक १० जुलै, २०२६ रोजी सादर करण्यात आला आहे. सदर अहवालाची एक प्रत PDF स्वरुपात या परिपत्रकासोबत आवश्यक त्या समयबद्ध कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.सदर अहवाल भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक कार्यालयाच्या https://cag.gov.in/ag/mumbai-i/en/audit-report या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

२. संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना सूचीत करण्यात येते की,भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन लेखापरीक्षण अहवालात अंतर्भुत असलेल्या त्यांच्या विभागाशी / कार्यासनांशी संबंधित मुद्यांसंदर्भात स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या प्रती, संबंधित विभागांच्या सचिवांच्या मान्यतेने तसेच प्रधान महालेखापाल कार्यालयाची संमती (Vetting) घेऊन परस्पर लोक लेखा समिती कक्ष ,विधानमंडळ सचिवालय , विधानभवन ,मुंबई यांच्याकडे पाठविण्यात याव्यात व त्याची एक प्रत या कार्यासनास अग्रेषित करावी.तदनंतर विभागातील संबंधीत कार्यासनांनी वरीलप्रमाणे कार्यवाही करुन स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांच्या प्रती या कार्यासनास सादर कराव्यात. सदर अहवाल प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या प्रती तीन महिन्यांच्या विहित मुदतीत लोक लेखा समितीस सादर करण्यात याव्यात.

३. लोक लेखा समितीच्या यापूर्वी झालेल्या साक्षींदरम्यान प्रशासकीय विभागांकडून स्पष्टीकरणात्मक ज्ञापने पाठविण्याबाबत होणारा विलंब आणि त्यामध्ये असलेल्या त्रुटी यांचा लोक लेखा समितीने गांभिर्यपूर्वक विचार केलेला आहे व त्याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. यास्तव या विभागाच्या संदर्भाधीन दिनांक १८ जानेवारी, २००१ च्या शासन परिपत्रकातील सूचनांचे कोटेकोरपणे पालन करावे, तसेच खालील सूचना प्रकर्षाने ध्यानात घ्याव्यात.

I स्पष्टीकरणात्मक ज्ञापने परिपूर्ण आणि स्वयंस्पष्ट असावीत. त्यामध्ये चूकीची माहिती दिलेली नसावी. स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या २० इंग्रजी प्रती व तसेच ४० मराठी प्रती लोक लेखा समिती, विधानमंडळ सचिवालयास पाठवाव्यात. तसेच त्या पत्राची व स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची प्रत्येकी १ प्रत लोलेस कार्यासन, वित्त विभाग यांचेकडे पाठवावी

II. उपरोक्त प्रयोजनासाठी विभाग प्रमुखांकडून/नियंत्रण अधिकाऱ्यांकडून काही माहिती मागविणे आवश्यक असेल तर ती माहिती "अत्यंत तातडीने पाठवावी" अशी त्यांना सूचना करावी.

III. या मध्ये क्षेत्रीय कार्यालयांकडून दिरंगाई झाल्यास त्याबाबतची वस्तुस्थिती संबंधित सचिवांच्या तात्काळ निदर्शनास आणावी.

IV. कोणत्याही परिस्थितीत स्पष्टीकरणात्मक ज्ञापने लोक लेखा समितीकडे पाठविण्याबाबत विलंब होता कामा नये, याची सर्व संबंधीत विभागांनी कटाक्षाने काळजी घ्यावी.

V. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून लोक लेखा समितीला स्पष्टीकरणात्मक ज्ञापने फार विलंबाने प्राप्त होतात. याबाबत लोक लेखा समितीच्या अध्यक्षांनी शासनाकडे वेळोवेळी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे लोक लेखा समिती विषयक कामकाज गांभिर्याने व तत्परतेने हाताळण्यात यावे.

४. यासंदर्भात असेही निदर्शनास आणून देण्यात येते की, जर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या सदर अहवालातील परिच्छेदांची स्पष्टीकरणात्मक ज्ञापने महालेखापालांच्या मान्यतेने लोक लेखा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ यांच्याकडे व त्याची एक प्रत वित्त विभागाकडे विहित मुदतीत पाठविण्यास संबंधितांकडून विलंब झाला, तर संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन आवश्यक ती कारवाई करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०७१४१५१४२१३७०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAVIKUMAR BALAJIRAO LINGANWAD
Date: 2026.07.14 15:16:23 +05'30'

(रविकुमार लिंगनवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

सोबत :- अहवालाची प्रत PDF स्वरुपात.(online)

प्रतिः- सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई -३२
सर्व सह सचिव / उप सचिव वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

प्रत :- माहितीसाठी:-
संचालक, लेखा व कोषागारे,मुंबई.
प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)- १, महाराष्ट्र मुंबई
प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ महाराष्ट्र मुंबई
उप सचिव, लोक लेखा समिती कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA
लोकहितार्थ सत्यनिष्ठा
Dedicated to Truth in Public Interest

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा
31 मार्च 2024 रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन लेखापरीक्षण अहवाल
Report of the Comptroller and Auditor General of India on Compliance Audit for the year ended 31 March 2024

Marathi

English

महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra

वर्ष 2026 चा अहवाल क्रमांक 3
Report No. 3 of 2026

(अनुपालन लेखापरीक्षण - नागरी)
(Compliance Audit-Civil)

SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA
लोकहितार्थ सत्यनिष्ठा
Dedicated to Truth in Public Interest

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा 31 मार्च 2024 रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन लेखापरीक्षण अहवाल

महाराष्ट्र शासन

2026 चा अहवाल क्रमांक 3

(अनुपालन लेखापरीक्षण- नागरी)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक
यांचा 31 मार्च 2024 रोजी संपलेल्या वर्षाचा
अनुपालन लेखापरीक्षण अहवाल

महाराष्ट्र शासन

2026 चा अहवाल क्रमांक 3

अनुक्रमणिका

उपोद्घात

उपोद्घात

31 मार्च 2024 रोजी संपलेल्या वर्षाचा हा अहवाल भारतीय राज्यघटनेच्या कलम 151 अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

हा अहवाल नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम, 1971 आणि त्याअंतर्गत भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी जारी केलेल्या लेखापरीक्षण आणि लेखा विषयक नियम, 2020 मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र शासनाच्या शासकीय विभाग आणि स्वायत्त संस्थांच्या लेखापरीक्षणाशी संबंधित आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम 151 (2) अन्वये हा अहवाल राज्य विधानमंडळासमोर ठेवणे आवश्यक आहे.

या अहवालात नमूद केलेली निरीक्षणे ही 2022-24 या कालावधीत लेखापरीक्षणा दरम्यान निदर्शनास आलेली आहेत.

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी जारी केलेल्या लेखापरीक्षण मानकांनुसार हे लेखापरीक्षण करण्यात आले आहे.

टिप: मूळ इंग्रजी अहवालावरुन अनुवादित; शंका समाधानासाठी कृपया इंग्रजी अहवाल पहावा.

कार्यकारी सारांश

कार्यकारी सारांश

या अहवालाविषयी

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल महाराष्ट्र शासनाच्या शासकीय विभागांच्या आणि स्वायत्त संस्थांच्या अनुपालन लेखापरीक्षणातून निदर्शनास येणाऱ्या प्रकरणांशी संबंधित आहे. अनुपालन लेखापरीक्षण म्हणजे लेखापरीक्षण केलेल्या संस्थांचा खर्च आणि महसूल यांची पडताळणी करून भारतीय राज्यघटनेतील तरतुदी, लागू असलेले कायदे, नियम, विनियम आणि सक्षम अधिकाऱ्यांनी जारी केलेले विविध आदेश आणि सूचना यांचे पालन केले जात आहे की नाही हे तपासणे होय.

लेखापरीक्षणाचे महत्त्वाचे परिणाम राज्य विधिमंडळाच्या निदर्शनास आणून देणे हा या अहवालाचा प्राथमिक उद्देश आहे. लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांमुळे कार्यकारिणीला सुधारात्मक कृती करण्यास आणि धोरणे आणि निर्देश तयार करण्यास सक्षम करणे अपेक्षित आहे ज्यामुळे संघटनांची कार्यक्षमता आणि आर्थिक व्यवस्थापन सुधारेल, अशा प्रकारे चांगल्या प्रशासनास हातभार लागेल.

या अहवालात 16 परिच्छेदांचा समावेश आहे, ज्यात दोन विषयनिष्ठ अनुपालन लेखापरीक्षणे समाविष्ट आहेत: (i) नामांकित निवासी शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी योजनेची अंमलबजावणी, (ii) मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांचे कामकाज आणि 14 लेखापरीक्षण परिच्छेद.

महाराष्ट्र शासनाचे 24 विभाग व 15 स्वायत्त संस्था असून त्यांच्या अध्यक्षपदी अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव आहेत, ज्यांचे लेखापरीक्षण प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-1, महाराष्ट्र, मुंबई यांच्याद्वारे केले जाते.

(परिच्छेद 1.1)

लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट असलेले 19 परिच्छेद आणि आढावे या संबंधीची स्पष्टीकरणात्मक ज्ञापने 13 महिने ते 123 महिन्यांच्या कालावधीसाठी प्रलंबित होती. लोकलेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समितीच्या 415 शिफारशींवरील केलेल्या कार्यवाहीच्या टिप्पण्या 16 विभागांकडून प्रलंबित होत्या.

(परिच्छेद 1.6.4)

व्यवहारांच्या लेखापरीक्षणाद्वारे मिळालेले महत्त्वपूर्ण निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत:

आदिवासी विकास विभाग

(i) नामांकित निवासी शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी असलेल्या योजनेची अंमलबजावणी संबंधित विषयनिष्ठ अनुपालन लेखापरीक्षण परिच्छेद

आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील बदलत्या वातावरणाशी जुळवून घेता यावे यासाठी आदिवासी विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी खासगी

शाळांमध्ये शिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाने शैक्षणिक वर्ष 2010-11 पासून योजना सुरू केली.

जरी नवीन प्रवेशाचे लक्ष्य 25,000 होते, तरी 2018-19 ते 2022-23 या वर्षात एकूण 2,910 ते 5,675 जागा मंजूर झाल्या. नवीन प्रवेशासाठी मंजूर जागांच्या तुलनेत, प्रवेशातील टक्केवारी तूट 2018-19 मध्ये 33 टक्के ते 2021-22 मध्ये आठ टक्के दरम्यान होती.

विभागाने मंजूर केलेल्या शाळांची संख्या 176 (2018-19) वरून 157 (2022-23) पर्यंत कमी झाली. 2022-23 या वर्षासाठी विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी प्राप्त झालेल्या पात्र अर्जांची संख्या 2,910 जागांच्या तुलनेत 4,883 होती. त्यामुळे या योजनेंतर्गत प्रवेशाची मागणी असूनही, योजनेअंतर्गत सहभागी होणाऱ्या शाळांची घट, परिणामी मंजूर जागांची संख्या कमी झाल्यामुळे पात्र विद्यार्थी या योजनेअंतर्गत लाभापासून वंचित राहिले.

2022-23 या वर्षात, पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे, 1,902 पात्र अर्जदारांना दुसरी इयत्तेत प्रवेश नाकारण्यात आला.

समितीने शाळांना दिलेल्या प्रारंभिक श्रेणीत सुधारणा करण्याच्या योजनेत कोणतीही तरतूद/मार्गदर्शक तत्त्वे/आदेश/परिपत्रके नसली तरी, विभागाने शैक्षणिक वर्ष 2018-19, 2019-20 आणि 2021-22 साठी 26 शाळांच्या श्रेणीत सुधारणा केली. चार प्रकरणांमध्ये, उप सचिव स्तरावर श्रेणीत सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. श्रेणीत सुधारणा केल्यामुळे 16 शाळांना ₹9.53 कोटींची थकबाकी देण्यात आली.

विभागाने स्वतःच्या कालमर्यादेचे पालन केले नाही, त्यामुळे शाळांची निवड विलंबाने झाली आणि परिणामी विद्यार्थ्यांच्या प्रवेशास विलंब झाला. विलंबाने झालेल्या प्रवेशांमुळे विद्यार्थ्यांचे अध्यापनाचे वेळापत्रक संकुचित झाले.

2018-19 ते 2022-23 दरम्यान पात्रता निकष पूर्ण न करणाऱ्या 81 ते 134 शाळांची या योजनेअंतर्गत निवड करण्यात आली. दिलेल्या कालावधीत पात्रतेचे निकष पूर्ण न करणाऱ्या शाळांना वारंवार मान्यता देण्यात आल्या. अनिवार्य अटी पूर्ण न करणाऱ्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देणे हे केवळ शिक्षणाच्या गुणवत्तेशी तडजोड करणे नसून अनिवार्य निकष पूर्ण न करणाऱ्या शाळांना निधीही वितरित केला गेला.

समितीने मंजूर न केलेल्या तीन शाळांची विभागाकडून विशेष प्रकरण म्हणून या योजनेंतर्गत निवड करण्यात आली. समितीच्या मंजुरीशिवाय 2018-19 आणि 2019-20 या शैक्षणिक वर्षासाठी 10 शाळांना अतिरिक्त नवीन प्रवेश देण्यात आले. सचिव स्तरावरील समितीने मंजूर केलेल्या सहा शाळांना मंजुरी देणाऱ्या शासन निर्णयातून वगळण्यात आले जे शासन निर्णय जारी करण्यातील कमकुवतपणा आणि वैध मंजुरी आदेशाशिवाय शाळांना दिल्या जाणाऱ्या प्रदानांतील अनियमितता दर्शवितात.

2022-23 मध्ये शासन निर्णय जारी करण्यास विलंब झाल्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली की अनिवार्य आवश्यकता पूर्ण न करणाऱ्या शाळांना सवलत द्यावी लागली आणि

विद्यार्थ्यांना विहित शैक्षणिक आणि पायाभूत सुविधा मानकांचा अभाव असलेल्या संस्थांमध्ये प्रवेश घ्यावा लागला.

2018-19 ते 2022-23 दरम्यान नामांकित शाळांमधील शिक्षकांची इंग्रजी वाचन, लेखन आणि अस्खलितपणे बोलण्याची क्षमता तपासण्यासाठी विभागाने आवश्यक परीक्षा घेतल्या नाहीत. योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये स्वतंत्र लेखे तयार करण्याची आणि शाळेला योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याची तरतूद नाही. त्यामुळे शाळांना वितरित करण्यात आलेला निधी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वापरला गेला आहे किंवा कसे, याची कोणतीही माहिती विभागाकडे नाही.

योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अनिवासी शाळांची तरतूद नसताना अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नागपूर अंतर्गत आठ अनिवासी शाळा आणि अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती अंतर्गत एक अनिवासी शाळा यांना 2018-19 ते 2022-23 या शैक्षणिक वर्षासाठी मान्यता देण्यात आली होती.

प्रकल्प अधिका-यांनी वसतिगृहांच्या त्रैमासिक आणि आकस्मिक निरीक्षण अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर केले नाहीत. विद्यार्थ्यांना लेखन साहित्य, शाळेचा गणवेष, मैदानी खेळ गणवेष, नाईट ड्रेस, दप्तरे, पुस्तके, इ. वितरण न केल्याची प्रकरणे होती आणि शाळांमध्ये साहित्य वितरणावर देखरेखीचा अभाव होता. 28 प्रकल्प अधिकाऱ्यांपैकी केवळ दोन प्रकल्प अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील 13 शाळांचे मूल्यांकन अहवाल आयुक्त कार्यालयाला सादर केले होते.

<u>शिफारसी</u>

- *राज्य शासनाने प्रवेशासाठी वास्तववादी लक्ष्य निश्चित करून सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या गावाजवळील शाळांमध्ये या योजनेंतर्गत प्रवेश दिला जाईल याची खात्री करावी.*
- *राज्य शासनाने सचिव स्तरीय समितीने विधीवत मान्यता दिलेल्या नामांकित शाळांच्या श्रेणींमध्ये कोणत्याही सुधारणेसाठी कालबद्ध पद्धतीने योग्य धोरण विहित केले गेले आहे याची खात्री करावी.*
- *राज्य शासनाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी शाळा निवडीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे याची खात्री करावी.*
- *राज्य शासनाने या योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधीच्या संदर्भात स्वतंत्र लेखे तयार करून उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याच्या सूचना द्याव्यात.*
- *राज्य शासनाने प्रभावी संनियंत्रणासाठी शाळांच्या त्रैमासिक तपासणी/आकस्मिक निरक्षणाचे अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करणे सुनिश्चित करावे.*
- *राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या साहित्य वितरणावर योग्य संनियंत्रण ठेवावे.*

(परिच्छेद 2.1)

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(ii) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असलेल्या वसतिगृहांच्या कामकाजावर विषयनिष्ठ अनुपालन लेखापरीक्षण परिच्छेद

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने अनुसूचित जाती आणि इतर दुर्बल घटकांच्या विद्यार्थ्यांना त्यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी निवास आणि इतर सुविधा देऊन त्यांना आधार देण्यासाठी वसतिगृहांची स्थापना केली आहे याशिवाय, अनुसूचित जाती आणि नव-बौद्ध प्रवर्गातील ज्यांना वसतिगृहाची सुविधा दिली जाऊ शकत नाही अशा विद्यार्थ्यांना अन्न, निवास आणि निर्वाह भत्ता देण्यासाठी स्वाधार योजना (जानेवारी 2017) सुरू केली.

स्वाधार योजनेचा विस्तार सर्व तालुक्यांमध्ये व पात्र प्रवर्गांना न करता नवीन शासकीय वसतिगृहांच्या बांधकामाचा पाठपुरावा न करण्याच्या विभागाच्या निर्णयामुळे 117 तालुक्यांमध्ये वसतिगृहांच्या सुविधांचा अभाव कायम राहिला, त्यामुळे 8,930 संस्थांमधील विद्यार्थ्यांना निवासी शैक्षणिक सहाय्यापासून वंचित राहावे लागले आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना न्याय्य शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट कमकुवत झाले. वर्ष 2020 पर्यंत शाश्वत विकास उद्दिष्टांतर्गत 500 शासकीय वसतिगृहे बांधण्याचे लक्ष्य साध्य करण्यासाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने कालबद्ध तपशीलवार योजना तयार केली नव्हती.

शासकीय वसतिगृहांमध्ये निधीचा कमी उपयोग झाल्याचे निदर्शनास आले, विशेषतः 2023-24 मध्ये, जिथे वितरण केलेल्या ₹487.15 कोटींपैकी ₹430.50 कोटी खर्च झाले, आणि उर्वरित ₹56.65 कोटींचा उपयोग केला नाही. अधिक वितरण असूनही, शासकीय वसतिगृहांसाठी निधीचा कमी उपयोग हे, अंमलबजावणी आणि अवशोषणाच्या मर्यादांकडे लक्ष वेधते आणि हे सूचित करते की अर्थसंकल्पीय सहाय्य पूर्णपणे वसतिगृह पायाभूत सुविधा आणि सेवांच्या सुयोग्य विस्तार किंवा बळकटीकरणात परिवर्तीत केले गेले नाही.

स्वाधार योजनेंतर्गत निधी मिळण्यास विलंब झाल्यामुळे आणि विद्यार्थ्यांनी सादर केलेली अपूर्ण कागदपत्रे यामुळे विलंब झाला. मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना आणि स्वाधार योजना या दोन्हींमधील देयकांच्या माहितीची पडताळणी करताना समन्वयाच्या अभावामुळे निर्वाह भत्त्यांचे चुकीचे समायोजन करण्यात आले आणि परिणामी 1,302 विद्यार्थ्यांना ₹57.82 लाखांचा कमी निर्वाह भत्ता देण्यात आला. मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत देय असलेल्या निर्वाह भत्त्याच्या समायोजनासाठी अवलंबलेल्या चुकीच्या दरांमुळे नऊ[1] जिल्ह्यांतील 471 विद्यार्थ्यांना ₹9.10 लाख कमी निर्वाह भत्ता आणि सात[2] जिल्ह्यांतील 271 विद्यार्थ्यांना ₹3.87 लाखांचा अतिरिक्त निर्वाह भत्ता देण्यात आला.

1 अहिल्यानगर, बुलढाणा, धाराशिव, जालना, लातूर, नागपूर, पुणे, सांगली आणि ठाणे.

2 अहिल्यानगर, बुलढाणा, धाराशिव, लातूर, नागपूर, पुणे आणि ठाणे.

₹4.55 कोटींचा लक्षणीय खर्च करूनही, ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथील मुला-मुलींसाठी नियोजित वसतिगृह सुविधा नियोजन, कंत्राट व्यवस्थापन आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यात आंतर-विभागीय समन्वयातील त्रुटींमुळे वापरासाठी अनुपलब्ध राहिले. विभागाने नवीन विद्यार्थ्यांना सामावून घेण्याच्या उद्देशाने नवीन वसतिगृहांचा वापर करण्याऐवजी विद्यमान वसतिगृहांमधून विद्यार्थ्यांना नवीन वसतिगृहात स्थलांतरित केले.

मार्च 2024 पर्यंत, राज्यातील 443 शासकीय वसतिगृहांपैकी 155 शासकीय वसतिगृहे भाडेतत्त्वावरील इमारतींमध्ये कार्यरत होती. लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की या 155 शासकीय वसतिगृहांपैकी 36 शासकीय वसतिगृहे ज्यांची एकूण मंजूर क्षमता 3,290 विद्यार्थ्यांची होती, भाड्याने घेतलेल्या इमारतींची मर्यादित क्षमता असल्यामुळे केवळ 2,316 विद्यार्थ्यांना सामावून घेऊन भाड्याच्या वसतिगृहांमध्ये कार्यरत होती. मंजूर क्षमतेच्या तुलनेत कमी प्रवेश क्षमता असलेल्या भाड्याच्या इमारतींमध्ये शासकीय वसतिगृहांचे कामकाज पाच ते 50 टक्क्यांच्या दरम्यान होते.

सहा जिल्ह्यांतील एकूण 109 शासकीय वसतिगृहांपैकी 49 वसतिगृहांमध्ये (28 मुलींच्या वसतिगृहासह) अधीक्षकाची पदे रिक्त होती आणि या वसतिगृहांचा अतिरिक्त प्रभार इतर वसतिगृहांच्या नियमित अधीक्षकांना देण्यात आला होता. मुलींच्या पाच वसतिगृहांमध्ये अधीक्षक पदाची जबाबदारी पुरुष अधीक्षकाकडे देण्यात आली होती.

सीसीटीव्ही, अग्निशामक, भोजन कक्ष, संगणक, ग्रंथालय, इन्व्हर्टर सुविधा इत्यादी मूलभूत सुविधांची कमतरता होती. विभागाने वसतिगृहातील अपंग विद्यार्थ्यांसाठी अडथळामुक्त सुविधा आणि नियमित देखरेख अनिवार्य करण्याच्या स्वतःच्या शासन निर्णयाचे पालन केले नाही. शासकीय आणि अनुदानित वसतिगृहांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली लागू केली गेली असली तरी, विशेषत: शासकीय वसतीगृहांमध्ये त्याची मर्यादित कार्यक्षमता हे स्थापनेनंतरच्या समर्थनासाठी अपुरे नियोजन आणि कमकुवत संनियंत्रणाचे निदर्शक आहे.

अनुदानित वसतिगृहे निर्धारित पायाभूत सुविधांच्या मानकांचे आणि विहित क्षेत्र निकषांच्या उपलब्धतेचे पालन करीत आहेत याची विभागाने खात्री केली नाही. परिणामी, विद्यार्थ्यांना गर्दीत आणि अपुऱ्या सुविधांमध्ये राहण्यास भाग पडले, ज्यामुळे त्यांच्या आरोग्यावर, सुरक्षिततेवर आणि एकूणच राहणीमानावर विपरीत परिणाम झाला. अनुदानित वसतिगृहांमध्ये मूलभूत सुविधांची तरतूद करणे ही दीर्घकाळ अनिवार्य करणारी मार्गदर्शक तत्त्वे असूनही, वसतिगृहांत मोठ्या प्रमाणात स्वच्छता, सुरक्षा आणि राहण्याच्या क्षमतेच्या किमान मानकांचा अभाव होता. निवडलेल्या 21 अनुदानित वसतिगृहांच्या संयुक्त प्रत्यक्ष पडताळणीमध्ये सहा अनुदानित वसतिगृहांत राहण्यायोग्य नसलेली, बंद असलेली वसतिगृहे आणि बांधकाम सुरू असलेले वसतिगृह कार्यरत दाखवणे, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची अनुपस्थिती, विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि प्रवेशाच्या नोंदी न ठेवणे, कच्च्या खाद्यपदार्थांचा अधिक साठा नसणे, विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक वस्तूंचा अभाव इत्यादीं उदाहरणे निदर्शनास आली, जे सूचित करते की

अनुदानित वसतिगृहांचे कार्यान्वयन कथितपणे बनावट होते. या सहा अनुदानित वसतिगृहांना 2019-20 ते 2023-24 या कालावधीत देखभाल, भाडे आणि मानधनाच्या रुपात ₹1.62 कोटी प्रदान केले गेले. आयुक्त, क्षेत्रीय उप-आयुक्त, सहाय्यक आयुक्त, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद स्तरावर शासकीय वसतिगृहे आणि अनुदानित वसतिगृहांच्या तपासणीत आणि जिल्हा व तालुका समन्वय समितीच्या बैठकांमध्ये लक्षणीय कमतरता होती.

शिफारसी

- *राज्य शासनाने शासकीय वसतिगृहांच्या बांधकामाला प्राधान्य देण्याबाबत केवळ स्वाधार योजनेंतर्गत मागणीच नव्हे तर इयत्ता आठवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या आणि दहावी पश्चात शिक्षण घेत असलेल्या इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती जमाती आणि इतर दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या मागणीचा समावेश करून मागणीचे सर्वसमावेशक निर्धारण करावे.*
- *शासनाने स्वाधार योजनेंतर्गत हप्त्यांचे वेळेवर वितरण करण्यासाठी ऑनलाइन पोर्टल विकसित करण्यास गती द्यावी आणि स्वाधार योजनेंतर्गत अपूर्ण अर्जांचा निपटारा करण्यासाठी कालमर्यादा देखील तयार करावी.*
- *शासनाने कालबद्ध पद्धतीने काम पूर्ण करण्यासाठी वसतिगृहांच्या बांधकामातील विलंबाचा मुद्दा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मांडावा.*
- *विभागाने, अधीक्षकाची रिक्त पदे जलदगतीने भरून आणि विशेषत: मुलींच्या वसतिगृहांमध्ये पुरेशी नियुक्ती सुनिश्चित करावी, जेणेकरुन तेथे देखरेख, सुरक्षा आणि तक्रार निवारण अधिक बळकट होईल.*
- *शासनाने शासकीय व अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थी व कर्मचारी यांच्या योग्य देखरेखीसाठी बायोमेट्रिक यंत्रणांची स्थापना व त्याची योग्य देखभाल सुनिश्चित करावी.*
- *शासनाने अनुदानित वसतिगृहांना निर्धारित वेळेत किमान विहित क्षेत्र राखण्याच्या निर्देशांचे पालन करण्याचे आणि वसतिगृहांमध्ये सर्व विहित सुविधा उपलब्ध आहेत याची खात्री करण्याचे निर्देश द्यावे.*

(परिच्छेद 2.2)

महसूल व वन विभाग

- जमाबंदी आयुक्त आणि भूमी अभिलेख यांच्या वापरकर्त्यांबरोबर सामंजस्य करार करण्यात झालेल्या निष्काळजीपणामुळे वेब पोर्टल/सेवा सुविधेद्वारे डाउनलोड केलेल्या अधिकारांच्या नोंदी वापरण्यासाठी बँका, संस्था आणि कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून ₹217.99 कोटी शुल्क जमा करण्यातील प्रलंबितता.

(परिच्छेद 2.3)

- पनवेलच्या तहसीलदारांनी वार्षिक दर विवरणपत्रानुसार चुकीच्या पद्धतीने दर लागू केल्यामुळे मुंबई ट्रान्स हार्बर लिंक रोड विकसित करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला केलेल्या शासकीय जमिनीच्या वाटपावर ₹69.10 लाख भोगवटा शुल्काची कमी आकारणी झाली.

(परिच्छेद 2.4)

- अर्धवट नियोजन आणि अयोग्य जागेची निवड यामुळे गोंदिया येथील कर्मचारी निवासस्थानांच्या बांधकामावर ₹2.74 कोटींचा निष्फळ खर्च झाला.

(परिच्छेद 2.6)

महसूल व वन विभाग (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)

- चाचणी-तपासणी केलेल्या दोन जिल्ह्यांमध्ये नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य वितरीत करण्याच्या प्रणालीतील त्रुटीमुळे ₹2.60 कोटींपेक्षा जास्त रकमेचे प्रदान करण्यात आले.

(परिच्छेद 2.7)

गृहनिर्माण विभाग

- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी एकूण मंजूर चटई क्षेत्र निर्देशांकाच्या चुकीच्या गणनेमुळे दोन विकासकांना ₹6.29 कोटींचे 3,159.31 चौरस मीटर्स आणि ₹29.51 कोटींचे 11,157.83 चौरस मीटर्स अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क देण्यात आले.

(परिच्छेद 2.8)

- झोपडपट्टी हद्दीतील शाळेच्या मोकळ्या भूखंडासाठी झोपडपट्टी चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर केल्याच्या परिणामी विकासकाला ₹18.49 कोटीचा अदेय लाभ झाला.

(परिच्छेद 2.9)

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

- प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन न केल्यामुळे श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, यवतमाळ येथील विनावापर पडून राहिलेल्या वैद्यकीय उपकरणांवर ₹39.08 कोटींची निष्क्रिय गुंतवणूक.

(परिच्छेद 2.10)

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

- स्वीय प्रपंजी लेखे उघडण्यासाठी आणि चालवण्यासाठी विहित कोषागार प्रक्रियांचे पालन न करणे आणि आर्थिक नियमांचे अपुरे नियंत्रण आणि अंमलबजावणी यामुळे एकत्रित निधी/लोक लेख्याबाहेर ₹26.35 कोटींची जमा सतत ठेवली गेली, ज्यामुळे

कायदेशीर देखरेख आणि अर्थसंकल्पीय नियंत्रण कमकुवत झाले, परिणामी, निधीचा अनियमित वापर झाला आणि टाळता येण्याजोगा आर्थिक खर्च झाला.

(परिच्छेद 2.11)

मराठी भाषा विभाग

- प्रकल्प नियोजनातील त्रुटी, जागेच्या निवडीमधील अपुरी सतर्कता, निविदा प्रक्रियेपूर्वी आराखडा अंतिम न करणे आणि कंत्राट व्यवस्थापनातील त्रुटी यामुळे मराठी भाषा भवनाच्या उपकेंद्राच्या बांधकामास विलंब झाल्याने ₹15.90 कोटीचा निधी अवरोधित झाला.

(परिच्छेद 2.12)

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

- गोदामांचे बांधकाम सुरू असताना अंदाजपत्रक स्तरावर संरक्षक भिंती, पोहोच रस्ते यांसारख्या आवश्यक पायाभूत सुविधांसाठी तरतुदी समाविष्ट न केल्यामुळे सुविधा अपूर्ण राहून ₹5.98 कोटी किंमतीच्या गोदामांचा वापर झाला नाही.

(परिच्छेद 2.13)

नगरविकास विभाग

- विद्यमान कराराची मुदत संपण्यापूर्वी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे निविदा प्रक्रिया सुरू करण्यात विलंब, तसेच 'नकार देण्याचा पहिला अधिकार' या कलमाशी विसंगत निविदा अटींचा समावेश यामुळे निविदा रद्द करण्यात आल्या आणि नवीन करार अंतिम होण्यास विलंब झाला, परिणामी वाहनतळाच्या जागेचा वापर झाला नाही आणि परिणामी ₹5.93 कोटी महसुलाचे नुकसान झाले.

(परिच्छेद 2.14)

सामान्य प्रशासन विभाग

- पत्रकार भवनाच्या प्रलंबित बांधकामाबाबत प्रशासकीय आणि तांत्रिक मान्यता मिळविण्यासाठी झालेल्या विलंबामुळे ₹2.43 कोटींचा निधी अडकून पडला.

(परिच्छेद 2.15)

सार्वजनिक आरोग्य विभाग

- डागा मेमोरियल शासकीय महिला रुग्णालय प्रशासन आणि सार्वजनिक आरोग्य विभागाला नियमित अर्थसंकल्पीय यंत्रणेद्वारे कार्यचालन आणि देखभालीचे नियोजन आणि तरतूद करण्यातील असमर्थता, तसेच प्रलंबित आणि तदर्थ निधी प्रस्तावांमुळे सांडपाणी प्रक्रिया संयंत्र निष्क्रिय राहिल्याने सहा वर्षाहून अधिक काळ ₹1.27 कोटीची गुंतवणूक अनुत्पादक झाली.

(परिच्छेद 2.16)

प्रकरण I

परिचय

प्रकरण I

परिचय

1.1 या अहवाला विषयी

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यक्षेत्रातील विविध समूहांच्या अंतर्गत येणाऱ्या शासकीय विभागांच्या आणि महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थांच्या अनुपालन लेखापरीक्षणाद्वारे उद्भवलेल्या बाबींशी संबंधित आहे. या कार्यालयाने लेखापरीक्षण केलेले विभाग आणि स्वायत्त संस्थांची समूहनिहाय यादी खालील **तक्ता 1.1** मध्ये दर्शविली आहे. याचा तपशील **परिशिष्ट 1.1** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 1.1: या कार्यालयाद्वारे लेखापरीक्षण केलेल्या विभाग आणि स्वायत्त संस्थांची समूहनिहाय यादी

समूहाचे नाव	विभागांची संख्या	स्वायत्त संस्थांची संख्या
आरोग्य व कल्याण	07	04
शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगार	05	03
ग्रामीण विकास	01	--
कृषि, अन्न व संलग्न उद्योग	03	--
जलसंपदा	02	01
नगर विकास	02	06
संस्कृती व पर्यटन	01	--
सामान्य प्रशासन	03	01
एकूण	**24**	**15**

अनुपालन लेखापरीक्षण म्हणजे लेखापरीक्षण केलेल्या संस्थांचा खर्च आणि महसूल यांची तपासणी करून भारतीय राज्यघटनेतील तरतुदी, लागू असलेले कायदे, नियम, विनियम आणि सक्षम अधिकाऱ्यांनी जारी केलेले विविध आदेश आणि सूचना यांचे पालन केले जात आहे किंवा कसे हे तपासणे होय.

लेखापरीक्षणाचे महत्त्वाचे परिणाम राज्य विधिमंडळाच्या निदर्शनास आणून देणे हा या अहवालाचा प्राथमिक उद्देश आहे. लेखापरीक्षण मानकांमध्ये अहवालासाठी भौतिक पातळी व्यवहारांचे स्वरूप, आकारमान आणि परिमाण यांच्याशी सुसंगत असणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांमुळे कार्यकारिणीला सुधारात्मक कारवाई करण्यास सक्षम करणे आणि धोरणे आणि निर्देश तयार करणे अपेक्षित आहे ज्यामुळे संघटनांची कार्यक्षमता आणि आर्थिक व्यवस्थापन सुधारेल, अशा प्रकारे, चांगल्या प्रशासनास हातभार लागेल.

लेखापरीक्षणाचे अधिकार, संघटनात्मक रचना, नियोजन आणि लेखापरीक्षणाची व्याप्ती आणि लेखापरीक्षणास शासनाचे प्रतिसाद यांचे स्पष्टीकरण या प्रकरणात दिले आहे. प्रकरण II मध्ये शासकीय विभाग आणि स्वायत्त संस्थांमधील अनुपालन लेखापरीक्षणातून उद्भवलेली निरीक्षणे आहेत.

1.2 लेखापरीक्षणार्थी संस्थांची रुपरेषा

राज्यातील सचिवालय स्तरावरील विभागांचे नेतृत्व अतिरिक्त मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव करतात आणि त्यांना संचालक/आयुक्त तसेच कनिष्ठ अधिकारी सहाय्य करतात.

मागील वर्षाच्या तुलनेत 2022-24 दरम्यानचा राज्य शासनाच्या राजकोषीय व्यवहारांचा सारांश **तक्ता 1.2** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

तक्ता 1.2: 2022-24 दरम्यानच्या राजकोषीय व्यवहारांचा सारांश

(₹ कोटीत)

जमा				संवितरणे			
	2021-22	2022-23	2023-24		2021-22	2022-23	2023-24
विभाग-अ: महसुली लेखे							
कर महसूल	220927.13	277486.31	302343.37	सर्वसाधारण सेवा	121745.32	130590.81	139874.71
करेतर महसूल	19306.70	16776.41	20857.94	सामाजिक सेवा	142523.26	163329.16	189224.05
केंद्रीय कर/ शुल्कांचा हिस्सा	54318.06	60000.97	71349.75	आर्थिक सेवा।	59454.77	80819.94	83363.03
केंद्र सरकारकडून अनुदाने	38759.68	51414.24	36045.40	सहाय्यक अनुदाने व अंशदाने	25962.54	32874.49	31888.67
एकूण विभाग-अ: महसुली जमा	**333311.57**	**405677.93**	**430596.46**	**एकूण विभाग-अ: महसुली खर्च**	**349685.89**	**407614.40**	**444350.46**
विभाग-ब: भांडवली लेखे व इतर							
i) संकीर्ण भांडवली जमा	0	0	0	1 सर्वसाधारण सेवा	2681.21	3526.56	5579.89
				2. सामाजिक सेवा	4082.09	9134.20	15243.68
				3. आर्थिक सेवा।	39907.09	48982.85	51749.83
				i)भांडवली खर्च (1+2+3)	**46670.39**	**61643.61**	**72573.40**
ii) कर्ज आणि अग्रिमांची वसुली	1178.88	642.62	742.20	ii) कर्ज आणि अग्रिमांची संवितरणे	2436.03	4664.41	4974.16
iii) लोक ऋण जमा [1]	90488.18[*]	87572.84[#]	125820.67[@]	iii) लोक ऋणांची परतफेड [2]	35934.66[*]	37665.79[#]	40649.98[@]
iv) आकस्मिक निधीतून विनियोजने	0.00	200.00	0.00	iv) आकस्मिक निधी विनियोजन	0.00	200.00	0.00
v) आकस्मिक निधी	0.00	200.00	0.00	v) आकस्मिक निधी	0.00	200.00	0.00
vi) लोक लेखा जमा	119376.52	143466.93	136495.89	vi) लोक लेख्यांची संवितरणे	100533.18	121973.69	123351.19
vii) प्रारंभीची रोख शिल्लक	68597.29	77692.29	81490.71	vii)अंतिम रोख शिल्लक	77692.29	81490.71	89246.74
एकूण विभाग-ब: जमा (i+ii+iii+iv+v+vi+vii)	**279640.87**	**309774.68**	**344549.47**	**एकूण विभाग-ब संवितरणे (i+ii+iii+iv+v+vi+vii)**	**263266.55**	**307838.21**	**330795.47**
एकूण एकंदर (अ+ब)	**612952.44**	**715452.61**	**775145.93**	**एकूण एकंदर (अ+ब)**	**612952.44**	**715452.61**	**775145.93**

[@] 91 दिवसांवरील अर्थोपाय अग्रिमे आणि अधिकर्ष यांचे व्यवहार वगळून (जमा व संवितरणे ₹166.85 कोटी)

[#] 91 दिवसांवरील अर्थोपाय अग्रिमे आणि अधिकर्ष यांचे व्यवहार वगळून (जमा व संवितरणे ₹7,129.25 कोटी)

[*] 91 दिवसांवरील अर्थोपाय अग्रिमे आणि अधिकर्ष यांचे व्यवहार वगळून (जमा व संवितरणे ₹98.43 कोटी)

स्त्रोत :- संबंधित वर्षाचे वित्तीय लेखे

---

[1] लोक लेखा जमांची आकडेवारी सकल आधारावर दर्शविली जाते.

[2] लोक लेखा संवितरणांची आकडेवारी सकल आधारावर दर्शविली जाते.

1.3 लेखापरीक्षणासाठी प्राधिकार

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 149 आणि 151 आणि भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या (कर्तव्ये, अधिकार आणि सेवाशर्ती) अधिनियम, 1971 अन्वये भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांना लेखापरीक्षणाचे प्राधिकार प्राप्त झाले आहेत. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक, महाराष्ट्र शासनाचे शासकीय विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामधील महसूल व खर्चाचे लेखापरीक्षण भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी निर्गमित केलेल्या भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या (कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम, 1971 च्या तरतुदींनुसार आणि लेखापरीक्षा आणि लेख्यांची नियमावली, 2020 नुसार करतात.

1.4 प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, नागपूर, या कार्यालयांची संघटनात्मक संरचना

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या निर्देशानुसार, प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर ही कार्यालये, त्यांच्या कार्यक्षेत्रातील विविध शासकीय विभाग व कार्यालये आणि स्वायत्त संस्थांचे (लेखापरिक्षित संस्था) लेखापरीक्षण करतात. **तक्ता 1.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या अधिकारक्षेत्रात आठ समूह आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या अधिकारक्षेत्रात उर्वरित आठ समूह येतात.

तक्ता 1.3: समुहांचा तपशील

अ. क्र.	प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या लेखापरीक्षा अधिकार क्षेत्रातील समूह	महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या लेखापरीक्षा अधिकार क्षेत्रातील समूह
1	आरोग्य व कल्याण	ऊर्जा व वीज
2	शिक्षण, कौशल्य विकास व रोजगार	उद्योग व वाणिज्य
3	ग्रामीण विकास	परिवहन
4	कृषी, अन्न व संलग्न उद्योग	पर्यावरण, विज्ञान व तंत्रज्ञान
5	जल संपदा	सार्वजनिक बांधकामे
6	नगर विकास	वित्त
7	संस्कृती व पर्यटन	माहिती तंत्रज्ञान व दळणवळण
8	सामान्य प्रशासन	कायदा व सुव्यवस्था

1.5 लेखापरीक्षणाचे नियोजन व अंमलबजावणी

लेखापरीक्षण प्रक्रिया ही लेखापरिक्षित संस्थांचे खर्च आणि प्राप्त झालेला महसूल, उपक्रमांची गंभीरता आणि गुंतागुंत, प्रत्यायोजित वित्तीय अधिकारांची पातळी आणि एकूण अंतर्गत नियंत्रणे आणि हितैषींच्या समस्या यांचे निर्धारण यावर आधारित लेखापरिक्षित संस्थांना भेडसावणाऱ्या जोखमांचे निर्धारण करून सुरू होते. या प्रक्रियेत

मागील लेखापरीक्षण निष्कर्षांचाही विचार केला जातो. या जोखीम निर्धारणाच्या आधारे लेखापरीक्षणाची वारंवारता आणि व्याप्ती निश्चित केली जाते. 2022-24 दरम्यान 711 घटकांचे लेखापरीक्षण करण्यासाठी 12,037 लेखापरीक्षण मनुष्य दिवस वापरण्यात आले. लेखापरीक्षण नियोजनात अशा घटकांचा/ संस्थांचा समावेश होता जे लक्षणीय समस्यांसाठी धोकादायक असल्याचे लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले होते.

प्रत्येक घटकाचे लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर तपासणी केलेल्या कार्यालयप्रमुखांना लेखापरीक्षण निष्कर्ष असलेले निरीक्षण अहवाल दिले जातात. तपासणी केलेल्या कार्यालयप्रमुखांनी निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासून एका महिन्याच्या आत लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांची उत्तरे सादर करावीत, असे आवाहन करण्यात येते. जेव्हा उत्तरे प्राप्त होतात, तेव्हा लेखापरीक्षणाचे निष्कर्ष एकतर निकाली काढले जातात किंवा अनुपालनासाठी पुढील कार्यवाहीचा सल्ला दिला जातो. या निरीक्षण अहवालातून उद्‌भवणाऱ्या महत्त्वपूर्ण लेखापरीक्षण निरीक्षणांना भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151(2) अन्वये राज्यपालांना सादर केलेल्या लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट करण्याची प्रक्रिया केली जाते.

1.6 लेखापरीक्षणास शासनाचा प्रतिसाद

1.6.1 प्रलंबित निरीक्षण अहवाल

शासकीय विभाग आणि स्वायत्त संस्थांच्या व्यवहारांची चाचणी-तपासणी करण्यासाठी आणि विहित नियम व कार्यपद्धतीनुसार त्यांच्या लेखांकनाचे आणि इतर महत्वपूर्ण दस्तऐवज ठेवले जात आहेत अथवा नाहीत याची पडताळणी करण्यासाठी त्यांच्या नियतकालिक तपासण्या केल्या जातात. या तपासण्यानंतर निरीक्षण अहवाल तयार केले जातात जे तपासणी केलेल्या कार्यालयांच्या प्रमुखांना पाठविण्यात येतात आणि त्यांच्या प्रती निकटतम वरिष्ठ प्राधिका-यांना पाठविण्यात येतात. या निरीक्षण अहवालांमध्ये समाविष्ट असलेल्या लेखापरीक्षण अभिक्षणांवर केलेल्या कार्यवाहीवर संनियंत्रण करणे सुलभ व्हावे यासाठी संबंधित विभागांच्या सचिवांना प्रलंबित निरीक्षण अहवालांचे अर्धवार्षिक अहवाल पाठविण्यात येतात.

जून 2024 पर्यंत 3,623 निरीक्षण अहवाल (13,847 अभिक्षणे) निपटाऱ्यासाठी प्रलंबित होते. निरीक्षण अहवाल आणि अभिक्षणे यांचा वर्ष-निहाय तपशील **परिशिष्ट 1.2** मध्ये दर्शविला आहे. असे निदर्शनास आले की 7,048 अभिक्षणे असलेले 2,496 निरीक्षण अहवाल पाच वर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहेत. यावरून असे निदर्शनास येते की लेखापरीक्षण अहवालातील त्रुटींचे निराकरण करण्यासाठी समयोचित व प्रभावी पावले उचलली जात नाहीत.

1.6.2 विभागीय लेखापरीक्षा समिती

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने सर्व प्रशासकीय विभागांना, प्रलंबित निरीक्षण अहवाल व अभिक्षणे यांचे पुनरावलोकन आणि निराकरण करण्यासाठी, लेखापरीक्षण समिती स्थापित करून त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश (डिसेंबर 1985) दिले. लेखापरीक्षण समित्यांचे अध्यक्ष प्रशासकीय विभागाचे सहसचिव असून, सहसंचालक, लेखा व कोषागारे हे सदस्य म्हणून आणि उपसंचालक, लेखा व कोषागारे हे निमंत्रक असतात. लेखापरीक्षा कार्यालयातील उपमहालेखाकार पदापेक्षा कमी नसलेला प्रतिनिधी लेखापरीक्षण समितीला सहाय्य करतो. लेखापरीक्षण समितीच्या बैठका प्रत्येक तिमाहीत किमान एकदा तरी आयोजित करणे आवश्यक आहे.

तक्ता 1.4 मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2022-24 दरम्यान लेखापरीक्षण समितीच्या तीन बैठका आयोजित केल्या होत्या**.**

तक्ता 1.4: 2022-24 दरम्यान लेखापरीक्षण समितीच्या बैठकांचे आयोजन

अ.क्र	प्रशासकीय विभागाचे नाव	बैठकांची संख्या	बंद केलेल्या निरीक्षण अहवालांची संख्या	बंद केलेल्या परिच्छेदांची संख्या
1	महसूल व वन	1	26	480
2	जल संपदा	1	42	214
3	आदिवासी विकास	1	14	98
एकूण		**3**	**82**	**792**

तक्ता 1.4 मध्ये दर्शविल्याप्रमाणे निरीक्षण अहवाल आणि अभिक्षणे मोठ्या प्रमाणात प्रलंबित असतानाही लेखापरीक्षण समितीच्या बैठका फारच कमी प्रमाणात आयोजित केल्या होत्या. तसेच, 2022-24 दरम्यान, प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या अधिकारक्षेत्रातील 24 प्रशासकीय विभागांपैकी फक्त तीन विभागांनी लेखापरीक्षण समिती बैठकीचे आयोजन केले होते.

1.6.3 प्रारूप परिच्छेदांना विभागांचा प्रतिसाद

मार्च 2024 व डिसेंबर 2025 दरम्यान 16 प्रारुप परिच्छेद (दोन विषयनिष्ठ लेखापरीक्षणांसहित) संबंधित विभागांच्या अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिवांना अर्धशासकीय पत्राद्वारे चार आठवडयाच्या आत उत्तर पाठविण्याच्या विनंतीसह पाठविण्यात आले. दोन विषयनिष्ठ लेखापरीक्षणे आणि चार प्रारुप परिच्छेदासंबंधी शासनाची उत्तरे प्राप्त झाली, परंतु या अहवालातील दहा प्रारुप परिच्छेदासंबंधी कोणतेही उत्तर प्राप्त झाले नव्हते.

1.6.4 लेखापरीक्षण अहवालांचा पाठपुरावा

जानेवारी 2001 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने जारी केलेल्या सूचनांनुसार, राज्य विधानमंडळाला लेखापरीक्षण अहवाल सादर केल्यावर तीन महिन्यांच्या आत

प्रशासकीय विभागांनी भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट असलेल्या परिच्छेदांविषयी स्पष्टीकरणात्मक ज्ञापने लेखापरीक्षकांच्या पडताळणीनंतर महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालयाला सादर करणे आवश्यक होते. परंतु, प्रशासकीय विभागांनी या निर्देशांचे पूर्णतः अनुपालन केले नव्हते. वर्ष 2012-13 ते 2021-22 दरम्यानची प्रलंबित स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची स्थिती **तक्ता 1.5** मध्ये दर्शविली आहे. **परिशिष्ट 1.3** मध्ये विभाग-निहाय तपशील दर्शविला आहे.

तक्ता 1.5: 2012-13 ते 2021-22 दरम्यानची स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांच्या प्रलंबिततेची स्थिती

लेखापरीक्षण अहवाल	अहवाल सादर करण्याचा दिनांक	परिच्छेदांची व आढाव्यांची संख्या	प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची संख्या	प्रलंबित
2012-13	14 जून 2014 (सामान्य आणि सामाजिक क्षेत्र)	15	14	1
	24 डिसेंबर 2014 (आर्थिक क्षेत्र	6	5	1
	14 जून 2014 (राजस्व क्षेत्र)	7	6	1
2013-14	10 एप्रिल 2015 (राजस्व क्षेत्र)	5	4	1
2014-15	13 एप्रिल 2015 (राजस्व क्षेत्र)	5	4	1
2016-17	20 जुलै 2018 (राजस्व क्षेत्र)	4	3	1
2017-18	04 मार्च 2020 (राजस्व क्षेत्र)	4	3	1
	04 मार्च 2020 (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम)	9	9	0
2018-19	08 सप्टेंबर 2020 (सामान्य आणि सामाजिक क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम)	12	10	2
	08 सप्टेंबर 2020 (आर्थिक क्षेत्र)	7	6	1
	08 सप्टेंबर 2020 (राजस्व क्षेत्र)	5	4	1
	08 सप्टेंबर 2020 (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम)	1	1	0
2019-20	25 मार्च 2022 (अनुपालन लेखापरीक्षण अहवाल)	11	8	3
2020-21	25 मार्च 2022 (अनुपालन लेखापरीक्षण अहवाल)	1	1	0
वर्ष 2022 चा अहवाल क्रमांक 3	25 ऑगस्ट 2022 महाराष्ट्रातील 74 व्या संविधान सुधारणा अधिनियम	1	0	1

लेखापरीक्षण अहवाल	अहवाल सादर करण्याचा दिनांक	परिच्छेदांची व आढाव्यांची संख्या	प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची संख्या	प्रलंबित
	यावरील संपादणूक लेखापरीक्षण			
वर्ष 2022 चा अहवाल क्रमांक 4	30 डिसेंबर 2022 भूपृष्ठ सिंचनातील परिणामांवर निष्पादन लेखापरीक्षण अहवाल	1	0	1
वर्ष 2023 चा अहवाल क्रमांक 1	25 मार्च 2023 महाराष्ट्र शासनाद्वारे सार्वजनिक सेवांचे वितरण	1	0	1
वर्ष 2023 चा अहवाल क्रमांक 4	4 ऑगस्ट 2023 इतर मागास बहुजन कल्याण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या शिष्यवृत्ती योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी यावरील संपादणूक लेखापरीक्षण अहवाल	1	0	1
वर्ष 2024 चा अहवाल क्रमांक 2	21 डिसेंबर 2024 महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा आणि आरोग्य सेवांचे व्यवस्थापन यावरील संपादणूक लेखापरीक्षण अहवाल	1	0	1
एकूण		**97**	**78**	**19**

तक्ता 1.5 मध्ये दर्शविल्याप्रमाणे, डिसेंबर 2024 पर्यंत लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट 97 परिच्छेद आणि आढाव्यांपैकी, 19 स्पष्टीकरणात्मक ज्ञापने प्रलंबित होती.

प्रलंबित लेखापरीक्षण अहवालामध्ये समाविष्ट असलेल्या सर्व मुद्दयांविषयी कार्यकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याच्या उद्देशाने लोकलेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समिती प्रत्येक प्रकरणांत तिच्या शिफारशींवर विभागांनी किती कालावधीत कार्यवाही केल्याबद्दल टिप्पण्या पाठविणे आवश्यक आहे ते निश्चित करते.

2010-11 ते 2016-17 या वर्षासाठीच्या लेखापरीक्षण अहवालांशी संबंधित 155 परिच्छेदांवर लोकलेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समितीमध्ये चर्चा करण्यात आली आणि 702 शिफारशी देण्यात आल्या, ज्यापैकी 415 शिफारशींवरील केलेल्या कार्यवाहीच्या टिप्पण्या प्रलंबित होत्या जे **तक्ता 1.6** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 1.6: लोकलेखा समिती व सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशींवरील कार्यवाही केल्याच्या प्रलंबित टिप्पण्यांची स्थिती

लेखापरीक्षण अहवालाचे वर्ष	लेखापरीक्षण अहवाल	लोक लेखा समितीचा व सार्वजनिक उपक्रम समिती अहवाल क्रमांक	लोक लेखा समिती व सार्वजनिक उपक्रम समितीचे वर्ष	लोक लेखा समिती व सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशींची संख्या	कार्यवाही केल्याबद्दल टिप्पण्यांची प्रलंबित संख्या
2010-11	सामान्य आणि सामाजिक क्षेत्र	12	2015-16	15	9
	राजस्व क्षेत्र	9	2015-16	15	2
		16	2015-16	11	9
	सार्वजनिक उपक्रम समिती	8	2015-16,	6	1
2011-12	सामान्य आणि सामाजिक क्षेत्र	29	2017-18	44	27
	आर्थिक क्षेत्र	35	2017-18	9	2
	राजस्व क्षेत्र	26	2015-16	19	19
		33	2017-18	13	8
	सार्वजनिक उपक्रम समिती	11	2015-16	10	1
2012-13	सामान्य आणि सामाजिक क्षेत्र	24	2015-16	18	17
	सामान्य आणि सामाजिक क्षेत्र	27	2017-18	48	48
	आर्थिक क्षेत्र	38	2017-18	31	3
		64	2017-18	120	80
	राजस्व क्षेत्र	37	2017-18	15	2
2013-14	सामान्य आणि सामाजिक क्षेत्र	19	2015-16	47	31
	आर्थिक क्षेत्र	23	2015-16	26	26
2014-15	सामान्य आणि सामाजिक क्षेत्र	47	2017-18	24	5
		52	2017-18	37	2
		57	2017-18	23	10
	आर्थिक क्षेत्र	46	2017-18	14	4
	राजस्व क्षेत्र	54	2017-18	37	15
2015-16	सामान्य आणि सामाजिक क्षेत्र	40	2017-18	16	4
		41	2017-19	16	13
	राजस्व क्षेत्र	56	2017-18	19	10
2016-17	सामान्य आणि सामाजिक क्षेत्र	58	2017-18	13	13
		59	2017-18	5	3
		67	2017-18	51	51
एकूण				**702**	**415**

लोकलेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समितीच्या ज्या शिफारशींवर कार्यवाही केल्याबद्दल टिप्पण्या प्राप्त झाल्या नव्हत्या त्यांची विभाग-निहाय स्थिती **परिशिष्ट 1.4** मध्ये दर्शविली आहे. **परिशिष्ट 1.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 16 विभागांकडून प्रलंबित असलेल्या 415 शिफारशींवरील कार्यवाही केल्याबद्दलच्या टिप्पण्या प्रलंबित होत्या. कार्यवाही केल्याबद्दलच्या सर्वाधिक टिप्पण्या (172 कार्यवाही केल्याच्या टिप्पण्या) या जलसंपदा विभागाकडे प्रलंबित होत्या.

प्रकरण II

व्यवहारांचे लेखापरीक्षण

प्रकरण II

व्यवहारांचे लेखापरीक्षण

शासकीय विभाग, त्यांची क्षेत्रीय कार्यालये तसेच स्वायत्त संस्थांच्या व्यवहारांच्या लेखापरीक्षणात साधन संपत्तीचे व्यवस्थापन आणि नियमितता, औचित्यता आणि काटकसर यांच्या मानकांचे पालन न करणे निदर्शनास आले. या पुढील परिच्छेदांमध्ये ते प्रस्तुत केले आहेत.

आदिवासी विकास विभागाशी संबंधित विषयनिष्ठ अनुपालन लेखापरीक्षण

2.1 नामांकित निवासी शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी असलेल्या योजनेची अंमलबजावणी

2.1.1 परिचय

आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी खाजगी शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची योजना सुरू केली (ऑगस्ट 2009). आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळावे, ज्यायोगे त्यांना उच्च शिक्षण क्षेत्रातील बदलत्या वातावरणाशी जुळवून घेता यावे, यासाठी ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेंतर्गत, पात्र विद्यार्थ्यांना केवळ पहिल्या व दुसऱ्या इयत्तेत[1] प्रवेश देण्यात आला आणि त्यांना बाराव्या इयत्तेपर्यंत शिक्षण देण्यात आले. संपूर्ण राज्यात 2010-11 या शैक्षणिक वर्षापासून ही योजना राबविण्यात आली.

शाळांच्या निवडीसाठी विभागाकडून दरवर्षी वृत्तपत्रांमध्ये जाहिराती प्रसिद्ध करून शाळांकडून प्रस्ताव मागवले जातात. शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांची माहिती शाळा विभागाने विकसित केलेल्या ऑनलाइन पोर्टलमध्ये[2] अपलोड करतात. शाळांनी त्या आधारे सादर केलेल्या माहितीची अतिरिक्त आदिवासी आयुक्त/प्रकल्प अधिकारी यांच्याकडून प्रत्यक्ष पडताळणी करून त्याआधारे शाळांना स्वयंचलनाने गुण दिले जातात. पडताळणीनंतर, शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या प्रत्यक्ष शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांच्या आधारे अंतिम गुण निश्चित केले जातात आणि त्यानंतर श्रेणी वाटप केल्या जातात. त्यानंतर, आयुक्त पात्रता निकष[3] पूर्ण करणाऱ्या शाळांच्या मान्यतेचा प्रस्ताव

---

1 इयत्ता पहिलीसाठी शैक्षणिक वर्ष 2010-11 ते 2014-15, इयत्ता पहिली आणि पाचवीसाठी शैक्षणिक वर्ष 2015-16, इयत्ता पहिली ते पाचवीसाठी शैक्षणिक वर्ष 2016-17, इयत्ता पहिली आणि दुसरीसाठी शैक्षणिक वर्ष 2017-18 ते 2021-22 आणि इयत्ता पहिलीसाठी शैक्षणिक वर्ष 2022-23 पासून प्रवेश देण्यात आला.

2 http://namankit.mahaonline.gov.in

3 शाळांसाठी महत्त्वाचे निकष असे आहेत: (i) इंग्रजी माध्यमात शिक्षण घेतलेले किमान 90 टक्के शिक्षक (ii) दहावीच्या किमान तीन तुकड्या उत्तीर्ण झालेल्या असाव्या (iii) पात्र सहाय्यकासह भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र प्रयोगशाळांची उपलब्धता आणि वसतिगृहांसाठी अनिवार्य निकष पुढीलप्रमाणे आहेत (i) मुला-मुलींच्या निवासासाठी स्वतंत्र इमारत (ii) वसतिगृहांच्या स्वयंपाकघरासाठी अन्न व औषध प्रशासन आणि अग्निशमन विभागाची मान्यता (iii) प्रत्येक 15 विद्यार्थ्यांसाठी एक वॉशबेसिन आणि प्रत्येक 20 विद्यार्थ्यांसाठी एक स्नानगृह / शौचालय इ.

मंजुरीसाठी सचिव स्तरीय समितीसमोर[4] प्रस्ताव सादर करतात. समितीने मान्यता दिल्यानंतर प्रवेशासाठी परवानगी दिलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येसह विद्यमान तसेच नवीन शाळांचा योजनेंतर्गत समावेश करण्यास मान्यता देणारे शासकीय ठराव दरवर्षी जारी केले जातात.

शाळेत प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे अर्ज प्रकल्प कार्यालयांमध्ये प्राप्त होतात. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा आणि विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ₹ एक लाखापेक्षा जास्त नसावे, या विभागाने विहित केलेल्या पात्रता निकषांच्या आधारे प्रकल्प अधिकारी विद्यार्थ्यांचे प्रवेश अंतिम करतात.

समितीने निवडलेल्या शाळांना शैक्षणिक वर्ष 2016-17 पासून 60 ते 69 श्रेणी असलेल्या शाळांना प्रति विद्यार्थी ₹50,000, 70 ते 79 श्रेणी असलेल्या शाळांना ₹60,000 आणि 80 पेक्षा जास्त श्रेणी असलेल्या शाळांना ₹70,000 वार्षिक शुल्क प्रदान करण्यात येते. 60 पेक्षा कमी श्रेणी असलेल्या शाळा या योजनेस अपात्र आहेत.

देयके तयार करून शाळांना प्रदाने करण्यासाठी निवडलेल्या शाळा, त्यांची श्रेणी, शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची नावे, विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक इत्यादींशी संबंधित माहिती ऑनलाइन प्रणालीमध्ये प्रविष्ट केली होती. शाळांना प्रदान करण्याची देयके संबंधित अतिरिक्त आदिवासी आयुक्तांनी ऑनलाइन प्रणालीमध्ये तयार केली होती आणि आयुक्तांना सादर केली होती. आयुक्तांनी कोषागारात देयके सादर करून देयके मंजूर झाल्यानंतर आरटीजीएस/एनईएफटीद्वारे थेट शाळांना प्रदाने करण्यात आली. नोव्हेंबर 2022 पासून, अतिरिक्त आदिवासी आयुक्तांना व्युत्पन्न देयके कोषागाराला सादर करण्यास आणि थेट शाळांना देयके देण्यास अधिकृत केले गेले.

2023-24 या शैक्षणिक वर्षासाठी 139 शाळांना मान्यता देण्यात आली आणि मार्च 2024 पर्यन्त या योजनेंतर्गत 47,315 विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. वर्ष 2018-19 ते 2023-24 दरम्यान या योजनेंतर्गत ₹1,398.62 कोटी[5] खर्च करण्यात आले.

2.1.2. संघटनात्मक संरचना


आदिवासी विकास विभागाच्या प्रमुखपदी अतिरिक्त मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग हे असून त्यांना आयुक्त, आदिवासी विकास विभाग साहाय्य करतात. राज्यात आयुक्तांच्या अखत्यारित/अधीन ठाणे, नाशिक, अमरावती आणि नागपूर येथे चार अतिरिक्त आदिवासी आयुक्त आहेत आणि चार अतिरिक्त आदिवासी आयुक्तांच्या अधीन 30 प्रकल्प अधिकारी कार्यरत आहेत. योजनेच्या अंमलबजावणीसाठी विभागाची संघटनात्मक संरचना **आलेख 2.1** मध्ये दर्शविण्यात आली आहे.

---

4 विभागाचे प्रधान सचिव या समितीचे अध्यक्ष होते, तर प्रधान सचिव, वित्त विभाग आणि सचिव, शालेय शिक्षण विभाग या समितीचे सदस्य होते.

5 वर्ष-निहाय झालेला खर्च: 2018-19: ₹297.34 कोटी, 2019-20: ₹241.41 2020-21: ₹85.32 कोटी, 2021-22: ₹149.99 कोटी, 2022-23: ₹324.58 कोटी आणि 2023-24: ₹299.98 कोटी.

आलेख 2.1: विभागाची संघटनात्मक संरचना



स्रोत: विभागाचा 2022-23 या वर्षाकरिता कार्यक्रम अर्थसंकल्प

2.1.3. लेखापरीक्षण चौकट

एप्रिल 2023 ते ऑगस्ट 2023 दरम्यान 2018-19 ते 2022-23 हा कालावधी अंतर्भूत करून (i) योजनेची योग्य अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी पुरेशी यंत्रणा आणि सूचना कार्यरत होत्या किंवा कसे आणि (ii) शाळांच्या निवडीच्या निकषांचे पालन सुनिश्चित केले गेले किंवा कसे आणि विभागाद्वारे पर्याप्त संनियंत्रण केले गेले किंवा कसे याचे निर्धारण करण्यासाठी लेखापरीक्षण करण्यात आले.

यासाठी, अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव, आयुक्त आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, चारही अतिरिक्त आदिवासी आयुक्त आणि आठ[6] प्रकल्प (प्रत्येक अतिरिक्त आदिवासी आयुक्त अंतर्गत दोन प्रकल्प कार्यालये साध्या स्तरीकृत यादृच्छिक नमुना पद्धतीवर निवडण्यात आली होती) कार्यालयातील अभिलेख्यांची तपासणी करण्यात आली. तसेच, 40 शाळांमधील 503 विद्यार्थ्यांचे लाभार्थी सर्वेक्षण देखील करण्यात आले.

एप्रिल 2023 रोजी अतिरिक्त मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग यांच्याबरोबर एक प्रवेश परिषद आयोजित करण्यात आली होती. मार्च 2025 रोजी झालेल्या निर्गमन परिषदेमध्ये लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांवर सचिव, नगर विकास विभाग यांच्यासमवेत चर्चा करण्यात आली आणि विभागाचा प्रतिसाद अहवालात योग्य प्रकारे समाविष्ट करण्यात आला आहे.

[6] पेण आणि घोडेगाव (अतिरिक्त आदिवासी आयुक्त, ठाणे), नाशिक आणि राजूर (अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नाशिक), किनवट आणि अकोला (अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती), चंद्रपूर आणि नागपूर. (अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नागपूर)

हा प्रारूप अहवाल जानेवारी 2025 मध्ये सचिव, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे पाठविण्यात आला होता आणि प्राप्त उत्तर (मे 2025) अहवालात समाविष्ट करण्यात आले आहे.

लेखापरीक्षण निष्कर्ष

2.1.4 नियोजन

2.1.4.1 मंजूर प्रवेशांच्या तुलनेत प्रत्यक्ष प्रवेशांमधील कमतरता

2015-16 पूर्वी नवीन प्रवेशाचे वार्षिक उद्दिष्ट 2500 होते, जे विभागाने वाढवून (एप्रिल 2015) 25,000 केले. विभागाकडे उपलब्ध असलेल्या पूर्वीच्या विदाचे निर्धारण न करता उद्दिष्ट निश्चित केले गेले तसेच त्याला कोणत्याही सर्वेक्षण विदाचा आधार नव्हता.

2018-19 ते 2022-23 दरम्यान या योजनेंतर्गत उद्दिष्टांच्या तुलनेत वर्ष-निहाय प्रवेश **तक्ता 2.1** मध्ये दर्शविले आहेत.

तक्ता 2.1: उद्दिष्ट, मंजूर शाळांची संख्या, प्रवेश व निर्धारित उद्दिष्टाच्या तुलनेत प्रवेशातील तूट यांचा वर्ष-निहाय तपशील

वर्ष	उद्दिष्ट	विभागाने मंजूर केलेल्या शाळांची संख्या	विभागाने मंजूर केलेले नवीन प्रवेश	प्रत्यक्ष प्रवेश	मंजूर नवीन प्रवेशाच्या तुलनेत प्रवेशातील टक्केवारीत घट
2018-19	25000	176	4,167	2,773	33
2019-20	25000	173	5,675	4,466	21
2020-21	25000	कोविड-19 महामारीमुळे 2020-21 या वर्षात 22 मे 2020 च्या शासन निर्णयाद्वारे या योजनेला स्थगिती देण्यात आली होती. नवीन प्रवेश दिले नव्हते, फक्त विद्यमान विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवले होते.			
2021-22	25000	163	2,975	2,731	8
2022-23	25000	157	2,910	2,050	30

स्रोत: आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी सादर केलेली माहिती

तक्ता 2.1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे नवीन प्रवेशांसाठी जरी 25,000 उद्दीष्ट होते तरी 2018-19 ते 2022-23 या वर्षात मंजूर झालेल्या एकूण जागा फक्त 2,910 ते 5,675 दरम्यान होत्या. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, 2010-11 आणि 2014-15 दरम्यान वार्षिक प्रवेशांची सरासरी 2014-15 मधील उच्चांकी 2,318 सहित 1,883 होती. त्यामुळे, उद्दीष्ट 2,500 वरून 25,000 पर्यन्त वाढविणे अवास्तव होते आणि ते याबाबतच्या कोणत्याही पूर्वीच्या विदा किंवा प्राथमिक सर्वेक्षणाद्वारे समर्थित केले नव्हते.

शासनाने त्यांच्या उत्तरात (मे 2025) उद्दिष्ट साध्य करण्यातील कमतरतेचा संबंध कमी प्रमाणात प्राप्त झालेल्या अर्जांशी जोडला.

शासनाचे उत्तरच लेखापरीक्षणाने उपस्थित केलेल्या उद्दिष्टे अवास्तव असल्याच्या वादाच्या मुद्दयाचे समर्थन करते.

नवीन प्रवेशासाठी मंजूर जागांच्या तुलनेत, कमतरतेची टक्केवारी **तक्ता 2.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2021-22 मध्ये आठ ते 2018-19 दरम्यान 33 टक्के इतकी होती. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, मंजूर जागांच्या तुलनेत प्रवेशातील कमतरतेचे एक कारण वाटप केलेल्या शाळा (प्रथमत: जवळच्या शाळेत प्रवेश दिला जातो आणि जागा उपलब्ध नसल्यास,विद्यार्थ्यांना पुढच्या जवळ असलेल्या शाळेत प्रवेश दिला जातो) घरापासून दूर असल्यामुळे होती. तसेच, **परिच्छेद 2.1.5.1** मध्ये चर्चिल्याप्रमाणे शाळांना मान्यता मिळण्यास विलंब झाल्यामुळे पात्र विद्यार्थ्यांनी इतर शाळांमध्ये प्रवेश घेतल्याची शक्यता नाकारता येत नाही.

योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शाळांकडून अर्ज मागविणाऱ्या जाहिराती विभाग प्रसिद्ध करतो तरी, विभागाने मंजूर केलेल्या शाळांची संख्या 176 (2018-19) वरून 157 (2022-23) इतकी घटली. वर्ष 2022-23 वगळता विद्यार्थ्यांकडून योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येचा संकलित विदा विभागाकडे उपलब्ध नव्हता. वर्ष 2022-23 मध्ये विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी प्राप्त झालेल्या पात्र अर्जांची संख्या मंजूर 2,910 जागांच्या तुलनेत 4,883[7] इतकी होती. अशाप्रकारे, योजनेंतर्गत प्रवेशासाठी मागणी असूनही योजनेंतर्गत सहभागी होणाऱ्या शाळांच्या संख्येत झालेल्या घटीमुळे, परिणामी मंजूर जागांच्या संख्येत घट झाली आणि योजनेंतर्गत लाभ मिळण्यापासून पात्र विद्यार्थी वंचित राहिले.

विभागाने, म्हणूनच, पात्र विद्यार्थ्यांचा अंतर्भाव परिणामकारकतेने वाढविण्यासाठी शाळांच्या मर्यादित सहभागाच्या कारणांचा आढावा घ्यावा.

2.1.4.2 2022-23 दरम्यान पात्र विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले

विभागाने जारी केलेल्या (मे 2017) शासन निर्णयानुसार योजनेंतर्गत नवीन प्रवेश देताना ते पहिल्या व दुसऱ्या इयत्तेत देणे आवश्यक होते. त्यानुसार, धोरणाप्रमाणे वर्ष 2021-22 पर्यन्त योजनेंतर्गत शैक्षणिक प्रवेश करण्यात आले होते.

शैक्षणिक वर्ष 2022-23 साठी, विभागाने सुरुवातीला फेब्रुवारी 2022 मध्ये पहिल्या व दुसऱ्या इयत्तेसाठी पात्र अर्जदारांकडून अर्ज मागवले होते. तथापि, त्यानंतर जुलै 2022 मध्ये समितीच्या झालेल्या बैठकीत योजनेंतर्गत इयत्ता दुसरीमध्ये प्रवेश दिला जाणार नाही असा निर्णय झाला आणि त्यामुळे, 2022-23 या वर्षात **तक्ता 2.2** मध्ये दिलेल्या तपशीलानुसार 1,902 पात्र अर्जदारांना प्रवेश नाकारण्यात आला.

---

[7] अतिरिक्त आदिवासी आयुक्त ठाणे: 559; अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नाशिक: 3,204; अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नागपूर: 553 आणि अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती: 567

तक्ता 2.2: वर्ष 2022-23 मध्ये इयत्ता दुसरीत प्रवेश नाकारलेले पात्र विद्यार्थी

अतिरिक्त आदिवासी आयुक्त	पात्र अर्जांची संख्या	प्रवेशासाठी मंजूर जागांची संख्या	प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या	प्रवेश नाकारलेल्या विद्यार्थ्यांची संख्या (टक्केवारी)
1	**2**	**3**	**4**	**5=(2-4)**
नाशिक	896	0	0	896(100)
ठाणे	481	0	0	481(100)
नागपूर	401	0	0	401(100)
अमरावती	243	0	119	124(51)
एकूण	**2,021**	**0**	**119**	**1,902(94)**

स्रोत: विभागाने सादर केलेली माहिती

विद्यार्थ्यांना इयत्ता दुसरीत प्रवेश न देण्याचा समितीचा निर्णय मे 2017 मध्ये शासनाने जारी केलेल्या निर्णयात प्रस्तावित शासनाच्या धोरणाच्या विरुद्ध होता.

शासनाने त्यांच्या उत्तरात, नमूद केले (मे 2025) की औपचारिक शिक्षण इयत्ता पहिलीपासून सुरू होत असल्याने समितीने इयत्ता दुसरीत प्रवेश न देण्याचा निर्णय घेतला.

उत्तर स्वीकारार्ह नाही, कारण इयत्ता दुसरीत प्रवेश न देण्याचा समितीचा निर्णय शासनाच्या धोरणाच्या विरुद्ध होता.

तसेच, विभागाने जारी केलेल्या (ऑगस्ट 2009) शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटीनुसार आदिम जमाती, विधवा, घटस्फोटित, निराधार, परित्यक्ता व दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींच्या मुलांना प्रवेशात प्राधान्य देण्यात येणार होते. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की वर्ष 2022-23 मध्ये प्रकल्प कार्यालय, पेण येथे निवडलेल्या प्रवर्गांना अपेक्षित प्राधान्य न देता विद्यार्थ्यांची निवड करण्यात आल्याने दारिद्र्यरेषेखालील प्रवर्गातील सहा पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले.

शासनाने त्यांच्या उत्तरात, नमूद केले (मे 2025) की, ऑगस्ट 2009 मध्ये जारी केलेल्या शासन निर्णयातील निर्देशांनुसार प्रकल्प अधिकाऱ्यांनी प्रवेशाला प्राधान्य दिले होते.

उत्तर स्वीकारार्ह नाही, कारण लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आलेली प्रकरणे हे दर्शवितात की शासन निर्णयामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्राधान्य निकषांचे काटेकोरपणे पालन केले जात नव्हते.

2.1.4.3 शाळांच्या श्रेणीमध्ये सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शक सूचनांचा अभाव

शैक्षणिक व पायाभूत सुविधांच्या आधारे शाळांचे मूल्यमापन करण्यासाठी विभागाने शाळांसाठी श्रेणी प्रणाली सुरू[8] (जून 2016) केली. दरवर्षी इच्छुक शाळा ऑनलाइन

[8] शैक्षणिक वर्ष 2014-15 पर्यन्त योजनेंतर्गत निवडलेल्या शाळांना प्रती विद्यार्थी प्रती वर्ष ₹50,000/- प्रदान केले जात होते. वर्ष 2015-16 पासून महानगरपालिका क्षेत्र, जिल्हा मुख्यालय, डोंगराळ प्रदेश याच्या आधारे शुल्क दर ₹40,000/- ते ₹50,000/- दरम्यान होते.

प्रणालीद्वारे विहित नमुन्यात आवश्यक माहिती सादर करतात. या माहितीची पडताळणी अतिरिक्त आदिवासी आयुक्त/प्रकल्प अधिकाऱ्यांद्वारे शाळांच्या तपासणीद्वारे केली जाते आणि श्रेणी प्रणालीत शाळांना मिळालेल्या गुणांच्या आधारे श्रेणी दिल्या जातात.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, समितीने शाळांना दिलेल्या प्राथमिक श्रेणीमध्ये सुधारणा करण्याची कोणतीही तरतूद या योजनेत नव्हती. तसेच, या संदर्भात विभागाकडून कोणत्याही मार्गदर्शक सूचना/आदेश/परिपत्रके जारी करण्यात आली नव्हती. शिवाय, विभागाने जारी केलेल्या (मे 2018) शाळांच्या निवडीच्या प्रक्रियेत तशी तरतूद नसल्याने. सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी मार्च.2021 रोजी झालेल्या बैठकीत शाळांच्या श्रेणीमध्ये सुधारणा करण्याच्या कोणत्याही प्रस्तावावर विचार न करण्याचा निर्णय घेतला

असे निदर्शनास आले की, स्वत:च्या निर्णयाविरुद्ध विभागाने 28 शाळांच्या श्रेणीमध्ये सुधारणा केली जे खाली चर्चिले आहे.

i. विभागाने शाळांकडून आलेल्या निवेदनाला प्रतिसाद म्हणून करण्यात आलेल्या शाळांच्या फेरतपासणीवर आधारित **परिशिष्ट 2.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे नोव्हेंबर 2018 आणि मार्च 2022 मध्ये शैक्षणिक वर्ष 2018-19, 2019-20 आणि 2021-22 साठी 26 शाळांच्या श्रेणीमध्ये सुधारणा केली. या 26 शाळांमधील गुणांची टक्केवारीतील वाढ चार ते 73 टक्क्यांदरम्यान होती. शिवाय, या शाळांची श्रेणी सुधारणा समितीची मंजुरी न घेता विभागीय स्तरावर मंजूर करण्यात आली. या 26 शाळांपैकी 18 शाळांच्या श्रेणी सुधारणेची मंजुरी प्रधान सचिव, चार[9] शाळांची उप सचिव, तर उर्वरित चार[10] शाळांच्या श्रेणी सुधारणेच्या मंजुरीचे तपशील अभिलेखावर उपलब्ध नव्हते. श्रेणी सुधारणेच्या परिणामी, उप-सचिवांनी श्रेणी सुधारणा केलेल्या चार शाळांना ₹1.77 कोटीची थकबाकी प्रदान केली आणि प्रधान सचिवांनी श्रेणी सुधारणा केलेल्या 18 पैकी 12[11] शाळांना ₹7.76 कोटीची थकबाकी प्रदान केली.

विहित मार्गदर्शक तत्त्वे व प्रस्थापित कार्यपद्धती अभावी शाळांच्या श्रेणीमध्ये सुधारणा करणे व सुधारित दराने केलेली प्रदाने अयोग्य व कोणतेही अधिकार नसलेली होती, जी

---

[9] (i) एसएनडी इंग्लिश मीडियम पब्लिक स्कूल (एसएससी), नाशिक, (ii) एसएनडी इंग्लिश मीडियम पब्लिक स्कूल (सीबीएसई), नाशिक, (iii) एकलव्य इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, नांदेड, (iv) गोदावरी इंटरनॅशनल स्कूल आणि ज्युनियर कॉलेज, नांदेड.

[10] (i) राजश्री पब्लिक स्कूल, नांदेड (ii) वेलिंग्टन इंटरनॅशनल स्कूल, नांदेड, (iii) कर्नाळा स्पोर्ट्स अकादमी बार्न्स हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज, रायगड (iv) ब्रह्मा व्हॅली पब्लिक स्कूल आणि ज्युनियर कॉलेज, नाशिक

[11] (i) भावना पब्लिक स्कूल, वाशिम (2018-19) (ii) लिटल वंडर्स इंग्लिश स्कूल, छत्रपती संभाजीनगर (iii) वेलिंग्टन इंटरनॅशनल स्कूल, नांदेड (iv) एल. के. आर. आर. प्रिन्स इंग्लिश स्कूल, परभणी (v) सरस्वती इंटरनॅशनल स्कूल, हिंगोली (vi) इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, नांदेड (2018-19) (vii) मातोश्री कमलाबाई ठमके इंग्लिश स्कूल, नांदेड (viii) रेड्डीज कॉन्व्हेंट, यवतमाळ (ix) यशवंतराव चव्हाण इंग्लिश मीडियम स्कूल, मंगरूळपीर (x) सेंट्रल पब्लिक स्कूल, बुलढाणा (xi) भावना पब्लिक स्कूल, रिसोड, वाशिम (2019- 20) (xii) इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, नांदेड (2019-20)

विसंगत निर्णय आणि एकसमानता नसलेल्या आर्थिक/वित्तीय प्रघातांचे धोके वाढविणारी ठरू शकते. शाळांच्या श्रेणी सुधारासाठी विभागाने स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे आणि कार्यपद्धती विहित कराव्या आणि मूळ श्रेणी मंजूर करणाऱ्या समितीकडून अश्या सुधारणा मंजूर होत आहेत याची सुनिश्चिती करावी.

ii. 2017-18 या वर्षासाठी प्रोग्रेसिव्ह कॉन्व्हेंट स्कूल, सिव्हिल लाइन्स, गोंदिया आणि प्रोग्रेसिव्ह इंटरनॅशनल स्कूल, गोंदिया या दोन शाळांनी अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नागपूर यांच्याकडे चुकीची श्रेणी दिल्याबद्दल निवेदने सादर केली (फेब्रुवारी 2018). अतिरिक्त आदिवासी आयुक्तांनी निवेदन विभागाकडे (फेब्रुवारी 2018) पाठवले. विभागाने प्रोग्रेसिव्ह कॉन्व्हेंट स्कूलच्या संदर्भात शाळांची श्रेणी (नोव्हेंबर 2018) 69.5 वरून 70.5 आणि प्रोग्रेसिव्ह इंटरनॅशनल स्कूलच्या संदर्भात 68 वरून 70 पर्यंत सुधारित केली. प्रकल्प अधिकारी/अतिरिक्त आदिवासी आयुक्त स्तरावर कोणतीही फेरतपासणी आणि पुनर्मूल्यांकन न करता केवळ निवेदनाच्या आधारे श्रेणीमध्ये सुधारणा केली. श्रेणीमध्ये वाढ केल्यामुळे शाळांना प्रति विद्यार्थी देय शुल्क ₹50,000 वरून ₹60,000 पर्यंत वाढले. शाळांनी शैक्षणिक वर्षाच्या शेवटी त्यांचे निवेदन सादर केले आणि विभागाने कोणतीही फेरतपासणी आणि पुनर्मूल्यांकन न करता केवळ निवेदनाच्या आधारे ही निवेदने प्राप्त झाल्यानंतर आठ महिन्यांनी श्रेणीमध्ये सुधारणा केली. पुनर्तपासणी, पुनर्मूल्यांकन न करता किंवा समितीच्या मान्यतेशिवाय श्रेणीमध्ये सुधारणा करणे योग्य नव्हते.

श्रेणी सुधारणा मंजूर करण्यासाठी अधिकृत अधिकाऱ्यांना निर्दिष्ट करणारी परिभाषित मार्गदर्शक तत्त्वे किंवा कार्यपद्धती, अशा पुनरावृत्तीसाठी कालावधी इ. चा अभाव श्रेणी प्रणालीची विश्वासार्हता कमी करते आणि परिणामी अतिरिक्त प्रदानांसाह अनियंत्रित श्रेणी बदलांचा धोक्यास सामोरे जातो.

शासनाने शाळांच्या श्रेणी सुधारणा संदर्भात शासन निर्णयात तरतूद नसल्याचे मान्य केले (मे 2025).

तथापि, शासनाच्या उत्तरात शालेय श्रेणी प्रणालीची विश्वासार्हता मजबूत करण्यासाठी आवश्यक असलेल्या सुधारणेसाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे किंवा कार्यपद्धती तयार करण्यासाठी कोणतीही कारवाई केली जात असल्याचे दिसून आले नाही.

2.1.5. योजनेची अंमलबजावणी

2.1.5.1 शाळांच्या निवडीला विलंब

विभागाने या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक शाळांकडून अर्ज मागविणे, शाळांची तपासणी, शाळांच्या मान्यतेसाठी सचिवस्तरीय समितीची बैठक घेणे आदींसाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी मुदत निश्चित केली होती.

वर्ष 2018-19, 2019-20, 2021-22 आणि 2022-23 दरम्यान झालेल्या बैठकांचा तपशील आणि जारी करण्यात आलेले शासकीय निर्णय **तक्ता 2.3** मध्ये दर्शविण्यात आले आहेत.

तक्ता 2.3: शाळांच्या निवडीसाठी घेण्यात आलेल्या बैठकांचा तपशील व जारी केलेला शासन निर्णय

शैक्षणिक वर्ष	शाळा निवडीसाठी समितीची बैठक घेण्याचे उद्दिष्ट	शाळा निवडीसाठी समितीची बैठक घेतली ती प्रत्यक्ष तारीख	बैठक घेण्यास विलंब[12] (दिवसांत)	योजनेंतर्गत शाळांची निवड करण्यासाठी शासकीय निर्णय जारी करण्याची तारीख	शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासून म्हणजेच 15 जूनपासून शासकीय निर्णय जारी करण्यास विलंब (दिवसांत)
2018-19	21 एप्रिल 2018 (एप्रिल 2018 चा तिसरा आठवडा)	19/06/2018 आणि 27/07/2018	59	20/08/2018	66
2019-20	20 जानेवारी 2019	15/03/2019 आणि 03/05/2019	54	30/07/2019	45
2021-22[13]	30 एप्रिल 2021	14/07/2021	75	03/12/2021	171
2022-23	30 एप्रिल 2022	27/07/2022 07/09/2022	88	16/09/2022	93

स्त्रोत: विभागाने सादर केलेल्या माहितीवरून संकलित

तक्ता 2.3 मध्ये दर्शविल्याप्रमाणे दरवर्षी समितीची बैठक घेण्यास 54 ते 88 दिवसांचा विलंब आणि त्यानंतर संबंधित शासकीय निर्णय जारी करण्यास 45 ते 171 दिवसांचा विलंब होता.

अशाप्रकारे, विभाग स्वतःच्याच मुदतीचे पालन करण्यात अपयशी ठरला, परिणामी शाळांची निवड विलंबाने झाली आणि परिणामी विद्यार्थ्यांचे प्रवेश विलंबाने झाले. या विलंबित प्रवेशांमुळे विलंबाने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अध्यापनाचे वेळापत्रक संकुचित झाले.

शासनाने नमूद केले (मे 2025) की डिसेंबर 2022 मध्ये शासन निर्णय जारी करण्यात आला आहे ज्यामध्ये शाळांची निवड आणि विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी कालबद्ध मुदत देण्यात आली आहे आणि शाळांच्या निवडीसाठी शासकीय निर्णय जारी करण्यात विलंब होणार नाही याची सुनिश्चिती केली जाईल.

---

12 बैठक घेण्याच्या लक्षित/ठरलेल्या तारखेपासून शाळेला शैक्षणिक वर्षासाठी अंतिम मान्यता देण्यात आली त्या अंतिम बैठकीपर्यंतचा कालावधी विलंब म्हणून परिगणित केला जातो.

13 कोविड महामारीच्या दुसऱ्या लाटेमुळे, शाळांची पडताळणी आणि शासन निर्णय जारी करण्यास विलंब झाला.

लेखापरीक्षणाने शासनाने दिलेली खात्री/वचन लक्षात घेतले आहे, परंतु, शाळा निवड आणि विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी डिसेंबर 2022 मध्ये शासन निर्णय जारी करणे हे एक सकारात्मक पाऊल असले तरी, या कालमर्यादेचे पालन सुनिश्चित करण्यासाठी योग्य नियंत्रण यंत्रणा स्थापित करणे आवश्यक आहे.

2.1.5.2 अनिवार्य निकष पूर्ण न करणाऱ्या शाळांची निवड

विभागाने जारी केलेल्या (मे 2018) शासन निर्णयात या योजनेंतर्गत पात्र होण्यासाठी शाळेने किमान 60 गुण मिळवणे आवश्यक राहील, अशी तरतूद केली आहे. तसेच, **परिशिष्ट 2.2** मध्ये नमूद केलेल्या प्रपत्र ए -1 मध्ये शाळेसाठी विहित 22 अनिवार्य निकष आणि **परिशिष्ट 2.3** मध्ये नमूद केलेल्या प्रपत्र ए-2 मध्ये वसतिगृहासाठी विहित 15 अनिवार्य निकष देखील प्रस्तावित करण्यात आले. शासन निर्णय पुढे प्रस्तावित करतो की यापैकी कोणतेही अनिवार्य निकष पूर्ण केले नाहीत तर संबंधित शाळा पात्र ठरणार नाही आणि श्रेणीसाठी विचारात घेतली जाणार नाही.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, **तक्ता 2.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे पात्रतेचे अनिवार्य निकष पूर्ण न करणाऱ्या अनेक शाळांना या योजनेंतर्गत मान्यता देण्यात आली होती.

तक्ता 2.4: या योजनेंतर्गत अनिवार्य निकषांची पूर्तता न करणाऱ्या मंजूर शाळांची संख्या

वर्ष	मंजूर शाळांची संख्या	लेखापरीक्षणासाठी ज्या शाळांचे दस्तऐवज सादर करण्यात आले त्यांची संख्या	एक किंवा अधिक अनिवार्य निकषांची पूर्तता न करणाऱ्या शाळांची संख्या	60 पेक्षा कमी श्रेणी असलेल्या शाळांची संख्या	60 पेक्षा कमी श्रेणी असलेल्या आणि एक किंवा अधिक अनिवार्य निकषांची पूर्तता न करणाऱ्या शाळांची संख्या
2018-19	176	173	134	76	71
2019-20	173	167	113	43	37
2021-22	163	149	81	1	1
2022-23	157	151	88	1	1

स्रोत: विभागाकडून संकलित केलेली माहिती

तक्ता 2.4 मध्ये दर्शविल्याप्रमाणे एक किंवा अधिक अनिवार्य निकष पूर्ण न करणाऱ्या 81 ते 134 दरम्यान असणाऱ्या शाळा योजनेंतर्गत निवडल्या होत्या. तसेच, 60 हून कमी श्रेणी असलेल्या शाळा देखील निवडण्यात आल्या होत्या.

लेखापरीक्षणात पुढे असेही निदर्शनास आले की,

- 2018-19 या शैक्षणिक वर्षासाठी अनिवार्य पात्रता निकष पूर्ण न करणाऱ्या 134 पैकी 95 शाळांना एक वर्षाच्या कालावधीत पात्रतेचे सर्व निकष पूर्ण करतील या अटीवर मान्यता देण्यात आली. या 95 शाळांपैकी 68 शाळांनी (71 टक्के) दिलेल्या मुदतीत आवश्यक अनिवार्य अटी पूर्ण केल्या नाहीत आणि शाळांनी आवश्यक अनिवार्य अटींची पूर्तता करण्याची सुनिश्चिती करण्यात विभागही अपयशी ठरला. तरीही, पुढील शैक्षणिक वर्ष 2019-20 साठी या शाळांना मान्यता देण्यात आली होती.
- याचप्रमाणे, अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नागपूर अंतर्गत वर्ष 2018-19 साठी सात अपात्र शाळांना एक ते तीन महिन्यांच्या कालावधीत अनिवार्य निकषांची पूर्तता त्या शाळांनी करावी, या अटीवर मान्यता देण्यात आली होती. दिलेल्या मुदतीत शाळेने अनिवार्य निकष पूर्ण केल्याची खातरजमा केल्यानंतर या शाळा योजनेंतर्गत सुरू ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात येणार होता. मात्र, शाळांची पात्रता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही विभागाकडून करण्यात आली नव्हती.
- 2018-19 ते 2019-20 आणि 2021-22 ते 2022-23 या कालावधीतील 128 मान्यताप्राप्त शाळांच्या बाबतीत विहित प्रपत्र ए-1 आणि ए-2[14] संबंधित विभागीय प्राधिकरणाने प्रमाणित केले नव्हते. हे प्रपत्र महत्त्वपूर्ण होते कारण ते अनुक्रमे शाळा आणि वसतिगृहांसाठी अनिवार्य निकषांची पूर्तता प्रमाणित करतात. विभागीय प्राधिकरणाकडून प्रपत्रांच्या योग्य पडताळणीच्या अभावी शाळांनी अनिवार्य पात्रतेच्या निकषांचे पालन केल्याची सत्यता लेखापरीक्षणात पडताळता आली नाही.

दिलेल्या कालावधीत पात्रतेचे निकष पूर्ण करण्यात अपयशी ठरलेल्या शाळांना वारंवार मान्यता दिल्यामुळे अशा अपात्र शाळा या योजनेंतर्गत कार्यरत राहिल्या.

अनिवार्य आवश्यकता पूर्ण करण्यात अपयशी ठरलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यामुळे शिक्षणाच्या दर्जाशी संभाव्य तडजोड होतेच शिवाय अनिवार्य आवश्यकता पूर्ण न करणाऱ्या शाळांना निधी वितरित केला गेला.

शासनाने नमूद केले (मे 2025) की सर्व शाळांच्या निरीक्षणासाठी कृती करण्यात येईल आणि एखादी शाळा अनिवार्य आवश्यकता पूर्ण करीत नसेल तर शाळेला दिलेली मान्यता रद्द करण्यात येईल.

लेखापरीक्षणात पुढे असेही निदर्शनास आले की **तक्ता 2.5** मध्ये नमूद केल्याप्रमाणे अनेक मान्यताप्राप्त शाळांमध्ये शाळा आणि वसतिगृहांसाठी काही महत्त्वाचे अनिवार्य निकष पूर्ण केले जात नव्हते.

[14] प्रपत्र ए 1 आणि ए 2 मध्ये अनुक्रमे शाळा आणि वसतिगृहांसाठी विहित अनिवार्य निकष आहेत.

तक्ता 2.5: महत्त्वाचे अनिवार्य निकष पूर्ण न करणाऱ्या शाळांची वर्ष-निहाय संख्या

अनु. क्र.	प्रकार	मान्यतेसाठी आवश्यक असणारे अनिवार्य निकष	शाळांची संख्या (टक्के)			
			2018-19	2019-20	2021-22	2022-23
1	शाळा	ज्या शाळांमध्ये 90 टक्के शिक्षक इंग्रजी माध्यमातून शिक्षण न घेतलेले होते अश्या शाळा .	88(50)	71(41)	67(41)	63(40)
2		ज्या शाळांमध्ये 10वी च्या किमान तीन तुकड्या उत्तीर्ण झालेल्या नाहीत अश्या शाळा	50(28)	50(29)	18(11)	14(09)
3		ज्या शाळांमध्ये प्रयोगशाळा सहाय्यकासह भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांची प्रयोगशाळा उपलब्ध नाही अश्या शाळा	39(22)	24(14)	2(01)	8(5)
4		ज्या शाळांमध्ये किमान 20 संगणक (इंटरनेट आणि इतर आधुनिक सुविधांसह) आणि पाच प्रिंटर उपलब्ध नाहीत	30(17)	19(11)	3(02)	7(4)
5		ज्या शाळांमध्ये प्रत्येक मजल्यावर प्रत्येकी 20 विद्यार्थ्यांसाठी एक स्नानगृह आणि एक शौचालय उपलब्ध नाहीत	31(18)	37(21)	17(10)	22(14)
6	वसतिगृह	ज्या शाळांमध्ये मुला-मुलींच्या निवासासाठी स्वतंत्र इमारती उपलब्ध नाहीत. एकाच इमारतीत राहण्याची सोय असल्यास, पक्के विभाजन नाही आणि मुला-मुलींसाठी स्वतंत्र प्रवेशद्वार उपलब्ध नाहीत.	17(10)	15(09)	10(06)	4(03)
7		वसतिगृहातील स्वयंपाकघर अन्न व औषध प्रशासन आणि अग्निशमन विभागाकडून मंजूर नाही	39(22)	13(08)	22(13)	7(04)
8		वसतिगृहाच्या भोजन कक्षामध्ये प्रत्येक 15 विद्यार्थ्यांमागे एक वॉश बेसिन उपलब्ध नाही	36(20)	22(13)	8(05)	7(04)

अनु. क्र.	प्रकार	मान्यतेसाठी आवश्यक असणारे अनिवार्य निकष	शाळांची संख्या (टक्के)			
			2018-19	2019-20	2021-22	2022-23
9		प्रत्येक मजल्यावर प्रत्येक 20 विद्यार्थ्यांसाठी एक स्नानगृह आणि शौचालय उपलब्ध नाही	20(11)	17(10)	6(04)	7(04)
10		आराम खोली आणि पूर्णवेळ/अर्धवेळ प्रशिक्षित डॉक्टर किंवा नर्स उपलब्ध नाही	17(10)	19(11)	8(05)	4(03)

स्त्रोत: विभागाने सादर केलेल्या माहितीवरून संकलित

तक्ता 2.5 मध्ये दर्शविल्याप्रमाणे, जोखीम-आधारित बाबींचे केलेले एकत्रीकरण खाली दर्शविले आहे.

➢ उच्च जोखीम समस्या (पद्धतशीर/सतत)
- इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या शिक्षकांचे अपुरे प्रमाण
- 2022-23 मध्ये देखील सुमारे 40% अनुपालन केले गेले नाही
- सुचनांच्या गुणवत्तेसाठी थेट परिणामांसह संरचनात्मक मानव संसाधन मर्यादा.
- शाळांमध्ये स्वच्छतागृहांची अपुरी सुविधा (प्रत्येक विद्यार्थ्यानुसार शौचालये/स्नानगृहे)
- विद्यार्थ्यांसाठी आरोग्य, सुरक्षा आणि सन्मानाचे महत्त्व.
- 2022-23 मध्ये परावर्तनाच्या चिन्हांचे सातत्याने अनुपालन न करणे.

➢ मध्यम-जोखीम समस्या (सुधारत आहे परंतु अस्थिर)
- वसतिगृह स्वयंपाकघर मंजुरी (अन्न व औषध प्रशासन प्राधिकरण/अग्निशमन विभाग)
- काळानुसार सुधारणा परंतु कमकुवत शाश्वतता दर्शविणारे वर्षानुवर्षे होणारे चढ-उतार .
- वसतिगृहांमध्ये वॉश बेसिन, स्नानगृहे आणि वैद्यकीय सुविधांची उपलब्धता.
- गैर-अनुपालन कमी झाले, परंतु नियमित देखरेखीऐवजी नियतकालिक तपासणीवर अवलंबून राहणे सुरू राहिले.

➢ कमी जोखमीच्या समस्या (मोठ्या प्रमाणात संबोधित केलेल्या) .
- विज्ञान प्रयोगशाळा आणि प्रयोगशाळा सहाय्यकांची उपलब्धता .
- संगणक, इंटरनेट आणि प्रिंटरची उपलब्धता.
- मुला-मुलींच्या वसतिगृहाचे विभाजन.

जवळपास सर्वच अनिवार्य निकषांमध्ये, 2018-19 आणि 2022-23 दरम्यान अनुपालन न करण्यामध्ये स्पष्टपणे घसरता कल दिसून आला आहे जो दर्शवितो:

- सुधारात्मक कारवाई सुरू करण्यात आली, आणि
- नियामक दबाव किंवा संनियंत्रणाचा काही परिणाम झाला होता.

तथापि, सुधारणा एकरेषीय किंवा एकसमान नाही आणि अनेक मूलभूत पायाभूत सुविधा आणि सुरक्षा मापदंडांमध्ये, 2022-23 मध्येही भौतिक पातळीवर गैर-अनुपालन कायम आहे.

शासनाने नमूद केले (मे 2025) की यापुढे केवळ पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या शाळांना योजनेंतर्गत समाविष्ट केले जाईल.

शासनाचे उत्तर, तरीही, अनिवार्य निकष पूर्ण करणाऱ्या शाळांना योजनेंतर्गत समाविष्ट केल्याची सुनिश्चिती करण्यासाठी आणि पूर्वीच्या अपात्र शाळांना योजनेंतर्गत समाविष्ट केल्याबद्दल जबाबदारी ठरविण्यासाठी कृती केल्याची सुनिश्चिती करण्यासाठी नियंत्रण यंत्रणेबद्दल निर्देश करीत नाही.

2.1.5.3 समितीच्या मान्यतेशिवाय शाळांना मान्यता देणे

2019-20 या शैक्षणिक वर्षासाठी शाळांची निवड आणि नवीन प्रवेशांना मंजुरी देण्यासाठी मार्च 2019 आणि मे 2019 मध्ये समितीच्या बैठका झाल्या होत्या. जुलै 2019 मध्ये चार अतिरिक्त आदिवासी आयुक्तांना एकूण 167[15] शाळांना मान्यता देणारे शासन निर्णय जारी करण्यात आले होते.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, समितीच्या मान्यतेशिवाय 2019-20 या शैक्षणिक वर्षासाठी आणखी तीन शाळांचा विशेष बाब म्हणून योजनेत समावेश करण्यास विभागाने मान्यता (सप्टेंबर 2019) दिली. या प्रकरणांचा तपशील खाली दर्शविला आहे:

- दहावीच्या तीन तुकड्या पूर्ण उत्तीर्ण होण्याच्या अनिवार्य निकषांची पूर्तता न केल्याने सोलापूर येथील लोकमंगल इंग्रजी माध्यम शाळेची समितीने निवड केली नव्हती. मात्र, विशेष बाब म्हणून अतिरिक्त आदिवासी आयुक्त, ठाणे यांच्या शिफारशीनुसार विभागाने शाळेला मान्यता दिली.
- शाळांसाठी 22 अनिवार्य निकषांपैकी 13 आणि वसतिगृहासाठी 15 अनिवार्य निकषांपैकी नऊ निकषांची पूर्तता न केल्याने आणि श्रेणी 60 पेक्षा कमी असल्याने गडचिरोली येथील ग्रीनलँड इंग्रजी माध्यम शाळेचा प्रस्ताव समितीने फेटाळून लावला होता. माननीय मंत्री, आदिवासी विकास विभाग यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नागपूर यांनी शाळेची फेरतपासणी केली. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नागपूर यांनी शाळेची फेरतपासणी करून आवश्यक सुविधांअभावी शाळेची मान्यता रद्द करण्याची शिफारस केली (ऑगस्ट 2019) होती. समितीने शाळेची मान्यता रद्द केली असूनही आणि फेरतपासणीतही शाळांमध्ये आवश्यक सोयीसुविधांचा अभाव आढळून आल्यानंतरही विभागाकडून विशेष बाब म्हणून शाळेला मान्यता देण्यात आली.

[15] अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती(44), अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नागपूर(44), अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नाशिक(49), अतिरिक्त आदिवासी आयुक्त, ठाणे(30)

- एमडीए रॉयल इंटरनॅशनल शाळेने जानेवारी 2019 मध्ये योजनेंतर्गत ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अट डावलून ऑफलाइन अर्ज सादर केला. त्यानंतर अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांना शाळेची तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शाळा आवश्यक निकषांची पूर्तता करत नसल्याचे तपासणीत निदर्शनास आले. तरीही विशेष बाब म्हणून शाळेची निवड करून 500 नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला.

समितीने मान्यता न दिलेल्या या तीन शाळांना 2019-20 या शैक्षणिक वर्षासाठी ₹2.82 कोटी देण्यात आल्याचे लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले. विहित प्रक्रियेचे पालन न करता या तीन शाळांना मान्यता दिल्याने पारदर्शकतेशी तडजोड केली गेली आणि निवड प्रक्रियेला पक्षपात आणि सार्वजनिक निधीच्या चुकीच्या वाटपाचा धोका निर्माण झाला.

शासनाने नमूद केले (मे 2025) की माननीय मंत्र्यांच्या आदेशानुसार शाळांना मंजुरी देण्यात आली.

उत्तर स्वीकारार्ह नाही कारण शाळांना मान्यता देण्याचे अधिकार सचिव स्तरीय समितीला होते. समितीने आधीच नाकारलेल्या/विचारात न घेतलेल्या शाळांना मान्यता देणे हे योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन आहे. शिवाय, मान्यता नसलेल्या शाळांच्या समावेशामुळे नियम-आधारीत प्रशासनाला बगल देवून प्रणालीत पक्षपात होण्याचा धोका प्रतिबिंबित होतो.

2.1.5.4 समितीच्या मान्यतेशिवाय विद्यार्थ्यांसाठी नवीन प्रवेश

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की विभागाने खाली दिलेल्या तपशीलानुसार समितीच्या मान्यतेशिवाय शैक्षणिक वर्ष 2018-19 आणि 2019-20 साठी 10 शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त नवीन प्रवेश देण्यास मान्यता दिली.

- शैक्षणिक वर्ष 2018-19 साठी एका[16] शाळेत समितीने 75 नवीन प्रवेशांना मान्यता दिली, परंतु विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयात मूळच्या मान्यतेपेक्षा 25 ने जास्त अश्या 100 नवीन प्रवेशांना मान्यता देण्यात आली, त्याचप्रमाणे तीन[17] शाळांमध्ये या समितीने कोणत्याही नवीन प्रवेशाला मान्यता दिली नाही. मात्र, विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयात दोन शाळांसाठी 100 नवीन प्रवेश आणि एका शाळेसाठी 150 नवीन प्रवेशांना मान्यता देण्यात आली.

---

16 आर.पी. गोडगे पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, सिन्नर.

17 (i) ॐ गुरुदेव इंग्लिश मीडियम स्कूल, अहिल्यानगर (ii) परिक्रमा पब्लिक स्कूल, अहिल्यानगर (iii) आत्मा मलिक इंग्लिश मीडियम गुरुकुल, नाशिक.

- शैक्षणिक वर्ष 2019-20 साठी तीन शाळांमध्ये[18] नवीन प्रवेशासाठी एकूण 200 जागा समितीने मंजूर केल्या होत्या. मात्र, या तिन्ही शाळांना विशेष बाब म्हणून 100 अतिरिक्त जागा मंजूर करण्यात आल्या होत्या. इतर तीन शाळांमध्ये[19] समितीने नवीन प्रवेश मंजूर केले नाहीत. मात्र, या तिन्ही शाळांना विशेष बाब म्हणून 250 नवीन प्रवेश मंजूर करण्यात आले होते.

  समितीच्या शिफारशींचा संदर्भ न घेता अतिरिक्त नवीन प्रवेशांना मंजुरी देऊन, विभागाने संस्थात्मक मान्यता यंत्रणा कमकुवत केली आणि प्रवेश क्षमतेच्या मनमानी विस्तारासाठी वाव निर्माण केला.

शासनाने नमूद केले (मे 2025) की माननीय मंत्र्यांच्या आदेशानुसार नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला.

विहित प्रक्रियेचे पालन न करता चार शाळांमध्ये मंजूर झालेल्या अतिरिक्त जागांमुळे पारदर्शकतेशी तडजोड झाली आणि निवड प्रक्रियेला पक्षपात आणि सार्वजनिक निधीच्या चुकीच्या वाटपाचा धोका निर्माण झाला म्हणून हे उत्तर स्वीकारार्ह नाही.

2.1.5.5 सचिव स्तरावरील समितीने मंजूर केलेल्या शाळांना मान्यता देण्यात येणाऱ्या शासन निर्णयातून वगळले गेले.

विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयात (ऑगस्ट 2009) अशी तरतूद होती की शाळांची निवड सचिव स्तरावरील समितीद्वारे केली जाईल जी शाळांची निवड करण्यासाठी आणि त्यांना देय शुल्क निश्चित करण्यासाठी एकमेव प्राधिकारी असेल.

लेखापरीक्षणात निदर्शनास आले की, 2018-19 साठी शाळांची निवड करण्यासाठी जून आणि जुलै 2018 मध्ये सचिव स्तरावरील समितीची बैठक झाली होती. या समितीने अतिरिक्त आदिवासी आयुक्त नाशिक अंतर्गत 53 शाळांना मान्यता दिली असली तरी त्यानंतरच्या ऑगस्ट 2018 मध्ये जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयात केवळ 47 शाळांचा समावेश होता. अश्याप्रकारे, शासन निर्णयात या मान्यताप्राप्त सहा[20] शाळांना वगळण्यात आले होते. लेखापरीक्षणात या सहा शाळांना 2018-19 या वर्षासाठी एकूण ₹16.19 कोटी प्राप्त झाले होते हे निदर्शनास आले.

---

[18] (i) एस.एन.डी. इंग्लिश मीडियम स्कूल (सी.बी.एस.ई.), नाशिक (ii) प्रवरा पब्लिक स्कूल, अहिल्यानगर (iii) प्रवरा गर्ल्स इंग्लिश मीडियम स्कूल, अहिल्यानगर.

[19] (i) मार्कंडेय पब्लिक स्कूल, यवतमाळ (ii) भावना पब्लिक स्कूल, वाशिम (iii) एस.एन.डी.इंग्लिश मीडियम स्कूल (एस.एस.सी.), नाशिक

[20] (1) हस्ती पब्लिक स्कूल, दोंडाईचा, धुळे (2) डी.एस.अहीर पब्लिक स्कूल, विठेवाडी, नाशिक (3) ब्रह्मा व्हॅली पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेज, अजनेरी, नाशिक (4) शताब्दी इंग्लिश मीडियम स्कूल, अगासखिंड, नाशिक (5) बियानी पब्लिक स्कूल, भुसावळ, जळगाव (6) जैन इंटरनॅशनल स्कूल, पळसखेडा, जळगाव

समितीने मंजूर केलेल्या परंतु शासन निर्णयात वगळलेल्या शाळांची नावे शासन निर्णय जारी करण्यातील आणि वैध मंजुरी आदेशाशिवाय केलेल्या प्रदानातील अनियमितता अंतर्गत नियंत्रण कमकुवत असल्याचे दर्शवितात.

उत्तरादाखल शासनाने नमूद केले (मे 2025) की, सचिव स्तरावरील समितीने 27.07.2018 रोजी 53 शाळांना मान्यता दिली असली तरी, या संदर्भात जारी करण्यात आलेल्या संबंधित शासन निर्णयात केवळ 47 शाळांचा समावेश होता. समितीच्या मंजुरीच्या आधारे या सहा शाळांना अनुदान मंजूर करण्यात आले.

उत्तर स्वीकारार्ह नाही कारण शासन निर्णयाद्वारे औपचारिक केल्यावरच योजनेंतर्गत शाळांची मान्यता वैध असते. या सहा शाळांचा समावेश असलेले शासकीय निर्णय अस्तित्वात नसल्यामुळे, अनुदान जारी करण्यास योग्य मंजुरी नव्हती. जारी केलेल्या शासन निर्णयात या शाळांचा समावेश नसल्याने त्यांची मान्यता आणि संबंधित खर्च अनियमित ठरले.

2.1.5.6 योजनेंतर्गत रद्द करण्यात आलेल्या शाळा सुरू ठेवल्या गेल्या

शैक्षणिक वर्ष 2022-23 साठी शाळांच्या निवडीसाठी शासन निर्णय सप्टेंबर 2022 मध्ये जारी करण्यात आले होते आणि अनिवार्य अटींची पूर्तता न केल्यामुळे, आवश्यक सुविधांचा अभाव आणि शाळांचे कमी श्रेणी गुण यामुळे चार[21] अतिरिक्त आदिवासी आयुक्त अधिकार क्षेत्रातील 13 शाळांची मान्यता रद्द करण्यात आली होती.

रद्द करण्यात आलेल्या 13 शाळांमधील विद्यार्थ्यांना शासकीय इंग्रजी माध्यम शाळा व योजनेंतर्गत इतर शाळांमध्ये समायोजित करण्यासाठी संबंधित अतिरिक्त आदिवासी आयुक्तांनी आयुक्त, आदिवासी विकास विभागामार्फत सात दिवसांच्या आत विभागाला प्रस्ताव सादर करणे आवश्यक होते. मात्र, या संदर्भात विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. त्यानंतर विभागाने वर्षाच्या मध्यात हस्तांतरित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे संभाव्य शैक्षणिक नुकसान पाहून रद्द केलेल्या शाळांना एक वर्षाची सूट दिली (नोव्हेंबर 2022).

अश्याप्रकारे, शासन निर्णयास विलंब झाल्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांचा अभाव असलेल्या शाळांमध्ये शिक्षण घेणे भाग पडले.

शासनाने हे मान्य केले (मे 2025) की शैक्षणिक वर्षाच्या मध्यभागी इतर शाळांमध्ये झालेल्या समायोजनामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान लक्षात घेऊन शाळांना एक वर्षाची सूट देण्यात आली.

उत्तर स्वीकारार्ह नाही कारण शासन निर्णय जारी करण्यात विभागाने केलेला विलंब ही टाळता येण्याजोगी चूक होती, ज्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली की अनिवार्य आवश्यकता पूर्ण न करणाऱ्या शाळांना सवलत द्यावी लागली. यामुळे विद्यार्थ्यांना

[21] ठाणे, नाशिक, अमरावती आणि नागपूर

विहित शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांच्या मानकांचा अभाव असलेल्या संस्थांमध्ये जावे लागले.

2.1.5.7 शिक्षकांची इंग्रजी भाषेची परीक्षा न घेणे

विभागाने एक आदेश जारी केला (जून 2018) की शाळांमधील शिक्षकांना इंग्रजी भाषा वाचता, लिहिता आणि अस्खलितपणे बोलता येणे आवश्यक आहे. या संदर्भात शिक्षकांची परीक्षा विभागाकडून घेणे आवश्यक होते आणि ही परीक्षा शाळांसाठी बंधनकारक होती.

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की विभागाने 2018-19 ते 2022-23 या कालावधीत कोणत्याही शाळेतील शिक्षकांसाठी अश्या प्रकारच्या कोणत्याही परीक्षा घेतल्या नाहीत. परिणामी, आदेशात नमूद केल्यानुसार आवश्यक परीक्षा न घेतल्याने, इंग्रजी भाषेमध्ये प्रावीण्य असलेले सक्षम शिक्षक शाळांमध्ये कार्यरत आहेत की नाही याची खातरजमा विभागाने केली नव्हती.

शासनाने लेखापरीक्षण निरीक्षण स्वीकारले आणि नमूद केले (मे 2025) की शाळांच्या शिक्षकांसाठी इंग्रजी भाषेची आवश्यक परीक्षा घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शिक्षकांसाठी आवश्यक इंग्रजी भाषेची परीक्षा घेण्याच्या सूचना आता देण्यात आल्या आहेत, असे शासनाने नमूद केले असले तरी त्याच्या अंमलबजावणीसाठी कोणतीही कालबद्ध योजना आखलेली नाही. वस्तुस्थिती अशी राहिली आहे की, वर्षानुवर्षे ही परीक्षा न घेतल्यामुळे शिक्षकांकडे आवश्यक इंग्रजी प्रावीण्य आहे याची खातरजमा विभागाला करता आली नाही. परिणामी, शाळा ज्या सेवांसाठी निधी प्राप्त करतात त्या सेवा देत आहेत याची खात्री नाही, ज्यामुळे इंग्रजी माध्यमात शिक्षण देण्याचे उद्दीष्ट विफल ठरले.

2.1.6 वित्तीय व्यवस्थापन

2.1.6.1 शाळांनी योजनेसाठी स्वतंत्र लेखे तयार करण्याच्या निर्देशांचा अभाव

आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी जारी केलेला (जून 2016 व मे 2018) शासन निर्णय प्रस्तावित करतात की या योजनेंतर्गत निवड झालेल्या शाळांना ऑनलाइन प्रणालीत शाळांना प्राप्त झालेल्या श्रेणीच्या आधारे प्रति विद्यार्थी वार्षिक शुल्क प्रदान केले जावे. शिक्षण शुल्क, पुस्तके व लेखन सामग्री, खानावळ शुल्क, शालेय गणवेष व विद्यार्थ्यांना वितरित करण्यात येणारे इतर साहित्य, वसतिगृहाचा खर्च आदी खर्च भागविण्यासाठी शाळांना एकरकमी शुल्क प्रदान केले जाते.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये या योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधीच्या संदर्भात शाळेद्वारे स्वतंत्र लेखे ठेवण्याची तरतूद नव्हती. शाळांना वितरित केलेला निधी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वापरला गेला की नाही याबाबतही विभागाकडे कोणतीही माहिती नव्हती.

शाळांनी स्वतंत्र लेखे न ठेवल्याबद्दलचे परिच्छेद भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वर्ष 2014-15 साठीच्या अहवालात देखील समाविष्ट करण्यात आले होते. लेखापरीक्षण निरीक्षणाच्या उत्तरादाखल विभागाने शाळांनी स्वतंत्र लेखे ठेवण्याबाबत निर्देश जारी करण्याचे मान्य केले होते. विभागाने लोकलेखा समितीच्या बैठकीमधील चर्चेमध्ये शाळा स्वतंत्र लेखे ठेवत असल्याचे नमूद केले. परंतु, विभागाच्या अभिलेखांमध्ये स्वतंत्र लेखे ठेवण्याबाबतचे कोणतेही आदेश/शासन निर्णय मिळाले नाहीत.

शासनाने नमूद केले (फेब्रुवारी 2024) की योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधीसाठी शाळांनी स्वतंत्र लेखे ठेवण्याबाबत निर्देश जारी केले जातील.

विभागाने यापूर्वी स्वतंत्र लेखे ठेवण्यासाठी सूचना देण्याचे मान्य केले होते आणि त्यानंतर लोकलेखा समितीसमोर सादर केले होते की असे लेखे ठेवले जात होते, परंतु ते सिद्ध करण्यासाठी कोणतेही आदेश किंवा शासन निर्णयासंबंधीचे अभिलेख उपलब्ध नव्हते. सूचना जारी केल्या जातील या शासनाच्या उत्तराने निष्क्रियता कायम असल्याचे निर्देशित केले.

2.1.6.2 शाळांना योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधीसंदर्भात उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याबाबतच्या सूचनांचा अभाव

विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयात (जून 2016 व मे 2018) या योजनेंतर्गत निवड झालेल्या शाळांना शिक्षण शुल्क, पुस्तके व लेखनसामग्री, खानावळ शुल्क, शालेय गणवेष व विद्यार्थ्यांना वितरित करण्यात येणारे इतर साहित्य, वसतिगृहाचा खर्च आदी खर्च भागविण्यासाठी शाळेच्या श्रेणीनुसार प्रति विद्यार्थी वार्षिक शुल्क प्रदान करण्याचे नमूद केले होते.

मुंबई वित्तीय नियम, 1959 च्या नियम 149 अन्वये परिशिष्ट 22 मध्ये शैक्षणिक संस्था, स्थानिक संस्था, सहकारी संस्थांना देण्यात येणारी सहाय्यक अनुदाने व विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती विहित मुदतीतच इच्छित हेतूसाठीच वापरण्यात यावी, असे विहित करण्यात आले आहे. या संस्थांनी देयक पारित करण्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत सहाय्यक अनुदानासंबंधी उपयोगिता प्रमाणपत्रे विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक होते. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांच्या 12 जानेवारी 2023 च्या शासन निर्णयाद्वारे सशर्त अनुदान स्वरुपात मुख्य शीर्ष 2225-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, याखालील तपशीलवार शीर्ष 31-सहाय्यक अनुदान(वेतनेतर) अंतर्गत वितरीत केलेल्या निधीसाठी उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे असे स्पष्ट केले.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की 2018-19 ते 2023-24 या कालावधीत या योजनेंतर्गत ₹1,398.62 कोटींचे[22] अनुदान वितरित केले गेले असले तरी, शाळांना

[22] वर्ष-निहाय केलेला खर्च: 2018-19: ₹297.34 कोटी, 2019-20: ₹241.41 कोटी, 2020-21: ₹85.32 कोटी, 2021-22: ₹149.99 कोटी, 2022-23: ₹324.58 कोटी आणि 2023-24: ₹299.98 कोटी

उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी कोणत्याही सूचना/आदेश/मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली नव्हती.

शाळांना उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याची आवश्यकता असलेल्या कोणत्याही सूचना/आदेश/मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुपस्थितीमुळे निधीचा गैरवापर, फेरफार किंवा गैरवाटप होण्याचा जास्त धोका होता. अनिवार्य अहवाल आणि खर्चाची पडताळणी न करता, वितरित अनुदान इच्छित हेतूंसाठी वापरले गेले असल्याची खात्री विभागात नसल्याने वित्तीय जबाबदारी व अंतर्गत नियंत्रणे कमकुवत झाली.

शासनाने नमूद केले (मे 2025) की शाळांनी मागील वर्षांत त्यांना मिळालेल्या निधीच्या संदर्भात उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी सूचना जारी केल्या जातील आणि आवश्यक उपयोगिता प्रमाणपत्रे सादर न केल्यास शाळांना पुढील अनुदान दिले जाणार नाही याची खात्री केली जाईल.

लेखापरीक्षणाने शासनाच्या आश्वासनाची दखल घेतली तथापि, मागील आणि भविष्यातील शैक्षणिक वर्षांसाठी उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करणे, पडताळणी आणि संनियंत्रणासाठी एक औपचारिक चौकट स्थापित करणे अत्यावश्यक आहे.

2.1.6.3 अनिवासी शाळांना निवासी शाळेप्रमाणे प्रदान

या योजनेनुसार निवासी सुविधा असलेल्या शाळांमध्येच विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात होता. विद्यार्थ्यांना साबण, टूथब्रश, गणवेश, टॉवेल, बूट, दफ्तर, शाळेची पुस्तके अश्या वस्तू आणि दिवसातून दोन वेळा जेवण आणि नाश्ता देण्यात येत होता. शाळांची श्रेणी विचारात घेऊन प्रत्येक विद्यार्थ्यामागे वार्षिक शुल्क निश्चित करण्यात आले होते. शैक्षणिक वर्ष 2016-17 पासून 60 ते 69, 70 ते 79 आणि 80 वर श्रेणी असलेल्या शाळांसाठी अनुक्रमे ₹50,000, ₹60,000 आणि ₹70,000 शुल्क देय होते.

ही योजना केवळ निवासी सुविधा असलेल्या शाळांना लागू असल्याने अनिवासी शाळा[23] या योजनेसाठी पात्र नाहीत. मात्र, अनिवासी शाळांना देय असलेल्या शुल्काचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश विभागाने आयुक्तांना दिले (मे 2019) ज्याला अंतिम करण्यात आले नव्हते (फेब्रुवारी 2024).

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, ऑगस्ट 2018 आणि सप्टेंबर 2022 मध्ये शैक्षणिक वर्ष 2018-19 ते 2022-23 यासाठी अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नागपूर अंतर्गत आठ अनिवासी शाळा[24] आणि अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती अंतर्गत

---

[23] अनिवासी शाळांमध्ये विद्यार्थी फक्त दिवसाच्या वेळेत शाळेत येतात.

[24] (1) जी. एस. रायसोनी विद्यानिकेतन, सुकळी, नागपूर (2) जी. एच. रायसोनी विद्यानिकेतन अंबाझरी, नागपूर, (3) पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, भंडारा, (4) पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, गोंदिया (5) पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, नागपूर (6) रॉयल गोंडवाना पब्लिक स्कूल, नागपूर (7) आदर्श संस्कार विद्यालय, श्रीकृष्ण नगर, नागपूर, (2022-23 साठी दिवसाचे वसतिगृह) (8) आदर्श संस्कार विद्यालय, नागपूर (केवळ 2022-23 साठी दिवसाचे वसतिगृह)

अनिवासी शाळांना[25] मान्यता देण्यात आली होती आणि या शाळांना नियमित निवासी शाळांच्या समान स्तरावर ₹24.99 कोटी प्रदान केले होते. योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अनिवासी शाळांसाठी तरतूद नसल्याने अनिवासी शाळांना प्रदान केलेले ₹24.99 कोटी अनियमित[26] होते.

नऊ अनिवासी शाळांना ₹24.99 कोटी जारी केल्याने अधिक निधी प्रदान केला गेला, कारण अनिवासी शाळांना त्या प्रमाणात परिचालन खर्च करावा लागत नाही. यामुळे या योजनेवर केवळ आर्थिक बोजा निर्माण झाला नाही तर असमानता देखील निर्माण झाली आणि निवासी सुविधा प्रदान करणाऱ्या वसतिगृह शाळांची गैरसोय झाली. तसेच, योजनेंतर्गत समाविष्ट नसलेल्या शाळांच्या श्रेणीचा लाभ देऊन, विभागाने औपचारिक सुधारणा न करता योजनेच्या व्याप्तीमध्ये प्रभावीपणे बदल केला, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि योजनेच्या अंमलबजावणीची अखंडता कमी केली.

शासनाने हे मान्य केले (फेब्रुवारी 2024) की योजनेंतर्गत अनिवासी शाळांना मान्यता देण्याबाबतचे निर्देश जारी केले गेले नाहीत परंतु अनिवासी शाळेला मान्यता देण्यात आली. शासनाने पुढे नमूद केले (मे 2025) की, 2023-24 मध्ये या योजनेंतर्गत कोणत्याही अनिवासी शाळेला मान्यता देण्यात आली नाही.

उत्तर स्वीकारार्ह नाही कारण अनिवासी शाळांना मान्यता दिल्यामुळे आणि प्रदाने केल्यामुळे योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन झाले आहे, ज्यामुळे अतिरिक्त प्रदाने झाली आणि असमानता उद्‌भवली आणि औपचारिक निर्देशांच्या अनुपस्थितीमुळे या योजनेंतर्गत समाविष्ट नसलेल्या अनिवासी शाळांना मान्यता आणि प्रदाने केल्याचे समर्थन केले जात नाही.

2.1.7 संनियंत्रण आणि मूल्यांकन

2.1.7.1 त्रैमासिक तपासणी आणि आकस्मिक तपासणीचा अहवाल सादर न करणे

विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयात (ऑगस्ट 2017) अशी तरतूद आहे की प्रत्येक प्रकल्प अधिकाऱ्याने शैक्षणिक सुविधांची उपलब्धता आणि विद्‌यार्थ्यांची उपस्थिती तपासण्यासाठी प्रत्येक तिमाहीत त्याच्या अधिकारक्षेत्रातील प्रत्येक नामांकित शाळेला भेट द्‌यावी. पडताळणीनंतर प्रकल्प अधिकाऱ्याने संबंधित अतिरिक्त आदिवासी आयुक्तांमार्फत या संदर्भातील अहवाल आयुक्तांना सादर करणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, 2019-20, 2021-22 आणि 2022-23 या वर्षांसाठी शाळांची निवड अधिकृत करणाऱ्या शासन निर्णयात नमूद केले आहे की, संबंधित प्रकल्प अधिकारी पहिल्या आणि दुसऱ्या शैक्षणिक सत्रात शाळेला दोन वेळा आकस्मिक भेट देऊन विभागाला त्यांच्या संबंधित अतिरिक्त आदिवासी आयुक्तांद्‌वारे शाळेतील सौहार्दपूर्ण वातावरण राखणे, विद्‌यार्थ्यांना दिली जाणारी वागणूक, आवश्यक सुविधांची उपलब्धता

[25] जीवन विकास कॉन्व्हेंट, डोणगाव, बुलढाणा.

[26] अतिरिक्त प्रदानाची गणना करण्याकरिता घटक-निहाय शुल्काची विभागणी उपलब्ध नव्हती.

वैद्यकीय उपचार, शिक्षणाची गुणवत्ता, पोषण इ. उपलब्ध करुन देणे याविषयी अहवाल सादर करेल.

2018-19 ते 2022-23 दरम्यान, आयुक्त कार्यालय आणि चार अतिरिक्त आदिवासी आयुक्त कार्यालयांना प्रकल्प अधिकाऱ्यांकडून कोणतेही तपासणी अहवाल प्राप्त झाले नाहीत. त्याचप्रमाणे, संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांद्वारे अतिरिक्त आदिवासी आयुक्त कार्यालयात आकस्मिक तपासणी अहवाल सादर करण्यात आला नाही. या त्रैमासिक तपासणी आणि आकस्मिक तपासणी अहवालाच्या अनुपस्थितीत, आयुक्त कार्यालय आणि अतिरिक्त आदिवासी आयुक्तांद्वारे संनियंत्रण कुचकामी राहिले. त्यामुळे आवश्यक सुविधांची उपलब्धता, शिक्षणाची गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती यांची पडताळणी करण्यासाठी प्रकल्प अधिकारी नियमित तपासणी करतात की नाही याची खात्री आयुक्त कार्यालयाला करता आली नाही.

शासनाने हे मान्य केले (मे 2025) की प्रकल्प अधिकारी स्तरावर केलेल्या तपासणी/आकस्मिक तपासणीचे अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर केले गेले नाहीत आणि पुढे नमूद केले की विभागाने नामांकित शाळांच्या तपासणीसाठी ई-तपासणी अनुप्रयोग विकसित केले आहे. मात्र, विभागाने या अनुप्रयोगाचा वापर अद्याप सुरू केलेला नाही.

अहवाल सादर केला गेला नाही ही शासनाची स्वीकृती ही एक प्रणाली त्रुटी दर्शवते, ज्यामुळे संनियंत्रण कुचकामी ठरले. ई-तपासणी अनुप्रयोग विकसित केले गेले आहे, असे शासनाने उत्तर दिले आहे, त्यात प्रभावी संनियंत्रण सुनिश्चित करण्यासाठी आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी कालबद्ध योजना निर्दिष्ट केलेली नाही.

2.1.7.2 विद्यार्थ्यांना साहित्याचे वितरण न करणे आणि शाळांमध्ये साहित्य वितरणावर संनियंत्रण नसणे

विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयात असे नमूद केले आहे (मे 2018) की शाळेने विद्यार्थ्यांना शाळेचा गणवेष, मैदानी खेळ गणवेष, नाईट ड्रेस, स्कूल बॅग, पुस्तके आणि लेखन साहित्य सामग्री आणि वैयक्तिक वापराच्या इतर वस्तू यासारख्या विशिष्ट वैयक्तिक वस्तू प्रदान केल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करताना संबंधित प्रकल्प कार्यालयाचा प्रतिनिधी शाळेत उपस्थित असणे आवश्यक आहे. लेखनसामग्री/इतर वैयक्तिक वापरच्या साहित्याचे वितरण न केल्यास/अंशतः वितरण केल्यास शाळेवर एकूण देय शुल्काच्या 10 टक्के दंड आकारला जात होता.

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की, निवडलेल्या आठ केंद्रांमध्ये प्रकल्प कार्यालयाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत साहित्याच्या वितरणाशी संबंधित नोंदी उपलब्ध नव्हत्या. लेखापरीक्षणाने 40 शाळांमधील 503 विद्यार्थ्यांचे लाभार्थी सर्वेक्षण देखील केले. लाभार्थी सर्वेक्षणाच्या निष्कर्षातून असे दिसून आले आहे की, अनेक विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, शाळेचा गणवेश, बूट, लेखनसामग्री इत्यादी आवश्यक साहित्य पुरविले गेले नाही.

मूलभूत वस्तूंच्या अभावामुळे शिकण्याच्या वातावरणावर विपरित परिणाम होतो, कारण विद्यार्थ्यांना वर्गातील क्रियाकलापांमध्ये प्रभावीपणे भाग घेण्यासाठी संघर्ष करावा लागू शकतो आणि परिणामी उपस्थिती आणि शैक्षणिक कामगिरीवर होणारा नकारात्मक परिणाम नाकारता येत नाही.

विविध अतिरिक्त आदिवासी आयुक्त/प्रकल्प अधिकारी कार्यालयात निदर्शनास आलेली साहित्याचे वितरण न केल्याबद्दल किंवा अंशतः वितरण केल्याबद्दल शाळांवर आकारण्यात आलेल्या दंडाची उदाहरणे खाली नमूद करण्यात आली आहेत:

- 2018-19 आणि 2019-20 दरम्यान प्रकल्प अधिकारी, नाशिक मध्ये 14 शाळांना ₹54,33,780 दंड ठोठावण्यात आला.
- 2022-23 या वर्षात अतिरिक्त आदिवासी आयुक्त, ठाणे (दंड ₹22,27,600) येथे पाच प्रकरणे, प्रकल्प अधिकारी, राजूर (दंड ₹1,74,000 आकारला) येथे एक प्रकरण, प्रकल्प अधिकारी, नाशिक येथे पाच प्रकरणे (दंड ₹12,64,000 आकारला) आणि अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती येथे सात प्रकरणे (दंडाची रक्कम उपलब्ध नाही) निदर्शनास आली.

या अटींचे पालन न केल्याबद्दल दंड आकारला जात असला तरी, या साहित्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी किंवा शाळांना ते प्रदान करण्यास भाग पाडण्यासाठी यंत्रणेत प्रणालीचा अभाव आहे. हे सर्व विद्यार्थ्यांसाठी पूरक आणि सक्षम शैक्षणिक वातावरण प्रदान करण्याच्या योजनेच्या परिणामकारकतेवर मर्यादा घालते.

शासनाने नमूद केले (मे 2025) की विद्यार्थ्यांना साहित्य वितरित न केल्यास शाळांवर दंड आकारला जातो.

दंड आकारणे हा एक अडथळा म्हणून कार्य करू शकतो, परंतु यामुळे विद्यार्थ्यांना वर्गातील प्रभावी सहभागासाठी आवश्यक असलेल्या वस्तू प्रत्यक्षात मिळतील याची खात्री होत नाही, त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत त्रुटी निर्माण होते.

2.1.7.3 नामांकित शाळांचे प्रलंबित मूल्यांकन

विभागाने (सप्टेंबर 2022) तपासणी समिती आणि पर्यवेक्षी समिती स्थापन केली, ज्यात राज्यातील नामांकित शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शासनाच्या इतर विभागांच्या अधिकाऱ्यांचा समावेश होता. आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि पुरेशा सुविधा नामांकित शाळा पुरवत आहेत की नाही हे तपासणे हा या मूल्यांकनाचा उद्देश होता. शाळांच्या तपासणीनंतर तपासणी समितीने पर्यवेक्षी समितीला अहवाल सादर करणे आवश्यक होते. तपासणी समितीच्या अहवालाची तपासणी केल्यानंतर, पर्यवेक्षी समितीने आपला अहवाल आयुक्तांना सादर करावयाचा होता ज्यामध्ये या योजनेंतर्गत शाळा सुरू ठेवाव्यात की नाही याची शिफारस केली जाऊन डिसेंबर 2022 च्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत हा अहवाल शासनास पाठविणे आवश्यक होते.

2022-23 या शैक्षणिक वर्षासाठी या योजनेंतर्गत 157 शाळांना मान्यता देण्यात आली. लेखापरीक्षणात असे दिसून आले की 28[27] प्रकल्प अधिकाऱ्यांपैकी दोन प्रकल्प अधिकाऱ्यांनी[28] त्यांच्या अधिकारक्षेत्रातील 13 शाळांचे मूल्यांकन अहवाल आयुक्त कार्यालयाला सादर केले होते. समित्यांद्वारे शाळांचे विलंबित/अपुरे मूल्यांकन केल्यामुळे इतर विभागांच्या अधिकाऱ्यांकडून स्वतंत्रपणे दर्जेदार शिक्षण आणि पुरेशा सुविधा सुनिश्चित करण्याचे उद्दीष्ट साध्य झाले नाही.

अपुरे आणि विलंबित स्वतंत्र मूल्यांकनांमुळे योजनेची संनियंत्रण यंत्रणा कमकुवत झाली, ज्यामुळे शाळेची मान्यता सुरू ठेवण्याचे किंवा बंद करण्याचे औचित्य सिद्ध करण्यासाठी विभागाला आधार मिळाला नाही. परिणामी, मान्यता निर्णयांनी यथास्थिती दृष्टिकोन अवलंबून स्वतंत्र मूल्यांकनाचा मूळ हेतू विफल ठरविला.

शासनाने उत्तरादाखल नमूद केले (मे 2025) की 31 शाळांच्या संदर्भात मूल्यांकन अहवाल प्राप्त झाला आहे आणि आता समितीद्वारे सर्व शाळांची तपासणी केली जात आहे याची खात्री केली जाईल.

31 शाळांचे मूल्यांकन अहवाल प्राप्त झाले आहेत, असे शासनाचे उत्तर संथ आणि अपुरी प्रगती दर्शविते. आता तपासणी सुनिश्चित केली जाईल अशी हमी दिली जात असली तरी या हमीद्वारे विलंबाची जबाबदारी घेतली गेली नाही आणि प्रलंबित तपासणी पूर्ण करण्यासाठी कोणतीही मुदत दिली गेली नाही.

निष्कर्ष

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की मंजूर प्रवेशाच्या तुलनेत प्रत्यक्ष प्रवेशात 2021-22 मधील आठ टक्के 2018-19 दरम्यान 33 *टक्क्यांची* कमतरता होती. वर्ष 2022-23 मध्ये, विभागाने सुरुवातीला पात्र अर्जदारांकडून दुसऱ्या इयत्तेसाठी अर्ज मागवले होते, परंतु नंतर इयत्ता दुसरीत प्रवेश न देण्याचा निर्णय घेतला परिणामी 1,902 पात्र अर्जदारांना प्रवेश नाकारण्यात आला. योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये याबाबत कोणतीही तरतूद नसतानाही विभागाने 26 शाळांच्या श्रेणीत सुधारणा केली. विभागाने शाळांच्या निवडीच्या विविध टप्प्यांसाठी स्वतःच्या निर्धारित वेळेचे उल्लंघन केले ज्यामुळे शाळांच्या निवडीला विलंब झाला आणि परिणामी विद्यार्थ्यांच्या प्रवेशास विलंब झाला. अनिवार्य पात्रतेचे निकष पूर्ण न करणाऱ्या शाळांची या योजनेंतर्गत निवड करण्यात आली. या योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधीच्या संदर्भात शाळांनी स्वतंत्र लेखे ठेवणे आणि उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या नाहीत. प्रकल्प अधिकारी स्तरावर केलेली शाळांची तपासणी/आकस्मिक तपासणी याबाबतचे विहित अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर केले जात नव्हते. विद्यार्थ्यांना विशिष्ट वैयक्तिक आणि लेखन सामग्री वस्तूंच्या वितरणावर कोणतेही संनियंत्रण ठेवले जात नव्हते.

---

[27] 30 प्रकल्प अधिकाऱ्यांपैकी, दोन प्रकल्प अधिकारी जसे (i) प्रकल्प अधिकारी, डहाणू आणि (ii) प्रकल्प अधिकारी, मुंबई यांच्याकडे या योजनेंतर्गत शाळा नव्हत्या.

[28] प्रकल्प अधिकारी, घोडेगाव आणि प्रकल्प अधिकारी, सोलापूर.

शिफारसी

- *राज्य शासनाने प्रवेशासाठी वास्तववादी लक्ष्य निश्चित करून सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या गावाजवळील शाळांमध्ये या योजनेंतर्गत प्रवेश दिला जाईल याची खात्री करावी.*
- *राज्य शासनाने सचिव स्तरीय समितीने विधीवत मान्यता दिलेल्या* नामांकित *शाळांच्या श्रेणींमध्ये कोणत्याही सुधारणेसाठी कालबद्ध पद्धतीने योग्य धोरण विहित केले गेले आहे याची खात्री करावी.*
- *राज्य शासनाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी शाळा निवडीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे याची खात्री करावी.*
- *राज्य शासनाने या योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधीच्या संदर्भात स्वतंत्र लेखे तयार करून उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याच्या सूचना द्याव्यात.*
- *राज्य शासनाने प्रभावी संनियंत्रणासाठी शाळांच्या त्रैमासिक तपासणी/ आकस्मिक निरिक्षणाचे अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करणे सुनिश्चित करावे.*
- *राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या साहित्य वितरणावर योग्य संनियंत्रण ठेवावे.*

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागावरील विषयनिष्ठ अनुपालन लेखापरीक्षण

2.2 मागासवर्गीय विद्यार्थांच्या वसतिगृहांचे कामकाज

2.2.1 परिचय

अनुसूचित जाती आणि इतर दुर्बल घटकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधांना चालना देण्यासाठी धोरणे, योजना आणि कार्यक्रम तयार करणे/अंमलबजावणी करणे ही सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाची सर्वतोपरी जबाबदारी आहे. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग या उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुदी करतो आणि आपल्या प्रादेशिक आणि जिल्हास्तरीय कार्यालयांद्वारे प्रशासकीय आणि संनियंत्रण संस्था म्हणून देखील कार्य करतो. अनुसूचित जाती आणि इतर दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणासाठी निवास आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने वसतिगृहे स्थापन केली आहेत. शासकीय वसतिगृहात मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या विविध प्रवर्गांच्या प्रवेशासाठी विभागाने आरक्षण[29] निर्धारित केले (डिसेंबर 2018) आहे.

31 मार्च 2024 अखेरीस महाराष्ट्र राज्यात 443 शासकीय वसतिगृहे (मुलांसाठी 230 आणि मुलींसाठी 213) कार्यरत होती, ज्यामध्ये 43,858 विद्यार्थ्यांनी (23,208 मुले

[29] (i) अनुसूचित जाती -80 टक्के (ii) अनुसूचित जमाती -तीन टक्के (iii) विमुक्त जाती आणि भटक्या जमाती -पाच टक्के (iv) आर्थिक मागास वर्ग (ईबीसी) आणि इतर मागासवर्ग (ओबीसी) - पाच टक्के (v) विशेष मागासवर्ग - दोन टक्के (vi) अपंग - तीन टक्के (vii) अनाथ - दोन टक्के

आणि 20,650 मुली) नोंदणी केली होती. याशिवाय, राज्यात शासन अनुदानित 2,388 वसतिगृहे अशासकीय संस्थांमार्फत चालविली जात होती (मुलांसाठी 1,804 आणि मुलींसाठी 584) आणि ज्यामध्ये 98,756 विद्यार्थी (78,863 मुले व 19,893 मुली) नोंदणीकृत होते. याशिवाय, अनुसूचीत जाती आणि नव-बौद्ध[30] प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुविधा दिली जाऊ शकत नाही अशा विद्यार्थ्यांना अन्न, निवास आणि देखभाल/निर्वाह यासाठी निश्चित भत्ता[31] देण्यासाठी स्वाधार योजना सुरू (जानेवारी 2017) केली. शासकीय वसतिगृहे, अनुदानित वसतिगृहे आणि स्वाधार योजनेतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या लाभांची तुलना खालील **तक्ता 2.6** मध्ये दर्शविली आहे:

तक्ता 2.6 शासकीय वसतिगृहे, अनुदानित वसतिगृहे आणि स्वाधार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या लाभांची तुलना:

तपशील	शासकीय वसतिगृहे	अनुदानित वसतिगृहे	स्वाधार योजना
लक्ष्यित लाभार्थी	शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतलेले विद्यार्थी	अनुदानित वसतिगृहात प्रवेश घेतलेले विद्यार्थी	अनुसूचित जाती आणि नव-बौद्ध विद्यार्थ्यांना ज्यांच्यासाठी वसतिगृहाची सुविधा देता आली नाही परंतु निश्चित भत्ता लागू आहे
निवासव्यवस्था	मोफत निवास व्यवस्था	मोफत निवास व्यवस्था	निवासासाठी प्रदान केलेला भत्ता
अन्न	मोफत जेवण	मोफत जेवण	जेवणासाठी प्रदान केलेला भत्ता
गणवेष	मोफत पुरवला जातो	पुरवला जात नाही	लागू नाही
पाठ्यपुस्तके आणि साहित्य	मोफत पुरवली जातात	पुरवले जात नाही	लागू नाही
ग्रंथालयाची सुविधा	पुरविली जाते	पुरविली जात नाही	लागू नाही
शैक्षणिक संच/ अभ्यासक्रम-विशिष्ट भत्ता	स्टेथोस्कोप, ड्रॉइंग बोर्ड, एप्रन, बॉयलर सूट इत्यादी वस्तूंसाठी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना (उदा.	पुरविले जात नाही	लागू नाही

30 अनुसूचित जाती समुदायाचे सदस्य ज्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला आहे.

31 (i) मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर @ ₹60,000 (ii) इतर महसूल विभाग शहरे आणि क वर्ग महानगरपालिका ₹51,000 आणि (iii) महानगरपालिकेच्या हद्दीपासून पाच किमी परिसरात इतर जिल्हा ठिकाणे आणि महाविद्यालये/ शैक्षणिक संस्था ₹43,000

तपशील	शासकीय वसतिगृहे	अनुदानित वसतिगृहे	स्वाधार योजना
	वैद्यकीय, अभियांत्रिकी, ललित कला) पुरविला जातो		
देखभाल/ निर्वाह भत्ता	वसतिगृहाच्या ठिकाणानुसार दरमहा ₹500 ते ₹800[32] इतका एकरकमी भत्ता	प्रदान केलेला नाही	निश्चित निर्वाह भत्ता
लाभ वितरणाची पद्धत	अशा प्रकारच्या वस्तूरूपातील सुविधा आणि रोख भत्ता	केवळ वस्तूरूपातील सुविधा	आधारशी जोडलेल्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरण
सुरू केल्याचे/लागू केल्याचे वर्ष/ उपयुक्तता	विद्यमान योजना	विद्यमान योजना	जानेवारी 2017 मध्ये चालू केली
वसतिगृह आणि भत्ता यापैकी एक निवडणे	लागू नाही	लागू नाही	जून 2017 पासून विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश किंवा स्वाधारभत्ता यापैकी एकाचा पर्याय निवडण्याची परवानगी दिली

ही तुलनात्मक चौकट शासकीय वसतिगृहे, अनुदानित वसतिगृहे आणि स्वाधार योजना यांमध्ये विद्यार्थ्यांच्या मदतीचे स्वरूप आणि व्याप्ती यांतील लक्षणीय फरक अधोरेखीत करते. शासकीय वसतीगृहात राहणाऱ्यांना सर्वात व्यापक लाभ मिळतो, तर अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थी आणि स्वाधार लाभार्थ्यांना तुलनात्मकदृष्ट्या मर्यादित आणि प्रामुख्याने निर्वाह आधारित सहाय्य मिळते.

2.2.2 संघटनात्मक रचना


सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या प्रमुखपदी प्रमुख सचिव असतात, ज्यांना आयुक्त, समाजकल्याण, पुणे हे मदत करतात. आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना सात प्रादेशिक उपायुक्त[33], शासकीय वसतिगृहासाठी 36 सहाय्यक आयुक्त आणि 34[34] जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद मदत करतात. विभागाची संघटनात्मक रचना **आलेख 2.2** मध्ये दर्शविली आहे.

[32] तालुका, जिल्हा स्तरावर आणि विभाग स्तरावर असलेल्या संस्थांसाठी अनुक्रमे ₹500, ₹600 आणि ₹800

[33] अमरावती, छत्रपती संभाजीनगर, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक आणि पुणे

[34] जिल्हा परिषद नसलेले मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हे वगळता

आलेख 2.2: सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाची संघटनात्मक रचना



स्त्रोत: विभागाचे अधिकृत संकेतस्थळ

महाराष्ट्रात सहायक आयुक्तांच्या नियंत्रणाखाली 443 शासकीय वसतिगृहे होती, तर 2,388 अनुदानित वसतिगृहे संबंधित जिल्हा परिषदांच्या जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली होती. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद प्रशासकीयदृष्ट्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या नियंत्रणाखाली होते आणि प्रादेशिक उप-आयुक्त/आयुक्त समाजकल्याण यांना कार्यात्मक अहवाल देत होते.

2.2.3 लेखापरीक्षण उद्दिष्टे

खालील बाबी तपासण्यासाठी लेखापरीक्षण केले गेले होते:

- वसतिगृहात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी गरजेनुसार सर्वसमावेशक आराखडा तयार करण्यात आला होता किंवा कसे;
- निधीचे वाटप, मुक्तता आणि निधीचा विनियोग योजनेच्या प्रस्तावित आराखडा आणि उद्दिष्टांनुसार होता किंवा कसे;
- वसतिगृहातील विद्यार्थ्यांना विहित निकषांनुसार सोयी-सुविधा पुरविल्या जातात किंवा कसे; आणि
- देखरेख आणि मूल्यमापन यंत्रणा पुरेशी आणि प्रभावी होती किंवा कसे.

2.2.4 लेखापरीक्षण निकष

लेखापरीक्षणाचे निष्कर्ष खालील निकषांवर आधारित होते:

- वेळोवेळी जारी केले जाणारे महाराष्ट्र शासनाचे आदेश, मार्गदर्शक तत्वे व शासन निर्णय.

- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने तयार केलेले वार्षिक आराखडे, निविदा नोंदवही, खरेदी नोंदवही व वसतिगृह स्तरावर ठेवलेल्या नोंदी.
- महाराष्ट्र कोषागार नियम, 1968.
- विभागातील अधिकाऱ्यांसह लाभार्थी सर्वेक्षण व वसतिगृहाची संयुक्त तपासणी.

2.2.5 लेखापरीक्षणाची व्याप्ती आणि कार्यपद्धती

2021-22 ते 2023-24 या कालावधीचे ऑगस्ट 2024 ते मार्च 2025 दरम्यान लेखापरीक्षण करण्यात आले. यासाठी, सचिव, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग, समाजकल्याण आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयातील अभिलेख्यांची चाचणी-तपासणी करण्यात आली. राज्यातील सात विभागातून[35] साध्या यादृच्छिक पद्धतीने 36 जिल्ह्यांपैकी सात जिल्ह्यांची निवड करण्यात आली. संभाव्यता प्रमाण ते आकार पद्धतीच्या आधारे राज्यातून आणखी दोन जिल्ह्यांची[36] निवड करण्यात आली होती, जेथे आकार म्हणजे जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहांची संख्या आहे.

नऊ[37] जिल्ह्यांतील सात प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण सहायक आयुक्त व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अभिलेख्यांची चाचणी-तपासणी करण्यात आली. निवडलेल्या नऊ जिल्ह्यांतील सहायक आयुक्तांनी ठेवलेल्या स्वाधार योजनेतील प्रदानांसंबंधीचे अभिलेख तपासण्यात आले. वसतिगृहांच्या प्रवेश क्षमतेवर आधारित असलेल्या आकार पद्धती ते संभाव्यता गुणोत्तराच्या आधारे प्रत्येक जिल्ह्यातून किमान एक मुलांचे वसतिगृह आणि एक मुलींच्या वसतिगृहाचा समावेश असलेल्या 18 शासकीय वसतिगृहे आणि 21 अनुदानित वसतिगृहांची[38] निवडही लेखापरीक्षणात करण्यात आली. जिल्हा, शासकीय वसतिगृहे आणि अनुदानित वसतिगृहे यांच्या मंजूर नमुन्यांचे तपशील **परिशिष्ट 2.4** मध्ये दर्शविले आहेत.

याशिवाय, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या अधिकाऱ्यांसाह 39 वसतिगृहांची (18 शासकीय वसतिगृहे आणि 21 अनुदानित वसतिगृहे) संयुक्त प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली आणि 39 वसतिगृहांमधील 606 विद्यार्थ्यांचे लाभार्थी सर्वेक्षणही करण्यात आले.

सचिव, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग यांच्यासमवेत ऑगस्ट 2024 मध्ये एक आगमन बैठक आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये लेखापरीक्षणाची उद्दिष्टे, निकष, व्याप्ती आणि कार्यपद्धतीवर चर्चा करण्यात आली होती. प्रधान सचिव,

---

35 अमरावती, छत्रपती संभाजीनगर, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक आणि पुणे.

36 धाराशिव आणि सांगली.

37 अहिल्यानगर, बुलढाणा, धाराशिव, जालना, लातूर, नागपूर, पुणे, सांगली आणि ठाणे.

38 नियमित निवड झालेल्या वसतिगृहांची तपासणी केली असता बनावट प्रवेश/बोगस विद्यार्थी/अस्तित्वात नसलेल्या वसतिगृहांची संशयित प्रकरणे निदर्शनास आल्याने नियमित निवडलेल्या 18 वसतिगृहांव्यतिरिक्त तीन अतिरिक्त वसतिगृहांची (जालना जिल्ह्यातील दोन व लातूर जिल्ह्यातील एक) निवड करण्यात आली.

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग यांच्यासोबत ऑक्टोबर 2025 मध्ये झालेल्या निर्गमन बैठकीमध्ये लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांवर चर्चा करण्यात आली आणि विभागाच्या प्रतिसादाचा अहवालात योग्य प्रकारे समावेश करण्यात आला आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांच्या कामकाजावरील लेखापरीक्षणाचे निष्कर्ष भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या मार्च 2018 रोजी संपलेल्या वर्षाच्या महाराष्ट्र शासनाच्या सामान्य व सामाजिक क्षेत्रावरील अहवालातील परिच्छेद 3.2 मध्ये समाविष्ट करण्यात आले होते (वर्ष 2019 चा अहवाल क्रमांक 1). लोकलेखा समितीच्या अहवालावर चर्चा सुरू आहे.

लेखापरीक्षण निष्कर्ष

2.2.6 नियोजन

लेखापरीक्षणाचे पहिले उद्दीष्ट वसतिगृहाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी गरजेवर आधारित सर्वसमावेशक आराखडा अस्तित्वात आहे किंवा कसे हे तपासणे होते. वसतिगृहाच्या पुरेश्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आराखड्याच्या अभावामुळे आणि शाश्वत विकास उद्दिष्टानुसार[39] शासकीय वसतिगृहे निर्माण करण्याच्या उद्दिष्टांची न केलेली पूर्तता या संदर्भातील त्रुटी पुढील परिच्छेदांमध्ये चर्चिल्या आहेत.

2.2.6.1 स्वाधार योजनेंतर्गत अपुरी व्याप्ती

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक संधी पुरविण्यासाठी वसतिगृहाच्या पुरेशा पायाभूत सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांच्या गरजा भागविणे हा वसतिगृहे निर्माण करण्याचा उद्देश होता.

178 तालुक्यांत मुलांसाठी शासकीय वसतिगृह उपलब्ध नसल्याने व 182 तालुक्यांत मुलींसाठी शासकीय वसतिगृह नसल्याने आणि 121 तालुक्यांत शासकीय वसतिगृह नसल्याने प्रत्येक तालुक्यात एक मुलांचे वसतिगृह व एक मुलींचे वसतिगृह याप्रमाणे नवीन 602 शासकीय वसतिगृहे निर्माण करण्याचा प्रस्ताव सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे सादर (मार्च 2021) केला. वसतिगृहाची सुविधा नसलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देणाऱ्या आदिवासी विकास विभागात राबविण्यात येत असलेल्या 'स्वयम'[40] सारख्या थेट लाभ हस्तांतरण योजनांशी शासकीय वसतिगृहांच्या बांधकाम आणि संचालनाच्या आर्थिक परिणामाची तुलना वित्त विभागाने केली (एप्रिल 2021) आणि नवीन वसतिगृहे बांधण्याला पर्याय म्हणून अशीच थेट लाभ हस्तांतरण योजना राबविण्याचा विचार करण्याची सूचना सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाला केली. वित्त विभागाच्या या सूचनेच्या

---

[39] उद्दिष्ट क्रमांक 04 (गुणवत्तापूर्ण शिक्षण)

[40] वसतिगृहाची सुविधा न मिळालेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य देण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत स्वयंम योजना सुरू करण्यात आली आहे.

परिणामी, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने नवीन वसतिगृहे बांधण्याच्या प्रस्तावाचा नंतर पाठपुरावा केला नाही.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, स्वाधार योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार (जून 2018) या योजनेचा लाभ केवळ महानगरपालिका क्षेत्रातील व महानगरपालिका क्षेत्रापासून पाच किलोमीटरच्या हद्दीतील संस्थांमध्ये मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या पात्र अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांनाच मिळणार होता. त्यामुळे, शासकीय वसतिगृह योजनेतर्गत समावेश होऊ शकणाऱ्या आठवी ते दहावीत शिकणारे विद्यार्थी आणि इतर मागासप्रवर्ग, विशेष मागासप्रवर्ग व इतर दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांचा स्वाधार योजनेत समावेश नव्हता. अश्या रितीने, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने स्वाधार योजनेचा विस्तार संपूर्ण राज्यात केला नाही

परिणामी, या 121 तालुक्यांपैकी 117 तालुक्यांतील विद्यार्थ्यांना महानगरपालिका क्षेत्रापासून पाच किलोमीटरच्या पुढे राहत असल्याने ना शासकीय वसतिगृहाची सुविधा मिळाली ना स्वाधार योजनेत समाविष्ट करण्यात आले. अशा रीतीने 8,930 संस्थांमध्ये[41] शिकणारे पात्र विद्यार्थी वसतिगृहाच्या सुविधेपासून वंचित राहिले. 2021 ते 2024 दरम्यान केवळ दोन नवीन शासकीय वसतिगृहे (मार्च 2021 पूर्वी मंजुरी मिळालेली) कार्यरत झाली. ही दोन शासकीय वसतिगृहे मुंबई उपनगर आणि नागपूर जिल्ह्यात म्हणजे शासकीय वसतिगृहे नसलेल्या 121 तालुक्यांव्यतिरिक्त होती.

सर्व तालुकांचा समावेश करून स्वाधार योजनेचा विस्तार न करता नवीन शासकीय वसतिगृहांच्या बांधकामाचा पाठपुरावा न करण्याच्या निर्णयामुळे 117 तालुक्यांमध्ये वसतिगृह सुविधांचा अभाव राहिला, त्यामुळे 8,930 संस्थांमधील विद्यार्थ्यांना निवासी शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहावे लागले आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना न्याय्य शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट विफल ठरले.

शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2025) की योजनेची व्याप्ती तालुका स्तरापर्यंत वाढविण्यासाठी आणि पाच किमी क्षेत्राची मर्यादा काढून टाकण्यासाठी सुधारित शासन निर्णय जारी (डिसेंबर 2024) करण्यात आला आहे.

सुधारित शासन निर्णय जारी करण्यात आला असला तरी, स्वाधार योजनेत आठवी ते दहावी इयत्तेत शिकणारे विद्यार्थी आणि इतर मागासवर्गीय, विशेष मागासवर्ग आणि इतर दुर्बल घटकांतील दहावी नंतर शिकणारे विद्यार्थी यांचा समावेश नव्हता कारण केवळ अनुसूचित जाती आणि नवबौद्ध विद्यार्थ्यांचा या योजनेत समावेश होता.

[41] {6,703 शाळा (121 तालुक्यांतील इयत्ता 8 वी ते 10 वी), 1,242 कनिष्ठ महाविद्यालये (11 वी व 12 वी), 498 व्यावसायिक महाविद्यालये आणि 117 तालुक्यांतील 487 अव्यावसायिक महाविद्यालये}

2.2.6.2 शाश्वत विकास उद्दिष्टांतर्गत वसतिगृहे उपलब्ध करून देण्याच्या उद्दिष्टातील तूट

नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी 'व्हिजन 2030' दस्तऐवज प्रकाशित केला (2017) ज्यामध्ये शाश्वत विकास उद्दिष्टांतर्गत वर्ष 2020 पर्यंत अनुसूचित जातीच्या मुला- मुलींसाठी 500 शासकीय वसतिगृहे आणि 2030 पर्यंत 800 शासकीय वसतिगृहे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, वर्ष 2020 पर्यंत 500 शासकीय वसतिगृहे आणि 2030 पर्यंत 800 शासकीय वसतिगृहांचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने सविस्तर आराखडा तयार केला नव्हता. 2020 पर्यंत 500 शासकीय वसतिगृहांचे उद्दिष्ट असताना मार्च 2024 पर्यंत केवळ 443 शासकीय वसतिगृहांची स्थापना करण्यात आली होती.

शासनाने नमूद केले की (नोव्हेंबर 2025) गेल्या वर्षापासून स्वाधार योजनेंतर्गत ऑनलाइन पद्धतीने अर्ज प्राप्त केले जात आहेत आणि त्यामुळे विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात मागणी/प्रतिसाद असलेल्या ठिकाणांचा शोध घेणे शक्य आहे. या आकडेवारीच्या आधारे, वसतिगृहे बांधण्यासाठी विभाग मोठ्या प्रमाणात मागणी असलेल्या ठिकाणांवर लक्ष केंद्रित करीत आहे. पुढे असेही नमूद केले की, 50 पेक्षा कमी विद्यार्थ्यांची वसतिगृहे बांधणे व्यवहार्य नसून वसतिगृहांच्या बांधकामासाठी 2025-26 या वर्षात ₹1,200 कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

उत्तरासोबत जोडलेल्या विदावरून लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की 38 तालुक्यांमध्ये (27 जिल्ह्यांमध्ये) स्वाधार योजनेंतर्गत प्राप्त झालेले ऑनलाइन अर्ज विद्यमान वसतिगृहांच्या प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त (स्वाधार योजनेंतर्गत 50 पेक्षा कमी अर्ज प्राप्त झालेले तालुके वगळता) होते.

याशिवाय, स्वाधार योजनेंतर्गत केवळ ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जांच्या आधारे केलेल्या मागणीचे मूल्यांकन सर्वसमावेशक नियोजनासाठी पुरेसे नाही कारण स्वाधार योजनेत केवळ दहावी नंतर शिकणाऱ्या अनुसूचित जाती आणि नवबौद्ध विद्यार्थ्यांचा समावेश आहे, त्यामुळे आठवी ते दहावी मध्ये शिकणाऱ्या आणि इयत्ता दहावीपुढे शिकणाऱ्या इतर मागासवर्गीय, विशेष मागासवर्गीय आणि इतर दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या संभाव्य मागणीकडे दुर्लक्ष केले जाते.

सध्या अस्तित्वात असलेल्या वासतिगृहांची क्षमता वाढविणे व नवीन वसतिगृहे बांधणे यांची आवश्यकता असल्याची वस्तुस्थिती कायम राहते.

'व्हिजन 2030' अंतर्गत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहांचा उत्तरोत्तर विस्तार करण्याची राज्याची वचनबद्धता असूनही, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने निर्धारित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कालबद्ध अंमलबजावणी योजना तयार केली नाही. मागणी निर्धारणाचा एकमेव आधार म्हणून स्वाधार योजनेच्या अर्जाच्या विदावर अवलंबून राहणे अपुरे आहे, कारण त्यात पात्र विद्यार्थ्यांच्या महत्त्वपूर्ण

घटकांना वगळले जाऊन वास्तविक गरज कमी दर्शविते. परिणामी, अनेक तालुक्यांमध्ये क्षमतेची मर्यादा कायम आहे, जे धोरण आणि शाश्वत विकास उद्दिष्टे यासंदर्भातील वचनबद्धतेची पूर्तता करण्यासाठी विद्यमान वसतिगृहांचा पद्धतशीर विस्तार आणि नवीन वसतिगृहांच्या बांधकामाची आवश्यकता दर्शवते.

2.2.7 वित्तीय व्यवस्थापन

लेखापरीक्षणाचे दुसरे उद्दिष्ट योजनेच्या प्रस्तावित आराखडे आणि उद्दिष्टांनुसार निधीचे वाटप, मुक्तता आणि वापर झाला आहे की नाही याचे मूल्यांकन करणे होते. स्वाधार योजनेच्या प्रदानातील विलंब आणि स्वाधार योजनेंतर्गत देखभाल भत्ता देण्यातील त्रुटीबाबत पुढील परिच्छेदांमध्ये चर्चा केली आहे.

2.2.7.1 शासकीय वसतिगृह, अनुदानित वसतिगृह आणि स्वाधार योजनेवरील खर्च

शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत राहण्याची आणि जेवणाची सोय केली जाते. विद्यार्थ्यांना गणवेश, पाठ्यपुस्तके, लेखन सामग्री, आदींसाठी दरवर्षी भत्ता देखील दिला जातो. शासकीय अनुदानित वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राहण्याची आणि जेवणाची मोफत व्यवस्था केली जाते. स्वाधार योजनेंतर्गत विद्यार्थी कोणत्या क्षेत्रात शिक्षण घेत आहे यावर अन्न, निवास आणि निर्वाह भत्ता अवलंबून होता. याशिवाय वैद्यकीय व अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना वार्षिक ₹5,000, तर कला, विज्ञान, वाणिज्य, परिचर्या इत्यादी इतर विद्याशाखांमधील विद्यार्थ्यांसाठी वार्षिक ₹2,000 शैक्षणिक साहित्यासाठी तरतूद करण्यात आली होती.

शासकीय वसतिगृहे, अनुदानित वसतिगृहे आणि स्वाधार योजनेंतर्गत वितरीत केलेला निधी आणि झालेला खर्च खालील **तक्ता 2.7** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

तक्ता 2.7: 2021-22 ते 2023-24 या कालावधीत राज्यातील शासकीय वसतिगृहे, अनुदानित वसतिगृहे आणि स्वाधार योजनेवरील वितरीत निधी आणि खर्च

(₹ कोटीत)

अनु. क्र.	शासकीय वसतिगृह		अनुदानित वसतिगृह		स्वाधार योजना	
	वितरीत निधी	झालेला खर्च	वितरीत निधी	झालेला खर्च	वितरीत निधी	झालेला खर्च
2021-22	262.20	260.99	93.54	93.14	90.00	90.00
2022-23	418.79	418.78	126.03	126.03	126.00	126.00
2023-24	487.15	430.50	352.05	352.05	366.83	366.83
एकूण	**1,168.14**	**1,110.27**	**571.62**	**571.22**	**582.83**	**582.83**

स्त्रोत: सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने सादर केलेली माहिती

2021-22 ते 2023-24 या कालावधीत शासकीय वसतिगृहे, अनुदानित वसतिगृहे आणि स्वाधार योजनेवर वितरित केलेल्या निधी आणि खर्चाच्या लेखापरीक्षण विश्लेषणातून परस्परविरोधी वापर पद्धती आढळून आल्या.

अनुदानित वसतिगृहे आणि स्वाधार योजनेंतर्गत खर्च तिन्ही वर्षांत वितरित केलेल्या निधीशी जवळून जुळत असताना, शासकीय वसतिगृहांनी निधीचा वापर कमी केला, विशेषतः 2023-24 मध्ये, ₹430.50 कोटीचा खर्च ₹487.15 कोटीच्या वितरित निधीपेक्षा कमी होता, ज्यामुळे ₹56.65 कोटी अखर्चित राहिले.

एकूण पाहता, या कालावधीत शासकीय वसतिगृहांमध्ये संचालन आणि देखभालीसाठी एकूण ₹57.87 कोटींचा अखर्चित निधी नोंदविण्यात आला, तर अनुदानित वसतिगृहे आणि स्वाधार अंतर्गत वापर अंदाजे पूर्ण झाले. जास्त वाटप असूनही, शासकीय वसतिगृहांतर्गत निधीचा कमी वापर, अंमलबजावणी आणि अवशोषणाच्या मर्यादा दर्शवितो आणि असे दर्शवितो की अर्थसंकल्पीय आधार वसतिगृह पायाभूत सुविधा आणि सेवांचा विस्तार किंवा बळकटीकरणात पूर्णपणे रूपांतरित झाला नाही.

2.2.7.2 स्वाधार योजनेंतर्गत हप्ता प्रदान करण्यास विलंब

स्वाधार योजनेंतर्गत, लाभार्थ्यांच्या आधारशी जोडलेल्या बँक खात्यांमध्ये अन्न, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी निधी हस्तांतरित केला जातो. विद्यार्थ्यांच्या संस्थेतील 75 टक्के उपस्थितीच्या आधारे संबंधित जिल्ह्यांच्या सहाय्यक आयुक्तांकडून दोन समान अर्धवार्षिक हप्त्यांमध्ये या योजनेचे अनुदान दिले जाते .

2021-22 ते 2023-24 या कालावधीत निवडलेल्या नऊ जिल्ह्यांमध्ये, 35,494 विद्यार्थ्यांपैकी 23,711 विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेंतर्गत प्रदाने दोन ते तीन वर्षांच्या विलंबाने झाली, असे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. 23,711 विद्यार्थ्यांपैकी 9,874 विद्यार्थी 2021-22 या शैक्षणिक वर्षाशी, 12,145 विद्यार्थी 2022-23 या वर्षाशी आणि 1,692 विद्यार्थी 2023-24 या वर्षाशी संबंधित होत्या. स्वाधार योजनेंतर्गत निधी वितरणाला झालेल्या विलंबाची व्याप्ती खालील **तक्ता 2.8** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 2.8: निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये स्वाधार योजनेंतर्गत प्रदानास विलंबाची व्याप्ती

वर्ष	विलंबाची व्याप्ती	विद्यार्थ्यांची संख्या	एकूण विद्यार्थ्यांची टक्केवारी
2021-22	विलंब नाही	1,527	13.39
	एक वर्ष	6,120	53.66
	दोन वर्षे	3,728	32.71
	तीन वर्षे	26	0.23

वर्ष	विलंबाची व्याप्ती	विद्यार्थ्यांची संख्या	एकूण विद्यार्थ्यांची टक्केवारी
2022-23	विलंब नाही	910	6.97
	एक वर्ष	11,961	91.62
	दोन वर्षे	184	1.41
2023-24	विलंब नाही	9,346	84.67
	एक वर्ष	1,692	15.33

स्त्रोत: निवडलेल्या जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्तांनी आहरित केलेल्या देयकांच्या आधारे लेखापरीक्षणाद्वारे संकलित

तक्ता 2.8 वरून असे निदर्शनास आले की:

- 2021-22 या शैक्षणिक वर्षासाठी, 2022-23 मध्ये 6,120 विद्यार्थ्यांना, 2023-24 मध्ये 3,728 विद्यार्थ्यांना आणि 2024-25 मध्ये 26 विद्यार्थ्यांना प्रदाने प्राप्त झाली.
- 2022-23 या शैक्षणिक वर्षासाठी, 2023-24 मध्ये 11,961 विद्यार्थ्यांना आणि 2024-25 मध्ये 184 विद्यार्थ्यांना प्रदाने प्राप्त झाली.
- 2023-24 या शैक्षणिक वर्षासाठी, 2024-25 मध्ये 1,692 विद्यार्थ्यांना प्रदाने प्राप्त झाली.

लेखापरीक्षणात असेही निदर्शनास आले की 2021-22 ते 2023-24 या शैक्षणिक वर्षात पहिला हप्ता प्रदान केलेल्या 27,428 विद्यार्थ्यांच्या[42] तुलनेत 17,949 विद्यार्थ्यांना[43] (65 टक्के) दुसऱ्या हप्त्याचे प्रदान करण्यात आले. तथापि, 9479 विद्यार्थ्यांना दुसरा हप्ता प्रदान न केलेल्याचे कारण अभिलेख्यात उपलब्ध नव्हते.

प्रदानांतील विलंबासंदर्भात, बुलढाणा, नागपूर, धाराशिव आणि जालना येथील सहाय्यक आयुक्तांनी असे नमूद केले की, निधी प्राप्त होण्यास विलंब आणि विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अपूर्ण दस्तऐवजांमुळे हा विलंब झाला होता.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, अपूर्ण दस्तऐवजांबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची तारीख आणि पूर्ण कागदपत्रे प्राप्त झालेली तारीख याची नोंद सहाय्यक आयुक्तांनी ठेवली नाही. योग्य दस्तऐवजांअभावी विद्यार्थ्यांनी पूर्ण दस्ताऐवज सादर न केल्याने किंवा अर्जावर वेळेत प्रक्रिया करण्यास विलंब झाल्याने प्रदानास विलंब झाला हे लेखापरीक्षणात निश्चित करता आले नाही.

शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2025) की, निधी वितरणात विलंब हा योजनेंतर्गत निधी प्राप्त होण्यास विलंब आणि विद्यार्थ्यांनी दस्तऐवज अपूर्ण सादर केल्यामुळे झाला. पुढे असेही नमूद केले की, प्रक्रिया सुलभ करण्यासाठी ऑनलाइन अर्ज स्वीकारण्याकरता एक स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल विकसित करण्याचा विचार सुरू आहे.

---

[42] 2021-22: 6,952; 2022-23: 11,246; आणि 2023-24: 9,230

[43] 2021-22: 5,647; 2022-23: 8,454; आणि 2023-24: 3,848;

निधी वेळेवर वितरित करण्यासाठी किंवा विद्यार्थ्यांकडून आवश्यक दस्ताऐवज मिळवून अपूर्ण स्वाधार अर्जांच्या प्रलंबिततेचे निराकरण करण्यासाठी अवलंबिलेल्या कोणत्याही कृतीचे संकेत विभागाच्या उत्तरात देण्यात आले नाहीत.

2.2.7.3 स्वाधार योजनेंतर्गत निर्वाह भत्ता देण्यातील त्रुटी

स्वाधार योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्वाधार योजनेतील लाभार्थ्यांना देय निर्वाह भत्यामधून मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत निर्वाह भत्ता म्हणून देण्यात येणाऱ्या रक्कमे इतकी कपात करावयाची होती.

स्वाधार योजनेंतर्गत भत्ता देण्यापूर्वी लाभार्थ्यांना देण्यात आलेली शिष्यवृत्तीचे प्रदान वगळण्यात आले की नाही हे तपासण्यासाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाकडे यंत्रणेचा अभाव असल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. 2022-23 मध्ये नऊ[44] जिल्ह्यांमध्ये स्वाधार योजनेंतर्गत लाभ मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या विदाचे मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या विदाशी विश्लेषण केले असता शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिष्यवृत्ती न मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीतही स्वाधार योजनेतील प्रदानातून निर्वाह भत्ता कापण्यात आल्याचे निदर्शनास आले. परिणामी खालील **तक्ता 2.9** मध्ये दर्शविल्याप्रमाणे स्वाधार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता कमी देण्यात आला होता.

तक्ता 2.9: स्वाधार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना निर्वाह भत्याचे कमी प्रदान

(₹ लाखात)

जिल्हा	स्वाधार योजनेंतर्गत प्रदान केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या	स्वाधार योजनेंतर्गत वाटप केलेली रक्कम (₹ लाखात)	लेखापरीक्षणात तपासलेल्या प्रकरणांची संख्या (क्रमांक 2 पैकी)	शिष्यवृत्ती योजनेंतर्गत रक्कम न मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या (क्रमांक 4 पैकी)	देखभाल भत्याचे कमी प्रदान (₹ लाखात)
1	**2**	**3**	**4**	**5**	**6**
अहिल्यानगर	494	210.03	60	24	0.83
बुलढाणा	906	374.85	116	22	0.62
धाराशिव	894	364.17	894	482	18.67
जालना	815	293.02	48	22	1.54
लातूर	2110	845.37	901	404	16.61
नागपूर	3958	2001.25	327	215	12.32
पुणे	3550	1578.70	93	2	0 .10
सांगली	208	68.32	172	102	6.12
ठाणे	118	69.80	118	29	1.01
एकूण	**13,053**	**5,805.51**	**2,729**	**1,302**	**57.82**

स्त्रोत: निवडलेल्या जिल्ह्यांतील सहाय्यक आयुक्तांनी आहरित केलेली देयके आणि मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या पोर्टलवरून घेतलेल्या विदाच्या आधारे लेखापरीक्षणाद्वारे संकलित

[44] अहिल्यानगर, बुलढाणा, धाराशिव, जालना, लातूर, नागपूर, पुणे, सांगली आणि ठाणे.

तक्ता 2.9 वरून खालील गोष्टी निदर्शनास आल्या:

- चाचणी-तपासणी केलेल्या नऊ जिल्ह्यांमध्ये, 2022-23 मध्ये स्वाधार योजनेंतर्गत 13053 विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत देय असलेल्या निर्वाह भत्त्याचे समायोजन केल्यानंतर ₹5,805.51 लाख देण्यात आले.

- 13,053 विद्यार्थ्यांपैकी 1,302 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेंतर्गत भत्ता देण्यात आला नव्हता. यामुळे 1,302 विद्यार्थ्यांना ₹57.82 लाखांचा निर्वाह भत्ता कमी मिळाला. लेखापरीक्षणात असेही निदर्शनास आले की, मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत देय असलेल्या निर्वाह भत्त्याच्या समायोजनासाठी स्वीकारलेल्या चुकीच्या दरांमुळे, नऊ[45] जिल्ह्यांमधील 471 विद्यार्थ्यांना ₹9.10 लाख कमी प्रदान झाले आणि सात [46] जिल्ह्यांमधील 271 विद्यार्थ्यांना ₹3.87 लाखांची जास्त रक्कम देण्यात आली, जे **परिशिष्ट 2.5** मध्ये तपशीलवार दर्शविले आहे.

तदनुषंगाने, मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना आणि स्वाधार योजना या दोन्ही योजनांची अंमलबजावणी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाद्वारे केली जाते. तथापि, दोन्ही योजनांतर्गत केलेल्या प्रदानाच्या विदाची पडताळणी करण्यात समन्वयाचा अभाव असल्याने मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत निर्वाह भत्त्यांचे स्वाधार योजनेंतर्गत निर्वाह भत्त्यामधून चुकीचे समायोजन झाले.

निवडलेल्या जिल्ह्यांमधील कमी/जास्त प्रदान हे स्वाधार योजनेंतर्गत लाभार्थी ओळख, प्रदान प्रक्रिया आणि संनियंत्रण यामधील पद्धतशीर कमकुवतपणा दर्शवते, ज्यामुळे वसतिगृह सुविधांच्या अभावाची भरपाई करणारी यंत्रणा म्हणून त्याचा प्रभाव कमी होतो.

शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2025) की, शिष्यवृत्ती योजनेंतर्गत प्रदान करण्यात येणाऱ्या निर्वाह भत्त्याची स्वाधार योजनेंतर्गत प्रदानातून समायोजन करण्याची अट काढून टाकणारा शासकीय निर्णय जारी करण्यात आला आहे (ऑक्टोबर 2025).

तथापि, 2021-22 ते 2023-24 दरम्यान स्वाधार योजनेंतर्गत केलेल्या कमी/जास्त प्रदानाबाबत शासनाने कोणतेही उत्तर दिले नव्हते.

2.2.8 वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी सुविधांची उपलब्धता

लेखापरीक्षणाचा तिसरा उद्देश वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार/शासन निर्णयानुसार योग्य सुविधा पुरविल्या जात आहेत की नाही याचे मूल्यांकन करणे हा होता. पुढील परिच्छेदांमध्ये चर्चा केल्याप्रमाणे वसतिगृहांच्या बांधकामात विलंब, अनुदानित वसतिगृहांत आवश्यक जागेची अनुपलब्धता, शासकीय वसतिगृहांत आणि अनुदानित

[45] अहिल्यानगर, बुलढाणा, धाराशिव, जालना, लातूर, नागपूर, पुणे, सांगली आणि ठाणे.

[46] अहिल्यानगर, बुलढाणा, धाराशिव, लातूर, नागपूर, पुणे आणि ठाणे

वसतिगृहांत सुविधांची अनुपलब्धता, अधीक्षकांची कमतरता इ. बाबी लेखापरीक्षणात निदर्शनास आल्या.

2.2.8.1 शासकीय वसतिगृहांच्या बांधकामास विलंब

जून 2007 आणि डिसेंबर 2015 मध्ये अनुक्रमे 100 वसतीगृहे (100 क्षमतेच्या मुलांसाठी 60 आणि मुलींसाठी 40) आणि 250 क्षमतेच्या 50 मुलींच्या वसतिगृहांच्या बांधकामाला मंजुरी दिली होती. 2007 ते 2019[47] दरम्यान सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने 33 कामांना प्रशासकीय मान्यता दिली.

सार्वजनिक बांधकाम विभागाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाला सादर केलेल्या (मार्च 2024) वसतिगृह इमारतीच्या चालू असलेल्या बांधकामाबाबत मासिक प्रगती अहवालानुसार 33 वसतिगृह इमारतींच्या बांधकामाची स्थिती **तक्ता 2.10** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 2.10: 31 मार्च 2024 पर्यंत वसतिगृह इमारतींच्या चालू बांधकामाची स्थिती

अनु. क्र.	कामांचा तपशील	कामांची संख्या
1	पूर्ण झाले पण हस्तांतरित केले नाही	10
2	प्रगतीपथावर आहे	14
3	सुधारित प्रशासकीय मंजुरीचा टप्पा	02
4	अंदाजपत्रक तयार करण्याच्या टप्प्यावर	01
5	जमीन उपलब्ध नाही	06
	एकूण	**33**

स्त्रोत: सार्वजनिक बांधकाम विभागाने विभागाला सादर केलेल्या मार्च 2024 च्या मासिक प्रगती अहवालानुसार

सार्वजनिक बांधकाम विभागाने मार्च 2024 च्या मासिक प्रगती अहवालात नोंदविल्यानुसार 33 कामांच्या स्थितीच्या लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, बहुतेक कामे कार्यान्वित केली गेली नाहीत. जरी 10 कामे पूर्ण झाली अशी नोंद असली तरी त्यांचे उपयोगाकरीता हस्तांतरण केले नव्हते जे कामे पूर्ण झाल्यानंतरचा प्रक्रियात्मक आणि समन्वय विलंब दर्शविते. उर्वरित कामांपैकी, 14 कामे अद्याप प्रगतीपथावर होती, तर तीन कामे अंदाज किंवा सुधारित प्रशासकीय मंजुरीच्या टप्प्याच्या पुढे गेली नव्हती. तसेच, जमीन उपलब्ध नसल्यामुळे सहा कामे रखडली होती जे प्राथमिक नियोजन आणि जागेच्या तयारीतील त्रुटी दर्शवितात. एकंदर स्थिती प्रकल्प अंमलबजावणीच्या अनेक टप्प्यांवर विलंब दर्शविते, परिणामी पूर्ण झालेल्या मालमत्तेचा वापर लांबणीवर पडला आणि इच्छित सेवा वितरण परिणाम पुढे ढकलले गेले.

[47] 2007:(2); 2008: (1); 2009: (1); 2010: (1); 2012: (1); 2013:(1); 2014: (2), 2015:(2); 2016:(4); 2018: (7) आणि 2019: (6). पाच शासकीय वसतिगृहाच्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाला सादर केलेल्या मासिक प्रगती अहवालात मंजुरीची तारीख उपलब्ध नव्हती.

पुढील परिच्छेदांमध्ये शासकीय वसतिगृहांच्या बांधकामास विलंब होण्याशी संबंधित दोन प्रकरणांची चर्चा केली आहे.

(i) ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथे वसतिगृहाचे बांधकाम

ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथे मुलांचे वसतिगृह (100 विद्यार्थ्यांची क्षमता) आणि मुलींचे वसतिगृह (75 विद्यार्थ्यांची क्षमता) यासाठी अनुक्रमे ₹2.64 कोटी आणि ₹2.63 कोटी खर्च करून प्रत्येकी एक इमारत बांधण्यासाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने प्रशासकीय मंजुरी दिली (मार्च 2014).

दोन्ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे कंत्राटदाराला देण्यात आली होती (एप्रिल 2015). हे काम 24 महिन्यांत पूर्ण करणे आवश्यक होते. काम पूर्ण करण्यासाठी कंत्राटदाराला वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली. प्रबलित सिमेंट काँक्रीट, प्लास्टरिंग आणि टाइलिंग पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराने 2019 मध्ये काम थांबवले. मात्र, दरवाजे, खिडक्या, मलनि: स्सारण टाकी, कुंपण भिंत आणि रंगरंगोटीची कामे कंत्राटदाराने पूर्ण केली नाहीत. कंत्राटदाराने सार्वजनिक बांधकाम विभागाला त्याच्या आर्थिक असमर्थतेचे कारण देवून हे निविदा काम मागे घेण्याची विनंती केली (सप्टेंबर 2021). 2019 ते 2023 या कालावधीत म्हणजेच तीन वर्षांहून अधिक काळ कोणतेही बांधकाम केले गेले नाही.

नंतर, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी ₹1.12 कोटींची प्रशासकीय मंजुरी दिली (जानेवारी 2023) आणि याव्यतिरिक्त दोन्ही वसतिगृहांचे विद्युतीकरणाचे काम पूर्ण करण्यासाठी ₹36.17 लाख देण्यात आले. पेव्हर ब्लॉक्स, गटार, भूमिगत पाण्याची टाकी, सांडपाणी टाकी इत्यादींचे काम आणि विद्युतीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे दोन वेगवेगळ्या कंत्राटदारांना देण्यात आले (जून 2023) होते. मुलांच्या वसतिगृहासाठी ₹2.27 कोटी आणि मुलींच्या वसतिगृहासाठी ₹2.28 कोटी खर्च करूनही डिसेंबर 2024 पर्यंत दोन्ही कामे अपूर्ण राहिली.

वसतिगृहांचे बांधकाम पूर्ण होण्याच्या अंतिम स्थितीत आहे आणि शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून वसतिगृहे कार्यान्वित केली जातील, असे शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2025).

(ii) गोंदिया जिल्ह्यात वसतिगृहाचे बांधकाम

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागामधील अभिलेख्यांच्या पडताळणीमधून असे निदर्शनास आले की, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने गोंदिया जिल्ह्यातील मौजा नांगपुरा येथे 250 क्षमतेचे मुलांचे वसतिगृह बांधण्याचा निर्णय (नोव्हेंबर 2011) घेतला. वसतिगृह बांधण्यासाठी जिल्हाधिकारी गोंदिया यांनी जमीन दिली होती (एप्रिल 2012). सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने ₹10.52 कोटी खर्चास प्रशासकीय मंजुरी दिली (सप्टेंबर 2012) आणि निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला मुक्त केला (फेब्रुवारी 2013). सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य

विभागाच्या सचिवांनी गोंदिया भेटीदरम्यान (ऑगस्ट 2016) शहरातील मध्यवर्ती भागात जेथे महाविद्यालयांची संख्या जास्त आहे तेथे नवीन सरकारी किंवा खासगी जमीन शोधण्याच्या सूचना दिल्या आणि बांधकाम थांबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. मात्र, निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कंत्राटदाराला ₹9.03 कोटींचे (विद्युतीकरण वगळता) कंत्राट देण्यात आले आणि नोव्हेंबर 2016 मध्ये कार्यादेश देण्यात आला.

तथापि, पर्यायी ठिकाणी जमीन उपलब्ध नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाला मूळ ठिकाणीच बांधकाम सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या (सप्टेंबर 2017). पुढे जमिनीवर अतिक्रमण झाल्याने बांधकाम सुरू होऊ शकले नाही. नंतर जिल्हा प्रशासनाने अतिक्रमण हटविले. कार्यादेश जारी करूनही कामासाठी जमीन उपलब्ध न झाल्याने कंत्राटदाराने जिल्हा न्यायालय, गोंदिया येथे ₹1.60 कोटी नुकसानभरपाईसाठी रिट याचिका (1/2018) दाखल केली होती (2018). सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेले (सप्टेंबर 2019) निवेदन फेब्रुवारी 2021 मध्ये जिल्हा न्यायालयाने फेटाळून लावले होते.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने कंत्राटदाराला (मे 2019) बांधकाम सुरू करण्याची विनंती केली पण कंत्राटदाराने जुन्या दराने काम करण्यास नकार दिला (2013-14 च्या जिल्हा दर सूचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते). म्हणूनच, सहाय्यक आयुक्त, गोंदिया यांनी सुधारित प्रशासकीय मंजुरीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ₹35.04 कोटी खर्चाचा सुधारित प्राथमिक अंदाज सादर केला (सप्टेंबर 2021). तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मंजुरी प्रलंबित होती (डिसेंबर 2024).

शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2025) की, सुधारित अंदाजपत्रक उच्चाधिकार समितीने मंजूर केले असून सुधारित प्रशासकीय मान्यता दिली गेली आहे.

ही दोन्ही प्रकरणे सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यातील नियोजन, कंत्राट व्यवस्थापन आणि आंतर-विभागीय समन्वयातील पद्धतशीर कमतरता दर्शवितात. दोन्ही प्रकरणांमध्ये, वसतिगृह प्रकल्प दीर्घ कालावधीसाठी अपूर्ण राहिले किंवा सुरू झाले नाहीत - एका घटनेत एक दशकाहून अधिक काळ - वारंवार प्रशासकीय मंजुरी आणि भरीव आर्थिक वचनबद्धता असूनही असे घडले. कंत्राटदाराने माघार घेणे, कंत्राट जोखीम व्यवस्थापन, जमिनीशी संबंधित निराकरण न झालेल्या समस्या, अंदाजपत्रकांमध्ये वारंवार सुधारणा करणे आणि प्रशासकीय मंजुरीला विलंब करणे यामुळे विलंब झाला. परिणामी, बराच खर्च करूनही आणि पूर्णत्वाची अनेक वेळा हमी देऊनही अपेक्षित वसतिगृह सुविधा वापरासाठी अनुपलब्ध राहिली, परिणामी वेळ आणि खर्च वाढला आणि पात्र विद्यार्थ्यांना निवासी शैक्षणिक सहाय्य नाकारले गेले.

2.2.8.2 भाड्याच्या इमारतींमध्ये चालणाऱ्या वसतिगृहातील जागांचा कमी वापर

नवीन शासकीय वसतिगृहांच्या मंजुरीसाठी जारी करण्यात आलेल्या शासकीय निर्णयात मंजूर शासकीय वसतिगृहांचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत वसतीगृहांचे कामकाज भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतींमध्ये सुरू करण्याची तरतूद वेळोवेळी करण्यात आली आहे.

मार्च 2024 पर्यंत, राज्यातील 443 शासकीय वसतिगृहांपैकी 155 शासकीय वसतिगृहे भाडेतत्त्वावरील इमारतींमध्ये कार्यरत होती. लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की या 155 शासकीय वसतिगृहांपैकी 36 शासकीय वसतिगृहे ज्यांची एकूण मंजूर क्षमता 3,290 विद्यार्थ्यांची होती, भाड्याने घेतलेल्या इमारतींची मर्यादित क्षमता असल्यामुळे केवळ 2,316 विद्यार्थ्यांना सामावून घेऊन भाड्याच्या वसतीगृहांमध्ये कार्यरत होती. मंजूर क्षमतेच्या तुलनेत कमी प्रवेश क्षमता असलेल्या भाड्याच्या इमारतींमध्ये शासकीय वसतिगृहांचे कामकाज पाच ते 50 टक्क्यांच्या दरम्यान होते.

मंजूर क्षमतेपेक्षा कमी प्रवेश क्षमता असलेल्या वसतिगृहांचा तपशील **परिशिष्ट 2.6** मध्ये दर्शविला आहे.

शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2025) की, सध्या भाड्याने घेतलेल्या 147 इमारतींपैकी 24 ठिकाणी शासकीय इमारतीचे बांधकाम सुरू असून अतिरिक्त 45 ठिकाणी जमीन उपलब्ध झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या समन्वयाने वसतिगृहे खात्रीने पूर्ण होतील याची काळजी घेतली जात आहे, असेही शासनाने नमूद केले.

लेखापरीक्षणाच्या निष्कर्षाचे पुरेसे निराकरण उत्तर करत नाही. शासनाने सूचित केले की, 24 ठिकाणी बांधकाम चालू आहे आणि अतिरिक्त 45 ठिकाणी जमीन उपलब्ध झाली आहे. तथापि, शासनाने ही वसतिगृहे कार्यान्वित करण्यासाठी कालबद्ध अंमलबजावणी योजना, टप्पे निहाय टप्पे किंवा पूर्णत्वाचे वेळापत्रक दिलेले नव्हते. दीर्घ विलंब आणि लेखापरीक्षणात नमूद केलेल्या अपूर्ण कामांमुळे हे सिद्ध झाले की, केवळ जागेची उपलब्धता किंवा बांधकाम सुरू करणे यामुळे कार्यात्मक वसतिगृह क्षमता वेळेवर निर्माण होत नाही. शिवाय, सार्वजनिक बांधकाम विभागाशी सुधारित समन्वयाचा दावा सामान्य स्वरूपाचा आहे आणि वसतिगृह प्रकल्पांचे नियोजन, अंमलबजावणी किंवा हस्तांतरणात मोजण्यायोग्य सुधारणा दर्शविणाऱ्या कागदोपत्री पुरव्यांद्वारे समर्थित नाही. शासनाच्या उत्तरात भाडेतत्त्वावरील इमारतींमध्ये सुरू असलेल्या उर्वरित 78 वसतिगृहांच्या इमारतींच्या बांधकामाबाबत कोणतीही कार्यवाही सूचित केलेली नाही.

2.2.8.3 नवीन विद्यार्थ्यांसाठी नव्याने बांधण्यात आलेल्या वसतिगृहांचा वापर नाही

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने नवीन विद्यार्थ्यांसाठी राज्यातील प्रत्येक सात क्षेत्रांमध्ये[48] क्षेत्रिय स्तरावर मुला-मुलींसाठी 1,000 क्षमतेची वसतिगृहे (प्रत्येकी 250 क्षमतेचे चार[49] युनिट्स) बांधण्यास मान्यता दिली (जून 2007). तसेच

[48] अमरावती, छत्रपती संभाजीनगर, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक आणि पुणे

[49] मुलांसाठी तीन युनिट आणि मुलींसाठी एक युनिट

पिंपरी-चिंचवड येथे मुलांसाठी 250 क्षमतेच्या नवीन वसतिगृहासाठी सामाजिक न्याय आणि सहाय्य विभागाने नोव्हेंबर 2012 मध्ये मान्यता दिली होती.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, नवीन विद्यार्थ्यांना सामावून घेण्याच्या उद्देशाने नवीन वसतिगृहांचा वापर करण्याऐवजी, विभागाने विद्यार्थ्यांना विद्यमान वसतिगृहांमधून नवीन वसतिगृहात स्थलांतरित केले ज्यामुळे पुढील परिच्छेदांमध्ये नमूद केल्याप्रमाणे क्षमता वाढवण्याचे उद्दिष्ट अयशस्वी झाले.

(i) लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, डिसेंबर 2016 मध्ये प्रत्येकी 250 क्षमतेची पुण्यातील युनिट I मुलांचे वसतिगृह आणि युनिट II मुलांचे वसतिगृह 1,000 क्षमतेच्या विभागीय वसतिगृहाचा भाग म्हणून कार्यान्वित झाली. पुण्यातील युनिट I मुलांच्या वसतिगृहात नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. तथापि, पुण्यातील युनिट II मुलांच्या वसतिगृहात, नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याऐवजी, संत ज्ञानेश्वर मुलांचे वसतिगृह (क्षमता:120) आणि मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह (क्षमता:75) या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना वसतिगृहाची मोडकळीस आलेली इमारत आणि तेथील अपुऱ्या सुविधांमुळे तात्पुरते स्थलांतरित करण्यात आले.

लेखापरीक्षणात असे ही निदर्शनास आले की, सप्टेंबर 2018 मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने संत ज्ञानेश्वर वसतिगृहाच्या दुरुस्तीसाठी ₹2.50 कोटींचा अंदाज सादर केला होता, परंतु सप्टेंबर 2024 पर्यंत सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने कोणतीही कार्यवाही केली नाही.

(ii) लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले (सप्टेंबर 2024) की, निगडी, पुणे येथे भाड्याच्या इमारतीत चालणाऱ्या आणि 100 विद्यार्थ्यांची क्षमता असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह भाड्याच्या इमारतीची दुरावस्था आणि मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे 2016-17 मध्ये पिंपरी चिंचवड येथे 250 क्षमतेच्या मुलांच्या वसतिगृहाच्या नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीत स्थलांतरित करण्यात आले. जरी प्रारंभी तात्पुरते स्थलांतर करण्यात आले होते तरी, पिंपरी-चिंचवड येथे 250 मुलांची क्षमता असलेले वसतिगृह 2018-19 मध्ये अधिकृतपणे सुरू झाले असून त्यात केवळ 150 नवीन विद्यार्थ्यांना सामावून घेण्यात आले कारण निगडी वसतिगृहातील 100 विद्यार्थ्यांना त्याच वसतिगृहाच्या इमारतीत आधीच स्थलांतरित करण्यात आले आहे. परिणामी, निर्माण करण्यात आलेली अतिरिक्त क्षमता 250 विद्यार्थ्यांच्या तुलनेत केवळ 150 विद्यार्थ्यांसाठी होती.

पिंपरी चिंचवड वसतिगृहाच्या अधीक्षकाने नमूद केले (सप्टेंबर 2024) की, गेल्या तीन वर्षांत वार्षिक 150 ते 200 पात्र नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकला नाही.

निर्गमन बैठकीत आयुक्तांनी नमूद केले की, मोडकळीस आलेल्या आणि अपुऱ्या सुविधा असणाऱ्या दोन वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या निवासासाठी वाघोली, पुणे येथे नवीन जागा निश्चित केली असून त्याबाबतचा प्रस्ताव शासनाला सादर केला जाईल.

शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2025) की, गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी प्रस्तावित अर्थसंकल्प प्राप्त झाला असून नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर वसतिगृह स्थलांतरित केले जाईल.

2.2.8.4 शासकीय वसतीगृहांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध नसणे

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने मे 1984 व जुलै 2011 मध्ये जारी केलेले शासन निर्णय आणि वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या इतर सूचनांमध्ये शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सी.सी.टी.व्ही., अग्निशामक यंत्र, भोजन कक्ष, संगणक, ग्रंथालय, इन्व्हर्टर सुविधा इत्यादी मूलभूत सुविधा पुरविणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

निवडलेल्या 18 शासकीय वसतिगृहांच्या संयुक्त प्रत्यक्ष पडताळणीत खाली नमूद केल्याप्रमाणे पुरविल्या जाणाऱ्या मूलभूत सुविधांमध्ये त्रुटी होत्या असे निदर्शनास आले.

- 11 शासकीय वसतिगृहांत अग्निशामक यंत्र उपलब्ध नव्हते/पुन्हा भरले नव्हते.
- 12 शासकीय वसतिगृहांत इनव्हर्टर आणि संगणक प्रयोगशाळेची सुविधा उपलब्ध नव्हती.
- चार शासकीय वसतिगृहांत सीसीटीव्ही सुविधा उपलब्ध नव्हती.
- सात शासकीय वसतिगृहांत ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध नव्हती.
- आठ शासकीय वसतिगृहांत मासिके आणि वृत्तपत्रे उपलब्ध नव्हती.
- पाच शासकीय वसतिगृहांत रंगीत टीव्ही उपलब्ध नव्हता.
- चार[50] शासकीय वसतिगृहांत विद्यार्थ्यांची वार्षिक वैद्यकीय तपासणी केली गेली नव्हती.
- चार शासकीय वसतिगृहांत शैक्षणिक सहल आयोजित केली गेली नव्हती आणि तक्रार नोंदवही ठेवली गेली नव्हती.
- चार[51] शासकीय वसतिगृहांत भोजन कक्षात टेबल आणि खुर्च्या उपलब्ध नव्हत्या तर दोन[52] शासकीय वसतिगृहांत योग्य भोजन कक्ष नव्हता. जेवणाची योग्य सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना दुपारचे आणि रात्रीचे जेवण जमिनीवर बसून घ्यावे लागत होते.

---

50 (i) मुलींचे वसतिगृह, ठाणे (ii) मुलांचे वसतिगृह, नळदुर्ग, धाराशिव (iii) मुलांचे वसतिगृह, जत, सांगली (iv) मुलींचे वसतिगृह, मंथा, जालना

51 (i) मुलांचे वसतिगृह, मोशी पिंपरी चिंचवड, (उ) मुलींचे वसतिगृह, अहिल्यानगर (iii) मुलींचे वसतिगृह, ठाणे (iv) मुलांचे वसतिगृह, नांदुरा, बुलढाणा

52 (i) मुलींचे वसतिगृह, तळेगाव दाभाडे, पुणे (ii) मुलांचे वसतिगृह, ठाणे



छायाचित्र 1: मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, मोशी, पिंपरी-चिंचवड, पुणे येथे जमिनीवर बसून जेवण घेताना विद्यार्थी

शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2025) की, भोजन कक्षात खुर्च्या आणि टेबले उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

निर्गमन बैठकीत, प्रधान सचिवांनी नमूद केले (ऑक्टोबर 2025) की, क्षेत्रीय कार्यालयांकडून स्पष्टीकरण मागितले जाईल आणि लेखापरीक्षणास सादर केले जाईल.

संयुक्त प्रत्यक्ष पडताळणी दरम्यान निदर्शनास आलेल्या कमतरतांचा उत्तरात उल्लेख नव्हता. 18 शासकीय वसतिगृहांच्या प्रत्यक्ष पडताळणी आणि तपासणी वेळी सादर केलेल्या दस्ताऐवज पुराव्यांद्वारे आधारीत लेखापरीक्षण निष्कर्ष होते जे शासकीय निर्णय व विभागीय सूचना यांमध्ये अनिवार्य केलेल्या अनेक मूलभूत सुविधांमध्ये त्रुटी दर्शवितात. मूलभूत सुविधांमधील सततच्या त्रुटीमुळे शासकीय वसतिगृहांची धोरणात्मक साधने म्हणून परिणामकारकता कमी झाली, परिणामी, सार्वजनिक संसाधनांचा अपुरा वापर होऊन वंचित विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची न्याय्य उपलब्धता सुनिश्चित करण्याची राज्याची क्षमता कमी झाली.

2.2.8.5 शासकीय वसतिगृहांमध्ये अधीक्षकाची कमतरता

वसतिगृहांचे संपूर्ण व्यवस्थापन आणि दैनंदिन कामकाजाची जबाबदारी अधीक्षका असते**.** अधीक्षक विद्यार्थ्यांच्या तक्रारींकडे लक्ष देऊन आपत्कालीन परिस्थितीत विद्यार्थ्यांना मदत करतात. लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की **परिशिष्ट 2.7** मध्ये दिलेल्या तपशीलानुसार सहा[53] जिल्ह्यांतील शासकीय वसतिगृहांत अधीक्षकाची कमतरता होती.

- एकूण 109 वसतिगृहांपैकी 49 वसतिगृहांमध्ये (28 मुलींच्या वसतिगृहासह) अधीक्षकांची पदे रिक्त होती आणि या वसतिगृहांचे अतिरिक्त प्रभार इतर वसतिगृहांच्या नियमित अधीक्षकांना देण्यात आले होते.

[53] बुलढाणा, धाराशीव, जालना, लातूर, नागपूर आणि सांगली. उर्वरित तीन निवडलेल्या जिल्ह्यांनी विदा सादर केला नाही.

- अधीक्षकांची पदे रिक्त असल्याचा कालावधी नऊ महिने ते 17 वर्षे आणि दोन महीनेपर्यंतचा होता.
- मुलींच्या पाच[54] वसतिगृहांमध्ये अधीक्षकाची जबाबदारी पुरुष अधीक्षकाकडे देण्यात आली होती.

इतर वसतिगृहांच्या नियमित अधीक्षकांना इतर वसतिगृहांच्या रिक्त पदांचे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आले ज्यामुळे एका अधीक्षकला दोन ते तीन वसतिगृहांचे कामकाज करावे लागले. विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि आधार देण्यासाठी तसेच, आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर मदत करण्यासाठी वसतिगृहात पूर्णवेळ अधीक्षकाची उपस्थिती महत्त्वपूर्ण आहे.

शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2025) की नियुक्तीसाठी निवडलेल्या अधीक्षकांच्या दस्तऐवजांची पडताळणी, वैद्यकीय आणि पोलिस पडताळणी प्रगतीपथावर आहे.

2.2.8.6 शासकीय वसतिगृहात अपंग विद्यार्थ्यांना आवश्यक सोयी-सुविधांचा अभाव

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयात (ऑक्टोबर 2013) विद्यमान वसतिगृहांमध्ये अपंग विद्यार्थ्यांना सर्व अडथळामुक्त सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विभागाने तातडीने कार्यवाही करावी अशी तरतूद करण्यात आली होती. वसतिगृहात अपंग विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यासाठी विहित मुदतीत कार्यवाही करण्याची सुनिश्चिती संबंधित प्रशासकीय विभागाने करणे आवश्यक आहे व प्रत्येक तिमाही संपल्यानंतर येणाऱ्या पहिल्या आठवड्यात यासंदर्भातील त्रैमासिक अहवाल अधिनस्थ कार्यालयांनी विभागाला सादर करणे आवश्यक आहे.

सर्व शासकीय वसतिगृहांत आणि अनुदानित वसतिगृहांत अपंग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधांच्या उपलब्धतेची माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात आली नाही. तसेच, 18 शासकीय वसतिगृहांच्या तपासणी दरम्यान असे निदर्शनास आले की, सहा[55] वसतिगृहांत अपंग विद्यार्थ्यांसाठी तळमजल्यावर राहण्याची सोय उपलब्ध नव्हती, तर केवळ सात[56] वसतिगृहांत अडथळामुक्त सुविधा उपलब्ध होत्या. निवडलेल्या 18 शासकीय वसतिगृहांपैकी केवळ एका शासकीय वसतिगृहाने (125वी जयंती मागासवर्गीय

[54] (i) मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, वाशी, धाराशिव (ii) मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, अंबड (iii) मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, कुही, नागपुर (iv) मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, खामगाव, बुलढाणा आणि (v) मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, अहमदपूर, लातूर

[55] (i) 250 मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे वसतिगृह, मोशी, पुणे, (ii) संत सखूबाई मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, अहमदनगर, (iii) मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, वाशी, धाराशिव, (iv) मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे वसतिगृह, जत, सांगली, (v) मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे वसतिगृह, जालना, (vi) मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे वसतिगृह, मनीष नगर, नागपूर

[56] (i) मुलांचे वसतिगृह, मोशी, पिंपरी-चिंचवड, (ii) मुलांचे वसतिगृह, लोणी अहिल्यानगर, (iii) मुलांचे वसतिगृह, नळदुर्ग, धाराशिव, (iv) मुलींचे वसतिगृह, चिंचणी, सांगली, (v) मुलींचे वसतिगृह, मंठा, जालना, (vi) मुलांचे वसतिगृह, शेगाव, बुलढाणा, (vii) मुलींचे वसतिगृह, वानाडोंगरी, नागपूर

मुलींचे शासकीय वसतिगृह, तळेगाव दाभाडे, पुणे) आवश्यक त्रैमासिक अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर केला होता.

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने वसतिगृहांमध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी अडथळामुक्त सुविधा आणि नियमित देखरेख अनिवार्य करण्याच्या स्वतःच्या शासन निर्णयाचे अनुपालन सुनिश्चित केले नाही. एकत्रित माहितीची अनुपलब्धता, अडथळामुक्त पायाभूत सुविधांची मर्यादित तरतूद, अनेक वसतिगृहांमध्ये तळमजल्यावरील निवासी सुविधांचा अभाव आणि विहित त्रैमासिक अहवाल सादर न करणे हे कमकुवत पर्यवेक्षण आणि अंमलबजावणी दर्शविते. परिणामी, अपंग विद्यार्थ्यांना खात्रीशीर प्रवेश, सुरक्षित गतिशीलता आणि सुयोग्य निवासी सुविधांपासून वंचित ठेवण्यात आले, ज्यामुळे सर्व समावेशक वसतिगृह-आधारित शैक्षणिक सहाय्याचे उद्दिष्ट फोल ठरले.

शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2025) की, शासकीय वसतिगृहांत प्रवेश घेतलेल्या अपंग विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा पुरविण्याचे निर्देश आयुक्तांनी अधिनस्थ कार्यालयांना जारी केले आहेत (ऑक्टोबर 2025).

2.2.8.7 शासकीय व अनुदानित वसतिगृहांत बायोमेट्रिक हजेरी यंत्रणा कार्यरत नसणे

महाराष्ट्र शासनाने 30 मार्च 2011 च्या शासन निर्णयाद्वारे सर्व शासकीय वसतिगृहांत आणि अनुदानित वसतिगृहांत कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी यंत्रणा लागू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार विभागाकडून बायोमेट्रिक हजेरी यंत्रणा पुरविण्याचे आदेश जारी करण्यात आले होते.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, **तक्ता 2.11** आणि **2.12** मध्ये दर्शविल्यानुसार अनेक वसतिगृहांमध्ये बायोमेट्रिक हजेरी यंत्रणेची व्यवस्था केली नव्हती किंवा ती कार्यरत नव्हती.

तक्ता 2.11: शासकीय वसतिगृहांतील बायोमेट्रिक हजेरी यंत्रणेची स्थिती

अनु.क्र.	विभाग	जिल्ह्यांची संख्या	शासकीय वसतिगृहांची संख्या	बायोमॅट्रिक यंत्रणा बसविलेल्या शासकीय वसतिगृहांची संख्या	कार्यरत बायोमॅट्रिक यंत्रणा
1	नाशिक	05	53	45	08
2	लातूर	04	60	60	04
3	छत्रपती संभाजी नगर	04	51	19	04
4	पुणे	05	93	93	00
5	नागपूर	06	70	63	30
एकूण		**24**	**327**	**280**	**46**

स्रोत: प्रादेशिक उप-जिल्हाधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी सादर केलेली माहिती

तक्ता 2.11 मध्ये दर्शविल्याप्रमाणे

- 327 शासकीय वसतिगृहांपैकी, 280 शासकीय वसतिगृहांमध्ये (86 टक्के) बायोमॅट्रिक उपस्थिती यंत्रणा स्थापित केली होती जे हार्डवेअर उपयोजनामधील लक्षणीय प्रगती दर्शविते.
- तर, केवळ 46 वसतिगृहांमध्ये) एकूण शासकीय वसतिगृहांच्या 14 टक्के; स्थापित यंत्रणाच्या 16 टक्के (बायोमॅट्रिक यंत्रणा कार्यरत होती**,** जे स्थापना आणि कार्यचालन यातील मोठी तफावत दर्शविते.

ठळक मुद्दे:

- पुणे विभागाने 100 टक्के (93/93 शासकीय वसतिगृहे) स्थापना करण्याचे लक्ष्य साध्य करूनही शून्य कार्यरत बायोमेट्रिक यंत्रणेची नोंद केली, ज्यामुळे गुंतवणूक कुचकामी ठरली.
- लातूर विभागाने देखील पूर्ण स्थापना (60 शासकीय वसतिगृहे) नोंदविली, परंतु केवळ चार यंत्रणा कार्यरत होत्या, ज्यामुळे कमकुवत स्थापना-पश्चात आधार दिसून येतो.
- नागपूर विभागाने तुलनेने चांगली कामगिरी केली, बसविलेल्या 63 पैकी 30 कार्यरत यंत्रणा, तरीही येथे अर्ध्याहून कमी यंत्रणा कार्यरत होत्या.
- छत्रपती संभाजी नगर विभागाने कमी स्थापना (51 शासकीय वसतिगृहांपैकी 19) आणि कमी कार्यात्मकता (चार शासकीय वसतिगृहे) दोन्ही नोंदविल्या, जे दोन्ही टप्प्यांमध्ये मागे असल्याचे दर्शविते.

तक्ता 2.12: नोव्हेंबर 2025 अखेरीस अनुदानित वसतिगृहांतील बायोमेट्रिक हजेरी यंत्रणेची स्थिती

अनु.क्र.	विभाग	जिल्हयांची संख्या	अनुदानित वसतिगृहांची संख्या	बायोमॅट्रिक यंत्रणा बसविलेल्या अनुदानित वसतिगृहांची संख्या	कार्यरत बायोमॅट्रिक यंत्रणा
1	नाशिक	05	483	483	150
2	लातूर	04	396	396	239
3	नागपूर	06	346	342	125
4	अमरावती	01	41	39	00
5	मुंबई	01	26	26	00
	एकूण	**17**	**1,292**	**1,286**	**514**

स्रोत: प्रादेशिक उप जिल्हाधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी सादर केलेली माहिती

तक्ता 2.12 मध्ये दर्शविल्याप्रमाणे

- 1,292 अनुदानित वसतिगृहांपैकी, 1,286 अनुदानित वसतिगृहांमध्ये (जवळजवळ 100 टक्के) बायोमॅट्रिक उपस्थिती यंत्रणा स्थापित केली होती जे हार्डवेअरची प्रभावी अंमलबजावणी दर्शविते.
- तथापि, केवळ 514 वसतिगृहांमध्येच) एकूण अनुदानित वसतिगृहांच्या 39.78 टक्के; स्थापित यंत्रणेच्या 39.96 टक्के (बायोमॅट्रिक उपस्थिती यंत्रणा कार्यरत होती जे अंमलबजावणीतील लक्षणीय तफावत दर्शविते.
- लातूर विभागाने 396 अनुदानित वसतिगृहांपैकी (सुमारे 60 टक्के) पैकी 239 कार्यरत प्रणालींसह तुलनेने चांगली कामगिरी केली.
- नाशिक विभागात 483 अनुदानित वसतिगृहांपैकी पूर्ण स्थापना करूनही केवळ 150 कार्यरत यंत्रणा (31 टक्के) होत्या.
- नागपूर विभागात 346 अनुदानित वसतिगृहांपैकी 36) 125 टक्के (कार्यर प्रणालींची नोंद केली.
- अमरावती आणि मुंबई विभागांनी जवळपास पूर्ण बायोमेट्रिक यंत्रणा बसवल्यानंतरही शून्य कार्यक्षमतेची नोंद केली, ज्यामुळे या विभागांमधील गुंतवणूक कुचकामी ठरली.

बायोमेट्रिक हजेरी यंत्रणा शासकीय आणि अनुदानित वसतिगृहांमध्ये लागू करण्यात आली होती तरी, तिची मर्यादित कार्यक्षमता, विशेषत: शासकीय वसतिगृहांमध्ये स्थापनेपश्चात अपुरे नियोजन आणि कमकुवत संनियंत्रण दर्शविते. अनुदानित वसतिगृहांमधील जास्त कार्यक्षमता दर तुलनेने चांगली अवशोषण क्षमता सूचित करतो; तथापि, दोन्ही श्रेणींमधील यंत्रणेची एकूण परिणामकारकता मर्यादित राहिली, परिणामी तांत्रिक गुंतवणुकीचा अपुरा वापर झाला.

शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2025) की, सर्व प्रादेशिक उप-जिल्हाधिकाऱ्यांना तीन महिन्यात बायोमेट्रिक हजेरी यंत्रणा खरेदी करण्याचे आणि शासकीय वसतिगृहांमध्ये उपस्थिती नोंद सुरू करण्याचे निर्देश जारी केले आहेत.

2.2.8.8 अनुदानित वसतिगृहांत विहित क्षेत्राची अनुपलब्धता

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने विद्यार्थ्यांच्या मंजूर क्षमतेच्या आधारे विद्यमान आणि नवीन अनुदानित वसतिगृहांसाठी आवश्यक असलेले किमान आणि कमाल क्षेत्रफळ विहित केले (डिसेंबर 2019). विहित केलेले किमान व कमाल क्षेत्रफळ **तक्ता 2.13** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 2.13: अनुदानित वसतिगृहांसाठी विहित केलेले किमान व कमाल क्षेत्रफळ

अनु.क्र.	वसतिगृहातील विद्यार्थ्यांची मंजूर संख्या	किमान क्षेत्रफळ (चौरस फुटांमध्ये)	कमाल क्षेत्रफळ (चौरस फुटांमध्ये)
1	24 - 47	4,000	4,900
2	48 - 74	6,000	7,315
3	75 - 99	9,120	11,050
4	100 व पुढे	11,200	13,630

स्त्रोत: डिसेंबर 2019 मध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने जारी केलेला शासन निर्णय

या क्षेत्रफळामध्ये विद्यार्थ्यांसाठी निवासव्यवस्था, कार्यालय, स्वयंपाकघर, भोजनकक्ष, फडताळ, बहुउद्देशीय कक्ष, अधीक्षकांची निवासव्यवस्था, सुरक्षरक्षक निवासव्यवस्था, स्वच्छतागृह (वॉश बेसिनसह), मार्गिका व जिन्याचा समावेश आहे.

अशासकीय संस्थेतर्फे भाड्याच्या इमारतीत चालविलेल्या अनुदानित वसतिगृहाचे क्षेत्रफळ कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अनुदानित वसतिगृहांमध्ये किमान क्षेत्रफळ सतत राखले जाईल याची वेळोवेळी सुनिश्चिती करणे आवश्यक आहे. त्याचे अनुपालन न केल्यास अनुदानित वसतिगृहांना दिलेली मान्यता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद समाजकल्याण आयुक्तांच्या पूर्व संमतीने रद्द करण्यास जबाबदार असतील. कोविड-19 मुळे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने अनुदानित वसतिगृहात पुरेशी जागा आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 30 जून 2021 पर्यंत मुदतवाढ मंजूर केली (जानेवारी 2021) जी पुढे 30 जून 2023 पर्यंत वाढविण्यात आली.

अभिलेख्यांच्या तपासणीत (डिसेंबर 2024 आणि जानेवारी 2025) असे उघड झाले की, निवडलेल्या नऊ जिल्ह्यांपैकी तीन[57] जिल्ह्यांत 117 वसतिगृहे होती. तीन जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयांतील अभिलेख्यांच्या तपासणीत असे उघड झाले की, **परिशिष्ट 2.8** मधील तपशीलानुसार तीन जिल्ह्यांतील 117 पैकी 58 वसतिगृहांमध्ये वसतिगृहासाठी विहित केलेले किमान क्षेत्रफळ नव्हते. असेही निदर्शनास आले की, या 58 वसतिगृहांपैकी 24 वसतिगृहांतील (41 टक्के) किमान क्षेत्रफळाची तूट 50 टक्क्यांहून अधिक होती.

धाराशिव, सांगली आणि जालना जिल्ह्यांतील अनुदानित वसतिगृहांच्या लेखापरीक्षण पडताळणीत शासन निर्णयाद्वारे (0 9.12.2019) विहित केलेल्या किमान बांधीव क्षेत्रफळ मानकांचे अनुपालन न करण्याचे मोठ्या प्रमाणावर निदर्शनास आले.

चाचणी-तपासणी केलेल्या सर्व वसतिगृहांमध्ये आवश्यक क्षेत्रफळात कमतरता आढळली, ज्यात किरकोळ 0.34 टक्क्यांपासून ते 90 टक्क्यांहून अधिक तुटवडा होता. सांगली

[57] धाराशिव, जालना आणि सांगली

जिल्ह्यात ही कमतरता तीव्र होती, जिथे 30 ते 162 विद्यार्थ्यांची मंजूर क्षमता असूनही अनेक वसतिगृहांमध्ये 90 टक्क्यांहून अधिक क्षेत्रफळाची कमतरता नोंदली गेली.

धाराशिव जिल्ह्यात, बहुतेक वसतिगृहांमध्ये 50 टक्क्यांहून अधिक कमतरता दिसून आली, तर जालना जिल्ह्यात एक वसतिगृह वगळता 76 टक्क्यांपर्यंत कमतरता होती.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी (जानेवारी 2020 आणि ऑगस्ट 2023) आणि जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी (जून 2022 आणि जुलै 2022) आवश्यक सुविधांसह आवश्यक जागा उपलब्ध न केल्याबद्दल सर्व कसूरदार वसतिगृहांना नोटिसा बजावल्या. आवश्यक जागा उपलब्ध न केल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत असूनही कसूरदार वसतिगृहांची मान्यता रद्द करण्याची कारवाई करण्यात आली नाही.

निर्गमन बैठकीत प्रधान सचिवांनी विभागाने नेमून दिलेल्या क्षेत्रफळाच्या नियमाचे पालन न केलेल्या वसतिगृहांचा आढावा घेण्याचे मान्य केले (ऑक्टोबर 2025).

किमान क्षेत्रफळाचे निकष विहित करून अनुपालनासाठी अनेक मुदतवाढ देऊनही विभागाने अनुदानित वसतिगृहे निर्धारित पायाभूत सुविधांच्या मानकांचे पालन करत आहेत याची सुनिश्चिती केली नाही. विहित क्षेत्रफळाची लक्षणीय कमतरता असलेल्या वसतिगृहांना सातत्याने मान्यता देणे, ज्यात 50 टक्क्यांहून अधिक कमतरता असलेल्या प्रकरणांचा समावेश आहे, हे विभागाची कमकुवत अंमलबजावणी आणि संनियंत्रण दर्शविते. परिणामी, विद्यार्थ्यांना गर्दीमध्ये आणि अपुऱ्या सुविधांमध्ये राहण्यास भाग पाडले गेले, ज्यामुळे त्यांच्या आरोग्यावर, सुरक्षिततेवर आणि एकूणच राहणीमानावर विपरित परिणाम झाला आणि सन्माननीय निवासी शैक्षणिक सहाय्य प्रदान करण्याचा उद्देश विफल ठरला.

2.2.8.9 अनुदानित वसतिगृहात मूलभूत सुविधांचा अभाव

अशासकीय संस्थांकडून अनुदानित वसतिगृहे चालविण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने जारी केलेल्या (मार्च 1998) मार्गदर्शक सूचनांमध्ये इतर गोष्टींबरोबरच पुरेसे शौचालय/स्वच्छतागृहे, पुरेसे आणि दर्जेदार अन्न, पुरेसे पाणी, स्वच्छ परिसर, अन्नधान्याचा एक महिन्याचा राखीव साठा (बफर स्टॉक) इत्यादींचा समावेश आहे. मार्गदर्शक सूचनांनुसार, गैरव्यवहाराच्या प्रत्येक प्रकरणासाठी अशासकीय संस्थेला ₹1,000 दंड आकारला जातो आणि अशा दंडाची रक्कम व्यवस्थापनाला देण्यात येणाऱ्या अनुदानातून वजा करणे आवश्यक आहे.

जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या अंतिम अनुदान निर्धारण अहवालाच्या छाननीत सहा जिल्ह्यांत[58] असे निदर्शनास आले की बहुतेक वसतिगृहे स्वच्छ शौचालय, स्वच्छ परिसर, वसतिगृहाच्या आवारात पुरेसा प्रकाश आणि अग्निरोधक/अग्निशामक यंत्राची उपलब्धता यासारख्या मूलभूत सुविधा पुरविण्यात

[58] अहिल्यानगर, बुलढाणा, लातूर, नागपूर, पुणे आणि सांगली.

दरवर्षी अपयशी ठरतात. मूलभूत सुविधा पुरविण्यात सातत्याने अपयशी ठरलेल्या वसतिगृहांची जिल्हा-निहाय संख्या तक्ता **2.14** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 2.14: विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा पुरविण्यात सातत्याने अपयशी ठरलेली वसतिगृहे

अ. क्र.	जिल्ह्याचे नाव	वर्ष	वसतिगृहांची एकूण संख्या	लेखापरीक्षण तपासणीसाठी सादर केलेल्या प्रकरणांची संख्या	मूलभूत सुविधा न पुरविल्याबद्दल दंड आकारला गेलेल्या अनुदानित वसतिगृहांची संख्या	मूलभूत सुविधा पुरविण्यात अपयशी ठरलेल्या वसतिगृहांची टक्केवारी (लेखापरीक्षण तपासणीसाठी सादर केलेल्या प्रकरणांपैकी))	वारंवार कसूरदार
1	2	3	4	5	6	7	8
1	पुणे	2021-22	79	54	42	77.77	64
		2022-23	79	70	68	97.14	
		2023-24	79	66	60	90.90	
2	अहिल्यानगर[59]	2021-22	108	83	69	83.13	57
		2022-23	108	77	69	89.61	
3	सांगली	2021-22	42	42	26	61.90	22
		2022-23	42	42	08	19.05	
		2023-24	42	42	18	42.86	
4	नागपूर	2021-22	98	20	12	60.00	23
		2022-23	98	50	47	94.00	
		2023-24	98	29	27	93.10	
5	बुलढाणा	2021-22	41	15	15	100.00	12
		2022-23	41	07	07	100.00	
		2023-24	41	17	17	100.00	
6	लातूर[60]	2022-23	91	37	37	100.00	12
		2023-24	91	22	22	100.00	

स्त्रोत: जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या अंतिम अनुदान मूल्यांकन अहवालातून संकलित

[59] अहिल्यानगर संदर्भात वर्ष 2023-24 चा विदा सादर करण्यात आला नाही.

[60] लातूर जिल्ह्याच्या संदर्भात वर्ष 2021-22 चा विदा सादर करण्यात आला नाही.

तक्ता 2.14 मधील ठळक मुद्दे:

- चाचणी तपासणी केलेल्या सर्व सहा जिल्ह्यांमध्ये, 1998 च्या सुरुवातीस स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जारी करूनही मोठ्या प्रमाणात अनुदानित वसतिगृहांनी स्वच्छ शौचालये, स्वच्छ परिसर, पुरेशी प्रकाश व्यवस्था आणि अग्निसुरक्षा उपकरणे यांसारख्या मूलभूत सुविधा पुरविल्या नव्हत्या.
- अनेक जिल्ह्यांमध्ये तुटीचे प्रमाण अत्यंत जास्त आहे:
- बुलढाणा आणि लातूरमध्ये चाचणी-तपासणी केलेल्या सर्व वर्षांत 100 टक्के कमतरतेचे प्रमाण नोंदवले गेले, जे अनुपालनाचे पूर्ण खंडन दर्शविते.
- पुणे आणि नागपूर या शहरांत अनुक्रमे 78 टक्के ते 97 टक्के आणि 60 ते 94 टक्के दरम्यान उणीवा दिसून आल्या ज्या उणीवा प्रासंगिक नसून पद्धतशीर होत्या हे दर्शवितात.
- काही वर्षांत तुलनेने कमी कमतरता असलेल्या जिल्ह्यांमध्ये देखील (उदा. 2022-23 मध्ये सांगली), त्यानंतरच्या वर्षातअनुपालन न करणे पुन्हा वाढले.

अनेक वसतिगृहांना वर्षानुवर्षे वारंवार कसूरदार म्हणून ओळखले गेले (उदा. पुणे, 64; अहिल्यानगर, 57; नागपूर, 23) तरीही त्यांना अनुदान मिळत राहिले आणि प्रभावी सुधारात्मक कारवाई न करता ती कार्यरत राहिली.

लेखा परिक्षणाद्वारे केलेल्या 21 अनुदानित वसतिगृहांच्या संयुक्त तपासणीत असे निदर्शनास आले की, वैद्यकीय अधिकारी, स्थानिक नगर पालिका/वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्याकडून सुविधांच्या स्वच्छतेबाबत आवश्यक प्रमाणपत्रे अकरा वसतिगृहांसाठी[61] प्राप्त केली गेली नव्हती.

---

[61] (i) युनियन बोर्डिंग हाऊस, रामोशीवाडी, पुणे (ii) नवभारत छात्र निवास, राजुर, अहिल्यानगर (iii) भीमा गौतमी मुलींचे वसतिगृह, कवि जंग नगर, अहिल्यानगर (iv) बसवेश्वर विद्यार्थी वसतिगृह, अंदूर, धाराशिव (v) तुळजा भवानी मुलींचे वसतिगृह, उमरगा, धाराशिव (vi) राजर्षि शाहू महाराज मुलींचे वसतिगृह, जाफराबाद, जालना (vii) नेहरू मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, गोलपांगरी, जालना (viii) ज्ञानदीप मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, बेलोरा, जालना (ix) मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, आझादवर्ड, रामटेक, नागपूर (x) राजर्षि शाहू महाराज मुलांचे वसतिगृह, कुही, नागपूर आणि (xi) अख्तर बेगम मुलींचे वसतिगृह, निलंगा, लातूर



छायाचित्र 2: ज्ञानदीप मुलांचे वसतिगृह, बेलोरा, मंठा, जिल्हा-जालना येथील अस्वच्छ व खुले स्वच्छतागृह

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने कसूरदार वसतिगृहांना प्रत्येकी ₹1,000 दंड ठोठावला होता. गेल्या 26 वर्षांपासून दंडाच्या रकमेत सुधारणा करण्यात आलेली नव्हती. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने सततच्या कसूरदारांवर कोणतीही कठोर कारवाई करण्याची शिफारस केली नाही. शिवाय, दंड आकारण्यात आला असला तरी आकारण्यात आलेला दंड अडथळा ठरत नसल्याने विद्यार्थ्यांना अस्वच्छतेतच राहावे लागत होते.

शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2025) की, दंडामध्ये वाढ करणे किंवा प्रस्तावित आवश्यक सुविधा न पुरविलेली अनुदानित वसतिगृहे बंद करण्याबाबत धोरण आखले जात आहे.

अनुदानित वसतिगृहांमध्ये मूलभूत सुविधांची तरतूद करणे अनिवार्य करणारी दीर्घकालीन मार्गदर्शक तत्त्वे असूनही, वसतिगृहांपैकी मोठ्या संख्येने बऱ्याच वसतिगृहांनी स्वच्छता, सुरक्षा आणि राहण्याच्या क्षमतेची किमान मानकांची सुनिश्चिती केली नाही. अकार्यक्षम अंमलबजावणी यंत्रणा आणि नाममात्र कालबाह्य दंड रचना यामुळे सततच्या कसूरदारांना अर्थपूर्ण सुधारात्मक कारवाई न करता कार्य सुरू ठेवण्याची परवानगी मिळाली. परिणामी, विद्यार्थ्यांना अस्वच्छ आणि असुरक्षित राहणीमानात राहण्यास भाग पाडले गेले, ज्यामुळे त्यांना आरोग्य आणि सुरक्षा धोक्यांना सामोरे जावे लागले आणि मागासवर्गीयांमधील विद्यार्थ्यांना सुयोग्य निवासी सहाय्य पुरविण्याच्या उद्देशाला धक्का बसला.

2.2.9 संनियंत्रण आणि मूल्यमापन

लेखापरीक्षणाचा चौथा उद्देश संनियंत्रण आणि मूल्यांकन यंत्रणा पुरेशी आणि प्रभावी आहेत का हा होता. पुढील परिच्छेदांमध्ये चर्चा केल्याप्रमाणे वसतिगृहांच्या तपासणीत कमतरता, जिल्हा आणि तालुका समन्वय समितीच्या बैठकांमध्ये कमतरता आणि अनुदानित वसतिगृहांच्या संशयास्पद बनावट कामकाजाचे निरीक्षण लेखापरीक्षणात आढळून आले.

2.2.9.1 शासकीय आणि अनुदानित वसतिगृहांच्या तपासणीत कमतरता

विभागाने जारी केलेल्या (सप्टेंबर 2004) शासन निर्णयामध्ये वरिष्ठ प्राधिकाऱ्यांकडून शासकीय वसतिगृहे आणि अनुदानित वसतिगृहांच्या तपासणीसाठी लक्ष्ये निश्चित करण्यात आली आहेत. आयुक्तांनी दरवर्षी एकूण शासकीय वसतिगृहांची आणि अनुदानित वसतिगृहांची पाच टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. जानेवारी 2020 मध्ये प्रादेशिक/जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांमार्फत तपासणीचे लक्ष्य आणखी सुधारित करण्यात आले. सुधारित लक्ष्यांनुसार प्रादेशिक उप-आयुक्तांनी दरमहा दोन शासकीय वसतिगृहांची आणि दोन अनुदानित वसतिगृहांची तपासणी करणे आवश्यक आहे. सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी दर दोन महिन्यातून एकदा म्हणजे वर्षातून सहा वेळा प्रत्येक शासकीय वसतिगृहांची तपासणी करणे आवश्यक आहे. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी वर्षातून तीन वेळा प्रत्येक अनुदानित वसतिगृहास भेट देणे आवश्यक आहे.

सादर केलेल्या माहितीनुसार, 2021-22 ते 2023-24 या कालावधीत आयुक्त, प्रादेशिक उप-आयुक्त, सहाय्यक आयुक्त आणि जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद स्तरावर शासकीय वसतिगृहांची आणि अनुदानित वसतिगृहांच्या तपासणीत मोठी कमतरता होती. खालील **तक्ता 2.15** मध्ये कमतरतेचा तपशील दर्शविला आहे.

तक्ता 2.15: शासकीय वसतिगृहे आणि अनुदानित वसतिगृहांच्या तपासणीत कमतरता

तपशील	वर्ष	वसतिगृह	वसतिगृहांची संख्या	वर्षासाठी निश्चित केलेले लक्ष्य	वर्षात प्रत्यक्ष केलेली तपासणी	लक्ष्य साध्य करण्यातील कमतरता (टक्के)
आयुक्त	2021-22	शासकीय वसतिगृह	443	22	07	15 (68)
		अनुदानित वसतिगृह	2388	120	0	120 (100)
प्रादेशिक उपायुक्त [62]	2021-22	शासकीय वसतिगृह	327	120	36	84 (70)
		अनुदानित वसतिगृह	2388	168	8	160 (95)
	2022-23	शासकीय वसतिगृह	174	72	52	20 (28)
		अनुदानित वसतिगृह	1970	144	38	106 (74)

[62] (i) 2021-22 या वर्षासाठी पाच प्रादेशिक उपायुक्त (शासकीय वसतिगृहे) आणि सात प्रादेशिक उपायुक्त (अनुदानित वसतिगृहे), (ii) 2022-23 या वर्षासाठी तीन प्रादेशिक उपायुक्त (शासकीय वसतिगृहे) आणि सहा प्रादेशिक उपायुक्त (अनुदानित वसतिगृहे) (iii) 2023-24 या वर्षासाठी तीन प्रादेशिक उपायुक्त (शासकीय वसतिगृहे) आणि पाच प्रादेशिक उपायुक्त (अनुदानित वसतिगृहे).

तपशील	वर्ष	वसतिगृह	वसतिगृहांची संख्या	वर्षासाठी निश्चित केलेले लक्ष्य	वर्षात प्रत्यक्ष केलेली तपासणी	लक्ष्य साध्य करण्यातील कमतरता (टक्के)
	2023-24	शासकीय वसतिगृह	206	72	53	19 (26)
		अनुदानित वसतिगृह	1753	120	18	102 (85)
सहाय्यक आयुक्त [63]	2021-22	शासकीय वसतिगृह	349	2094	398	1696 (81)
	2022-23	शासकीय वसतिगृह	264	1584	478	1106 (70)
	2023-24	शासकीय वसतिगृह	294	1764	557	1207 (68)
जिल्हा समाज कल्याण अधिकारी [64] जिल्हा परिषद	2021-22	अनुदानित वसतिगृह	1505	4515	300	4215 (93)
	2022-23	अनुदानित वसतिगृह	1680	5040	830	4210 (84)
	2023-24	अनुदानित वसतिगृह	1693	5079	1095	3984 (78)

स्रोत: समाज कल्याण आयुक्त कार्यालय, पुणे यांनी सादर केलेल्या विदेनुसार

तक्ता 2.15 मधून निदर्शनास आल्याप्रमाणे

1. आयुक्त-स्तरीय तपासणी: किमान पर्यवेक्षण

   - आयुक्तांना दरवर्षी 5 टक्के वसतिगृहांची तपासणी करणे बंधनकारक होते.
   - 2021-22 मध्ये, 22 लक्ष्यित शासकीय वसतिगृह तपासणीपैकी फक्त 7 (32 टक्के) तपासणी करण्यात आली.
   - अनुदानित वसतिगृहांसाठी, 120 (100 टक्के कमतरता) च्या लक्ष्याविरुद्ध कोणतीही तपासणी केली गेली नाही.
   - विशेषतः अनुदानित वसतिगृहांकरता, सर्वोच्च पातळीवरील पर्यवेक्षणाचा जवळपास अभाव दर्शवते.

[63] (i) 2021-22 वर्षासाठी 25 सहाय्यक आयुक्त (ii) 2022-23 वर्षासाठी 19 सहाय्यक आयुक्त आणि (iii) 2023-24 वर्षासाठी 22 सहाय्यक आयुक्त

[64] (i) 2021-22 वर्षासाठी 19 जिल्हा समाज कल्याण अधिकारी,)ii) 2022-23 वर्षासाठी 20 जिल्हा समाज कल्याण अधिकारी आणि)iii) 2023-24 वर्षासाठी 21 जिल्हा समाज कल्याण अधिकारी

2. प्रादेशिक उपायुक्तांकडून तपासणी: गंभीर आणि वारंवार येणाऱ्या कमतरता.

- प्रादेशिक उपायुक्तांना दरमहा दोन शासकीय वसतिगृहे आणि दोन अनुदानित वसतिगृहांची तपासणी करणे बंधनकारक होते.
- अनुदानित वसतिगृहांसाठी, तपासणीतील कमतरता व्याप्ती पुढीलप्रमाणे होती:
    - 95 टक्के (2021-22),
    - 74 टक्के (2022-23),
    - 85 टक्के (2023-24).
- 2023-24 मध्ये शासकीय वसतिगृहांच्या तपासणीत सुधारणा झाली (आठ टक्क्यांपर्यंत कमतरता कमी झाली), तरी, अनुदानित वसतिगृहांचे पर्यवेक्षण सातत्याने कमकुवत राहिले.

3. सहाय्यक आयुक्त-स्तरीय तपासणी: अधिक उच्च लक्ष्य, कमी कामगिरी

- सहाय्यक आयुक्तांना प्रत्येक शासकीय वसतिगृहाची वर्षातून सहा वेळा तपासणी करणे बंधनकारक होते, ज्यामुळे वार्षिक उद्दिष्टे खूप जास्त होती.
- तीनही वर्षांत, आवश्यक असलेल्या तपासणींपैकी फक्त 19 ते 32 टक्के तपासणी करण्यात आल्या, ज्यामुळे 68 ते 81 टक्के कमतरता राहिली.
- यावरून असे दिसून येते की स्पष्ट आदेश असूनही, शासकीय वसतिगृहांचे नियमित आणि वारंवार निरीक्षण सुनिश्चित केले गेले नाही.

4. जिल्हा समाज कल्याण अधिकारी स्तरावरील तपासणी: अनुदानित वसतिगृह संनियंत्रणात दीर्घकालीन कमतरता

- जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांना वर्षातून तीन वेळा प्रत्येक अनुदानित वसतिगृहाची तपासणी करणे बंधनकारक होते.
- प्रत्यक्ष तपासणी लक्ष्यापेक्षा खूपच कमी राहिली:
    - 2021-22 मध्ये 93 टक्के तूट,
    - 2022-23 मध्ये 84 टक्के, आणि
    - 2023-24 मध्ये 78 टक्के.
- कालांतराने किरकोळ सुधारणा होऊनही, आवश्यक असलेल्या तपासण्यांपैकी तीन-चतुर्थांश पेक्षा जास्त तपासण्या केल्या गेल्या नाहीत.

स्पष्टपणे परिभाषित तपासणी चौकट आणि लक्ष्ये असूनही, सर्व प्रशासकीय स्तरांवर शासकीय आणि अनुदानित वसतिगृहांचे पर्यवेक्षण अत्यंत अपुरे राहिले. तपासणीतील सततच्या आणि मोठ्या प्रमाणात कमतरतेमुळे संनियंत्रण कमकुवत झाले, कमतरता ओळखण्यास विलंब झाला आणि जबाबदारीची यंत्रणा कमकुवत झाली. परिणामी,

पायाभूत सुविधा, स्वच्छता, सुरक्षितता आणि विद्यार्थी कल्याणाशी संबंधित कमतरता कायम राहिल्या, ज्यामुळे वसतिगृह-आधारित शैक्षणिक सहाय्य योजनांचा प्रभाव कमी झाला.

परिच्छेद 2.2.8.4 आणि 2.2.8.9 मध्ये निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे शासकीय वसतिगृहांची आणि अनुदानित वसतिगृहांमध्ये सुविधांचा अभाव आणि **परिच्छेद 2.2.9.3** मध्ये निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे अनुदानित वसतिगृहांचे संशयास्पद बनावट कामकाज नियमित तपासणी करून रोखता आले असते.

2.2.9.2 जिल्हा आणि तालुका समन्वय समितीच्या बैठकांमध्ये कमतरता

शासकीय व अनुदानित वसतिगृहाच्या कामकाजावर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर समन्वय समिती स्थापन करण्याचे आदेश सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्यता विभागाने जारी केले (डिसेंबर 1996) होते. जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली चार शासकीय अधिकारी व दोन अशासकीय व्यक्तींसह समन्वय समिती स्थापन करण्यात येणार होती. तालुकास्तरावर स्थानिक आमदारांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येणार होती. तसेच, जिल्हास्तरीय समितीच्या बैठका तीन महिन्यांतून एकदा आणि तालुकास्तरीय समितीच्या बैठका दोन महिन्यांतून एकदा होणे आवश्यक होते. समित्यांचे अहवाल आवश्यक शिफारशी व सूचनांसह आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना सादर करण्यात येणार होते.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की 2021-22 ते 2023-24 या कालावधीत जिल्हा आणि तालुका समन्वय समितीच्या बैठकांमध्ये कमतरता होती. जिल्हा आणि तालुका समन्वय समितीच्या बैठकांचा तपशील खालील **तक्ता 2.16** मध्ये दर्शविला आहे:

तक्ता 2.16: जिल्हा आणि तालुका समन्वय समितीच्या बैठकांचा तपशील

अ.क्र.	विभागाचे नाव	जिल्ह्यांची संख्या	जिल्हास्तरीय समितीच्या बैठकांची संख्या		तालुकास्तरीय समितीच्या बैठकांची संख्या	
			लक्ष्य	साध्य	लक्ष्य	साध्य
1.	पुणे	5	60	निरंक	90	निरंक
2.	नाशिक	5	60	28	90	निरंक
3.	लातूर	4	48	31	72	4
4.	नागपूर	6	72	12	108	2

स्रोत: विभागाने सादर केलेली माहिती

मुख्य निरीक्षणे

1. समन्वय यंत्रणेचे अपुरे कामकाज:

- पुणे विभागात तीनही वर्षांत जिल्हास्तरीय समिती बैठका किंवा तालुकास्तरीय समिती बैठका झाल्या नाहीत.
- नाशिक विभागात तीन वर्षांत तालुकास्तरीय समितीच्या बैठका झाल्या नाहीत.

- लातूर विभागात गेल्या तीन वर्षांत फक्त चार तालुकास्तरीय बैठका झाल्या.
- नागपूर विभागात तीन वर्षांत फक्त दोन तालुकास्तरीय बैठका आणि बारा जिल्हास्तरीय बैठका झाल्या.

2. विहित कालावधीचे सातत्याने पालन न करणे

- तालुका समित्यांची दोन महिन्यांतून एकदा बैठकीची निर्धारित वारंवारता - कोणत्याही विभागात पाळली गेली नव्हती.
- ही कमतरता सर्व विभागांमध्ये पद्धतशीर आणि सातत्यपूर्ण आहे, जी विभागाकडून प्रभावी अंमलबजावणीचा अभाव दर्शवते.

3. अहवाल देण्याच्या आणि अभिप्रायाच्या फेऱ्यातील कमतरता

- मार्गदर्शक तत्वांनुसार समितीचे अहवाल आयुक्त, समाज कल्याण यांना शिफारशींसह सादर करणे आवश्यक होते.
- बैठका न घेतल्याने असे दिसून येते की मार्गदर्शक तत्वांमध्ये कल्पना केलेली अभिप्राय, प्रगती आणि सुधारणात्मक कृती यंत्रणा कुचकामी ठरली.

शासकीय आणि अनुदानित वसतिगृहांवर संनियंत्रणासाठी एक प्रमुख संस्थात्मक यंत्रणा म्हणून कल्पना केलेल्या समन्वय समित्या 2021-22 ते 2023-24 दरम्यान मोठ्या प्रमाणात निष्क्रिय राहिल्या. बैठकांमध्ये सतत कमतरता आणि निर्धारित नियत कालिकतेचे पालन न केल्याने आंतर-विभागीय समन्वय आणि देखरेख कमकुवत झाली. परिणामी, पायाभूत सुविधा, स्वच्छता, सुरक्षितता आणि विद्यार्थी कल्याणाशी संबंधित वसतिगृह व्यवस्थापनातील पद्धतशीर कमतरतांचा आढावा घेण्यात आला नाही किंवा वेळेवर त्या दूर करण्यात आल्या नाहीत.

परंतु, कोणत्याही समितीने आवश्यक शिफारशी असलेला अहवाल आयुक्त कार्यालयाला सादर केला नाही.

2.2.9.3 अनुदानित वसतिगृहांत बनावट कारभाराचा संशय

वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या विविध शासकीय निर्णयांत विहित केलेल्या आवश्यक सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत की नाही हे तपासण्यासाठी निवडलेल्या नऊ जिल्ह्यांतील 21 अनुदानित वसतिगृहांची संयुक्त प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. खालील **तक्ता 2.17** मध्ये चर्चा केल्याप्रमाणे 21 पैकी सहा अनुदानित वसतिगृहांत संशयास्पद बनावट कारभारांची प्रकरणे निदर्शनास आली.

तक्ता 2.17: अनुदानित वसतिगृहांतील संशयित बनावट कारभार प्रकरणे

अन. क्र.	संयुक्त तपासणी निष्कर्ष
1.	**महात्मा ज्योतिबा फुले विद्यार्थी वसतिगृह, मोदीखाना, जालना**
	वसतिगृहाची मंजूर क्षमता 38 विद्यार्थी व एका अधीक्षकाचे पद होते; एक स्वयंपाकी आणि एक सुरक्षा रक्षक यांनाही मंजुरी देण्यात आली. (i) इमारत जीर्ण अवस्थेत असल्याने ती राहण्यायोग्य नव्हती. वसतिगृह बंद असून वसतिगृहाच्या आजूबाजूच्या स्थानिक व्यक्तींनीही बराच काळ वसतिगृह बंद असल्याची पुष्टी केली. (ii) वसतिगृहाच्या हद्दीपलीकडील परिसर कचऱ्याच्या ढिगाऱ्यांनी भरलेला होता. (iii) संपूर्ण परिसर धुळीच्या जाड थराने झाकलेला होता ज्यावरून असे दिसून येते की बराच काळ कोणतीही देखभाल/साफसफाई केली गेली नाही. अशाप्रकारे, 2019-20 ते 2023-24 या कालावधीत ₹18.10 लाख मानधन व देखभाल भत्ता देण्यात आलेल्या वसतिगृहाचे कार्यान्वयन संशयास्पद होते. विभागीय अधिकाऱ्यांच्या दिनांक 12.07.2022 च्या भेटीच्या अहवालानुसार हे वसतिगृह व्यवस्थित कार्यरत असून कोणत्याही गंभीर प्रतिकूल टिप्पणीचा उल्लेख करण्यात आलेला नाही.
	 छायाचित्र 3: मोडकळीस आलेली वसतिगृहाची इमारत  छायाचित्र 4: कचऱ्याने भरलेली वसतिगृहाची हद्द
2.	**राजर्षि शाहू महाराज कन्या वसतिगृह, जाफराबाद, जालना**
	वसतिगृहाची मंजूर क्षमता 24 विद्यार्थ्यांची होती आणि एक अधीक्षक, एक स्वयंपाकी व एक सुरक्षारक्षक हे पदही मंजूर करण्यात आले. (i) विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भातील अर्ज, प्रवेश नोंदणी, विद्यार्थी प्रवेश निर्गमन नोंदी वसतिगृह प्राधिकाऱ्याकडे उपलब्ध नव्हत्या. (ii) हजेरीपटानुसार दिनांक 06.01.2025 रोजी म्हणजेच लेखापरीक्षण पाथकाद्वारे भेट देण्याच्या आदल्या दिवशी 24 विद्यार्थी उपस्थित होते. मात्र, भेटीच्या वेळी वसतिगृहात एकही विद्यार्थी उपलब्ध नव्हता. त्यानंतर लाभार्थी सर्वेक्षणादरम्यान दोन विद्यार्थ्यांना बोलावून त्यांची चौकशी करण्यात आली. त्या दोन विद्यार्थ्यांपैकी एका विद्यार्थ्याचा उल्लेख वसतिगृहाच्या हजेरीपटात 2018-19 ते 2020-21 अशी सलग तीन वर्षे एकाच इयत्तेत करण्यात आला होता. (iii) सभागृह व खाटा धुळीने माखलेले होते व विद्यार्थ्यांची पुस्तके, कपडे, बूट, भांडी इत्यादी कोणतीही वैयक्तिक वस्तू आढळली नाही. विद्यार्थ्यांना वैयक्तिक वस्तू ठेवण्यासाठी देण्यात आलेले ट्रंक बॉक्स पूर्णपणे रिकामे होते.

<table>
<tr><td></td><td colspan="2">(iv) अनुदानित वसतिगृहांच्या देखभालीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार वसतिगृहात एक महिन्यासाठी कच्च्या अन्नमालाचा राखीव साठा ठेवणे आवश्यक होते. मात्र, कच्च्या अन्नमालाचा राखीव साठा उपलब्ध नव्हता.
अशाप्रकारे, 2019-20 ते 2023-24 दरम्यान ₹42.74 लाख मानधन व देखभाल भत्ता देण्यात आलेल्या वसतिगृहाचा कारभार संशयास्पद होता.
विभागीय अधिकाऱ्यांच्या दिनांक 16.11.2022, 10.01.2023 व 16.09.2023 च्या भेटीच्या अहवालानुसार हे वसतिगृह व्यवस्थित कार्यरत असून कोणत्याही गंभीर प्रतिकूल टिप्पणीचा उल्लेख करण्यात आला नव्हता.</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>छायाचित्र 5: वसतिगृहातील खाटांची स्थिती</td><td>छायाचित्र 6: विद्यार्थ्यांचे रिकामे ट्रंक बॉक्स</td></tr>
<tr><td>3.</td><td colspan="2">नेहरू मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, गोलापांगरी, जालना</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">वसतिगृहाची मंजूर क्षमता 46 विद्यार्थ्यांची होती आणि एक अधीक्षक, एक स्वयंपाकी व एक सुरक्षारक्षक हे पदही मंजूर करण्यात आले.
(i) भेटीच्या वेळी वसतिगृहाला कुलूप होते आणि वसतिगृहात कर्मचारी, विद्यार्थी आणि रखवालदार उपलब्ध नव्हते. त्यानंतर अधीक्षक वसतिगृहात आले आणि चार विद्यार्थ्यांनाही वसतिगृहात बोलविण्यात आले, ज्यांची लाभार्थी सर्वेक्षणाचा भाग म्हणून चौकशी करण्यात आली.
(ii) वसतिगृहाचा अर्धा भाग कचरा, भंगार साहित्य आणि लाकडी कचऱ्याने भरलेला असल्याने वसतिगृहाची इमारत व परिसर विद्यार्थ्यांसाठी राहण्यायोग्य स्थितीत नव्हता.
(iii) विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची नोंदवही व इतर संबंधित नोंदी जसे की प्रवेश अर्ज ठेवण्यात आले नाहीत. वर्ष 2023-24 व 2024-25 चे हजेरीपट ठेवण्यात आले नाहीत. विद्यार्थ्यांचे प्रवेश निर्गमन नोंदवही ठेवण्यात आली नव्हती. 46 विद्यार्थ्यांच्या मंजूर क्षमतेच्या तुलनेत खोलीत दोन विद्यार्थ्यांसाठी ॲल्युमिनियम पेट्या उपलब्ध होत्या.
(iv) खोलीतील भांडी, ब्लँकेट, ॲल्युमिनियम पेट्या अशा वैयक्तिक वस्तू आणि फरशी धुळीने माखल्या होत्या. विद्यार्थ्यांच्या खोलीत उपलब्ध असलेल्या ॲल्युमिनियम पेट्या वसतिगृहात जास्तीत जास्त दोन विद्यार्थी असल्याचे दर्शवित होत्या.
(v) अनुदानित वसतिगृहांच्या देखभालीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार वसतिगृहात एक महिन्यासाठी कच्च्या अन्नमालाचा राखीव साठा ठेवणे आवश्यक होते. मात्र, कच्च्या अन्नमालाचा राखीव साठा उपलब्ध नव्हता.
(vi) स्वच्छतागृहे व स्नानगृहात पाणीपुरवठा होत नव्हता.</td></tr>
</table>

	अशाप्रकारे, 2019-20 ते 2023-24 या कालावधीत ₹31.20 लाख मानधन व देखभाल भत्ता देण्यात आलेल्या वसतिगृहाचे कामकाज संशयास्पद होते. दिनांक 09.10.2022 च्या विभागीय अधिकाऱ्यांच्या भेटीच्या अहवालानुसार हे वसतिगृह व्यवस्थित कार्यरत असून कोणत्याही गंभीर प्रतिकूल टिप्पणीचा उल्लेख करण्यात आला नव्हता.	
		
	छायाचित्र 7: रिकामी खोली आणि विद्यार्थ्यांच्या सामानाचा अभाव	छायाचित्र 8: वसतिगृहाच्या आवारात टाकाऊ भंगारसाहित्य
4.	**ज्ञानदीप मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, बेलोरा, तालुका मंथा, जालना**	
	वसतिगृहाची मंजूर क्षमता 40 विद्यार्थ्यांची होती आणि एक अधीक्षक, एक स्वयंपाकी व एक सुरक्षारक्षक हे पदही मंजूर करण्यात आले (i) वसतिगृहातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या हजेरी संदर्भातील नोंदी 2020-21 पासून उपलब्ध नव्हत्या. (ii) चार स्नानगृहांत/स्वच्छतागृहांत/मुताऱ्यांत टाकाऊ भंगार साहित्य व लाकडी कचरा टाकला होता आणि पाणी उपलब्ध नव्हते. (iii) अनुदानित वसतिगृहांच्या देखभालीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार वसतिगृहात एक महिन्यासाठी कच्च्या अन्नमालाचा राखीव साठा ठेवणे आवश्यक होते. मात्र, कच्च्या अन्नमालाचा राखीव साठा उपलब्ध नव्हता. (iv) वसतिगृहात उपस्थित असलेल्या 33 विद्यार्थ्यांपैकी केवळ सहा विद्यार्थी उपलब्ध होते, ज्यांची लाभार्थी सर्वेक्षणासाठी चौकशी करण्यात आली. वर्ष 2023-24 च्या हजेरीपटात एकही दिवस गैरहजर न राहता 40 विद्यार्थ्यांची पूर्ण उपस्थिती दिसून आली. (v) उपलब्ध बेड, गाद्या, उशी, कच्चे अन्नपदार्थ 40 विद्यार्थ्यांसाठी पुरेसे नव्हते. (vi) बायोमेट्रिक यंत्रणा 2020-21 पासून कार्यरत नव्हती, परंतु अधीक्षकांनी 2021- 22 ते 2023-24 या वर्षाचे मानधन देण्याच्या प्रस्तावासह कर्मचाऱ्यांचे बायोमेट्रिक हजेरी पत्रक सादर केले व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांनी ते प्रदानासाठी स्वीकारले. कार्यरत बायोमेट्रिक मशिनशिवाय सादर केलेले बायोमेट्रिक हजेरी पत्रक बनावट पध्दतीने तयार केल्याचे दर्शविते अशाप्रकारे, 2019-20 ते 2023-24 या कालावधीत ₹16.69 लाख मानधन व देखभाल भत्ता देण्यात आलेल्या वसतिगृहाचा कारभार संशयास्पद होता.	

<table>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>छायाचित्र 9: टाकाऊ वस्तू टाकलेली स्वच्छतागृहे</td><td>छायाचित्र 10: अपुऱ्या खाटा, गाद्या आणि उश्या</td></tr>
<tr><td>5.</td><td colspan="2">गजानन महाराज मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, सिंधखेड राजा, बुलढाणा</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">वसतिगृहाची मंजूर क्षमता 24 विद्यार्थ्यांची होती आणि एक अधीक्षक, एक स्वयंपाकी व एक सुरक्षारक्षक ही पदेही मंजूर करण्यात आली.

(i) दोन खोल्या (प्रत्येकी 16 X 14 चौरस फूट) तसेच एक संलग्न शौचालय व स्नानगृह होते जे 24 विद्यार्थिनींच्या वापरासाठी नियमानुसार (शासन निर्णय दिनांक 16.03.1998) पुरेसे नव्हते.

(ii) वसतिगृहात फक्त गाद्या उपलब्ध होत्या आणि चादरी, उशी, घोंगडी इत्यादी उपलब्ध नव्हते. विद्यार्थ्यांचे शयन (बेडिंग) साहित्य, कपडे, अभ्यासाची पुस्तके आदी वैयक्तिक वस्तूही उपलब्ध नव्हत्या.

(iii) वसतिगृहातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या हजेरी संदर्भातील नोंदी उपलब्ध नव्हत्या.

(iv) अनुदानित वसतिगृहांच्या देखभालीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार (शासन निर्णय दिनांक 16.03.1998) वसतिगृहात एक महिन्यासाठी कच्च्या अन्नमालाचा राखीव साठा ठेवणे आवश्यक होते. मात्र, कच्च्या अन्नमालाचा राखीव साठा उपलब्ध नव्हता.

(v) विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भातील नोंदी जसे अर्ज, प्रवेश अर्जाचा क्रमांक, विद्यार्थ्यांची जन्मतारीख, पत्ता, पालकांचा मोबाइल क्रमांक अशा महत्त्वाच्या नोंदी प्रवेश अर्जात भरल्या नव्हत्या.

अशाप्रकारे, 2019-20 ते 2023-24 या कालावधीत ₹51.02 लाख मानधन व देखभाल भत्ता देण्यात आलेल्या वसतिगृहाचा कारभार संशयास्पद होता.

विभागीय अधिकाऱ्यांच्या दिनांक 18.01.2020 व 28.02.2023 च्या भेटी अहवालानुसार, हे वसतिगृह व्यवस्थित सुरू होते आणि कोणत्याही गंभीर प्रतिकूल टिप्पणीचा उल्लेख नव्हता.</td></tr>
</table>

<table>
<tr><td></td><td colspan="2"></td></tr>
<tr><td></td><td colspan="2">छायाचित्र 11: जमिनीवर टाकलेली गादी</td></tr>
<tr><td>6</td><td colspan="2">नेहरू छात्रालय, मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, लातूर</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">वसतिगृहाची मंजूर क्षमता 36 विद्यार्थ्यांची होती आणि एक अधीक्षक, एक स्वयंपाकी व एक सुरक्षारक्षक ही पदेही मंजूर करण्यात आली होती.
(i) वसतिगृहाचे प्रत्यक्षात बांधकाम सुरू असल्याचे निदर्शनास आले. वसतिगृह अन्य ठिकाणी हलविण्यात आल्याची माहिती निरीक्षक, जिल्हा परिषद यांनी लेखापरीक्षण पथकाला दिली. नवीन ठिकाणी 'बाबासाहेब पाटील मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह कुलस्वामिनी नगर' नावाचे वसतिगृह सुरू असल्याचे निदर्शनास आले. वसतिगृहात नेहरू छात्रालय, मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहाचा एकही विद्यार्थी उपस्थित नव्हता.
(ii)) नेहरू छात्रालय, मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे प्रवेश, हजेरीपट, हालचाली नोंदवही यासंदर्भातील अभिलेख लेखापरीक्षण पथकाला उपलब्ध करून देण्यात आल्या नाहीत.
iii) वसतिगृहातील अधीक्षक, स्वयंपाकी, सुरक्षारक्षक असे कर्मचारी उपलब्ध नव्हते.
अशाप्रकारे, 2022-23 ते 2023-24 या कालावधीत ₹2.40 लाख मानधन भत्ता देण्यात आलेल्या वसतिगृहाचा कारभार संशयास्पद होता. वर्ष 2022-23 पासून देखभाल भत्ता न देता केवळ मानधन दिल्याने वसतिगृहात एकही विद्यार्थी उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले.
उत्तरादाखल जिल्हा समाज कल्याण अधिकारी, लातूर यांनी नमूद केले की, संस्थेने बांधकामाच्या कामाबद्दल माहिती दिलेली नाही आणि ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांना हलविण्यात आले आहे ते माहीत करून घेतले जाईल आणि लेखापरीक्षण पथकाला कळविले जाईल.</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>छायाचित्र 12: वसतिगृहाची निर्माणाधीन इमारत</td><td>छायाचित्र 13: वसतिगृहातील टाकाऊ साहित्य</td></tr>
</table>

स्त्रोत: संयुक्त तपासणी अहवालाच्या आधारे संकलित

अशाप्रकारे, अनुदानित वसतिगृहांच्या संयुक्त प्रत्यक्ष पडताळणीत राहण्यास अयोग्य परिस्थिती, बंद वसतिगृहे व निर्माणाधीन वसतिगृहे कार्यरत असल्याचे दर्शविणे अश्या बाबी निदर्शनास आल्या, कर्मचारी व विद्यार्थ्यांची गैरहजेरी, विद्यार्थ्यांची उपस्थिती व प्रवेशाच्या नोंदी न ठेवणे, कच्च्या अन्नपदार्थाचा राखीव साठा नसणे, विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक वस्तूंचा अभाव आदी बाबींमुळे अनुदानित वसतिगृहांचा कारभार वरकरणी बनावट असल्याचे निदर्शनास आले.

परिच्छेद 2.2.9.1 मध्ये चर्चा केल्याप्रमाणे नियुक्त प्राधिकाऱ्यांच्या तपासणीतील कमतरता लक्षात घेऊन, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2025) की आयुक्त, समाज कल्याण यांनी, स्थापन केलेल्या भरारी पथकाचे विस्तृत अहवाल प्राप्त झाले आहेत आणि तपासणी अधीन आहेत, ज्याच्या आधारे शासकीय नियम व विनियमांचे उल्लंघन करणाऱ्या अनुदानित वसतिगृहांवर योग्य प्रशासनिक कारवाई केली जाईल.

निष्कर्ष

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्थ असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असलेल्या वसतिगृहांच्या लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, पुरेसे अर्थसंकल्पीय सहाय्य आणि सुस्पष्ट धोरणात्मक चौकट असूनही, पुरेशा, सुलभ आणि सन्माननीय निवासी शैक्षणिक सुविधा प्रदान करण्याचे अपेक्षित परिणाम केवळ अंशतः साध्य झाले होते. वसतिगृह व्यवस्थापनाच्या संपूर्ण कालचक्रात नियोजन, निधीचा वापर, पायाभूत सुविधांची निर्मिती, मूलभूत सुविधांची तरतूद आणि संनियंत्रण यातील उणिवा निदर्शनास आल्या. बांधकामात होणारा विलंब, निर्माण केलेल्या क्षमतेचा कमी वापर, स्वाधार योजनेतील व्याप्तीतील त्रुटी, अधिक्षकांची कमतरता, अपुऱ्या सुविधा (अपंग विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या सुविधांसह), कमकुवत तपासणी यंत्रणा आणि तंत्रज्ञानाचा अकार्यक्षम वापर यामुळे वसतिगृह-आधारित सहाय्याची परिणामकारकता कमी झाली. परिणामी, पात्र विद्यार्थ्यांची लक्षणीय संख्या एकतर वसतिगृहाच्या सुविधांपासून वंचित राहिली किंवा त्यांना निकृष्ट परिस्थितीत राहण्यास भाग पाडले गेले, ज्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या समान संधि प्राप्त होण्याचे उद्दीष्ट कमी झाले.

शिफारसी

- *राज्य शासनाने शासकीय वसतिगृहांच्या बांधकामाला प्राधान्य देण्याबाबत केवळ स्वाधार योजनेंतर्गत मागणीच नव्हे तर इयत्ता आठवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या आणि दहावी पश्चात शिक्षण घेत असलेल्या इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती जमाती आणि इतर दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या मागणीचा समावेश करून मागणीचे सर्वसमावेशक निर्धारण करावे.*

- *शासनाने स्वाधार योजनेंतर्गत हप्त्यांचे वेळेवर वितरण करण्यासाठी ऑनलाइन पोर्टल विकसित करण्यास गती द्यावी आणि स्वाधार योजनेंतर्गत अपूर्ण अर्जांचा निपटारा करण्यासाठी कालमर्यादा देखील तयार करावी.*

- *शासनाने कालबद्ध पद्धतीने काम पूर्ण करण्यासाठी वसतिगृहांच्या बांधकामातील विलंबाचा मुद्दा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मांडावा.*
- *विभागाने, अधीक्षकाची रिक्त पदे जलदगतीने भरून विशेषत: मुलींच्या वसतिगृहांमध्ये पुरेशी नियुक्ती सुनिश्चित करावी, जेणेकरून तेथे देखरेख, सुरक्षा आणि तक्रार निवारण अधिक बळकट होईल.*
- *शासनाने शासकीय व अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थी व कर्मचारी यांच्या योग्य देखरेखीसाठी बायोमेट्रिक यंत्रणाची स्थापना व त्याची योग्य देखभाल सुनिश्चित करावी.*
- *शासनाने अनुदानित वसतिगृहांना निर्धारित वेळेत किमान विहित क्षेत्र राखण्याच्या निर्देशांचे पालन करण्याचे आणि वसतिगृहांमध्ये सर्व विहित सुविधा उपलब्ध आहेत याची खात्री करण्याचे निर्देश द्यावे.*

महसूल व वन विभाग

2.3 वापरकर्त्यांकडून शुल्क जमा करण्यातील प्रलंबितता

जमाबंदी आयुक्त आणि भूमी अभिलेख यांच्या वापरकर्त्यांबरोबर सामंजस्य करार करण्यात झालेल्या निष्काळजीपणामुळे वेब पोर्टल/सेवा सुविधेद्वारे डाउनलोड केलेल्या अधिकारांच्या नोंदी वापरण्यासाठी बँका, संस्था आणि कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून ₹217.99 कोटी शुल्क जमा करण्यातील प्रलंबितता.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने *ई-महाभूमी* अंतर्गत डिजिटल इंडिया भू-अभिलेख स्थलांतर योजना राबविली होती. *फेरफार* (नमुना क्रमांक 6), 7/12 उतारे, 8ए उतारा इ. सारख्या भूमी अभिलेखांच्या डिजिटल प्रती, ज्यांना हक्काभिलेख म्हटले जाते, सार्वजनिक वापरासाठी ऑनलाइन वेब पोर्टलद्वारे उपलब्ध करून देण्यात आले. ई-महाभूमी अंतर्गत, हे अभिलेख डिजिटल स्वाक्षरीशिवाय विनामूल्य डाउनलोड केले जाऊ शकतात, तर डिजिटल स्वाक्षरीसह डाउनलोड करण्यासाठी प्रति अभिलेख ₹15 शुल्क आकारले जात होते. शुल्काच्या दरात वेळोवेळी बदल करण्यात आले.

फेब्रुवारी 2020 मध्ये झालेल्या राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांनी महसूल विभागाला ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस[65] द्वारे संगणकीकृत हक्काभिलेख ऑनलाइन सेवा बँकांना उपलब्ध करून देण्याचे आणि जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांच्याशी आवश्यक करार करून सुविधा कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर जमाबंदी आयुक्त आणि संचालक,

[65] ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस म्हणजे वेगवेगळ्या सॉफ्टवेअर प्रोग्राम्सना विदा आणि कार्यक्षमतेची देवाणघेवाण करून एकमेकांशी संवाद साधण्यासाठी भिन्न परवानगी देणाऱ्या नियमांचा संच आहे.

भूमी अभिलेख विभाग, पुणे (मार्च 2020) यांनी निर्देश दिले की संबंधित वापरकर्त्यांनी[66] जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांनी उपलब्ध करून दिलेल्या महसूल विदा प्रणालीत प्रवेश करण्यासाठी त्यांच्या स्वत:च्या खर्चाने आवश्यक सुविधा विकसित कराव्यात आणि वेब पोर्टलवर प्रवेश करण्यासाठी प्रत्येक वापरकर्त्याच्या नियुक्त प्रशासकांना वापरकर्ता ओळखपत्र आणि संकेतशब्द दिले जातील.

2022 मध्ये, महसूल विभागाने ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस (एपीआय) द्वारे इतर वापरकर्त्यांसाठी संगणकीकृत आणि डिजिटली-स्वाक्षरी केलेले हक्काभिलेख विदा पाहणे सोपे केले. या वापरकर्त्यांना विविध योजनांतर्गत सेवांच्या वितरणासाठी हक्काभिलेख विदा आवश्यक असल्याने, वापरकर्ते आणि जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांच्यात सामंजस्य करार अंमलात आणले गेले.

सामंजस्य कराराच्या कलम 1.5 नुसार, हक्काभिलेखाचे डाउनलोड अधिकार मासिक देयकाच्या अधीन होते, ज्यामध्ये वापरानंतरच्या महिन्याच्या समाप्तीपूर्वी लागू शुल्क भरणे आवश्यक होते, असे न केल्यास सेवा बंद केल्या जाऊ शकतात. या सामंजस्य करारांमुळे जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांना थकीत रक्कम न भरल्यास करार रद्द करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

31 जानेवारी 2019 आणि 26 मार्च 2019 रोजीच्या शासकीय निर्णयानुसार, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांनी मार्च 2020 मध्ये जारी केलेल्या सूचनांसह, वापरकर्त्यांकडून जमा केलेले शुल्क सुरुवातीला स्टेट बँक ऑफ इंडिया, पुणे येथे नेट बँकिंग सुविधेसह आरटीजीएस (रीयल टाइम-ग्रॉस सेटलमेंट)/एनईएफटी (राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरण) द्वारे ठेव खात्यात जमा करणे आवश्यक होते. प्रत्येक महिन्याच्या शेवटी, जमा झालेल्या शुल्कापैकी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांचा हिस्सा त्याच्या वैयक्तिक खात्यात जमा करून आणि लागू असलेला शासकीय हिस्सा (₹5 प्रति अभिलेख) योग्य मुख्य शीर्षांतर्गत शासकीय जमा लेखा प्रणालीद्वारे शासकीय खात्यात जमा केला जाणार होता.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले (सप्टेंबर 2024 आणि मे 2025) की विविध वापरकर्त्यांनी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांच्या वेब पोर्टल/सेवा सुविधेचा लाभ घेतला होता, तर 2020-21 ते 2025-26 (एप्रिल 2025 पर्यंत) या कालावधीसंबंधीचे बँकांकडून ₹1.61 कोटी आणि संस्थांकडून ₹9.76 कोटीचे संबंधित शुल्क जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांनी जमा केले नव्हते जे **तक्ता 2.18** मध्ये दर्शविले आहे

[66] वापरकर्ता जसे की व्यक्ती, केंद्र / राज्य शासकीय विभाग, केंद्र / राज्य शासकीय महामंडळे, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी बँका, वित्तीय संस्था/इतर खाजगी संस्था, जे संगणकीकृत रेकॉर्ड ऑफ राईट्सची ऑनलाइन सेवा वापरतात.

तक्ता 2.18: वापरकर्त्यांकडून वर्षनिहाय प्रलंबित शुल्क

(₹ लाखात)

	बँका		संस्था		एकूण	
वर्ष	एकूण प्रलंबित शुल्क	महाराष्ट्र शासनाचा हिस्सा	एकूण प्रलंबित शुल्क	महाराष्ट्र शासनाचा हिस्सा	एकूण प्रलंबित शुल्क	महाराष्ट्र शासनाचा हिस्सा
1	2	3	4	5	(6)=(2+4)	(7)=(3+5)
2020-21	22.17	18.23	225.81	75.27	247.98	93.50
2021-22	28.71	25.80	279.32	83.87	308.03	109.67
2022-23	31.40	24.21	393.27	129.53	424.67	153.74
2023-24	46.47	22.71	599.80	162.44	646.27	185.15
2024-25	29.67	19.09	483.16	155.25	512.83	174.34
2025-26 (एप्रिल 2025)	3.56	1.34	29.54	9.80	33.1	11.14
एकूण	**161.98**	**111.38**	**2010.90**	**616.16**	2172.88	727.54
कमी: वसूल केलेली रक्कम	0	0	1035.11	0	1035.11	0
उर्वरित प्रलंबित रक्कम	**161.98**	**111.38**	**975.79**	**616.16**	**1,137.77**	**727.54**

स्रोत: जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांनी दिलेली माहिती

उपरोक्त तक्त्यावरून असे निदर्शनास आले आहे की, बँका/संस्थांकडून एकूण शुल्क ₹11.38 कोटी (शासकीय हिस्सा ₹7.28 कोटी व जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांचा हिस्सा ₹4.10 कोटी) प्राप्त झाले नाही.

कृषी आयुक्तालयाने (डिसेंबर 2018) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय पीक विमा पोर्टलवर ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस द्वारे अधिकारांच्या नोंदींमध्ये प्रवेश देण्याची विनंती केली होती. या विनंतीनुसार आणि आंतर-विभागीय सल्लामसलतीनंतर, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांनी योजनेच्या अंमलबजावणीत सहभागी पीक विमा कंपन्यांद्वारे जमिनीच्या मालकी हक्कांच्या पडताळणीसाठी ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस आधारित हक्कलेख विदा पहाणे सोपे केले.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, मे 2025 पर्यंत, कृषी आयुक्तालयाने प्रति अभिलेख ₹15 या विहित दराने एकूण 13,77,41,550 हक्कलेख डाउनलोड केले आहेत (शासकीय हिस्सा: प्रति अभिलेख ₹ पाच). त्यानुसार, 2019-20 पासून कृषी विभागाकडून ₹206.61 कोटी शुल्क, ज्यात शासनाचा ₹68.87 कोटीचा महसूल आणि जमाबंदी

आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांचा ₹137.74 कोटीचा हिस्सा सम्मिलीत आहे, वसूल करणे प्रलंबित आहे.

लेखापरीक्षणात दीर्घकाळ शुल्क न मिळण्याची कारणे विचारण्यात आली, तेव्हा जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांनी नमूद केले (सप्टेंबर 2024 आणि जून 2025) की, सप्टेंबर 2024 मध्ये बँका आणि संस्थांना प्रलंबित थकबाकी निकाली काढण्यासाठी नोटिसा जारी करण्यात आल्या होत्या, या अटीसह की वेब पोर्टलवर प्रवेश बंद केला जाईल आणि सतत पैसे न भरल्यास दंड आकारला जाईल.

उत्तर समर्थनीय नाही कारण 2019-20 पासून ₹217.99 कोटी (बँका आणि संस्थांकडून ₹11.38 कोटी आणि कृषी विभागाकडून ₹206.61 कोटी) शुल्क वसूल झाले नाही. लेखापरीक्षणाने या प्रकरणाकडे लक्ष वेधल्यानंतरच जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांनी शुल्क न भरल्याबद्दल नोटिसा बजावल्या होत्या. तसेच एकूण थकीत रकमेपैकी, ₹76.15 कोटी शासकीय महसूल (₹7.28 कोटी आणि ₹68.87 कोटी) थकीत होता आणि सहा वर्षे उलटून गेल्यानंतरही तो वसूल केला गेला नव्हता, ज्यामुळे थकबाकी वसुलीवर विपरित परिणाम झाला आणि शासकीय महसुलाचे नुकसान झाले.

हे प्रकरण शासनाकडे संदर्भित करण्यात येऊन (जुलै 2025); नोव्हेंबर 2025 मध्ये स्मरणपत्र पाठविले गेले; उत्तर प्रतिक्षित आहे.

2.4 भोगवटा शुल्काची कमी आकारणी

पनवेलच्या तहसीलदारांनी वार्षिक दर विवरणपत्रानुसार चुकीच्या पद्धतीने दर लागू केल्यामुळे मुंबई ट्रान्स हार्बर लिंक रोड विकसित करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला केलेल्या शासकीय जमिनीच्या वाटपावर ₹69.10 लाख भोगवटा शुल्काची कमी आकारणी झाली.

महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या (फेब्रुवारी 2016) च्या निर्णयानुसार भोगवटा किंवा भाडेतत्त्वावर शासकीय जमिनीचे वितरण करताना ज्या दिनांकाला शासकीय जमीन वाटपाचा आदेश देण्यात आला आहे, त्या दिनांकाला वार्षिक विवरणपत्रातील विहित दरानुसार अशा जमिनीचे मूल्यमापन निश्चित करावे. तसेच वार्षिक दर विवरणपत्र 2017-18 च्या शर्त 16 (बी) नुसार वार्षिक दर विवरणपत्रामध्ये विहित केलेल्या (चौरस मीटर/हेक्टर) आणि दराच्या आधारावर जमिनीचे मूल्य आणि वर्गीकरण (कृषी आणि बिगरकृषी) यावर भोगवटा शुल्क वसूल करावे.

तहसीलदार कार्यालय, पनवेल, जिल्हा रायगड येथील अभिलेख्यांची छाननी केली (डिसेंबर 2019) असता निदर्शनास आले की, जिल्हाधिकारी, रायगड यांनी गव्हाण, तालुका- पनवेल, जिल्हा रायगड येथील सर्व्हे क्रमांक 90/9 येथील शासकीय जमिनीतील 0.219 हेक्टर्स (2,190 चौरस मीटर) इतके भूखंडाचे हक्क मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला दिले (सप्टेंबर 2017). मुंबई ट्रान्स हार्बर लिंक रोड विकसित करण्यासाठी ही जमीन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आली.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, 0.219 हेक्टर जमिनीवर भोगवटा शुल्क आकारताना, विभागाने जमिनीचा हा भूखंड *जिरायत*[67] म्हणून विचारात घेतला आणि 2017-18 च्या वार्षिक दर विवरणपत्रातील स्लॅब दर लागू करून ₹3.97 लाख [68]भोगवटा शुल्क आकारले. त्यानुसार, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नोव्हेंबर 2017 मध्ये भोगवटा शुल्क भरले आणि जमीन ताब्यात घेतली (डिसेंबर 2017). जमीन अकृषिक असल्याने, विभागाला अकृषिक जमिनीला लागू असलेल्या वार्षिक दर विवरण 2017- 18 च्या अट 16 (बी) नुसार स्लॅब दर म्हणजेच प्रति चौरस मीटर ₹3,650 आकारणे आवश्यक होते. अशाप्रकारे, आकारणी केलेले भोगवटा शुल्क ₹3.97 लाखांऐवजी ₹73.07 लाख असणे आवश्यक होते. परिणामी खालील **तक्ता 2.19** मध्ये दर्शविल्याप्रमाणे ₹69.10 लाख कमी भोगवटा शुल्क आकारण्यात आले:

तक्ता 2.19: भोगवटा शुल्काची अल्प आकारणी

लेखापरीक्षणानुसार गणना[69]		**जमीन *जिरायत* शेती जमीन म्हणून गृहीत धरून विभागाची गणना**		**कमी आकारणी (₹ लाखांत)**
तपशील	**(रक्कम ₹ मध्ये)**	**तपशील**	**(रक्कम ₹ मध्ये)**	
जमिनीचे क्षेत्रफळ: 0.219 हेक्टर म्हणजे 2190 चौरस मीटर		जमिनीचे क्षेत्रफळ : 0.219 हेक्टर		
2017-18 च्या वार्षिक दर विवरणपत्रानुसार दर = ₹3,650 प्रति चौ.मी.		2017-18 च्या वार्षिक दर विवरणपत्रानुसार दर प्रति हेक्टर ₹18,13,500		
i. 500 चौरस मीटर × ₹3650	18,25,000	भोगवटा शुल्क = 0.219 × ₹18,13,500	**3,97,157 (ब)**	
ii. 1500 चौरस मीटर × ₹3650 × 90 टक्के	49,27,500			
iii.190 × ₹3,650× 80 टक्के	5,54,800			
एकूण (i +ii + iii)	**73,07,300 (अ)**			**69,10,143 (अ-ब)**

67 शेतीसाठी पूर्णपणे पावसावर अवलंबून असलेली शेत जमीन.

68 2017-18 या वर्षासाठी वार्षिक दर विवरण नुसार 0.219 हेक्टर x ₹ 18,13,500 प्रति हेक्टर = ₹ 3,97,157.

69 2017-18 च्या वार्षिक दर विवरणपत्रानुसार भोगवटा शुल्काच्या मोजणीचा स्तर खालीलप्रमाणे आहे.
500 चौरस मीटरपर्यंत: 100 टक्के दर.
500 चौरस मीटर ते 2000 चौरस मीटर: दराच्या 90 टक्के
2001 चौरस मीटर ते 4000 चौरस मीटर: दराच्या 80 टक्के.

लेखापरीक्षणाचा मुद्दा स्वीकारताना (सप्टेंबर 2023) नोव्हेंबर 2020 मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला 15 दिवसांच्या आत कमी आकारलेला कर भरण्यासाठी वसुलीची मागणी नोटीस बजावण्यात आली. तथापि, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रतिसाद दिला नाही, आणि त्यामुळे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 च्या कलम 174 अन्वये आणि महाराष्ट्र जमीन महसूल वसुली नियम 1967 मधील तरतुदींनुसार कारवाई प्रस्तावित करण्यात आली.

हस्तांतरणाच्या वेळी अकृषिक शासन जमिनीचे जिरायत म्हणून चुकीचे वर्गीकरण केल्यामुळे कमी कर आकरण्यात आला, ज्यामुळे वार्षिक दर विवरणपत्रानुसार कमी दर लागू करण्यात आले. लेखापरीक्षण निरीक्षण स्वीकारण्यात आले आणि नोव्हेंबर 2020 मध्ये मागणी सूचना जारी करण्यात आली, तरी महसूल अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल कायदा आणि वसुली नियमांनुसार वसुली कारवाई सुरू केली नाही आणि पाठपुरावा केला नाही, ज्यामुळे थकबाकीची वसुली झाली नाही, ज्यामुळे ₹69.10 लाख इतका शासन महसूल कमी मिळत राहिला.

नोव्हेंबर 2020 मध्ये लेखापरीक्षण निरीक्षण स्वीकारून आणि मागणी सूचना जारी करूनही, विभागाने महाराष्ट्र जमीन महसूल कायदा, 1966 आणि महाराष्ट्र जमीन महसूल वसुली नियम, 1967 च्या तरतुदींविरुद्ध पाच वर्षांहून अधिक काळ वसुलीचा पाठपुरावा केला नाही. दीर्घकाळ चाललेल्या निष्क्रियतेमुळे शासकीय महसुलची वसुली न होणे कायम राहिले आणि अंमलबजावणी व पाठपुराव्यातील त्रुटी दिसून आल्या.

हे प्रकरण शासनास संदर्भित करण्यात आले (मार्च 2024);तसेच जुलै 2025 आणि नोव्हेंबर 2025 मध्ये स्मरणपत्रे पाठविण्यात आली; उत्तर प्रतीक्षित आहे.

2.5 दंड न आकारणे

गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करणाऱ्या वाहन/यंत्रांवर ₹11.50 लाख दंड न आकारल्यामुळे शासन महसूल वसूल न होणे सुरूच राहिले

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966,च्या कलम 48 (8) नुसार, महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजे काढणे व उत्खनन) नियम, 2017 च्या नियम 9 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र अधिसूचनेद्वारे प्रकाशित करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या दिनांक 12.01.2018 च्या राजपत्र असामान्य भाग-4 (ब) क्र. 18 च्या नियम 9 अन्वये अनधिकृत/अवैध कामांसाठी वाहन किंवा यंत्राचा वापर केल्यास उदा. गौण खनिजांचा अवैध उपसा करणे, संकलित करणे, बदलणे, उचलणे किंवा विल्हेवाट लावणे, उपरोक्त राजपत्रात नमूद केलेल्या वाहनाच्या/यंत्राच्या वर्गीकरणानुसार दंड किंवा सुविधा शुल्क आकारले जाईल. जप्त केलेले वाहन गौण खनिज, वाहन/यंत्राच्या दंडाचे प्रदान केल्यावर

आणि वैयक्तिक बंधपत्र[70] सादर केल्यानंतर सोडण्यात येईल. हा दंड महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 च्या कलम 48 (7) अन्वये लागू होणाऱ्या दंडाव्यतिरिक्त आहे, ज्यामध्ये उत्खनन केलेले, काढून टाकलेले, संकलित केलेले, पुनर्स्थित केलेले, उचललेले किंवा विल्हेवाट लावलेल्या खनिजांच्या बाजार मूल्याच्या पाचपट रक्कम असेल.

उप-विभागीय अधिकारी, अहिल्यानगर यांच्या अभिलेख्यांच्या छाननी दरम्यान असे निदर्शनास आले की 2017-18 या कालावधीत उप-विभागीय अधिकारी, अहिल्यानगर यांनी दोन पंचनामे[71] जारी केले होते, पहिला पंचनामा 12.11.2017 रोजी एका ट्रकसाठी आणि दुसरा पंचनामा 07.03.2018 रोजी गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतुकीत वापरल्या जाणाऱ्या एका ट्रक आणि एक यांत्रिक लोडर (जेसीबी) साठी जारी करण्यात आला होता. शिवाय, तहसीलदार, अहिल्यानगर यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 च्या कलम 48 (7) आणि 48 (8) अन्वये ट्रक आणि यांत्रिक लोडर (जेसीबी) (आदेश क्रमांक 377 दिनांक 14.03.2018) साठी ₹1,98,900 आणि ट्रकसाठी ₹76,200 (आदेश क्र. 386 दिनांक 19.03.2018) किरकोळ खनिजांच्या प्रकार आणि प्रमाणानुसार दंड वसूल करण्यासाठी आदेश जारी केले होते. याशिवाय, वैयक्तिक रोख्यांच्या आधारे गौण खनिजांच्या अवैध उत्खननासाठी जप्त केलेली ही वाहने/यंत्रसामग्री सोडविण्यासाठी दोन आदेश दिनांक 17.03.2018 रोजी 398 आणि 19.03.2018 रोजी 404 आदेश जारी केले होते.

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की गौण खनिजाच्या अवैध उत्खननासाठी या दोन प्रकरणांमध्ये एकूण तीन वाहने/यंत्रे वापरण्यात आली आणि ती जप्त करण्यात आली होती. मात्र, या दोन्ही प्रकरणात उप विभागीय अधिकारी, अहिल्यानगर यांनी जप्त केलेले वाहन/यंत्र सोडण्याच्या जारी केलेल्या आदेशांमध्ये, महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजे उत्खनन व काढणे) (दुरुस्ती) नियम, 2017 च्या नियम 9 नुसार दंड आकारण्यात आला नव्हता.

अधिसूचनेतील तक्त्यानुसार (जानेवारी 2018), गौण खनिजाचे अवैध उत्खनन केल्याचे आढळून आल्यास ट्रक व यांत्रिक लोडर (जेसीबी) यांना दंड/सुविधा शुल्क आकारण्याचे

[70] कलम 48 च्या उप-कलम (8) अन्वये जप्त केलेल्या यंत्रसामग्री, उपकरणे किंवा वाहतुकीच्या साधनांच्या मालकाने जिल्हाधिकारी किंवा अधिकृत अधिकाऱ्याच्या निर्देशानुसार जप्त केलेली यंत्रसामग्री, अवैध उत्खनन, काढणे, गोळा करणे, बदलणे यासाठी वापरल्या जाणाऱ्या यंत्रसामग्री,उपकरणे किंवा वाहतुकीची साधने यांच्या बाजार मूल्यापेक्षा जास्त नसलेल्या रकमेसाठी वैयक्तिक करारनामा सादर करणे, गौण खनिजांची निवड किंवा विल्हेवाट लावणे किंवा त्यांची वाहतूक आवश्यक आहे.

[71] पंचनामा हा एक औपचारिक दस्तऐवज आहे जो तपासणी अधिकारी तयार करतो आणि गुन्हा किंवा घटनेच्या ठिकाणी अधिकृतपणे निरीक्षणे, पुरावे आणि निष्कर्ष नोंदवण्यासाठी दोन किंवा अधिक स्वतंत्र साक्षीदार (पंच) स्वाक्षरी करतात. शोध, जप्ती यासारख्या घटनांच कायदेशीर अभिलेख म्हणून किंवा ही प्रक्रिया पारदर्शकपणे आणि कायदेशीरपणे आयोजित केली गेली आहे याच्या सुनिश्चितीची चौकशी करण्यासाठी काम करतो.

दर अनुक्रमे ₹2 लाख व ₹7.50 लाख होते. अशाप्रकारे, या प्रकरणात न आकरण्यात आलेला दंड एकूण ₹11.50 लाख[72] होता.

उत्तरात, उप-विभागीय अधिकारी, अहिल्यानगर यांनी नमूद केले (जून 2024) की, तहसीलदार, अहिल्यानगर यांना ट्रक व यांत्रिक लोडरच्या (जेसीबी) संबंधित मालकांकडून रक्कम वसूल करण्याच्या सूचना दिल्या (डिसेंबर 2019 आणि मे 2024) होत्या आणि त्यानुसार, तहसीलदार, अहिल्यानगर यांनी संबंधित मालकांना रकमेच्या वसुलीसाठी नोटीस जारी केली (जुलै 2024) होती.

महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजे उत्खनन व काढणे) नियम, 2017 च्या नियम 9 अन्वये गौण खनिजांच्या अनधिकृत उत्खननात वापरली जाणारी वाहने/यंत्रसामग्री जप्त करूनही, त्यांच्या सोडवणुकीच्या वेळी विहित दंड आकारण्यात आला नाही. जरी कालांतराने वसुलीची कारवाई सुरू करण्यात आली, तरी ऑक्टोबर 2025 पर्यंत ₹11.50 लाख दंडाची रक्कमेची वसुली झाली नव्हती. त्रुटीच्या परिणामी सातत्याने शासकीय महसूल वसूल झाला नाही आणि वैधानिक दंड तरतुदींच्या अंमलबजावणीतील आणि पाठपुरावा करण्यातील कमकुवतपणा निदर्शनास आला.

हे प्रकरण शासनास संदर्भित करण्यात आले (ऑक्टोबर 2024);तसेच जुलै 2025 आणि नोव्हेंबर 2025 मध्ये स्मरणपत्रे पाठविण्यात आली; उत्तर प्रतीक्षित आहे.

2.6 कर्मचारी निवासस्थानांच्या बांधकामावर निष्फळ खर्च

अर्धवट नियोजन आणि अयोग्य जागेची निवड यामुळे गोंदिया येथील कर्मचारी निवासस्थांनाच्या बांधकामावर ₹2.74 कोटींचा निष्फळ खर्च झाला.

प्रशासकीय इमारत व जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्या कर्मचाऱ्यांसाठी 82 निवासस्थाने बांधण्यास महाराष्ट्र शासनाने ₹12.42 कोटींची प्रशासकीय मंजुरी दिली (नोव्हेंबर 1999). सर्वेक्षण करण्याचे कोणतेही धोरण नसल्याने जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्या कर्मचाऱ्यांनी निवासासाठी केलेल्या मागणीचे सर्वेक्षण मंजुरीपूर्वी करण्यात आले नव्हते. तसेच, बांधकामासाठी मंजूर केलेल्या गोंदिया शहरापासून अंदाजे चार कि.मी.अंतरावरील जागेऐवजी जिल्हाधिकारी, गोंदिया यांना जिल्हाधिकारी कार्यालय व मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी गोंदिया शहरात उपलब्ध असलेल्या जागेचा फेरविचार करण्याचा शासनाने सल्ला दिला (डिसेंबर 1999).

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले (जुन 2022) की कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी वर्ग IV ची आठ, वर्ग III ची आठ आणि वर्ग II ची 24 निवासस्थाने बांधण्यासाठी कंत्राटदाराला कार्यादेश जारी केल्याच्या तारखेपासुन 12 महिन्यांच्या आत पूर्ण करण्याची कामे अनुक्रमे मार्च 2007, नोव्हेंबर 2006 आणि मे 2009 मध्ये दिली होती. वर्ग IV, वर्ग III व वर्ग II च्या निवासस्थानांचे काम

[72] दोन ट्रक्स आणि एक यांत्रिक लोडरसाठी (जेसीबी), दंडाची रक्कम: ₹ 2 लाख+₹ 2 लाख+₹ 7.5 लाख = ₹11.50 लाख

₹55.70 लाख, ₹50.32 लाख आणि ₹167.87 लाख खर्च करून अनुक्रमे डिसेंबर 2008, मार्च 2008 व डिसेंबर 2011 मध्ये पूर्ण केली होती आणि जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांच्याकडे अनुक्रमे जानेवारी 2011, सप्टेंबर 2011 व जानेवारी 2012 मध्ये सुपूर्द करण्यात आली होती.

त्यानुसार, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, निवासस्थान वितरण समिती यांनी ऑक्टोबर 2011 व जुलै 2012 मध्ये कर्मचाऱ्यांना निवासस्थानांचे वाटप केले, मात्र एकाही कर्मचाऱ्याने निवासस्थानाचा ताबा घेतला नाही आणि जानेवारी 2012 पर्यंत ती पूर्ण होऊन हस्तांतरित होऊन दहा वर्षांहून अधिक काळ लोटला तरी ती रिकामी राहिली. त्या काळात समाजकंटकांनी विद्युत अवजारे, सॅनिटरी फिटिंग आणि पाणीपुरवठा जोडण्यांची तोडफोड/चोरी केली. याबाबत पोलिसांत तक्रारही दाखल करण्यात आली होती (मार्च 2013). दरम्यान, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, गोंदिया यांनी जिल्हाधिकारी, गोंदिया यांना खराब झालेले वीजपुरवठा, स्वच्छता सुविधा व पाणीपुरवठा जोडण्यांसाठी ₹40 लाखांचा निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली (सप्टेंबर 2015). त्यानुसार, जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी शासनाला कर्मचारी निवासस्थाने सामायिक पूलमध्ये रूपांतरित करण्याची सूचना केली (मार्च 2016) जेणेकरून इतर विभागातील कर्मचाऱ्यांना निवासस्थानांचे वाटप करता येईल. मात्र, शासनाकडून कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही (मे 2024) आणि निवासस्थाने रिकामी राहिली, परिणामी ₹2.74 कोटींचा[73]निष्फळ खर्च झाला.

उत्तरात विभागाने नमूद (मे 2024) केले की, निवासस्थानांची जागा गोंदिया शहरापासून दूर म्हणजेच अंदाजे पाच किलोमीटरवर असल्याने ताब्यात घेतली गेली नाहीत, आणि पाणी, वीज आणि इतर सुविधा उपलब्ध नसल्याने अधिकारी, कर्मचारी यांनी निवासस्थानांसाठी अर्ज सादर केले नव्हते.

लेखापरीक्षण असा निष्कर्ष काढते की प्रकल्प आखणीच्या टप्प्यातील अपुरे नियोजन, तसेच मागणीच्या निर्धारणाचा अभाव आणि शासनाने सल्ला दिलेला असूनही प्राथमिक नागरी सुविधांचा अभाव असलेल्या अयोग्य ठिकाणाची निवड यामुळे गोंदिया येथे कर्मचारी निवासस्थानांच्या बांधकामावरील ₹2.74 कोटींचा खर्च निष्फळ ठरला. पूर्ण झालेली निवासस्थाने दशकाहून अधिक काळ अव्याप्त राहिली, ज्या दरम्यान अपुऱ्या सुरक्षेमुळे मालमत्तेचा विध्वंस आणि हानी झाली. तसेच, सामायिक पूलमध्ये रूपांतर करण्यासहित पर्यायी उपयोगासाठी निर्णय घेण्यातील विलंब यामुळे सोयीसुविधा दीर्घकाळ विनावापर पडून राहिल्या. या सर्व कमतरतांचा परिणाम एकत्रितपणे निष्फळ खर्च आणि गुंतवणुकीच्या अपेक्षित लाभांची प्राप्ती न होण्यात झाला.

हे प्रकरण शासनास संदर्भित करण्यात आले (एप्रिल 2025);तसेच जुलै 2025 आणि नोव्हेंबर 2025 मध्ये स्मरणपत्रे पाठविण्यात आली; उत्तर प्रतीक्षित आहे.

[73] वर्ग IV निवासस्थाने: ₹55.70 लाख, वर्ग III: ₹50.32 लाख आणि वर्ग II: ₹167.87 लाख

महसूल व वन विभाग (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)

2.7 पीक नुकसान सहाय्य अनुदानासाठी ₹2.60 कोटींची अतिरिक्त प्रदाने

चाचणी-तपासणी केलेल्या दोन जिल्ह्यांमध्ये नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य वितरीत करण्याच्या प्रणालीतील त्रुटीमुळे ₹2.60 कोटींचे अतिरिक्त प्रदान करण्यात आले.

महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), महाराष्ट्र शासन (विभाग) यांनी शासन निर्णयाद्वारे (जानेवारी 2023) विलंब टाळण्यासाठी आणि आर्थिक सहाय्याची उत्कृष्ट सेवा प्रदान करण्यासाठी महा-आयटीने[74] विकसित केलेल्या संगणकीकृत प्रणालीद्वारे, नैसर्गिक आपत्तीमुळे ज्या शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे, अशा पात्र शेतकऱ्यांना मदत निधी वितरीत करण्याचा निर्णय घेतला. तीन हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेल्या आणि लागवडीखालील जमिनीच्या एक तृतीयांश पेक्षा जास्त पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पीक सहाय्य अनुदान दिले जाते. पीक सहाय्य अनुदान वितरणासाठी पीक अर्थसहाय्य विहित असलेले शासन निर्णय विभागाकडून वेळोवेळी जारी केले जातात.

पीक मदत वितरणाची प्रक्रिया तलाठ्याद्वारे 'पंचनामा' तयार करण्यापासून सुरू होते. पंचनाम्यात शेतकऱ्याचे नाव, ज्या जमिनीत पीक नष्ट झाले आहे त्या जमिनीचे क्षेत्र इत्यादी बाबी दर्शविल्या जातात. 'पंचनाम्या'वर तलाठी स्वाक्षरी करतात आणि साक्षीदार म्हणून गावातील पाच रहिवासी स्वाक्षरी करतात. 'पंचनाम्या' व्यतिरिक्त, तलाठ्याद्वारे शेतकऱ्याचे नाव, क्षेत्र बाधित शेतकऱ्याचा आधार क्रमांक, पीक अर्थसहाय्य अनुदान म्हणून देय रक्कम, बँक खाते क्रमांक, दूरध्वनी क्रमांक इत्यादी विहित नमुन्यात भरले जाते. 'पंचनाम्या'ची एक प्रत, विहित नमुना आणि एक्सेल शीटमध्ये भरलेली सर्व शेतकऱ्यांची माहिती तलाठी तालुक्याच्या कार्यालयात पाठवितात. तालुका कार्यालय एक्सेल शीट प्रणालीमध्ये अपलोड करते आणि दुबार लाभार्थी नोंदी ओळखण्यासाठी आधार क्रमांक, गाव, नाव आणि "गट क्रमांक"[75] इत्यादींची फेरतपासणी करून प्रणालीद्वारे स्वयंचलितपणे प्रमाणीकरण केले जाते. तालुका कार्यालय संपूर्ण विदा सांभाळून ठेवते आणि मंजुरीसाठी तो विदा जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला जातो. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मंजुरीनंतर शेतकऱ्यांना पीक अर्थसहाय्य अनुदान वितरण करण्यासाठी यंत्रणेद्वारे विशिष्ट क्रमांकांची यादी (ज्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मंजूर केली गेली आहे त्यांची नावे दर्शविणारी यादी)तयार केली जाते. शेतकऱ्याने प्रणालीमध्ये, आधार क्रमांकाद्वारे बायोमेट्रिक प्रमाणीकरण केल्यानंतर अर्थसहाय्य शेतकऱ्याच्या बँक खात्यात जमा केली जाते.

---

[74] राज्यात माहिती तंत्रज्ञान संबंधित उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि प्रभावी ई-शासकीय प्रणाली स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची नोडल संस्था कार्यरत आहे.

[75] "गट क्रमांक" हा एक सर्वेक्षण ओळख क्रमांक आहे जो ग्रामीण आणि कृषि भागात, विशेषत: महाराष्ट्रातील जमिनीचा तुकडा ओळखण्यासाठी वापरला जातो.

एखाद्या नुकसानीच्या घटनेसाठी पात्र लाभार्थीला केवळ एकदाच सहाय्य दिले जाईल याची खात्री करणे तसेच योग्य प्रणाली-आधारित नियंत्रणे आणि प्रमाणीकरण तपासणीद्वारे लाभार्थी विदाची पुनरावृत्ती प्रक्रिया रोखण्यासाठी पीक नुकसान सहाय्य प्रणालीची आवश्यकता होती. तसेच, मे 2024 मध्ये जारी केलेल्या विभागीय सूचनांमध्ये अतिरिक्त प्रदाने जून 2024 पर्यंत वसूल करण्याचे विहित केले आहे.

महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) याच्या लेखापरीक्षणादरम्यान (जानेवारी 2024) राज्यातील शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या पीक सवलतीच्या आकडेवारीचे विश्लेषण लेखापरीक्षण पथकाद्वारे विदेत समाविष्ट असणाऱ्या शेतकऱ्याचे नाव, आधार क्रमांक, जिल्हा, तालुका, गट क्रमांक, नैसर्गिक आपत्तीमुळे प्रभावित शेताचे क्षेत्र आणि प्रत्येक पिकाच्या प्रकारासाठी देय असलेल्या अर्थसहाय्याचे प्रमाण अधिकृत करणारा शासन निर्णय क्रमांक जुळवून घेवून करून घेतले.

नोव्हेंबर 2022 ते जानेवारी 2024 या कालावधीत जारी केलेल्या विविध शासन निर्णयांतर्गत मुक्त केलेले पीक सहाय्याच्या विश्लेषणात असे उघड झाले की, राज्यातील 11,860 शेतकऱ्यांना दोन किंवा दोनपेक्षा जास्त वेळा पीक सहाय्य वितरित केल्याची 26,004 प्रकरणे समोर आली, त्यापैकी 18,247 प्रकरणे (70 टक्के) अकोला आणि छत्रपती संभाजीनगर या दोन जिल्ह्यांमध्ये आहेत. विश्लेषणाच्या निष्कर्षांची अचूकता तपासण्यासाठी, लेखापरीक्षण दलाने या दोन जिल्ह्यांमधील जिल्हाधिकारी आणि तालुका कार्यालयांना (13 तालुके) भेट दिली (ऑक्टोबर 2024) आणि 'पंचनामा' मधील विदाची प्रणालीवर अपलोड केलेल्या विदाशी फेरतपासणी करून, 18,247 प्रकरणांपैकी 12,102 प्रकरणांची (66 टक्के) पडताळणी केली. तपासणीत 12,102 प्रकरणांपैकी[76] 7,301 प्रकरणांमध्ये[77] (60 टक्के) एकाच शेतकऱ्याला बनावट/एकाधिक प्रदान केल्याची पुष्टी झाली, ज्याच्या परिणामी ₹2.60 कोटींचे अतिरिक्त प्रदान केले गेले. विदा विश्लेषणामध्ये आढळलेल्या उर्वरित 4,801 प्रकरणांमध्ये (12,102-7,301), लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की बनावट/एकाधिक प्रदान केले गेले नाही कारण शासन निर्णयाचा चुकीचा क्रमांक प्रविष्ट केला गेला, एकाच गट क्रमांकामध्ये अनेक पिकांची लागवड केली गेली होती. तालुका कार्यालयाने एकच एक्सेल फाईल दोनदा/अनेक वेळा अपलोड केल्यामुळे बनावट/एकाधिक प्रदाने केली गेली. अशा प्रकारे, प्रणालीमध्ये त्रुटी होती ज्यामुळे एकच फाइल दोनदा किंवा अनेक वेळा अपलोड करणे शक्य झाले होते. अशाप्रकारे, प्रणालीमध्ये लाभार्थी स्तर प्रमाणीकरण तपासण्या होत्या तरी एकसारख्या विदा फाइल्सचे बनावट अपलोड शोधून काढणारी किंवा रोखणारी पर्याप्त नियंत्रणे नव्हती, त्यामुळे एकाच अभिलेख्यावर वारंवार प्रक्रिया करण्यास परवानगी मिळत गेली. हे प्रणाली रचना आणि कार्यओघ नियंत्रणातील कमकुवतपणा सूचित करते, जे बनावट समूह अपलोड रोखू शकले नव्हते किंवा अशा घटना पर्यवेक्षी पुनरावलोकनासाठी दर्शवू शकले नव्हते.

---

[76] उर्वरित 6,145 प्रकरणे राज्य विधानसभा निवडणूक 2024 जाहीर झाल्यामुळे लेखापरीक्षणासाठी सादर केली गेली नाहीत. त्यामुळे नोंदींची पडताळणी 12,102 प्रकरणांपुरती मर्यादित होती.

[77] अकोला: 6,147; छत्रपती संभाजीनगर: 1,154.

लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांच्या आधारे, विभागाने राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना बनावट/ एकाधिक प्रदाने ओळखण्याचे आणि जून 2024 पर्यंत वसुली पूर्ण करण्याचे निर्देश दिले (मे 2024). छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील दोन तहसीलदारांनी नमूद केले की, फाईल अपलोड करताना स्क्रीनवर 'रेकॉर्ड सेव्ह करण्यास असमर्थ' असा संदेश येतो ज्यामुळे फाइल पुन्हा एकदा अपलोड होते. उत्तरादाखल विभागाने नमूद केले की (जानेवारी 2025) मे 2024 मध्ये जारी केलेल्या निर्देशांच्या आधारे, अकोला आणि छत्रपती संभाजीनगरमधील 9,250 प्रकरणांमध्ये बनावट/एकापेक्षा जास्त प्रदाने करण्यात आली होती, ज्यापैकी 719 प्रकरणांमध्ये (₹69.01 लाख) वसुली करण्यात आली होती, तर 8,531 प्रकरणांमध्ये वसुली प्रलंबित होती.

जून 2024 पर्यंत वसुली पूर्ण करण्याचे निर्देश विभागाला देऊनही अतिरिक्त प्रदानांची वसुली पूर्ण झाली नव्हती. तसेच, इतर जिल्ह्यांमध्ये निदर्शनास आलेली प्रकरणे आणि वसुलीची स्थिती विभागाकडून प्रतीक्षित होती. यंत्रणेतील त्रुटी सुधारल्या गेल्या आहेत अथवा नाही हे विभागाच्या उत्तरातही स्पष्ट करण्यात आले नाही.

हे प्रकरण शासनास संदर्भित करण्यात आले (मे 2025);तसेच जुलै 2025 आणि ऑक्टोबर 2025 मध्ये स्मरणपत्रे पाठविण्यात आली; उत्तर प्रतीक्षित आहे.

गृहनिर्माण विभाग

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे आणि पिंपरी-चिंचवड क्षेत्र

2.8 विकासकाला अदेय लाभ

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी एकूण मंजूर चटई क्षेत्र निर्देशांकाच्या चुकीच्या गणनेमुळे दोन विकासकांना ₹6.29 कोटींचे 3,159.31 चौरस मीटर्स आणि ₹29.51 कोटींचे 11,157.83 चौरस मीटर्स अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क देण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाने पात्र झोपडपट्टीवासीयांना मोफत पुनर्वसन सदनिका उपलब्ध करून देण्यासाठी सर्वसमावेशक झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार केली होती. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये पुनर्वसन घटक[78] क्षेत्र आणि मुक्त विक्री घटक[79] क्षेत्र असे दोन घटक असतात. पुनर्वसन सदनिका बांधणाऱ्या विकासकांना

[78] विशेष नियमावली 1 (यु) नुसार पुनर्वसन घटक म्हणजे या नियमावलीतील तरतुदींनुसार पात्र झोपडीधारकांना देण्यात येणाऱ्या सर्व निवासी सदनिका तसेच अनिवासी बांधकाम परिसराचे क्षेत्रफळ आणि समाविष्ट सामायिक क्षेत्र, लॉबी, जिना/जिने, उद्वाहन/उद्वाहने आणि मशीन रूम/रूम्स, छन्न मार्ग, कल्याण केंद्र/केंद्रे, बालवाडी/बालवाड्या, ई.

[79] विशेष नियमावली 1 (व्ही) नुसार पुनर्वसनासाठी आवश्यक चटई क्षेत्र निर्देशांक वजा केल्यानंतर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या एकूण अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकापैकी चटई क्षेत्र निर्देशांक किंवा हस्तांतरणीय विकास हक्काच्या स्वरूपात (या नियमावलीत विहित केलेल्या गुणोत्तरातील पुनर्वसन घटक अधिक प्रोत्साहन विक्री घटक) उपलब्ध चटई क्षेत्र निर्देशांक या नियमांनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या मोफत विक्री घटकाचे बांधलेले क्षेत्र म्हणून प्रोत्साहन चटई क्षेत्र निर्देशांकावर बांधकाम केले जाऊ शकते.

झोपडपट्टी भूखंडाच्या चटई क्षेत्र निर्देशांकाच्या[80] उपयोगिता मर्यादेच्या अधीन राहून खुल्या बाजारात विक्रीसाठी विक्री सदनिका बांधण्यासाठी मुक्त विक्री घटक क्षेत्राचा वापर करण्याची परवानगी आहे. झोपडपट्टी भूखंडाच्या चटई क्षेत्र निर्देशांक वापर मर्यादेमुळे ज्या मुक्त विक्री घटक क्षेत्राचा प्रत्यक्ष वापर करता येत नाही, तो हस्तांतरणीय विकास हक्क[81] स्वरूपात दिला जातो. पुनर्वसन घटकाच्या बांधकामावर होणारा खर्च भरून काढण्यासाठी विकासकाला मुक्त विक्री घटकाची परवानगी दिली जाते.

नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेले पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, या क्षेत्रांत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची अंमलबजावणी करते. झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या विशेष नियमावली आणि महाराष्ट्रासाठी एकीकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीद्वारे नियंत्रित केली जाते. विशेष विनियम 13(2) नुसार, पुनर्वसन आणि मोफत विक्री या दोन्ही घटकांचा समावेश असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी एकूण मंजूर चटई क्षेत्र निर्देशांक कोणत्याही झोपडपट्टीच्या जागेवर 3.0 पेक्षा जास्त असू शकत नाही. परंतु, सध्याची सदनिका घनता प्रती हेक्टर 450 पेक्षा जास्त असेल तर, 4.0 पर्यंत चटई क्षेत्र निर्देशांक वापरायला परवानगी आहे. तसेच, विशेष विनियम 13 (2) नुसार एकूण मंजूर चटई क्षेत्र निर्देशांक आणि जास्तीत जास्त अनुज्ञेय किंवा वापरलेला चटई क्षेत्र निर्देशांक यातील फरकासाठी हस्तांतरणीय विकास हक्क जारी करण्याची परवानगी देण्यात आली आहे. नियमावलीच्या (सप्टेंबर 2014) विशेष विनियम 15 (1) अन्वये जारी करण्यात आलेल्या (डिसेंबर 2018) अधिसूचनेनुसार, पुनर्वसन सदनिकांच्या बांधकामासाठी अतिरिक्त मुक्त विक्री घटक/प्रोत्साहनपर बांधीव क्षेत्राची विहित गुणोत्तरानुसार गणना करणे आवश्यक आहे.

एकीकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली, 2020 च्या विनियम 11.2.4 नुसार, विकासकाने दाट वस्ती नसलेल्या भागातील विकास आराखडा लागू असलेली हक्काची जमीन, अधिकाऱ्यांकडे प्रत्यार्पित केली तर ते हस्तांतरणीय विकास हक्कासाठी पात्र ठरतात. जर जमीन कोणत्याही किंमतीशिवाय आणि कोणत्याही अतिक्रमणाशिवाय प्रत्यार्पित केली गेली असेल, तर हस्तांतरणीय विकास हक्क प्रत्यार्पित केलेल्या जमिनीचे दुप्पट क्षेत्रफळासमान असतील. ही पात्रता अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकाच्या अतिरिक्त किंवा प्रत्यार्पित केलेली जमीन आणि आजूबाजूच्या जमिनीच्या विकास क्षमतेची पर्वा न करता लागू होते.

अ) अभिलेख्यांच्या छाननीत असे निदर्शनास आले (मे 2023) की झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विकासकाला 2,591.50 चौरस मीटर्सच्या झोपडपट्टी भूखंडावर 147 पुनर्वसन सदनिका बांधण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूर केली

[80] चटई क्षेत्र निर्देशांक म्हणजे विकास नियंत्रण विनियमावली अंतर्गत मोजणीतून वगळण्यात आलेले क्षेत्र वगळता सर्व मजल्यांवरील एकत्रित बांधीव क्षेत्राचे भूखंडाच्या एकूण क्षेत्रफळाशी गुणोत्तर होय.

[81] चटई क्षेत्र निर्देशांक किंवा विकास हककांच्या स्वरूपात ही नुकसानभरपाई आहे जी मालकाला बांधीव क्षेत्राच्या बांधकामाचा अधिकार देईल.

(एप्रिल 2017). विद्यमान सदनिकांची घनता हेक्टरी 450 पेक्षा जास्त असल्याने चार चटई क्षेत्र निर्देशांकाचा विचार करता झोपडपट्टीच्या भूखंडासाठी कमाल यथा स्थान अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक 10,3666 चौरस मीटर्स होता.

विशेष विनियम 1 (यू) नुसार पुनर्वसन घटक, ज्यामध्ये सामायिक क्षेत्र, जिने, छन्नमार्ग आदींचा समावेश असलेले पात्र सदनिकाधारकांना दिले जाणारे बांधीव क्षेत्र 8,715.31 चौरस मीटर्स होते. सामायिक क्षेत्र, जिने, छन्नमार्ग आदींचा समावेश असलेले बिगर बांधीव क्षेत्रफळ 3,174.47 चौरस मीटर्स होते. पुनर्वसन घटक विचारात घेऊन विकासकाला देण्यात येणारा विनामूल्य विक्री घटक 23,522.62 चौरस मीटर्स[82] इतका मोजला गेला.

झोपडपट्टीच्या भूखंडावरील 10,366 चौरस मीटर्सच्या कमाल मंजूर यथा स्थान चटई क्षेत्र निर्देशांकापैकी विकासकाने पुनर्वसनासाठी 5,540.84 चौरस मीटर्स आणि 23,522.62 चौरस मीटर्सच्या मोफत विक्री घटकापैकी 4,810 चौरस मीटर्सचा चटई क्षेत्र निर्देशांक वापरला.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले (मे 2023) की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विशेष विनियम 13 (2) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी 23,522.62 चौरस मीटर्स मोफत विक्री घटक आणि 8,715.31 चौरस मीटर्स (23,522.62 चौरस मीटर्स + 8,715.31 चौरस मीटर्स) पुनर्वसन घटक विचारात घेऊन एकूण 32,237.93 चौरस मीटर्स[83] चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर केला होता.

विशेष विनियम 13 (2) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी एकूण मंजूर चटई क्षेत्र निर्देशांकाची गणना चुकीची होती कारण पुनर्वसन घटकाचा चटई क्षेत्र निर्देशांक केवळ 5,540.84 चौरस मीटर्सच्या चटई क्षेत्र निर्देशांकाऐवजी 8,715.31 चौरस मीटर्स (3,174.47 चौरस मीटर्स चटई क्षेत्र निर्देशांक मुक्त) म्हणून गणला गेला होता. लेखापरीक्षणानुसार, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने 32,237.93 चौरस मीटर्स चटई क्षेत्र निर्देशांकाऐवजी एकूण 29,063.46 चौरस मीटर्स चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करणे आवश्यक होते.

एकूण 32,237.93 चौरस मीटर्स चटई क्षेत्र निर्देशांकापैकी 10,366 चौरस मीटर्सचा यथास्थान कमाल चटई क्षेत्र निर्देशांक वजा करून उर्वरित 21,871.93 चौरस मीटर्सचा चटई क्षेत्र निर्देशांक झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विकासकाला मुक्त केला (मे 2022 पर्यंत). तथापि, लेखापरीक्षणानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने 2,1871.93 चौरस मीटर्स चटई क्षेत्र निर्देशांकाऐवजी एकूण 18,712.62 चौरस मीटर्स चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करणे आवश्यक होते.

एकूण मंजूर चटई क्षेत्र निर्देशांकाच्या चुकीच्या गणनेमुळे **तक्ता 2.20** मध्ये दर्शविल्याप्रमाणे अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क मुक्त करण्यात आला.

---

[82] 23,522.62 चौरस मीटर्स= 8715.31 चौरस मीटर्स * 2.699

[83] 23,522.62 चौरस मीटर्सचा मोफत विक्री घटक + पुनर्वसन घटक 8,715.31 चौरस मीटर्स

तक्ता 2.20: विकासकाला हस्तांतरणीय विकास हक्काचे अतिरिक्त वितरण

अनु. क्र.	तपशील	झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणानुसार	लेखापरीक्षणानुसार
1	भूखंड क्षेत्रफळ (चौरस मीटर्समध्ये)	2591.50	2591.50
2	कलम 13 (2) अन्वये चटई क्षेत्र निर्देशांकाचा उपयोग	4.00	4.00
3	भूखंडावर अनुज्ञेय कमाल चटई क्षेत्र निर्देशांक (चौरस मीटर्समध्ये)	10,366 **(अनु.क्र. 1*2)**	10,366 **(अनु.क्र. 1*2)**
4	पुनर्वसन घटकाचा चटई क्षेत्र निर्देशांक (चौरस मीटर्समध्ये)	5540.84	5540.84
5	पुनर्वसन घटकांचा बिगर-चटई क्षेत्र निर्देशांक (चौरस मीटर्समध्ये) (सामयिक क्षेत्र, जिने, छन्न मार्ग (पॅसेज) इ.)	3174.47	3174.47
6	एकूण पुनर्वसन घटक (चौरस मीटर्समध्ये)	8,715.31 **(अनु.क्र. 4+5)**	8,715.31 **(अनु.क्र. 4+5)**
7	दिनांक 17.12.2018 च्या अधिसूचनेसह विशेष विनियम 15 (1) अंतर्गत विहित गुणोत्तर	2.699	2.699
8	विनामूल्य विक्री घटक (चौरस मीटर्समध्ये)	23,522.62 **(अनु.क्र 6*7)**	23,522.62 **(अनु.क्र. 6*7)**
9	विशेष विनियम 13 (2) अंतर्गत योजनेचा एकूण मंजूर चटई क्षेत्र निर्देशांक (चौरस मीटर्समध्ये)	**32,237.93 (अनु.क्र 6+8)**	**29,063.46 (अनु.क्र. 4+8)**
10	झोपडपट्टीच्या भूखंडात पुनर्वसन चटई क्षेत्र निर्देशांकाचा वापर (चौरस मीटर्समध्ये)	5,540.84	5,540.84
11	झोपडपट्टीच्या भूखंडात वापरलेला मोफत विक्री चटई क्षेत्र निर्देशांक (चौरस मीटर्समध्ये)	4,810.00	4,810.00
12	विकासकाला मुक्त केलेला हस्तांतरणीय विकास हक्क (चौरस मीटर्समध्ये)	21,871.93 **(क्र. 9-3) (अ)**	18,712.62 **(क्र. 9-10-11) (ब)**
13	विकासकाला मुक्त केलेला अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क	**3159.31 (अ-ब)**	

तक्ता 2.20 मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण मंजूर चटई क्षेत्र निर्देशांकाचे चुकीचे गणन केल्यामुळे विकासकाला अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क मुक्त करण्यात आल्याने ₹6.29 कोटींचा[84] नाहक फायदा झाला.

उत्तरात, (जानेवारी 2026) विभागाने नमूद केले की नियमावलीनुसार गणना केली गेली आणि विकासकाला कोणताही अतिरिक्त मुक्त विक्री चटई क्षेत्र निर्देशांक/हस्तांतरणीय विकास हक्क मंजूर केला नव्हता.

उत्तर स्वीकारार्ह नाही कारण, अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्काची मंजुरीचा संबंध झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण नियमावलीच्या विशेष विनियम 13 (2) आणि विशेष विनियम 15 (1) आणि एकत्रित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली,2020

[84] वर्ष 2017-18 च्या वार्षिक दरपत्रकानुसार 3159.31 चौरस मीटर x जमिनीची किंमत ₹19,910 प्रति चौरस मीटर.

च्या विनियम 11.2.4 मधील तरतुदींच्या चुकीच्या प्रयोगाशी संबंधित होता, ज्यामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने संभाव्य विकास आणि हस्तांतरणीय विकास हक्काच्या गणनेसाठीच्या नियामक तरतुदींच्या विरुद्ध एकूण मंजूर चटईक्षेत्र निर्देशांकाची गणना करताना बिगर-चटईक्षेत्र क्षेत्रांचा चुकीने समावेश केला आणि विकास आराखडा रस्त्याच्या अडथळ्यात अडकलेल्या क्षेत्रावर चटईक्षेत्र निर्देशांक वापरला

ब) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या अशाच प्रकारच्या एका प्रकरणाच्या अभिलेख्यांची मे 2023 मध्ये केलेल्या तपासणीत असे निदर्शनास आले की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने 6,452 चौरस मीटर्सच्या भूखंडासाठी[85] झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूर केली (मार्च 2017). भूखंड विनियमावली 2014 नुसार 4,976.46 चौरस मीटर्सच्या विकास आराखडा रस्त्याच्या अडथळ्यात अडकलेला होता. म्हणजे, पुनर्वसनासाठी निव्वळ 1,475.54 चौरस मीटर्सचे भूखंड क्षेत्र उपलब्ध होते. योजनेमध्ये नोव्हेंबर 2020 आणि जानेवारी 2021 मध्ये सुधारणा[86] झाल्या. जानेवारी 2021 मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये झालेल्या सुधारणेनुसार 175 पुनर्वसन सदनिका बांधण्याचे नियोजित केले होते.

विकासकाने 1,475.54 चौरस मीटर्सच्या निव्वळ झोपडपट्टी भूखंड क्षेत्रावर 7,260.08 चौरस मीटर्स इतक्या एकूण पुनर्वसन घटक क्षेत्राचे बांधकाम प्रस्तावित केले. यामध्ये पुनर्वसन सदनिकांच्या 4,697.25 चौरस मीटर्स इतक्या चटई क्षेत्र निर्देशांक आणि बांधीव क्षेत्रफळाच्या 2562.83 चौरस मीटर्स इतक्या चटईक्षेत्र मुक्त क्षेत्राचा समावेश होता. तसेच, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने पुनर्वसन घटकाऐवजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण नियमावली (सप्टेंबर 2014) च्या विशेष नियमावली 15(1) अंतर्गत नगर विकास विभागाच्या अधिसूचनेमध्ये (डिसेंबर 2018) उल्लेखिलेल्या 1:2.647 गुणोत्तरावर आधारित सुसंगत मुक्त विक्री घटक 19,217.43 चौरस मीटर्स इतका गणन केला. लेखापरीक्षणात तथापि, खालील विसंगती निदर्शनास आल्या (मे 2023):

- **1,475.54 चौरस मीटर्स निव्वळ झोपडपट्टी भूखंड क्षेत्रावर पुनर्वसनासाठी चटई क्षेत्र निर्देशांकाच्या बदल्यात 1,204.91 चौरस मीटर्स अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क मंजूर करणे**

  विकासकाने 1,475.54 चौरस मीटर्सच्या निव्वळ झोपडपट्टी भूखंड क्षेत्रावर पुनर्वसन सदनिका बांधण्याचे प्रस्तावित केले. विशेष विनियम 13 (2) अन्वये झोपडपट्टी

---

[85] सर्व्हे क्र 1812(111 बी/1-ए-1-बी), हडपसर, पुणे येथील 1475.54 चौरस मीटर्सचा निव्वळ झोपडपट्टी भूखंड मे.एलब्रस रियाल्टी ह्यांच्या नावे

[86] विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण नियमावलीच्या (सप्टेंबर 2014) विशेष नियम 15(1) अंतर्गत असलेल्या अधिसूचनेच्या (डिसेंबर 2018) अन्वये योजना सुधारणेच्या केलेल्या विनंतीमुळे झोपडपट्टी पुनर्वसन योजना नोव्हेंबर 2020 सुधारित करण्यात आली. झोपडपट्टी पुनर्वसन योजना नव्याने पात्र ठरलेल्या झोपडपट्टीधारकांना सामावून घेण्यासाठी जानेवारी 2021 मध्ये अजून सुधारित करण्यात आली.

पुनर्वसन प्राधिकरणाने उर्वरित भूखंडासाठी 25,119.59[87] चौरस मीटर्स चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर केला, ज्यामध्ये उर्वरित भूखंड क्षेत्रासाठी चटई क्षेत्र निर्देशांक 4 (5,902.16 चौरस मीटर्स) आणि योजनेच्या पुनर्वसन घटकाच्या बदल्यात मुक्त विक्री घटक क्षेत्र (19,217.43 चौरस मीटर्स) यांचा समावेश होता. विशेष नियम 13(2) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी एकूण मंजूर चटई क्षेत्र निर्देशांकाची गणना चुकीची होती, कारण पुनर्वसन घटकाचा चटई क्षेत्र निर्देशांक 4,697.25 चौरस मीटर्स जो जागेवर बांधकामासाठी प्रस्तावित होता, त्याऐवजी 5,902.16 चौरस मीटर्स इतका गणला गेला होता. परिणामी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने 1,475.54 चौरस मीटर्स निव्वळ झोपडपट्टी भूखंड क्षेत्रासाठी 1,204.91 चौरस मीटर्स अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क मंजूर केले जे **तक्ता 2.21** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 2.21: पुनर्वसनासाठी चटई क्षेत्र निर्देशांकाच्या तुलनेत अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क मंजूर करणे

अनु क्र.	तपशील	झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणानुसार	लेखापरीक्षणानुसार
1	विकास आराखडा रस्त्यात अडकलेले क्षेत्र तयार केल्यानंतर शिल्लक झोपडपट्टी भूखंड क्षेत्र	1,475.54	1,475.54
2	अनुज्ञेय असलेला चटई क्षेत्र निर्देशांक	4	-
3	पुनर्वसन घटकाचा चटई क्षेत्र निर्देशांक **{(1) * (2)}**	5902.16 -----------**(अ)**	4,697.25 ----------- **(ब)** (पुनर्वसन सदनिकांसाठी विकासकाकडून प्रस्तावित चटई क्षेत्र निर्देशांक)
4	झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मंजूर केलेला अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क **(अ) - (ब)**	-	1,204.91

- **विकास आराखडा रस्त्यात अडकलेल्या 4,976.64 चौरस मीटर्स क्षेत्रफळाच्या तुलनेत 9,952.92 चौरस मीटर्स अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क मंजूर करणे.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी एकूण 45,025.43 चौरस मीटर्स क्षेत्रफळ मंजूर केले, ज्यामध्ये एकूण भूखंड क्षेत्रावर म्हणजेच 6,452 चौरस मीटर्सवर चटई क्षेत्र निर्देशांक 4 (25,808 चौरस मीटर्स) आणि योजनेच्या पुनर्वसन घटकाच्या बदल्यात मोफत विक्री घटक क्षेत्र (19,217.43 चौरस मीटर्स) यांचा समावेश होता. तथापि, या भूखंडाचा काही भाग विकास आराखडा रस्त्यात अडकलेला (4,976.46 चौरस मीटर्स) असल्याने आणि उर्वरित भूखंड क्षेत्रासाठी म्हणजेच 1,475.54 चौरस मीटर्स क्षेत्रफळासाठी चटई क्षेत्र निर्देशांक 4 पर्यंत भूखंड संभाव्यतेचा वापर करण्याचा अधिकार विकासकाला असल्याने मंजुरी योग्य नव्हती. तसेच, एकत्रित विकास

[87] 45,025.43 चौरस मीटर्स - 19,905.84 चौरस मीटर्स (विकास आराखडा रस्त्यात अडकलेल्या क्षेत्राचा 4,976.46 चौरस मीटर्स * 4 चटई क्षेत्र निर्देशांक) = 25,119.59 चौरस मीटर्स

नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली, 2020 च्या नियम 11.2.4 नुसार, जर विकासकाने अतिक्रमणमुक्त विकास आराखडा रस्त्यात अडकलेल्या क्षेत्रासाठी पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेला सोपविला तर, 19,905.84 चौरस मीटर्स (4,976.46 चौरस मीटर्स x चटई क्षेत्र निर्देशांक 4) ऐवजी केवळ 9,952.92 चौरस मीटर्स (4,976.46 चौरस मीटर्स x चटई क्षेत्र निर्देशांक 2) हस्तांतरणीय विकास हक्क मिळाला असता. म्हणून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विकास आराखडा रस्त्यात अडकलेल्या क्षेत्रासाठी 9,952.92 चौरस मीटर्स अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क मंजूर केले जे **तक्ता 2.22** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 2.22 : विकास आराखडा रस्ता क्षेत्रासाठी अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क मंजूर करणे.

तपशील	झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणानुसार (चौरस मीटर्समध्ये)	लेखापरीक्षणानुसार (चौरस मीटर्समध्ये)
विकास आराखडा रस्त्यात अडकलेले क्षेत्र	4,976.46	4,976.46
विकास आराखडा रस्त्यात अडकलेल्या क्षेत्रासाठी मंजूर चटई क्षेत्र निर्देशांक	4	2 (एकत्रित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली, च्या विनियम 11.2.4 नुसार)
विकास आराखडा रस्त्यात अडकलेल्या क्षेत्राच्या तुलनेत चटई क्षेत्र निर्देशांक	19,905.84	9,952.92
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मंजूर केलेला अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क (म्हणजे चटई क्षेत्र निर्देशांक 2 च्या समतुल्य)	-	9,952.92

एकूण मंजूर चटई क्षेत्र निर्देशांकाच्या चुकीच्या गणनेमुळे विकासकाला प्रचलित वार्षिक दर विवरणावर ₹29.51 कोटी[88] किमतीचा 11,157.83 चौरस मीटर्स[89] अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क मंजूर करण्यात आला.

उत्तरात (जानेवारी 2026) विभागाने नमूद केले की, नियमावलीनुसारच गणना केली गेली आणि विकासकाला विकास आराखडा रस्त्यात अडकलेल्या क्षेत्रासाठी कोणतेही अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क मंजूर केले नव्हते.

उत्तर स्वीकारार्ह नाही कारण, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण नियमावलीच्या विशेष विनियम 13 (2) आणि विशेष विनियम 15 (1) आणि एकत्रित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली,2020 च्या विनियम 11.2.4 मधील तरतुदींच्या एकूण मंजूर चटईक्षेत्र निर्देशांक आणि अनुज्ञेय हस्तांतरणीय विकास हक्क गणनेमध्ये केलेला चुकीचा वापर आणि विकास आराखडा रस्ता पिछेहाटद्वारे भारलेल्या क्षेत्रावर चटईक्षेत्र निर्देशांक लागू करणे यामुळे विकासकाला अतिरिक्त हस्तांतरणीय विकास हक्क मुक्त होऊन

[88] निव्वळ अतिरिक्त मोफत विक्री चटई क्षेत्र निर्देशांक/हस्तांतरणीय विकास हक्क मंजूर 11,157.83 चौरस मीटर x आरआर दर ₹26,450/चौरस मीटर 2021-22 साठी आरआर च्या प्रवेश क्रमांक 30/444 द्वारे = ₹29,51,24,603

[89] 9,952.92 चौरस मीटर + 1,204.91 चौरस मीटर =11,157.83 चौरस मीटर

अनियमित मंजुरी मिळाली ज्यामुळे त्याला अनुक्रमे ₹6.29 कोटी आणि ₹29.51 कोटींचा अदेय लाभ मिळाला. यातील त्रुटी झोपडपट्टी पुनर्वसन योजना आणि हस्तांतरणीय विकास हक्काच्या प्रशासन शासित करणाऱ्या नियामक चौकटींच्या उपयोगितेमधील पद्धतशीर कमतरता दर्शवितात.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

2.9 विकासकाला अदेय लाभ

झोपडपट्टी हद्दीतील शाळेच्या मोकळ्या भूखंडासाठी झोपडपट्टी चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर केल्याच्या परिणामी विकासकाला ₹18.49 कोटीचा अदेय लाभ झाला.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाचे घटक असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत घोषित झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास केला जातो. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची अंमलबजावणी बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, 1991 च्या नियमांनुसार केली जाते. बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या, नियम 33 (10) च्या परिशिष्ट IV मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी नियमन मापदंडांची रूपरेषा दिली आहे.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या, विनियम 33 (10) च्या परिशिष्ट IV आणि विनियम 32 च्या खालील निकषांच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे निष्कर्ष मापदंडीत केले गेले.

- विनियम 32 मध्ये विविध ताबेदारी, ठिकाणे आणि वापर क्षेत्रांसाठी कमाल चटई क्षेत्र निर्देशांक आणि सदनिका घनता निश्चित करण्यात आली आहे.
- कलम 7.7 नुसार राखीव भूखंड आणि लगतच्या बिगर-झोपडपट्टी क्षेत्रांचा पुनर्विकास करण्यास परवानगी देण्यात आली असून, बिगर-झोपडपट्टी चटई क्षेत्र निर्देशांक आजूबाजूच्या क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत मर्यादित ठेवण्यात आला आहे.
- कलम 7.8 अटींच्या अधीन राहून एकाच विकासकाने विकसित केल्यास दोन किंवा अधिक झोपडपट्टी पुनर्वसन योजना एकत्र करण्याची परवानगी देते.
- कलम 8.1 पुनर्निर्मित झोपडपट्ट्यांच्या इमारतींचे विद्यमान क्षेत्रफळ न वाढवता त्यांना संबंधित सुविधा[90] पुरविण्याची अनुमती देते.
- मोकळ्या बिगर-झोपडपट्टी भूखंडाच्या विकासाचे नियमन करणारे परिशिष्ट IV चे कलम 7.7 हे सदर प्रकरणास लागू असून ते कलम 8.1 अंतर्गत सुविधांशी संबंधित सामान्य तरतुदींमुळे अधिलिखित केले जाऊ शकत नाही.

---

[90] कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरण किंवा धर्मादाय न्यासाद्वारे चालविल्या जाणाऱ्या शाळा, दवाखाना व व्यायामशाळा इत्यादिसह बालवाडी, संस्था कार्यालय, धार्मिक वास्तू इ.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अभिलेख्यांच्या छाननीत (जून 2023) असे दिसून आले की, खार (पश्चिम), मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी[91] (योजना I आणि II) कलम 7.8 अन्वये मेसर्स जॉय डेव्हलपर्स यांच्या हितामध्ये सुधारित आशयपत्र जारी करण्यात आले होते (जून 2017). योजना I च्या जागेवर 341.10 चौरस मीटर्स क्षेत्रफळाची एक अकार्यरत खाजगी शाळा[92] अस्तित्वात होती. शाळेच्या वास्तूला विकास आराखड्यातील कोणत्याही आरक्षणाने घेरले नव्हते किंवा झोपडपट्ट्यांचे अतिक्रमणही झाले नव्हते.

सुधारित आशयपत्रानुसार (जून 2017) शाळेच्या भूखंडाला सदर योजनेच्या अनुलग्नक- II[93] मध्ये विद्यमान सुविधा म्हणून सूचीबद्ध केल्याच्या कारणास्तव चटई क्षेत्र निर्देशांक-4 (1364.40[94] चौरस मीटर्स) मंजूर करण्यात आला. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये 341 चौरस मीटर्स इतक्या प्रत्यक्ष क्षेत्रफळाच्या तुलनेत शाळेचे प्रस्तावित क्षेत्रफळ 210 चौरस मीटर्स होते. तथापि, मे 2015 च्या आशयपत्रामध्ये शाळेचा समावेश योजना I मध्ये करण्यात आला होता आणि विनियम 32 अन्वये चटई क्षेत्र निर्देशांक 1 मंजूर करण्यात आला होता. तसेच, सुधारित आशयपत्राच्या टिप्पणीमध्ये (जून 2017) योजनेच्या वास्तुविशारदाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये शाळेचा समावेश करण्याची विनंती केली आणि असे नमूद केले की, याचा अर्थ केवळ झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत विद्यमान शाळेच्या संरचनेचे पुनर्वसन करणे असा आहे.

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की, सदर खासगी शाळेला कोणतेही विकास नियंत्रण आरक्षण देण्यात आले नव्हते किंवा झोपडपट्ट्यांनी अतिक्रमित केलेली नव्हती. त्यामुळे, शाळेच्या पुनर्विकासासाठी कलम 7.7 नुसार झोपडपट्टी नसलेल्या क्षेत्रांच्या चटई क्षेत्र निर्देशांकाच्या आजूबाजूच्या क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत म्हणजेच चटई क्षेत्र निर्देशांक 1 पर्यन्त मर्यादित करणे आवश्यक होते आणि बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली 1991 च्या विनियम 33 (10) अंतर्गत कलम 8.1 अन्वये पुनर्बांधणी केलेल्या झोपडपट्टी इमारतींना त्यांचे विद्यमान क्षेत्र न वाढविता संबंधित सुविधा प्रदान करणे आवश्यक होते. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून चटई क्षेत्र निर्देशांक 1 ची प्राथमिक मंजुरी (मे 2015) योग्य होती आणि त्यानंतर सुधारित आशयपत्रात (जून 2017)

---

[91] 1) नवी शेर्ली माता यशोधरा नगर रहिवासी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित (योजना 1 व 2) नवमाला झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सहकारी गृहनिर्माण संस्थामर्यादित (योजना II) व इतर या वांद्रे गाव, मुंबई उपनगर जिल्हा, खार (प), मुंबई-400052 येथील अनुक्रमे सीटीएस क्रमांक ई/86/10; ई/86/12 व ई/99/ए; ई/99बी या दोन योजना एकत्रित करण्यात आल्या (मे 2015)

[92] खार (प.) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यामंदिर

[93] 341.10 चौरस मीटर्स x 4 = 1364.40 चौरस मीटर्स

[94] अनुलग्नक II: पुनर्विकासापूर्वी अस्तित्वात असलेल्या सोयीसुविधांसह पात्र झोपडपट्टी लाभार्थी आणि संलग्न जमिनीचा तपशील समाविष्ट

शाळेच्या भूखंडासाठी चटई क्षेत्र निर्देशांक 4 मंजूर झाल्याने ₹18.49 कोटीचा[95] 1023.3 चौरस मीटर्स[96] अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर झाला.

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की मोकळ्या बिगर-झोपडपट्टी क्षेत्र असणाऱ्या शाळेच्या भूखंडासाठी कलम 7.8 व 8.1 च्या चुकीच्या वापरामुळेच सुधारित आशयपत्रातील (जून 2017) चटई क्षेत्र निर्देशांक 4 ची नंतर दिलेली मंजुरी उद्भवली, ज्याकरिता परिशिष्ट IV च्या कलम 7.7 अंतर्गत नियमन कटाक्षाने आवश्यक होते, परिणामी अधिक चटई क्षेत्र निर्देशांकाची अनियमित वाढ झाली.

उत्तरात, विभागाने नमूद केले (जून 2025) की पुनर्वसन योजनेकरिता तक्रार निवारण समिती मुंबई उपनगरे, यांनी शाळेची पात्रता (जून 2018) निश्चित केली होती आणि म्हणूनच सक्षम अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या अनुलगनक II मध्ये संपूर्ण क्षेत्र प्रमाणित केले गेले होते. विभागाने पुढे असेही संगितले की, विद्यमान शाळा चटई क्षेत्र निर्देशांक 4 सह पुनर्विकासासाठी कलम 8.1 मध्ये परिभाषित केलेल्या इतर सामाजिक पायाभूत सुविधांप्रमाणेच विद्यमान सुविधा संरचना म्हणून मानली जात होती. म्हणजेच, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने विकासकाला परवानगी असलेल्या मर्यादेपेक्षा अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर केलेला नव्हता.

उत्तर स्वीकारार्ह नाही कारण शाळेचा भूखंड हा झोपडपट्टी नसलेला, कोणत्याही अतिक्रमणापासून किंवा विकास आराखडा आरक्षणापासून मुक्त होता. त्यानुसार, त्याचा पुनर्विकास विनियम 33(10) च्या अनुलगनक IV च्या कलम 7.7 द्वारे पूर्णपणे नियंत्रित केला गेला होता, जो अशा झोपडपट्टी नसलेल्या आजूबाजूच्या भूखंडांच्या चटई क्षेत्र निर्देशांकाच्या क्षेत्रीय मर्यादेपर्यंत मर्यादित करतो. कलम 8.1 अंतर्गत संलग्न सुविधांशी संबंधित सामान्य सक्षम तरतूद कलम 7.7 अंतर्गत विहित केलेल्या विशिष्ट निर्बंधांवर कुरघोडी करण्यासाठी लागू केली जाऊ शकत नाही. त्यामुळे, चटई क्षेत्र निर्देशांक 1 ची प्राथमिक मंजुरी (मे 2015) योग्य होती, तर त्यानंतर सुधारित आशयपत्र (जून 2017) मधील चटई क्षेत्र निर्देशांक 4 ची मंजुरी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक अनियमितपणे वाढविणारे ठरले ज्याच्या परिणामी विकासकाला अदेय लाभ झाला.

[95] चटई क्षेत्र निर्देशांक 3 आणि लागू चटई क्षेत्र निर्देशांक एवढा मोफत विक्री चटई क्षेत्र निर्देशांक म्हणजे 341.10 चौरस मीटर्स x 4 =1364.40 चौरस मीटर्स - 341.10 चौरस मीटर्स =1023.30 चौरस मीटर्स

[96] 1,80,700 (2017 चे वार्षिक दर विवरणपत्र) x 1023.3 = 18,49,10,310

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

2.10 विनावापर पडून राहिलेल्या वैद्यकीय उपकरणांवर निष्क्रिय गुंतवणूक

प्रधानमंत्री आरोग्य सुरक्षा योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन न केल्यामुळे श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, यवतमाळ येथील विनावापर पडून राहिलेल्या वैद्यकीय उपकरणांवर ₹39.08 कोटींची निष्क्रिय गुंतवणूक.

भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने प्रधानमंत्री आरोग्य सुरक्षा योजनेच्या तिसऱ्या टप्प्याअंतर्गत (जानेवारी 2014) महाराष्ट्र राज्यातील श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, यवतमाळचे सुसज्जज्ञ विभाग/ट्रॉमा सेंटर बांधून सुधारणेचे काम हाती घेतले होते, ज्यामध्ये केंद्र शासन आणि राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे ₹120 कोटी आणि ₹30 कोटी होता. मार्गदर्शक तत्वांच्या कलम-II च्या कलम 17 मध्ये असे नमूद केले आहे की, अंमलबजावणी अभिकरण आणि खरेदी सहाय्यक अभिकरण यांना बांधकाम आणि उपकरणांच्या खरेदी दरम्यान समन्वय साधण्यासाठी वैयक्तिकरित्या आणि संयुक्तपणे जबाबदार धरणे आवश्यक आहे जेणेकरून एकीकडे खरेदीमुळे बांधलेल्या मालमत्तेची कार्यक्षमता विलंबित होणार नाही आणि दुसरीकडे खरेदी केलेली मालमत्ता निष्क्रिय राहणार नाही. तसेच, या मार्गदर्शक तत्वांच्या कलम-II च्या कलम 19 मध्ये असे नमूद केले आहे की, राज्य शासन आणि श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांनी सुनिश्चित करावे की आवश्यक पदांची निर्मिती आणि भरती प्रक्रिया बांधकाम आणि खरेदीच्या टप्प्यांशी समक्रमितपणे केली जाईल.

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने जानेवारी 2016 मध्ये केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाला स्थापत्य बांधकाम कार्यासाठी अंमलबजावणी अभिकरण म्हणून आणि वैद्यकीय उपकरणांच्या खरेदीसाठी खरेदी सहाय्यक अभिकरण म्हणून HITES लिमिटेडला (भारत सरकारचा उपक्रम) नियुक्त केले. या प्रकल्पासाठी मंजूर झालेला एकूण निधी ₹150 कोटी होता जो केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग (₹74.36 कोटी) स्थापत्य कामासाठी आणि HITES लिमिटेड (₹75.64 कोटी) वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्यासाठी असा दोघांमध्ये वितरित केला जाणार होता. स्थापत्य बांधकाम आणि वैद्यकीय उपकरणे खरेदीसाठी एकूण उपलब्ध निधी ₹126.39 कोटी होता (केंद्राचा हिस्सा ₹96.39 कोटी आणि राज्याचा हिस्सा ₹30 कोटी). केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाला ₹58.25 कोटी[97] आणि HITES लिमिटेडला ₹68.14 कोटी[98] निधी देण्यात आला.

---

[97] केंद्राचा हिस्सा ₹33.25 कोटी आणि राज्याचा हिस्सा ₹25 कोटी

[98] केंद्राचा हिस्सा ₹63.14 कोटी आणि राज्याचा हिस्सा ₹5 कोटी

केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाने (जानेवारी 2023) श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाला सुसज्ज रुग्णालय सुपूर्द केले, तर खरेदी सहाय्यक अभिकरणाने मार्च 2018 ते एप्रिल 2022 पर्यंत श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाला ₹68.55 कोटी किंमतींची 285 वैद्यकीय उपकरणे पुरवली. नोव्हेंबर 2025 पर्यंत वैद्यकीय उपकरणांची स्थिती खालील **तक्ता 2.23** मध्ये दर्शविली आहे :

तक्ता 2.23 वैद्यकीय उपकरणांची स्थिती

(₹ लाखात)

वितरणाचे वर्ष	पुरवलेली उपकरणे		स्थापित उपकरणे		स्थापित न केलेली उपकरणे		स्थापित आणि वापरात असलेली उपकरणे		स्थापित आणि वापरात नसलेली उपकरणे	
1	2	3	4= (8+10)	5= (9+11)	6= (2-4)	7= (3-5)	8	9	10	11
	प्रमाण	रक्कम	प्रमाण	रक्कम	प्रमाण	रक्कम	प्रमाण	रक्कम	प्रमाण	रक्कम
2018	65	558.31	62	530.58	3	27.73	13	218.59	49	311.99
2019	185	4930.78	172	4616.52	13	314.26	16	1538.05	156	3078.47
2020	34	345.30	27	312.42	7	32.88	3	170.08	24	142.34
2021	0	0	0	0	0	0	0	0	0	0
2022	1	1020.53	1	1020.53	0	0	1	1020.53	0	0
एकूण	**285**	**6854.92**	**262**	**6480.05**	**23**	**374.87**	**33**	**2947.25**	**229**	**3532.80**

स्त्रोत: अधिष्ठाता, श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ यांनी पुरविलेली माहिती

लेखापरीक्षणात खालील गोष्टी निदर्शनास आल्या (मार्च 2023) :-

- स्थापित 262 वैद्यकीय उपकरणांपैकी फक्त 33 वैद्यकीय उपकरणे वापरात आणण्यात आली आणि उर्वरित 229 वैद्यकीय उपकरणे ज्यांची किंमत ₹35.33 कोटी होती, ती आवश्यक मनुष्यबळाची म्हणजेच डॉक्टर/निम-वैद्यकीय/रुग्णालय सहाय्यक कर्मचाऱ्यांची भरती न झाल्यामुळे वापरात आणण्यात आली नव्हती.
- शिवाय, 285 वैद्यकीय उपकरणांपैकी 262 वैद्यकीय उपकरणे स्थापित करण्यात आली आणि मार्च 2018 ते ऑक्टोबर 2020 दरम्यान वितरित केलेली उर्वरित 23 उपकरणे ज्यांची किंमत ₹3.75 कोटी होती ती स्थापित करण्यात आली नव्हती (नोव्हेंबर 2025) आणि रुग्णालयाच्या आवारातच पडून होती. स्थापनेसाठी सल्लागार विद्वानांची उपलब्धता नसल्याने ही वैद्यकीय उपकरणे स्थापित करावयाची राहिली होती. शिवाय, विस्थापित 23 उपकरणांपैकी ₹3.42 कोटी किमतींच्या 16 वैद्यकीय उपकरणांचा आश्वासित कालावधी स्थापनेपूर्वीच संपला.

यवतमाळ येथील सुसज्ज रुग्णालयाच्या कामकाजासाठी 760 नवीन पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांनी (जुलै 2017) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडे पाठविला होता. महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषध विभागाने पहिल्या टप्प्यात यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात सुसज्ज रुग्णालयासाठी 223[99] पदे निर्माण करण्यास (जानेवारी 2021) मान्यता दिली. मात्र, सप्टेंबर 2024 पर्यंत 223 पदांपैकी केवळ 57 नियमित पदे[100] भरण्यात आली असून उर्वरित 166 पदे अद्याप रिक्त आहेत.

अधिष्ठाता, श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांनी नमूद केले (मार्च 2023) की, मनुष्यबळाच्या अनुपलब्धतेमुळे उपकरणे स्थापित करण्यात आली नव्हती आणि वापरात आणली गेली नव्हती. आवश्यक कर्मचाऱ्यांची भरती शासन स्तरावर प्रलंबित असल्याचेही सांगण्यात आले.

या उत्तरामुळे प्रधानमंत्री आरोग्य सुरक्षा योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या कलम 17 आणि 19 च्या अटींचे पालन न केल्यामुळे यवतमाळ येथील सुसज्ज रुग्णालयामध्ये उपकरणांच्या खरेदीमध्ये सात वर्षांहून अधिक काळ ₹39.08 कोटींच्या[101] 252 वैद्यकीय उपकरणांची गुंतवणूक निष्क्रिय राहिली, हा लेखापरीक्षणातील मुद्दा अधिक स्पष्ट होतो. शिवाय, 57 पदांची नियुक्ती झाल्यानंतरही (मंजूर 223 पदांपैकी), 229 संबंधित स्थापित वैद्यकीय उपकरणे वापरात आणली गेली नाहीत. शिवाय, आवश्यक असलेल्या 760 पदांच्या नियुक्तीसाठी अधिष्ठाता, श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, यवतमाळ यांनी पाठपुरावा केला नाही. त्यामुळे, गेल्या काही वर्षांत, इच्छित लाभार्थी वैद्यकीय सुविधांपासून वंचित राहिले.

हे प्रकरण शासनाकडे संदर्भित करण्यात (फेब्रुवारी 2025) आले आणि त्यानंतर स्मरणपत्रे जुलै 2025 आणि ऑक्टोबर 2025 जारी करण्यात आली; उत्तर प्रतिक्षित आहे.

---

[99] वर्ग अ : 09 पदे, वर्ग ब: 10 पदे, वर्ग क (नियमित) : 97 पदे, वर्ग क (बाह्यस्त्रोत) : 07 पदे, वर्ग ड (बाह्यस्त्रोत) : 86 पदे, वरिष्ठ निवासी-1 : 05 पदे, वरिष्ठ निवासी-2 : 05 पदे, वरिष्ठ निवासी-3 : 04 पदे

[100] वर्ग अ: 03 पदे, वर्ग ब : 07 पदे, वर्ग क (नियमित): 47 पदे,

[101] 229 वैद्यकीय उपकरणे स्थापित केली पण वापरात आणली नाही (₹35.33 कोटी) आणि 23 वैद्यकीय उपकरणे स्थापित करण्यात आली नाही (किंमत ₹3.75 कोटी)

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

2.11 कायदेशीर आदेशाशिवाय साखर कारखान्यांकडून वसुली

स्वीय प्रपंजी लेखे उघडण्यासाठी आणि चालवण्यासाठी विहित कोषागार प्रक्रियांचे पालन न करणे आणि वित्तीय नियमांचे अपुरे नियंत्रण आणि अंमलबजावणी यामुळे एकत्रित निधी/लोक लेख्याबाहेर ₹26.35 कोटींची जमा सतत ठेवली गेली, ज्यामुळे कायदेशीर देखरेख आणि अर्थसंकल्पीय नियंत्रण कमकुवत झाले. परिणामी, निधीचा अनियमित वापर झाला आणि टाळता येण्याजोगा आर्थिक खर्च झाला.

भारतीय संविधानाच्या कलम 265 नुसार, कायद्याच्या अधिकाराशिवाय कोणताही कर आकारला किंवा वसूल केला जाणार नाही. भारतीय संविधानाच्या कलम 266(1) नुसार, राज्य शासनाला मिळणाऱ्या सर्व महसुलाने, "राज्याचा एकत्रित निधी" म्हणून ओळखला जाणारा एक एकत्रित निधी तयार केला जातो.शिवाय, कलम 266(2) मध्ये असे नमूद केले आहे की राज्य शासनाकडून किंवा त्यांच्या वतीने प्राप्त होणारे इतर सर्व सार्वजनिक निधी राज्याच्या लोकलेख्यात जमा केले जातात.

याव्यतिरिक्त, महाराष्ट्र कोषागार अधिनियम, 1968 च्या नियम 494 आणि मुंबई वित्तीय अधिनियम 1959 च्या नियम 12 मध्ये असे नमूद केले आहे की, राज्याच्या महालेखापालांशी सल्लामसलत करून शासनाच्या मंजुरीच्या आधारे विशिष्ट हेतूसाठी कोषागार अधिकाऱ्यांकडे वैयक्तिक खाते सुरू केले जाणे आवश्यक आहे. महाराष्ट्र कोषागार अधिनियमाच्या नियम 8 नुसार, प्राप्त महसूल खर्चासाठी वापरला जाऊ नये आणि निधी मिळाल्यानंतर दोन दिवसांच्या आत शासकीय खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

ऊस (नियंत्रण) आदेश 1966 अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून विभागाने जारी केलेल्या महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण आणि गाळप व ऊस पुरवठा नियमन)आदेश 1984(2012 मध्ये सुधारित) मध्ये ऊस गाळप करण्यासाठी साखर कारखान्यांकडून आकारले जाणारे परवाना शुल्क निर्दिष्ट केले.

सहकार व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन (विभाग) यांनी शासन निर्णयाद्वारे (6 जानेवारी 1999) पुणे येथे 'साखर संकुल'[102] बांधकामास मान्यता दिली. वित्त विभागाच्या मान्यतेने[103] जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार साखर कारखान्यांकडून गाळप करण्यासाठी प्रति मेट्रिक टन उसासाठी ₹ एक वसूल करून साखर संकुलाच्या बांधकाम व देखभालीवरील खर्च भागवायचा होता. या शासन निर्णयाने साखर आयुक्तांना वैयक्तिक खाते ठेवण्याची परवानगी दिली होती. महाराष्ट्र शासनाने

---

102 प्रशासकीय कार्यालये आणि साखर आयुक्तांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने असलेले एक संकुल

103 8 डिसेंबर 1998 च्या अनौपचारिक संदर्भाद्वारे मान्यता देण्यात आली.

दिलेल्या मंजुरीच्या आधारे महालेखापाल (लेखे व अनुज्ञेयता)-1 मुंबई कार्यालयाने (एप्रिल 1999) वैयक्तिक खाते ठेवण्याच्या प्रस्तावास सहमती दर्शविली.

लेखापरीक्षणात (एप्रिल 2024) निदर्शनास आले ,6 जानेवारी 1999 च्या शासन निर्णयान्वये साखर कारखान्यांकडून गाळपासाठी ₹ एक प्रति मेट्रिक टन उस इतकी वसुली कोणत्याही कायदेशीर आदेशाशिवाय करण्यात आली.

तसेच, शासन निर्णयामध्ये वसुलीचा कर्तव्य कालावधी किंवा वसुलीचे स्वरूप, *म्हणजेच* शुल्क, कर किंवा जकात विनिर्दिष्ट केले नाही. अशा प्रकारे, साखर कारखान्यांकडून केलेली वसुली वरील महाराष्ट्र साखर कारखाना (क्षेत्र आरक्षण आणि गाळप व ऊस पुरवठा नियमन) आदेश, 1984 च्या नुसार अवैध होती. साखर कारखान्यांकडून वसुली करण्याचा उद्देश कार्यालयीन इमारतीच्या बांधकाम आणि देखभालीवर खर्च करणे हा होता. अशा प्रकारे ही वसुली महसुली स्वरूपाची होती. तथापि, भारतीय राज्यघटनेच्या कलम 266 (1) आणि 266 (2) मधील तरतुदींचे उल्लंघन करून, ही वसुली जमा करण्यासाठी वैयक्तिक खात्यास मंजुरी देण्यात आली.

शासन निर्णय आणि विभागाच्या पत्रात (मे 2003) सूचना देऊनही साखर आयुक्तांनी वैयक्तिक खाते उघडले नाही, जे महाराष्ट्र कोषागार अधिनियम, 1968 आणि मुंबई वित्तीय अधिनियम 1959चे उल्लंघन होते. तथापि, साखर आयुक्तांनी कोषागारात वैयक्तिक खाते उघडण्याऐवजी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत बचत खाते उघडले आणि या खात्याला वैयक्तिक खाते म्हणून मान्यता देण्याची परवानगी मागितली (जुलै 2002). विभागाने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत वैयक्तिक खाते उघडण्याची परवानगी नाकारली (मे 2003)आणि साखर आयुक्तांना ज्या बँकांमध्ये कोषागाराचे कार्य केले जाते त्या बँकांमध्ये म्हणजेच भारतीय रिझर्व्ह बँक किंवा भारतीय स्टेट बँक मध्ये वैयक्तिक खाते उघडण्याचे निर्देश दिले. साखर आयुक्तांनी भारतीय स्टेट बँक मध्ये आणखी एक खाते उघडले आणि भारतीय स्टेट बँकेमधील खात्याला वैयक्तिक खाते म्हणून मान्यता देण्यासाठी विभागाकडे परवानगी मागितली (जून 2017).अशा प्रकारे, 21 वर्षांहून[104] अधिक काळ उलटल्यानंतरही, साखर आयुक्तांनी निर्देशांचे पालन केले नाही आणि बचत/चालू बँक खात्यात निधी ठेवणे सुरू ठेवले. मार्च 2023 अखेरीस, या खात्यांमधील अखेरची बँक शिल्लक ₹2.95 कोटी होती.

साखर आयुक्तांनी संकलित केलेला निधी आणि या निधीतून केलेल्या खर्चाचा हिशेब ठेवण्यासाठी 'साखर संकुल-वटणावळ निधी'नावाचे ताळेबंद आणि जमा व खर्च लेखे ही ठेवले होते. मार्च 2023 पर्यंत भांडवली राखीव आणि अधिशेष निधीतील शिल्लक ₹28.28 कोटी होती तर गुंतवणूक (बँक मुदत ठेवीच्या स्वरूपात) ₹24.47 कोटी होती.

2018-19 ते 2022-23 या कालावधीसाठी 'साखर संकुल- वटणावळ निधी' च्या पुढील तपासणीत असे आढळून आले की साखर कारखान्यांकडून ₹26.35 कोटी वसूल करण्यात आले आणि बचत/चालू खात्यात जमा केले गेले आणि ते शासकीय खात्याच्या भरले

[104] एप्रिल 2003 पासून मार्च 2024 पर्यंत

गेले नाही, हे अत्यंत अनियमित आहे आणि भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 266 (1) आणि 266 (2) चे उल्लंघन करते.

2018-19 ते 2022-23 या कालावधीत, लेखापरीक्षणात निदर्शनास आले की साखर संकुल निधीतून छपाई, लेखनसामग्री, वेतन, कार्यालयीन खर्च, वाहन इंधन आणि विमा यासारख्या वस्तूंवर ₹1.86 कोटी खर्च करण्यात आले, जे साखर संकुलाच्या बांधकाम आणि देखभालीशी संबंधित नव्हते. तसेच, अधिकृत वैयक्तिक खाते म्हणून निधी न ठेवल्यामुळे खात्यांची देखभाल आणि लेखापरीक्षण आणि प्राप्तिकर भरण्यासाठी व्यावसायिक शुल्कावर ₹2.44 कोटी टाळता येण्याजोगे खर्च झाले. महाराष्ट्र कोषागार नियमांचे उल्लंघन करून भाडे उत्पन्न, भंगार विक्री, पुस्तकांची विक्री आणि निविदा शुल्क असे शासकीय महसूल शासकीय खात्यात जमा करण्याऐवजी चुकीच्या पद्धतीने या निधीत जमा करण्यात आल्याचेही लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले.

कर आकारणीसाठी वैधानिक पाठबळ नसणे, साखर संकुल प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वसुली यंत्रणेचे नियमितीकरण न करणे आणि वैयक्तिक खाते ठेवण्यासाठी आणि परिचालनासाठी विहित कोषागार प्रक्रियेचे पालन न करणे या सर्वांमुळे वरील अनियमितता अपुरे संनियंत्रण आणि वित्तीय नियमांच्या अंमलबजावणीमुळे एकत्रित निधी/सार्वजनिक खात्याच्या बाहेर ₹26.35 कोटीची जमा कायम ठेवता आली, ज्यामुळे वैधानिक पर्यवेक्षण आणि अर्थसंकल्पीय नियंत्रण सौम्य झाले आणि परिणामी निधीचा अनियमित वापर आणि टाळता येण्याजोगा आर्थिक व्यय झाला.

उत्तरादाखल (सप्टेंबर 2025) साखर आयुक्तांनी नमूद केले की शासनाने शासन निर्णयाद्वारे (जानेवारी 1999) साखर आयुक्तांना वैयक्तिक खाते ठेवण्यास अधिकृत केले. तत्कालीन साखर आयुक्तांनी वैयक्तिक खाते ठेवण्यासाठी महालेखापाल कार्यालयाची परवानगी आवश्यक नसल्याचे आदेश दिले आणि पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत (पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी) ठेवलेले खाते वैयक्तिक खाते म्हणून मंजूर करण्याची विनंती केली (एप्रिल 2003). तथापि, महाराष्ट्र शासनाने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत वैयक्तिक खाते ठेवण्याची परवानगी नाकारली (मे 2003) आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया किंवा स्टेट बँक ऑफ इंडियामधील कोषागार परिचालन बँकांमध्ये वैयक्तिक खाते ठेवण्याचे निर्देश दिले.

साखर आयुक्तांनी असेही नमूद केले की, साखर संकुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे आणि प्रति मेट्रिक टन ऊस एक (ऑगस्ट 2022 मध्ये सुधारित तीन) दराने संकलनातून प्राप्त झालेली जमा पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि भारतीय स्टेट बँकेत ठेवलेल्या खात्यांमध्ये जमा केली गेली असून कार्यालयीन खर्च, संकुलाची दुरुस्ती/देखभाल यांसारखे खर्च या खात्यांमधून पूर्ण केले गेले. साखर आयुक्तांनी विभागाला विनंती केली (जून 2017) की भारतीय स्टेट बँकेत ठेवलेले खाते वैयक्तिक खाते म्हणून मंजूर करावे. मात्र, विभागाकडून कोणतीही मान्यता मिळालेली नाही.

साखर आयुक्तांचे उत्तर वस्तुस्थितीस धरून होते.अशाप्रकारे, साखर संकुलाच्या बांधकामासाठी साखर कारखान्यांकडून ₹26.35 कोटींची वसूली कायदेशीर आदेशाशिवाय

झाली आणि शासनाच्या निर्देशांना न जुमानता निधी शासकीय खात्याबाहेर ठेवल्यामुळे कायदेशीर तपासणी आणि नियंत्रणातून सुटली. शासन आणि साखर आयुक्तांच्या या कृतीने भारतीय राज्यघटना, महाराष्ट्र साखर कारखाना (क्षेत्र आरक्षण आणि गाळप व ऊस पुरवठा नियमन)आदेश, महाराष्ट्र कोषागार अधिनियम, 1968 आणि मुंबई वित्तीय अधिनियम, 1959च्या विविध तरतुदींचे उल्लंघन केले आणि त्यामुळे ते असंवैधानिक होते आणि कायद्याद्वारे समर्थित नव्हते.

हे प्रकरण शासनाला संदर्भित करण्यात आले (एप्रिल 2025), तसेच जुलै 2025 आणि ऑक्टोबर 2025 मध्ये स्मरणपत्रे पाठविण्यात आली; उत्तर प्रतिक्षित आहे.

मराठी भाषा विभाग

2.12 मराठी भाषा भवनाच्या उपकेंद्राच्या बांधकामास विलंब

प्रकल्प नियोजनातील त्रुटी, जागेच्या निवडीमधील अपुरी सतर्कता, निविदा प्रक्रियेपूर्वी आराखडा अंतिम न करणे आणि कंत्राट व्यवस्थापनातील त्रुटी यामुळे मराठी भाषा भवनाच्या उपकेंद्राच्या बांधकामास विलंब झाल्याने ₹15.90 कोटींचा निधी अवरोधित झाला.

महाराष्ट्र शासनाने मराठी भाषेचा विकास आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने 2011 मध्ये स्वतंत्र मराठी भाषा विभाग स्थापन केला. महाराष्ट्र शासनाने मराठी भाषा संशोधन विकास व सांस्कृतिक केंद्राची स्थापना करण्यास शासन निर्णयाद्वारे (ऑगस्ट 2013) मान्यता दिली, ज्यात धोबी तलावाजवळील रंग भवनच्या खुल्या प्रेक्षागृहामध्ये मराठी भाषा भवन आणि त्याच्या अखत्यारीतील कार्यालये[105] बांधण्याचा समावेश होता. परंतु, निवडलेले वारसा स्थळ वारसा समितीने खुल्या प्रेक्षागृहासाठी वापरण्याचे सुचविल्यामुळे नजिकच्या भविष्य काळात बांधकाम करणे शक्य नाही असे शासनाच्या ध्यानात आले(जून 2016).

तथापि, वारसा समितीने निवडलेले स्थळ हे वारसा स्थळ असून या ठिकाणी मराठी भाषा संशोधन विकास व सांस्कृतिक केंद्राचे बांधकाम होऊ शकत नाही असा निषेध नोंदविला म्हणून फेब्रुवारी, 2018 मध्ये हा निर्णय रद्द करण्यात आला.

दरम्यान, मराठी भाषेचा विकास आणि संवर्धनासाठी विविध कार्यक्रम/संशोधन/प्रकल्पांची तातडीची गरज लक्षात घेता, मराठी भाषा विभागाने शहर व औद्योगिक विकास महामंडळाला मराठी भाषा विभागाच्या उपकेंद्राच्या[106] बांधकामासाठी भूखंड देण्याची विनंती केली (जून 2016). शहर व औद्योगिक विकास महामंडळाने ऐरोली येथील सेक्टर 13 मधील 2000 चौरस मीटर क्षमतेचा भूखंड क्रमांक 6 ए हा मराठी भाषा

[105] महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ आणि महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ यांचे कार्यालय पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे भाड्याने सुरू आहे.

[106] मराठी भाषा भवनाचे उपकेंद्र हे महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ आणि महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे कार्यालय असेल

विभागाला 60 वर्षांसाठी दीर्घकालीन भाडेतत्वावर देण्यास क्रमांक 11724 द्वारे मंजूरी दिली (सप्टेंबर 2016).

धोबी तलावाजवळील रंग भवनाच्या खुल्या प्रेक्षागृहामध्ये मराठी भाषा संशोधन विकास व सांस्कृतिक केंद्र स्थापन करण्याचा निर्णय मंत्री मंडळाने घेतल्याने, पर्यायी जागेवर (म्हणजे ऐरोली) येथे उपकेंद्राच्या बांधकामाचा प्रस्ताव मंत्री मंडळाकडे पाठविण्यात (फेब्रुवारी 2018) आला होता. मंत्री मंडळाने फेब्रुवारी 2018 मध्ये या प्रस्तावाला मान्यता दिली.

शहर व औद्योगिक विकास महामंडळाने ऐरोली येथील दिलेला भूखंड ताब्यात घेण्यासाठी व त्यावर उपकेंद्राचे बांधकाम करण्यास विभागाने प्रशासकीय मंजुरी दिली (मार्च 2018). शहर व औद्योगिक विकास महामंडळाने एप्रिल 2018 मध्ये मराठी भाषा विभागाला भूखंड वितरित केला आणि त्यानंतर मे 2018 मध्ये शहर व औद्योगिक विकास महामंडळाला ₹3.64 कोटीचा प्रारंभीचा भाडेपट्टीचा हप्ता देण्यात आला.

मराठी भाषा भवन उपकेंद्राच्या बांधकाम आराखड्याला अंतिम मान्यता देत असताना (जुलै 2018) शहर व औद्योगिक विकास महामंडळाने मराठी भाषा विभागाला सूचित केले की, भूखंड 6 आणि 6 ए किनारपट्टी नियमन क्षेत्र II (शहरी) श्रेणी आणि 2011 च्या किनारपट्टी नियमन क्षेत्र अधिसूचनेनुसार खारफुटीच्या 50 मीटर नियंत्रण क्षेत्रामध्ये आहेत. परिणामी, सुमारे 1000 मीटर भूखंडावर परिणाम झाला ज्यामध्ये कोणत्याही विकासास परवानगी दिली नव्हती.

किनारपट्टी नियमन क्षेत्र II निर्बंधांमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी, शहर व औद्योगिक विकास महामंडळाने विभागाला उर्वरित भूखंडात बाधित भागाचा चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्याची परवानगी दिली. शहर व औद्योगिक विकास महामंडळाने पुढे 1018 चौरस मीटरचा भूखंड मराठी भाषा विभागाला ₹2.26 कोटी अतिरिक्त भाडेपट्टीसह देवू केला. विभागाने शहर व औद्योगिक विकास महामंडळाच्या अतिरिक्त भूखंडाच्या प्रस्तावाला मान्यता (सप्टेंबर 2019) दिली आणि प्रदान मंजूर केले. अशा प्रकारे, शहर व औद्योगिक विकास महामंडळाला चटई क्षेत्र निर्देशांक एकसह 60 वर्षांसाठी 3018 चौरस मीटर जमिनीच्या भाडेपट्टी रकमेसाठी एकूण ₹5.90 कोटी[107] देण्यात आले. जुलै 2021 मध्ये, मराठी भाषा विभागाने शहर व औद्योगिक विकास महामंडळाबरोबर कायदेशीर भाडेपट्टी करार केला आणि भूखंड ताब्यात घेतला.

फेब्रुवारी 2022 मध्ये, सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, नवी मुंबई महानगरपालिका यांनी मराठी भाषा भवन उपकेंद्राच्या बांधकामाच्या खालील गोष्टींना तांत्रिक मंजुरी दिली. बांधकाम सुरू करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला मार्च 2022 मध्ये दोन हप्त्यांमध्ये ₹10 कोटी अग्रिम देण्यात आले होते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कार्यादेश जारी केला होता (ऑगस्ट 2022) आणि मराठी भाषा भवनाच्या इमारतीचे काम पूर्ण करण्याचा कालावधी 24 महिन्यांचा

[107] भाडेपट्टीची रक्कम ₹3.64 कोटी अधिक भाडेपट्टीची रक्कम ₹2.26 कोटी.

होता. तथापि, विभाग मंत्रालयाच्या निर्देशांमुळे आरेखनात बदल (नोव्हेंबर 2022 आणि जानेवारी 2023) करण्यात आले आणि यथावकाश सुधारित आरेखन मंत्र्यांना दाखविण्यात आले (मे 2024). कालांतराने, नवी मुंबई महानगरपालिकेने सुधारित आरेखनाला मंजूरी (ऑक्टोबर 2024) दिली.

लेखापरीक्षणामध्ये असे निदर्शनास आले (एप्रिल 2025) की कार्यादेश जारी केल्याच्या तारखेपासून दोन वर्षांनंतरही ऑक्टोबर 2024 मध्ये इमारतीच्या आरेखनाला मान्यता मिळाल्यामुळे ऐरोली येथील मराठी भाषा भवन उपकेंद्राचे बांधकाम सुरू होऊ शकले नाही. शिवाय, ऑगस्ट, 2024 मध्ये कंत्राटदार यांच्या कराराचा कालावधी संपला असल्या कारणामुळे कंत्राटदाराने देखील काम सुरू करण्यास नकार (मार्च 2025) दिला होता म्हणूनच, मराठी भाषा विभागाने इमारतीच्या आरेखनामधील सतत होणारे बदल आणि झालेला विलंब यामुळे सुधारित प्रशासकीय मंजुरी आणि पुन्हा निविदा प्रक्रियेची माहिती दिली.

लेखापरीक्षणाने खालील निष्कर्ष काढले:

- मराठी भाषा भवनाचे बांधकाम ज्यामध्ये मराठी भाषा संशोधन विकास व सांस्कृतिक केंद्राच्या स्थापनेस शासनाने ऑगस्ट 2013 मध्ये मान्यता दिली. जागा बदलणे, जागेचा ताबा मिळण्यास विलंब, भूखंडावरील किनारपट्टी नियमन क्षेत्र निर्बंध आणि इमारतीच्या रचनेत सातत्याने अनेक वेळा बदल करणे अशा अनेक कारणांमुळे 13 वर्षे उलटून गेल्यानंतरही ऐरोली येथील पर्यायी जागेवर बांधकाम सुरू होऊ शकले नाही.
- मार्च 2022 मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला ₹10 कोटी अग्रिम रक्कम प्रदान करण्यात आली होती, परंतु एप्रिल 2025 पर्यंत सुरू न झालेले बांधकाम अकार्यक्षम आर्थिक नियोजन आणि निष्क्रिय निधी अवरोधित होण्याचा संभाव्य धोका दर्शविते.
- उपकेंद्राचे काम पूर्ण न झाल्यामुळे स्थलांतरणासाठी प्रस्तावित असलेली दोन कार्यालये भाड्याच्या जागेत अजूनही कार्यरत आहेत. यामुळे शासनाला प्रतिवर्ष ₹30.82 लाखांचा[108] अतिरिक्त भार पडत आहे.
- दीर्घ विलंब महागाई, सामग्रीच्या किंमतीतील वाढीमुळे खर्च वाढण्याचा धोका वाढतो. या प्रदीर्घ दिरंगाईमुळे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी विचारित संशोधन, विकास आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत अडथळा निर्माण झाला असून मराठी भाषा विभागाचे मूळ उद्दिष्ट अपुरे पडले आहे. तसेच, एकूण ₹15.90 कोटी (₹5.90 कोटी भाडेपट्टी हप्ता आणि ₹10 कोटी बांधकाम अग्रिम) अवरोधित केले गेले आहेत, जे खराब/सुमार वित्तीय कार्यक्षमता आणि निधीचा अकार्यक्षम वापर दर्शवितात.

---

[108] महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या कार्यालयाचे भाडे = ₹1,53,427/- प्रति महिना महाराष्ट्र राज्य विश्वकोश उत्पादन मंडळाच्या कार्यालयाचे भाडे = ₹1,03,444/- दरमहा दोन्ही कार्यालयांचे एकूण वार्षिक भाडे = (12*₹1,53,427) + (12* ₹103,444) = ₹30,82,452/-

विभागाचे उत्तर स्वीकारार्ह नाही कारण, वस्तुस्थिती अशी आहे की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ऑगस्ट 2022 मध्ये कार्यादेश जारी केला होता. मात्र, इमारतीच्या रचनेचे आरेखन निश्चित न झाल्याने उपकेंद्राचे बांधकाम सुरू होण्यास विलंब झाला. यामुळे मराठी भाषा भवन उपकेंद्राचे मूळ उद्दिष्ट विफल ठरले.

मराठी भाषा भवन उपकेंद्राच्या बांधकामास विलंब होणे हे प्रामुख्याने प्रकल्प नियोजन, आराखडा 'व्यवस्थापन आणि कंत्राट प्रशासनातील त्रुटींमुळे असल्याचे लेखापरीक्षण विश्लेषणावरून दिसून येते. विभागाने वैधानिक निर्बंधांबाबत पुरेशी काळजी न घेता महाराष्ट्र शहर आणि औद्योगिक विकास महामंडळाद्वारे वाटप केलेला भूखंड स्वीकृतीकडे वाटचाल केली, परिणामी चटई क्षेत्र निर्देशांक मर्यादा आणि अतिरिक्त जमीन अधिग्रहणाची आवश्यकता लक्षात आली.

त्याशिवाय, इमारतीच्या आराखड्याला अंतिम स्वरूप न देता कार्यादेश जारी करण्यात आला, ज्यामुळे कराराचा कालावधी सुरू झाल्यानंतरही आराखड्यात वारंवार बदल करावे लागले. याव्यतिरिक्त, काम सुरू न करता कराराचा कालावधी निघून जाऊ देण्यात आला, जो कमकुवत कंत्राट व्यवस्थापन आणि अपुरे संनियंत्रण दर्शवितो. या त्रुटींमुळे प्रकल्पाची तयारी आणि अंमलबजावणी अपूर्ण असल्याचे दिसून येते.

ऑगस्ट 2013 मध्ये या प्रकल्पाला मंजुरी देऊनही प्रकल्प नियोजनातील त्रुटी, जागा निवडीमध्ये अपुरे परिश्रम, निविदापूर्वी आराखडा अंतिम न करणे आणि कंत्राट व्यवस्थापनातील त्रुटी यामुळे मराठी भाषा भवन उपकेंद्राचे बांधकाम 13 वर्षांनंतरही सुरू झाले नव्हते. प्रदीर्घ विलंबामुळे कोणतेही उत्पादन न मिळाले ₹15.90 कोटी रोखण्यात आले, भाड्याच्या जागेवर सतत खर्च करावा लागला आणि खर्चात वाढ होण्याचा धोका वाढला आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आयोजित करण्यात आलेल्या संशोधन, विकास आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीतही या दिरंगाईमुळे अडथळा निर्माण झाला असून मराठी भाषा विभाग स्थापन करण्याचे मूळ उद्दिष्ट विफल ठरले.

उत्तरादाखल विभागाने नमूद केले (जुलै 2025) की, कार्यालयीन प्रक्रिया आणि सक्षम प्राधिकाऱ्यांकडून किनारपट्टी नियमन क्षेत्र निर्बंधांमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई म्हणून अतिरिक्त भूखंडाचे वाटप, आरेखनात अनेक वेळा केलेले बदल इत्यादींमुळे विलंब झाला.

विभागाचे उत्तर स्वीकारार्ह नाही. विभागाने कार्यालयीन कार्यपद्धती आणि सक्षम अधिकाऱ्यांच्या निर्णयांना विलंब झाल्याचे सांगितले असले तरी, वैधानिक व्यवहार्यता मूल्यांकनाच्या अनुपस्थितीचे पुरेसे स्पष्टीकरण ते देत नाहीत. कार्यस्थळ स्वीकारण्यापूर्वी, इमारतीच्या आराखड्याला अंतिम रूप देण्यास विलंब निविदा आणि ज्या पद्धतीने करार प्रशासित केला गेला. अंतिम आराखड्यांशिवाय ऑगस्ट 2022 मध्ये कार्यादेश जारी करण्यात आला आणि त्यानंतर आराखड्यामध्ये वारंवार बदल सुरू करण्यात आले, परिणामी काम सुरू झाले नाही. तसेच, कामाची जुळवाजुळव न करता कराराचा कालावधी ऑगस्ट 2024 मध्ये संपला. हे प्रकल्प तयार करणे आणि कंत्राट

प्रशासनातील कमकुवतपणा दर्शवते. म्हणूनच, विभागाच्या नियंत्रणातील प्रशासकीय त्रुटींमुळे विलंब झाला आहे

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

2.13 नव्याने बांधण्यात आलेल्या गोदामांचा वापर न होणे

गोदामांचे बांधकाम सुरू असताना अंदाजपत्रक स्तरावर संरक्षक भिंती, पोहोच रस्ते यांसारख्या आवश्यक पायाभूत सुविधांसाठी तरतुदी समाविष्ट न केल्यामुळे सुविधा अपूर्ण राहून ₹5.98 कोटी किंमतीच्या गोदामांचा वापर झाला नाही.

लाभार्थ्यांसाठी अन्न सुरक्षा आणि लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणालीचे (टीपीडीएस) कार्यक्षम संचालन सुनिश्चित करण्यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, जुलै 2013 मध्ये लागू केला. या कायद्याच्या कलम 24(5) नुसार राज्य शासनाने राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावर शास्त्रोक्त साठवण सुविधा निर्माण करणे आणि त्यांची देखभाल करणे आवश्यक होते. लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली आणि इतर अन्नआधारित कल्याणकारी योजनांअंतर्गत लागणारे अन्नधान्य सामावून घेण्यासाठी या सुविधा पुरेशा असणे आवश्यक होते.

तत्पूर्वी, ऑगस्ट 2012 मध्ये ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीचा लाभ घेऊन राज्यभरात अन्नधान्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी तीन महिन्यांच्या लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली वाटपाचा साठा करण्यासाठी पुरेशी मध्यवर्ती साठवणूक सुविधा उभारण्याचा सल्ला केंद्र सरकारने महाराष्ट्र शासनाला दिला होता.

ठाणे आणि धुळे या दोन जिल्ह्यांचे अनुक्रमे लेखापरीक्षण करण्यात आले (सप्टेंबर 2022 आणि फेब्रुवारी 2023). लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली प्रणालीसाठी जिल्हानिहाय आवश्यक साठवण क्षमता आणि त्याबरोबर उपलब्ध क्षमता खालील **तक्ता 2.24** मध्ये दर्शविली आहे:

तक्ता 2.24 डिसेंबर 2022 अखेरीस साठवण क्षमतेची गरज व तूट.

जिल्हा	मासिक वाटप मेट्रिक टनामध्ये	आवश्यक साठवण क्षमता (मेट्रिक टन) (3 x रकाना 2)	उपलब्ध क्षमता (मेट्रिक टन)	साठवण क्षमतेतील तूट (मेट्रिक टन)	तुटीची टक्केवारी (रकाना 5 x 100/रकाना 3)
1	2	3	4	5 = (3-4)	6
ठाणे	4,372	13,116	7,500	5,616	42.82
धुळे	8,416	25,248	13,400	11,848	46.93
एकूण	**12,788**	**38,364**	**20,900**	**17,464**	**45.52**

स्त्रोत: जिल्हा पुरवठा कार्यालयांनी सादर केलेली माहिती

तक्ता 2.24 मध्ये दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने ठाणे (एक) आणि धुळे (तीन) येथे अनुक्रमे चार गोदामांच्या बांधकामासाठी ₹6.14 कोटीची[109] प्रशासकीय मंजुरी (नोव्हेंबर 2012 आणि जानेवारी 2013) दिली. या मंजुरीमध्ये सुरुवातीला संरक्षक भिंती, अंतर्गत रस्ते इत्यादींच्या बांधकामासाठी ढोबळ अंदाज तयार करण्यात आले असल्याचे शासनाने नमूद केले आणि तसेच संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना निर्देश देण्यात आले होते की, कार्यादेश देण्यापूर्वी सविस्तर अंदाज तयार करणे आवश्यक आहे. विलंब आणि अतिरिक्त खर्च टाळण्याच्या सूचनांसह या चारही गोदामांचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपविण्यात आले होते. ठाणे आणि धुळे येथे बांधण्यात आलेल्या गोदामांचे तपशील खालील **तक्ता 2.25** मध्ये दिले आहेत:

तक्ता 2.25: बांधलेल्या गोदामांचे तपशील

गोदामाचे ठिकाण (जिल्हा)	प्रशासकीय मंजुरीचा महिना (कार्यादेशाची तारीख)	गोदामाचे बांधकाम पूर्ण होण्याची निर्धारित तारीख	गोदामांची संख्या/क्षमता (मेट्रिक टनात)	पूर्ण होण्याचा महिना/वर्ष	झालेला खर्च (₹ कोटीत)	नोव्हेंबर 2025 अखेरीस गोदामाच्या वापराची स्थिती
चिखोली, (ठाणे)	नोव्हेंबर 2012 (05.02.2014)	04.02.2015	01/1,080	फेब्रुवारी 2018	1.06	कार्यान्वित नाही
देवपूर, (धुळे)	जानेवारी 2013 (07.02.2015)	06.02.2016	03/7,080	डिसेंबर 2018	4.92	
एकूण			**04/8,160**		**5.98**	

स्त्रोत: जिल्हा पुरवठा कार्यालयांनी सादर केलेली माहिती

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, सार्वजनिक बांधकाम विभागाने ₹5.98 कोटी खर्च करून 8,160 मेट्रिक टन साठवण क्षमता असलेले चार गोदामांचे बांधकाम फेब्रुवारी 2018 पर्यंत पूर्ण केले होते.

तसेच, धुळे येथील गोदामाच्या बाबतीत गोदाम बांधण्यात आले असले तरी नव्याने बांधण्यात आलेल्या गोदामाकडे जाण्यासाठी रस्ता नसल्याने ते जिल्हा पुरवठा अधिकारी, धुळे यांनी ताब्यात घेतले नसल्याचे लेखापरीक्षण तपासणीत निदर्शनास आले आहे. शिवाय, गोदामाच्या आराखड्यात अंतर्गत रस्त्यांची कमतरता होती आणि इमारतीच्या उत्तर बाजूस कुंपण नव्हते. पूर्वेकडील संरक्षक भिंतीचे बांधकामही अपूर्ण होते. संरक्षक भिंत आणि पोहोच रस्ता नसल्यामुळे ठाणे येथील गोदाम बंद पडले. चारही गोदामांचा वापर नोव्हेंबर 2025 पर्यंत करता आला नाही.

[109] ठाणे : ₹1.06 कोटी, धुळे : ₹5.08 कोटी

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी उत्तरात नमूद केले की (ऑक्टोबर 2024), धुळे येथील गोदामांच्या बाबतीत, गोदामाला मुख्य रस्त्याशी जोडणारा पोहोच रस्ता बांधण्यासाठी जिल्हा विकास निधीतून निधी देण्यात आला आहे. हे काम पूर्ण झाल्यावर धान्य साठवणुकीसाठी गोदामाचा वापर केला जाईल. तसेच, धुळे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले (नोव्हेंबर 2025) की, शासनाने संरक्षक भिंत व अंतर्गत रस्ते बांधण्यासाठी ₹2.25 कोटींची प्रशासकीय मान्यता ऑक्टोबर 2025 मध्ये दिली आहे.

ठाणे येथील गोदामाच्या बाबतीत विभागाने नमूद केले (ऑक्टोबर 2024) की, गोदामासाठी पोहोच रस्ते, संरक्षक भिंत आणि वाहनतळाच्या कामांसाठी ₹1.98 कोटीची प्रशासकीय मान्यता ऑक्टोबर 2023 मध्ये देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांच्यामार्फत मार्च 2024 मध्ये कार्यादेश जारी करण्यात आला असून काम पूर्ण होण्याचा दिनांक जानेवारी 2025 आहे आणि पोहोच रस्ता, संरक्षक भिंत आणि वाहनतळ ही कामे पूर्ण झाल्यावर गोदाम कार्यान्वित केले जाईल. तसेच, जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे यांनी सांगितले (नोव्हेंबर 2025) की, संरक्षक भिंत आणि अंतर्गत पोहोच रस्त्याच्या बांधकामाशी संबंधित कामे प्रगतीपथावर आहेत.

उत्तर स्वीकारार्ह नाही कारण नोव्हेंबर 2012 आणि जानेवारी 2013 च्या शासन निर्णयांमध्ये स्पष्ट निर्देश देऊनही संरक्षक भिंती, अंतर्गत रस्ते यासारख्या आवश्यक पायाभूत सुविधांसाठीच्या तरतुदी अंदाजपत्रक स्तरावर जिल्हाधिकारी/जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी समाविष्ट केल्या नव्हत्या. गोदामांच्या बांधकामास आधीच विलंब झाला होता आणि अंदाजपत्रक स्तरावर अनिवार्य असलेले घटक वगळल्यामुळे सुविधा अपूर्ण राहिल्या झाल्या आणि पोहोच रस्ते नसल्यामुळे गोदामे कार्यान्वित झाली नव्हती. शिवाय, आश्वासनांचे वेळेवर पालन करण्यात विभाग अपयशी ठरल्यामुळे प्रशासकीय निष्काळजीपणा दिसून आला.

लेखापरीक्षणाच्या निष्कर्षानुसार ₹5.98 कोटी खर्चून बांधण्यात आलेल्या चार गोदामांचा वापर प्रकल्प निर्मितीच्या टप्प्यावर अपूर्ण नियोजन आणि अंदाजामुळे करण्यात आला नव्हता, ज्यामध्ये शासन निर्णयांमध्ये स्पष्ट निर्देश देऊनही पोहोच रस्ते, संरक्षक भिंती आणि अंतर्गत रस्ते यासारख्या आवश्यक सहाय्यक पायाभूत सुविधा समाविष्ट केल्या गेल्या नव्हत्या. या अनिवार्य घटकांच्या अनुपस्थितीमुळे गोदामे पूर्ण झाल्यानंतर सात वर्षांहून अधिक काळ अकार्यरत राहिली, जरी जिल्ह्यांना लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत साठवण क्षमतेत लक्षणीय कमतरता भासत होती. कार्योत्तर मंजुरी आणि सहाय्यक कामांच्या अंमलबजावणीला झालेला विलंब समन्वय आणि वेळेवर निर्णय घेण्यातील कमकुवतपणा दर्शवतो, राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत परिकल्पित पुरेशी आणि कार्यक्षम मध्यवर्ती साठवण सुविधा निर्माण करण्याचे उद्दिष्ट कमी करतो.

हे प्रकरण शासनास संदर्भित करण्यात आले (फेब्रुवारी 2025);तसेच जुलै 2025 आणि ऑक्टोबर 2025 मध्ये स्मरणपत्रे पाठविण्यात आली; उत्तर प्रतीक्षित आहे.

नगर विकास विभाग

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

2.14 महसुलाची हानी

विद्यमान कराराची मुदत संपण्यापूर्वी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे निविदा प्रक्रिया सुरू करण्यात विलंब, तसेच 'नकार देण्याचा पहिला अधिकार' या कलमाशी विसंगत निविदा अटींचा समावेश यामुळे निविदा रद्द करण्यात आल्या आणि नवीन करार अंतिम होण्यास विलंब झाला, परिणामी वाहनतळाच्या जागेचा वापर झाला नाही आणि परिणामी ₹5.93 कोटी महसुलाचे नुकसान झाले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वांद्रे कुर्ला संकुलातील जी विभागामधील प्लॉट क्र आरजी-1-ए वरील 37,252 चौरस मीटरचा भूखंड रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडला मनोरंजन उद्यान आणि अनुषंगिक सुविधांसह दोन मजली भुयारी वाहनतळाच्या बांधकामासाठी भाडेपट्ट्याने दिला (जुलै 2007). बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्यात भाडेकरार करण्यात आला (जुलै 2015). करारानुसार रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला सुमारे 1,000 गाड्या सामावून घेण्याची क्षमता असलेला पहिल्या स्तरावरील भुयारी वाहनतळ विनामूल्य दिला. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला या कार वाहनतळाच्या जागेच्या संचालन आणि व्यवस्थापनासाठी निविदा मागविण्याचा पूर्ण आणि अनिर्बंध अधिकार होता आणि अशा निविदेमध्ये प्राप्त होणारा सर्वोच्च प्रस्ताव रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडला कळविणे आवश्यक होते ज्यांना 'नकाराचा पहिला अधिकार' असेल.

त्यानुसार, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कार/गाड्या वाहनतळाच्या संचालन व देखभालीसाठी निविदा मागविल्या (डिसेंबर 2016), ज्यामध्ये परवाना शुल्कापोटी दरमहा ₹6.00 लाखांची सर्वाधिक बोली लागली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिलेला प्रस्ताव स्वीकारणाऱ्या ‘नकाराचा पहिला अधिकार’ धोरणानुसार सर्वाधिक बोली रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडला दिली. अशाप्रकारे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने 17 मार्च 2017 ते 16 मार्च 2018 या कालावधीसाठी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडला पहिल्या स्तरावरील भुयारी वाहन तळाच्या जागेचे संचालन व देखभालीचे कंत्राट ₹6.00॰लाख मासिक परवाना शुल्कासह दिले (मार्च 2017).

तथापि, मार्च 2018 आणि मे 2018 मध्ये नव्याने निविदा मागविताना, वाहनतळ शुल्कातील अनुपातिक वाढ लक्षात घेत प्राधिकरणाने ₹19.80 लाख ही राखीव किंमात निश्चित केली. परंतु, दोन्ही वेळेला बोली प्राप्त झाल्या नाहीत. दरम्यान, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने दरवर्षी 10 टक्के वाढीसह ₹17.50 लाख मासिक परवाना

शुल्कासहित तीन वर्षे सदर वाहनतळ चालविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे त्यांची विनंती (मार्च 2019) सादर केली. बोलीला मिळालेला सुमार प्रतिसाद आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने केलेली विनंती लक्षात घेत, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे कंत्राट दरवर्षी 10 टक्के वाढीसह ₹17.50 लाख मासिक परवाना शुल्कासहित वाढविले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पुन्हा दरमहा ₹23.29 लाख[110] राखीव किंमतीसह निविदा मागविल्या (जुलै 2022). मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने निविदेत दोन अटींचा, ज्यातील पहिली अट रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने निविदा प्रक्रियेत भाग घ्यायलाच हवा, आणि दुसरी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या दरातील तफावत उद्‌धृत केलेल्या सर्वोच्च दराच्या 10 टक्क्यांच्या आत असावी या अटींचा समावेश केला. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने निविदापूर्व बैठकीत या नवीन अटींवर आक्षेप घेतला आणि म्हणूनच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विधी कक्षाच्या मतानुसार (सप्टेंबर 2022) कराराप्रमाणे मूळ 'नकाराचा पहिला अधिकार' अटीमध्ये बदल करणे चुकीचे आहे याच्या आधारे एप्रिल 2023 मध्ये निविदा रद्द करण्यात आली.

लेखापरीक्षण निरीक्षणात खालील बाबी (ऑक्टोबर 2023) निदर्शनास आल्या:

- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने जून 2022 पर्यंतच मुदतवाढ दिलेल्या कराराच्या वैधतेच्या आधीच निविदा मागवून कंत्राट अंतिम करण्याऐवजी जुलै 2022 मध्ये विलंबाने निविदा मागविल्या.
- जुलै 2022 मध्ये मागविण्यात आलेल्या निविदेत समाविष्ट करण्यात आलेल्या दोन अतिरिक्त अटींचाही मे 2018 मध्ये मागविलेल्या आधीच्या निविदेत समावेश करण्यात आला होता. या अटी करारातील 'नकाराचा पहिला अधिकार' कलमात बदल करण्यासारखे आहेत, या कारणास्तव रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने याला आक्षेप घेतला होता. त्यामुळे, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडला यापूर्वी आक्षेप घेतलेल्या निविदेत अतिरिक्त अटींचा समावेश केल्याने निविदा रद्द करण्यात आली आणि त्यामुळे कंत्राटाला अंतिम स्वरूप देण्यास विलंब झाला. शिवाय, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पुनर्विचार करून 'नकाराचा पहिला अधिकार' अटीत बदल करण्याचा जो पेच निर्माण केला, त्यावरून रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड बरोबरच्या पहिल्या करारात (जुलै 2015)

---

110 रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने जून 2022 महिन्यासाठी प्रदान केलेल्या ₹21.17 लाख मासिक परवाना शुल्कात 10 टक्के वाढ करून राखीव किंमत निश्चित करण्यात आली होती.

असे कलम समाविष्ट केल्याने भाडेकरार प्रलंबित होईपर्यंत पुरेसा स्पर्धात्मक दर शोधण्यावर परिणाम झाल्याचे निदर्शनास येते.

उत्तरात, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नमूद केले (ऑक्टोबर 2024) की, प्राधिकरणाने सप्टेंबर 2023 मध्ये या वाहनतळ परिसरासाठी निविदा मागविल्या आहेत, परंतु अद्याप ही निविदा प्रक्रिया अंतिम झालेली नसून हा वाहनतळ रिकामा आणि वापराविना अवस्थेत आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पूर्वीचा करार संपण्यापूर्वीच निविदा मागविणे आवश्यक होते आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडला 'नकाराचा पहिला अधिकार' याची संधी दिल्यानंतर ती अंतिम करणे आवश्यक होते आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची एक प्रमुख मालमत्ता जी 1000 गाड्यांचे वाहनतळ म्हणून वापरली जाऊ शकते, ती जनतेसाठी उपलब्ध झाली नाही, या लेखापरीक्षणाच्या युक्तिवादाला या उत्तराने दुजोरा दिला आहे.

तसेच, पूर्वीचा करार संपण्यापूर्वी नवीन कंत्राटाला अंतिम स्वरूप देण्यात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची असमर्थता आणि जुलै 2015 मध्ये रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडबरोबर झालेल्या कराराशी सुसंगत नसलेल्या अतिरिक्त अटींचा समावेश केल्याने वाहनतळाच्या जागेचा वापर न झाल्याच्या परिणामी ₹5.93 कोटीच्या[111] महसुलाचे नुकसान झाले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला पूर्वीचा करार संपण्यापूर्वी नवीन कंत्राटाला अंतिम स्वरूप देण्यास झालेला विलंब यासोबत 'नकाराचा पहिला अधिकार' या अटीशी विसंगत निविदा अटीचा समावेशाचा परिणाम निविदा रद्द होण्यात आणि नवीन कंत्राट अंतिम करण्यास विलंब होण्यात झाला. त्यामुळे, 1,000 वाहने सामावून घेण्याची क्षमता असलेली वाहनतळ सुविधा जुन 2022 नंतर विनावापर पडून राहिली, परिणामी, ₹5.93 कोटीच्या महसुलाचे नुकसान झाले आणि मोक्याची सार्वजनिक मालमत्ता रिकामी पडून राहिली.

हे प्रकरण शासनास संदर्भित करण्यात आले डिसेंबर 2024); तसेच जुलै 2025 आणि ऑक्टोबर 2025 मध्ये स्मरणपत्रे पाठविण्यात आली; उत्तर प्रतीक्षित आहे.

[111] जुलै 2022 ते ऑक्टोबर 2024 या कालावधीसाठी ₹21.17 लाख मागील मासिक परवाना शुल्काच्या आधारे गणना केली आहे म्हणजेच (₹21.17 लाख * 28 महीने)

सामान्य प्रशासन विभाग

2.15 पत्रकार भवनाचा वापर न करणे

पत्रकार भवनाच्या प्रलंबित बांधकामाबाबत प्रशासकीय आणि तांत्रिक मान्यता मिळविण्यासाठी झालेल्या विलंबामुळे ₹2.43 कोटींचा निधी अडकून पडला

महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) हा महाराष्ट्र शासनाचा उपक्रम आहे, जो प्रमुख क्षेत्रात सर्वांगीण शहर नियोजन आणि पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम, 1966 च्या कलम 113 अंतर्गत स्थापन केला गेला आहे. नवीन शहर विकास प्राधिकारी आणि शहरी विस्तारासाठी एक प्रमुख अंमलबजावणी अभिकरण म्हणून, जमीन विकास, पायाभूत सुविधा प्रकल्प आणि नागरी सुविधांचे नियोजन, अंमलबजावणी आणि नियमन करण्यात सिडको महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. सिडकोने योग्य वित्तीय व्यवस्थापन, धोरणात्मक शहरी प्रशासन आणि कार्यक्षम मालमत्ता वापर या तत्त्वांनुसार आपली जबाबदारी पार पाडणे अपेक्षित आहे. सिडकोच्या अधिकारक्षेत्रात निर्माण केलेली सार्वजनिक मालमत्ता ही केवळ भांडवली गुंतवणूक नसून समाजाला दीर्घकालीन सामाजिक-आर्थिक लाभ देण्याचा हेतू आहे.

नवी मुंबईतील *पत्रकार भवनाच्या* (पत्रकारांसाठी इमारत) विकासासाठी नवी मुंबईतील प्रिंट मीडिया तसेच इलेक्ट्रॉनिक मीडियाचे पत्रकार[112] सिडकोकडे पाठपुरावा करत होते. या मागणीच्या अनुषंगाने एप्रिल 2017 मध्ये सिडकोने नवी मुंबईतील नेरुळ येथे ₹3.36 कोटीं किमतीच्या *पत्रकार भवन* इमारतीच्या (तळमजला अधिक पहिला मजला)[113] बांधकामास प्रशासकीय मान्यता दिली. पुढे असे ही ठरले की, सिडकोने ही इमारत पूर्ण केल्यानंतर, ती इमारत कार्यचालनासाठी आणि देखभालीसाठी नवी मुंबईच्या पत्रकारांच्या अधिकृत संस्थेकडे हस्तांतरित केली जाईल आणि सिडकोकडे या इमारतीचा मालकी हक्क राहील. जून 2017 मध्ये निविदा मागवण्यात आल्या होत्या आणि डिसेंबर 2017 मध्ये ₹2.59 कोटीचे काम देण्यात आले. ऑक्टोबर 2020 मध्ये ₹2.43 कोटी[114] खर्च करून हे काम पूर्ण झाले. सिडकोने इमारतीला मार्च 2022 मध्ये भोगवटा प्रमाणपत्र दिले.

---

112 नवी मुंबई पत्रकार संघटना, नवी मुंबई पत्रकार संघ, नवी मुंबई मराठी पत्रकार संघ आणि इतर संघटना

113 प्लॉट नंबर 15 ए, सेक्टर 38, नेरुळ, नवी मुंबई

114 ₹2.40 कोटी कामासाठी आणि खर्चाच्या वाढीसाठी ₹0.03 कोटी

दरम्यान, सचिव व महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सिडकोला कळविले (जुलै 2021) की, शासकीय प्रसिद्धी यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी कोकण विभागासहित महाराष्ट्रातील प्रत्येक विभागात आधुनिक *महिती* भवन उभारण्यासाठी शासनस्तरावर पावले उचलली जात आहेत. पत्रकार भवनाच्या बांधकामाचा उद्देश *महिती* भवन बांधण्याच्या उद्दीष्टांशी समान असल्याचे सांगून नेरुळ येथील पत्रकार भवनाची इमारत विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई यांना विनामूल्य सुपूर्द करण्याची विनंती महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग यांनी उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना केली (जुलै 2021).

त्यानंतर, सिडकोने मालकीहक्क हस्तांतरण न करता कार्यान्वयन आणि देखभालीसाठी महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, महाराष्ट्र शासन यांना पत्रकार भवन हस्तांतरीत करण्याचा ठराव केला (फेब्रुवारी 2022).

त्यानुसार, सिडको आणि महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यात मे 2022 मध्ये 01.05.2022 ते 31.04.2033 या 11 वर्षांच्या प्रारंभिक कालावधीसाठी अधिवास व परवाना कराराची अंमलबजावणी करण्यात आली. कराराच्या सातव्या कलमानुसार वीज, पाणी खर्च, मालमत्ता कर, दुरुस्ती आणि देखभाल, अंतर्गत सजावट यासंबंधीचा सर्व खर्च महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग उचलणार होते. तसेच, ही जागा महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागाच्या शाखा स्थलांतरीत करण्यासाठी वापरली जाईल आणि जागेच्या उपलब्धतेनुसार परवानाधारकाद्वारे या इमारतीची काही जागा पत्रकारांसाठी राखीव ठेवली जाईल. कराराच्या कलम 18 नुसार, परवानाधारकाने कराराच्या कोणत्याही अटीचे उल्लंघन केल्यास महामंडळाला करार रद्द करण्याचा अधिकार असेल. बांधकाम पूर्ण झालेली इमारत उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली (जुलै 2022).

मार्च 2024 मध्ये संयुक्त प्रत्यक्ष पडताळणी दरम्यान असे निदर्शनास आले की, इमारत रिकामी आणि न वापरलेल्या स्थितीत होती परिसराकडे दुर्लक्ष केल्याची चिन्हे दिसून . आली जसे कीआजूबाजूला झुडपे वाढली होती, गटारावरील झाकणे गायब होती, मुख्य प्रवेशद्वाराजवळ काचा फुटल्या होत्या आणि दक्षता आणि पहाऱ्याची व्यवस्था तसेच देखभाल उपक्रमाची उणीव होती.

इमारतीचे बांधकाम ऑक्टोबर 2020 मध्ये पूर्ण झाले असले तरी भोगवटा प्रमाणपत्र देण्यास विलंब झाला होता. तसेच, जुलै 2022 मध्ये ही इमारत महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभागाकडे सुपूर्द करण्यात आली असली तरी, जानेवारी 2023 मध्येच महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून फर्निचर, वीज, पाण्याची जोडणी इत्यादींसाठी अंदाजपत्रक मागितले. जरी सार्वजनिक बांधकाम विभागाने ₹1.19 कोटींचे अंदाजपत्रक सादर केले असले तरी प्रशासकीय आणि तांत्रिक मान्यता मिळविण्याची कारवाई अद्याप सुरू होती (नोव्हेंबर 2025).

पत्रकार भवनाचे बांधकाम ऑक्टोबर 2020 मध्ये ₹2.43 कोटी खर्च करून पूर्ण झाले असले तरी, सिडकोने मार्च 2022 पर्यंत भोगवटा प्रमाणपत्र देण्यास विलंब केल्यामुळे मालमत्तेच्या वापराची तयारी लांबणीवर पडली. तसेच, जुलै 2022 मध्ये ही इमारत माहिती आणि जनसंपर्क विभागाकडे सुपूर्द केल्यानंतर, विभागाने ही सुविधा कार्यान्वित करण्यासाठी वेळेवर कार्यवाही केली नाही, कारण अत्यावश्यक कामांसाठी प्रशासकीय आणि तांत्रिक मंजूरी नोव्हेंबर 2025 पर्यंत प्रलंबित होती. सलग टप्प्यांवर झालेल्या या विलंबामुळे ही इमारत दीर्घ काळ वापराविना राहिली, ज्यामुळे सार्वजनिक निधी ₹2.43 कोटीं अडवला गेला. पूर्ण झालेल्या मालमत्तेचा सतत वापर न करणे, देखभाल आणि राखण व पहारा व्यवस्थेच्या अनुपस्थितीमुळे इमारतीची नासधूस झाली आणि मालमत्तेचे मूल्य कमी होण्याचा धोका आणि भविष्यातील टाळता येण्याजोगा खर्च झाला, जे अपुरा आंतरविभागीय- समन्वय आणि सार्वजनिक मालमत्तेच्या बांधकामानंतरच्या वापरासाठी कमकुवत नियोजन दर्शविते

हे प्रकरण शासनास संदर्भित करण्यात आले (जून 2025 व डिसेंबर 2025); उत्तर प्रतीक्षित आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग

2.16 सांडपाणी प्रक्रिया संयंत्राची देखभाल न करणे

डागा मेमोरियल शासकीय महिला रुग्णालय प्रशासन आणि सार्वजनिक आरोग्य विभागाची नियमित अर्थसंकल्पीय यंत्रणेद्वारे कार्याचालन आणि देखभालीचे नियोजन आणि तरतूद करण्यातील असमर्थता, तसेच प्रलंबित आणि तदर्थ निधी प्रस्तावांमुळे सांडपाणी प्रक्रिया संयंत्र निष्क्रिय राहिल्याने सहा वर्षांहून अधिक काळ ₹1.27 कोटीची गुंतवणूक अनुत्पादक झाली.

डागा मेमोरियल शासकीय महिला रुग्णालय, नागपूर येथील प्रदूषित पाण्यावर सुरुवातीला हायपो सोल्यूशन ट्रीटमेंटचा[115] वापर करून प्रक्रिया करण्यात येत होती. जिल्हाधिकारी आणि सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नागपूर यांनी रुग्णालयाच्या आवारात ₹2.47 कोटी खर्चून सांडपाणी प्रक्रिया संयंत्र बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता दिली (ऑगस्ट 2014).

प्रदूषित पाण्याचे निर्जंतुकीकरण आणि प्रक्रिया करून ते रोपांना पाणी देणे, स्वच्छता, शीतकरण इत्यादी अपेय उद्देशांसाठी पुन्हा वापरण्यायोग्य बनवणे हा सांडपाणी प्रक्रिया संयंत्राचा उद्देश होता. प्रशासकीय मंजुरीच्या शर्ती आणि आदर्श मालमत्ता व्यवस्थापन मानकांनुसार अंमलबाजवणी अभिकरणाने कार्यचालन आणि देखभाल कालावधी संपल्यानंतर व्यवस्थापनासाठी केलेल्या समयोचित निधीच्या तरतुदीमधून सांडपाणी प्रक्रिया संयंत्राच्या निरंतर कार्यचालनाची सुनिश्चिती करणे आवश्यक होते. देखभाल आणि दुरुस्तीची जबाबदारी अंमलबजावणी संस्थेकडे असेल या अटींच्या अधीन ही मंजुरी देण्यात आली होती. अशा रीतीने, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अर्थसंकल्पीय सहाय्याद्वारे ही जबाबदारी डागा मेमोरियल शासकीय महिला रुग्णालयाची होती.

अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी ऑक्टोबर 2015 मध्ये या कामाला तांत्रिक मंजुरी दिली. निविदा प्रक्रियेचे पालन केल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ₹99.53 लाखांसह 24 महिने आणि कार्यान्वयन व देखभालीसाठी एक वर्षाच्या निर्धारित कालावधीसह सांडपाणी प्रक्रिया संयंत्राच्या बांधकामाचे काम नागपुर

[115] हायपोक्लोराइट सोल्यूशन्स, ज्याला बऱ्याचवेळा हायपो म्हणून संबोधले जाते, सामान्यत: रोगजनकांचे निर्जंतुकीकरण आणि निष्क्रिय करण्यासाठी रुग्णालयातील कचरा स्त्रावावरउपचार करण्यासाठी वापरले जाते. हे असणे आवश्यक आहे.ते वातावरणात सोडण्यापूर्वी पूर्व-उपचार केले जातात.

येथील विकासकाला दिले (एप्रिल 2016). सदर बांधकाम ₹1.27 कोटी एकूण खर्च[116] करून मार्च 2018 मध्ये पूर्ण झाले आणि फेब्रुवारी 2019 मध्ये एक वर्षाचे कार्यान्वयन आणि देखभाल पूर्ण झाले. एक वर्षाचा देखभाल कालावधी संपल्यामुळे मार्च 2019 पासून सांडपाणी प्रक्रिया संयंत्राचे कामकाज थांबविण्यात आले.

डागा मेमोरियल शासकीय महिला रुग्णालयाच्या अभिलेख्यांची छाननीत (ऑक्टोबर 2022) असे निदर्शनास आले की, सांडपाणी प्रक्रिया संयंत्र पुन्हा सुरू करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने डागा मेमोरियल शासकीय महिला रुग्णालय, नागपूर, येथे अंदाजे ₹15.67 लाख खर्चाचे वार्षिक देखभाल कंत्राट प्रस्तावित केले (एप्रिल 2019). त्यानुसार, वैद्यकीय अधीक्षक, डागा मेमोरियल शासकीय महिला रुग्णालय, नागपूर यांनी आरोग्य सेवा संचालक, मुंबई आणि जिल्हाधिकारी (जिल्हा खनिज निधी) यांच्याकडे प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (ऑगस्ट 2023) अंतर्गत अनुदान देण्याची मागणी केली (मे 2022).

तथापि, निधी प्राप्त न झाल्याने (मे 2024) सांडपाणी प्रक्रिया संयंत्र अकार्यरतच राहिला आणि डागा मेमोरियल शासकीय महिला रुग्णालयाने मार्च 2019 पासून मार्च 2024 पर्यंत ₹20 लाख खर्च[117] करून सांडपाणी विसर्जनाच्या आधीच्या/ पूर्वीच्याच प्रणालीचा वापर सुरू ठेवला.

सांडपाणी प्रक्रिया संयंत्र अकार्यरत राहण्याचा संबंध रुग्णालय प्रशासनाचा निष्काळजीपणा आणि सार्वजनिक आरोग्य विभागाला नियमित अर्थसंकल्पीय यंत्रणेद्वारे कार्याचालन आणि देखभालीचे नियोजन आणि तरतूद करण्यातील असमर्थता, तसेच प्रलंबित आणि तदर्थ निधी प्रस्ताव व जिल्हा खनिज निधी सारख्या बिगर-मूळ स्त्रोतांवरील अवलंबितता याच्याशी जोडला गेला. जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियमांनुसार सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी पूर्वीच्या संयंत्राची परिणामकारकता निश्चित करता आली नाही, कारण डागा मेमोरियल शासकीय महिला रुग्णालयाकडे दोन्ही प्रणालींमधील प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या गुणवत्तेची तुलना करण्यासाठी कोणतीही यंत्रणा उपलब्ध नव्हती.

उत्तरात वैद्यकीय अधीक्षक (मे 2024) यांनी नमूद केले की, जिल्हाधिकाऱ्यांकडून (जिल्हा खनिज निधी) निधी न मिळाल्यामुळे सांडपाणी प्रक्रिया संयंत्र कार्यरत नव्हता.

---

[116] सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या बांधकामावरील खर्च ₹113.47 लाख + प्राथमिक सर्वेक्षणावरील खर्च ₹13.33 लाख + प्रसिद्धी आणि निविदा प्रक्रियेवरील खर्च ₹0.23 लाख.

[117] ₹1 लाख x 04 संयंत्र x 05 वर्षे.

अशाप्रकारे, रुग्णालय प्रशासनाचा निष्काळजीपणा आणि सार्वजनिक आरोग्य विभागाला नियमित अर्थसंकल्पीय यंत्रणेद्वारे कार्यचालन आणि देखभालीचे नियोजन आणि तरतूद करण्यातील असमर्थता, तसेच प्रलंबित आणि तदर्थ निधी प्रस्ताव यामुळे सहा वर्षांहून अधिक काळ सांडपाणी प्रक्रिया संयंत्र अकार्यरत राहिले, ₹1.27 कोटींची गुंतवणूक अनुत्पादक ठरली आणि सांडपाण्यावर प्रक्रिया आणि पुनर्वापर करण्याचे उद्दिष्ट निष्फळ ठरले.

हे प्रकरण शासनास संदर्भित करण्यात आले (मे 2025); तसेच जुलै 2025 आणि ऑक्टोबर 2025 मध्ये स्मरणपत्रे पाठविण्यात आली; उत्तर प्रतीक्षित आहे.

(डी. जयशंकर)
प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I,
महाराष्ट्र, मुंबई

मुंबई
दिनांक: 30 जून 2026

प्रतिस्वाक्षरित

(के. संजय मूर्ती)
भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

नवी दिल्ली
दिनांक: 06 जुलै 2026

परिशिष्टे

परिशिष्ट 1.1

(संदर्भ: परिच्छेद 1.1)

प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यक्षेत्रातील विभाग आणि स्वायत्त संस्थांची समूहनिहाय यादी दर्शविणारे विवरणपत्र

समूहाचे नाव	विभागाचे नाव	स्वायत्त संस्थांची नावे
आरोग्य आणि कल्याण	वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये	-
	सार्वजनिक आरोग्य	-
	आदिवासी विकास	-
	महिला आणि बाल विकास	महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई
		महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई
	सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य	-
	इतर मागास बहुजन कल्याण	-
	अल्पसंख्यांक विकास	महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग
		महाराष्ट्र राज्य हज समिती
शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगार	शालेय शिक्षण आणि क्रीडा	-
	उच्च आणि तंत्रशिक्षण	प्रवेश नियामक प्राधिकरण
		शुल्क नियामक प्राधिकरण
	कौशल्य विकास आणि उद्योजकता	-
	कामगार	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ
	मराठी भाषा	-
ग्रामीण विकास	ग्राम विकास आणि पंचायतराज	-
कृषी, अन्न आणि संलग्न उद्योग	कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय	-
	सहकार, विपणन आणि वस्त्रोद्योग	-
	अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण	-
जलसंपदा	जलसंपदा	महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरण
	मृद आणि जलसंधारण	-
नगरविकास	नगरविकास	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

समूहाचे नाव	विभागाचे नाव	स्वायत्त संस्थांची नावे
	गृहनिर्माण	महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
		झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई
		झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
		मुंबई महानगर प्रदेश- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे
		महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण"
संस्कृती आणि पर्यटन	पर्यटन आणि सांस्कृतिक व्यवहार	-
सामान्य प्रशासन	सामान्य प्रशासन	राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, मुंबई
	महसूल	-
	संसदीय कामकाज आणि महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय	-

परिशिष्ट 1.2
(संदर्भ: परिच्छेद 1.6.1)
विभाग आणि स्वायत्त संस्था-निहाय थकित तपासणी अहवाल/परिच्छेद डिसेंबर 2023 पर्यंत जारी केलेले परंतु 30 जून 2024 पर्यंत प्रलंबित

अनु. क्र.		विभागाचे नाव/स्वायत्त संस्था	2016-17 पर्यंत		2017-18		2018-19		2019-20		2020-21		2021-22		2022-23		2023-24		एकूण	
			निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद
1	2		3	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17	18	19	20
समूह: आरोग्य आणि कल्याण मंत्रालय																				
1	**वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये**		82	276	14	65	10	49	19	39	1	9	3	20	8	84	15	149	152	691
2	**सार्वजनिक आरोग्य**		117	291	18	63	12	59	13	101	1	1	4	39	23	143	16	90	204	787
3	**आदिवासी विकास**		92	247	17	69	31	88	8	44	0	0	2	20	11	135	6	51	167	654
4	**महिला आणि बालविकास**		119	207	63	117	80	207	25	79	13	35	3	9	7	37	13	69	323	760
	ए	महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई	1	2	0	0	2	2	1	1	0	0	1	3	0	0	1	6	6	14
	बी	महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई	2	3	0	0	0	0	0	0	1	9	0	0	0	0	0	0	3	12
	एकूण		122	212	63	117	82	209	26	80	14	44	4	12	7	37	14	75	332	786
5	**सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य**		71	143	39	128	37	144	17	109	3	26	6	52	16	121	14	104	203	827

परिशिष्ट 1.2

(संदर्भ: परिच्छेद 1.6.1)

विभाग आणि स्वायत्त संस्था-निहाय थकित तपासणी अहवाल/परिच्छेद डिसेंबर 2023 पर्यंत जारी केलेले परंतु 30 जून 2024 पर्यंत प्रलंबित

अनु. क्र.		विभागाचे नाव/स्वायत्त संस्था	2016-17 पर्यंत		2017-18		2018-19		2019-20		2020-21		2021-22		2022-23		2023-24		एकूण	
			निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद
1		2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17	18	19	20
6		इतर मागास बहुजन कल्याण	0	0	0	0	1	5	0	0	0	0	1	5	3	21	1	11	6	42
		समूह : शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगार																		
7		शालेय शिक्षण आणि क्रीडा	371	765	19	105	9	70	59	304	7	27	6	38	24	114	13	74	508	1497
8		उच्च आणि तंत्रशिक्षण	13	47	12	82	2	39	6	28	5	25	6	46	8	65	6	37	58	369
9		कौशल्य विकास	8	40	3	14	16	54	17	65	4	16	3	14	4	15	9	36	64	254
10		कामगार	13	39	6	23	3	11	11	35	2	3	1	4	5	20	5	27	46	162
	ए	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ	0	0	1	13	1	5	0	0	1	9	1	9	0	0	0	0	4	36
		एकूण	13	39	7	36	4	16	11	35	3	12	2	13	5	20	5	27	50	198
11		मराठी भाषा	0	0	0	0	0	0	0	0	0	0	4	18	0	0	0	0	4	18

परिशिष्ट 1.2
(संदर्भ: परिच्छेद 1.6.1)
विभाग आणि स्वायत्त संस्था-निहाय थकित तपासणी अहवाल/परिच्छेद डिसेंबर 2023 पर्यंत जारी केलेले परंतु 30 जून 2024 पर्यंत प्रलंबित

अनु. क्र.	विभागाचे नाव/स्वायत्त संस्था	2016-17 पर्यंत		2017-18		2018-19		2019-20		2020-21		2021-22		2022-23		2023-24		एकूण	
		निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17	18	19	20
	समूह : ग्रामीण विकास																		
12	ग्राम विकास	66	187	1	1	9	53	5	44	4	59	1	13	7	75	1	9	94	441
	समूह : कृषी, अन्न आणि संलग्न उद्योग																		
13	कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय	227	529	36	154	19	125	41	247	32	16 8	12	73	30	172	15	69	412	1537
14	सहकार, विपणन आणि वस्त्रोद्योग	148	295	16	51	19	64	7	23	9	30	5	28	11	64	4	38	219	593
15	अन्न आणि नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण	1	3	26	63	21	91	25	101	9	52	21	154	32	275	13	96	148	835
	समूह : जलसंपदा																		
16	जलसंपदा	97	318	11	51	5	21	1	4	1	6	8	42	7	49	0	0	130	491
17	मृद आणि जलसंधारण	23	52	1	3	2	5	6	16	6	38	2	12	8	47	7	66	55	239

परिशिष्ट 1.2
(संदर्भ: परिच्छेद 1.6.1)

विभाग आणि स्वायत्त संस्था-निहाय थकित तपासणी अहवाल/परिच्छेद डिसेंबर 2023 पर्यंत जारी केलेले परंतु 30 जून 2024 पर्यंत प्रलंबित

अनु. क्र.		विभागाचे नाव/स्वायत्त संस्था	2016-17 पर्यंत		2017-18		2018-19		2019-20		2020-21		2021-22		2022-23		2023-24		एकूण	
			निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद
1	2		3	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17	18	19	20
समूह : नगर विकास																				
18	**नगर विकास**		**30**	**104**	**10**	**42**	**9**	**36**	**9**	**53**	**1**	**5**	**3**	**28**	**3**	**30**	**2**	**33**	**67**	**331**
	ए	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण	10	36	8	54	0	0	6	55	1	12	1	9	4	58	5	46	35	270
	बी	नागपूर सुधारणा ट्रस्ट	5	36	1	10	1	14	0	0	1	28	0	0	0	0	0	0	8	88
	सी	जिल्हा नगरविकास प्राधिकरण	13	63	0	0	0	0	0	0	0	0	0	0	0	0	0	0	13	63
	एकूण		**58**	**239**	**19**	**106**	**10**	**50**	**15**	**108**	**3**	**45**	**4**	**37**	**7**	**88**	**7**	**79**	**123**	**752**
19	**गृहनिर्माण**		**0**	**0**	**0**	**0**	**0**	**0**	**0**	**0**	**0**	**0**	**0**	**0**	**0**	**0**	**0**	**0**	**0**	**0**
	ए	महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण	80	226	13	98	11	61	10	84	2	18	4	51	1	7	4	52	**125**	**597**
	बी	झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण	6	48	0	0	3	23	0	0	0	0	2	15	0	0	2	25	13	111

परिशिष्ट 1.2
(संदर्भ: परिच्छेद 1.6.1)

विभाग आणि स्वायत्त संस्था-निहाय थकित तपासणी अहवाल/परिच्छेद डिसेंबर 2023 पर्यंत जारी केलेले परंतु 30 जून 2024 पर्यंत प्रलंबित

अनु. क्र.		विभागाचे नाव/स्वायत्त संस्था	2016-17 पर्यंत		2017-18		2018-19		2019-20		2020-21		2021-22		2022-23		2023-24		एकूण	
			निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद
1	2		3	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17	18	19	20
	सी	महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण	0	0	0	0	0	0	0	0	0	0	0	0	1	5	1	5	2	10
	एकूण		**86**	**274**	**13**	**98**	**14**	**84**	**10**	**84**	**2**	**18**	**6**	**66**	**2**	**12**	**7**	**82**	**140**	**718**
समूह: संस्कृती आणि पर्यटन																				
20	**सांस्कृतिक घडामोडी आणि पर्यटन**		**3**	**13**	**3**	**23**	**3**	**22**	**10**	**29**	**2**	**15**	**3**	**22**	**4**	**36**	**8**	**36**	**36**	**196**
समूह : सामान्य प्रशासन																				
21	**सामान्य प्रशासन**		**80**	**137**	**10**	**43**	**9**	**32**	**13**	**54**	**7**	**37**	**7**	**33**	**15**	**80**	**10**	**58**	**151**	**474**
	ए	राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, मुंबई	0	0	0	0	0	0	0	0	0	0	1	5	1	3	1	3	3	11
	एकूण		**80**	**137**	**10**	**43**	**9**	**32**	**13**	**54**	**7**	**37**	**8**	**38**	**16**	**83**	**11**	**61**	**154**	**485**

परिशिष्ट 1.2
(संदर्भ: परिच्छेद 1.6.1)
विभाग आणि स्वायत्त संस्था-निहाय थकित तपासणी अहवाल/परिच्छेद डिसेंबर 2023 पर्यंत जारी केलेले परंतु 30 जून 2024 पर्यंत प्रलंबित

अनु. क्र.	विभागाचे नाव/स्वायत्त संस्था	2016-17 पर्यंत		2017-18		2018-19		2019-20		2020-21		2021-22		2022-23		2023-24		एकूण	
		निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद	निरीक्षण अहवाल	परिच्छेद
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17	18	19	20
22	महसूल आणि वने	46	82	43	109	86	198	63	152	9	27	20	66	30	207	57	584	354	1425
23	संसदीय कामकाज आणि महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय	0	0	0	0	0	0	1	1	1	2	2	3	1	2	2	9	7	17
	एकंदर एकूण	1724	4189	371	1381	401	1478	376	1674	123	657	130	814	266	1870	232	1784	3623	13847

परिशिष्ट 1.3

(संदर्भ: परिच्छेद 1.6.4)

शासकीय स्पष्टीकरणात्मक ज्ञापने प्राप्त न झालेल्या पुनरावलोकनांची/परिच्छेदांची संख्या दर्शविणारा तक्ता (2012-13 पासून)

विभागाचे नाव	2012-13	2013-14	2014-15	2015-16	2016-17	2017-18	2018-19	2019-21 (मार्च 2021 रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन लेखापरीक्षण अहवाल)	महाराष्ट्रातील 74 व्या संविधान सुधारणा अधिनियम यावरील संपादणूक लेखापरीक्षण	भूपृष्ठ सिंचनातील परिणामांचे संपादणूक लेखापरीक्षण	महाराष्ट्र शासनाद्वारे सार्वजनिक सेवांचे वितरण	महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरणाची अंमलबजावणी	महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा आणि आरोग्य सेवांचे व्यवस्थापन	एकूण
शालेय शिक्षण आणि क्रीडा	1	0	0	0	0	0	0	0	0	0	0	0	0	**1**
सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान)	0	0	0	0	0	0	0	0	0	0	1	0	0	**1**
नगरविकास	0	0	1	0	0	0	2	2	1	0	0	0	0	**6**
सहकार, विपणन आणि वस्त्रोद्योग	0	0	0	0	0	0	1	0	0	0	0	0	0	**1**
जलसंपदा	1	0	0	0	0	0	0	0	0	1	0	0	0	**2**
ग्रामीण विकास	0	0	0	0	0	0	0	1	0	0	0	0	0	**1**
महसूल आणि वने	1	1	0	0	1	1	1	0	0	0	0	0	0	**5**
सार्वजनिक आरोग्य विभाग	0	0	0	0	0	0	0	0	0	0	0	0	1	**1**
विमुक्त जाती कल्याण विभाग	0	0	0	0	0	0	0	0	0	0	0	1	0	**1**
एकूण	**3**	**1**	**1**	**0**	**1**	**1**	**4**	**3**	**1**	**1**	**1**	**1**	**1**	**19**

परिशिष्ट 1.4

(संदर्भ: परिच्छेद 1.6.4)

कार्यवाही अहवाल प्रलंबित असलेल्या लोक लेखा समिती/सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशींची विभागनिहाय स्थिती (डिसेंबर 2024 अखेरीस)

अनु. क्र.	विभागाचे नाव	2010-11	2011-12	2012-13	2013-14	2014-15	2015-16	2016-17	एकूण
1.	शालेय शिक्षण आणि क्रीडा	0	1	0	9	0	0	0	**10**
2.	नगरविकास	6	1	24	12	0	1	3	**47**
3.	सार्वजनिक आरोग्य	0	0	3	0	0	1	21	**25**
4.	वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये	0	2	1	3	0	12	9	**27**
5.	आदिवासी विकास	0	0	0	0	10	0	0	**10**
6.	उच्च आणि तंत्रशिक्षण	0	4	0	0	0	0	0	**4**
7.	गृहनिर्माण	0	20	13	0	5	1	2	**41**
8.	कौशल्य विकास आणि उद्योजकता	3	0	0	0	0	3	1	**7**
9.	महिला आणि बालविकास	0	0	0	3	2	0	0	**5**
10.	जलसंपदा	2	2	104	30	4	0	30	**172**
11.	मृदा आणि जलसंधारण	6	0	0	0	0	0	0	**6**
12.	अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण	0	0	3	0	0	0	0	**3**
13.	महसूल आणि वन	3	26	2	0	15	4	1	**51**
14.	सहकार, विपणन आणि वस्त्रोद्योग	0	0	0	0	0	5	0	**5**
15.	सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य	1	0	0	0	0	0	0	**1**
16.	पर्यटन आणि सांस्कृतिक व्यवहार	0	1	0	0	0	0	0	**1**
	एकूण	**21**	**57**	**150**	**57**	**36**	**27**	**67**	**415**

परिशिष्ट 2.1

(संदर्भ: परिच्छेद 2.1.4.3)

समितीने मंजूर केलेल्या श्रेणीमध्ये विभाग स्तरावर नंतर सुधारणा करण्यात आलेल्या प्रकरणांची यादी

अनु. क्र.	वर्ष	अतिरिक्त आदिवासी आयुक्तांचे नाव	शाळेचे नाव	समितीने मंजूर केलेल्या शाळेची मूळ श्रेणी	शाळेची सुधारित श्रेणी	टक्केवारीत वाढ (रकाना 6 - रकाना 5)*100/ रकाना 5	टिप्पणी
1	2	3	4	5	6	7	8
1	2021-22	नाशिक	एसएनडी इंग्लिश मिडियम पब्लिक स्कूल (एसएससी), बाभुळगाव, तालुका: येवला, जिल्हा: नाशिक.	65	82	26	शाळेच्या श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी विभागाला 04.01.2022 रोजी शाळेकडून निवेदने प्राप्त झाली. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नाशिक यांनी शाळांची फेरतपासणी करून 07.01.2022 रोजी गुण 65 वरून 82 केले. सुधारित श्रेणीला उपसचिव स्तरावर 31.01.2022 रोजी मान्यता देण्यात आली.
2	2021-22	अमरावती	राजश्री पब्लिक स्कूल, जिल्हा: नांदेड	77	80	4	शाळेच्या श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी 02.12.2021 रोजी शाळेकडून निवेदने प्राप्त झाली. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नाशिक यांनी शाळांची फेरतपासणी करून 31.12.2021 रोजी गुण 77 वरून 80 केले. 02.02.2022 रोजी सुधारित गुणांना मान्यता देण्यात आली.

अनु. क्र.	वर्ष	अतिरिक्त आदिवासी आयुक्तांचे नाव	शाळेचे नाव	समितीने मंजूर केलेल्या शाळेची मूळ श्रेणी	शाळेची सुधारित श्रेणी	टक्केवारीत वाढ (रकाना 6 - रकाना 5)*100/ रकाना 5	टिप्पणी
1	2	3	4	5	6	7	8
3	2021-22	अमरावती	वेलिंग्टन इंटरनॅशनल स्कूल, जिल्हा: नांदेड	77	80	4	शाळेच्या श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी विभागाला 03.12.2021 रोजी शाळेकडून निवेदने प्राप्त झाली. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांनी शाळांची फेरतपासणी करून 03.01.2022 रोजी 77 ते 80 गुणांचे फेरमूल्यांकन केले. सुधारित गुणांना दिनांक 13.01.2022 रोजी मान्यता देण्यात आली
4	2021-22	नाशिक	एसएनडी इंग्लिश मिडियम पब्लिक स्कूल (सीबीएसई), बाभुळगाव, तालुका: येवला, जिल्हा: नाशिक (प्राप्त गुण - 44)	44	76	73	समितीने ही शाळा फेटाळून लावली. त्यानंतर शाळेच्या श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी दिनांक 04.01.2022 रोजी शाळेकडून निवेदने प्राप्त झाली. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नाशिक यांनी शाळांची फेरतपासणी केली आणि 07.01.2022 रोजी 44 वरून गुण 76 पर्यंत सुधारला. सुधारित श्रेणीला 31.01.2022 रोजी उपसचिव स्तरावर मान्यता देण्यात आली

अनु. क्र.	वर्ष	अतिरिक्त आदिवासी आयुक्तांचे नाव	शाळेचे नाव	समितीने मंजूर केलेल्या शाळेची मूळ श्रेणी	शाळेची सुधारित श्रेणी	टक्केवारीत वाढ (रकाना 6 - रकाना 5)*100/ रकाना 5	टिप्पणी
1	2	3	4	5	6	7	8
5	2021-22	अमरावती	एकलव्य इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, बामणी, दाभाड, तालुका: अर्धापूर जिल्हा: नांदेड	48	65	35	समितीने ही शाळा फेटाळून लावली. त्यानंतर श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी 14.12.2021 रोजी शाळेकडून निवेदने प्राप्त झाली, अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नाशिक यांनी शाळांची फेरतपासणी करून 04.01.2022 रोजी 48 ते 65 असे सुधारित श्रेणी गुण 04.02.2022 रोजी उपसचिव स्तरावर मंजूर करण्यात आले.
6	2021-22	नाशिक	गोदावरी इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, मरळक फाटा पूर्णा रोड, जिल्हा: नांदेड	48	71	48	समितीने ही शाळा फेटाळून लावली. त्यानंतर श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी 03.12.2021 रोजी शाळेकडून विभागाला निवेदन प्राप्त झाले. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नाशिक यांनी शाळेची पुन्हा पाहणी केली आणि 04.01.2022 रोजी श्रेणी गुण 48 वरून 71 पर्यंत सुधारित केले. सुधारित श्रेणीला दिनांक 14.03.2022 रोजी उपसचिव स्तरावर मान्यता देण्यात आली.

अनु. क्र.	वर्ष	अतिरिक्त आदिवासी आयुक्तां चे नाव	शाळेचे नाव	समितीने मंजूर केलेल्या शाळेची मूळ श्रेणी	शाळेची सुधारित श्रेणी	टक्केवारीत वाढ (रकाना 6 - रकाना 5)*100/ रकाना 5	टिप्पणी
1	2	3	4	5	6	7	8
7	2021-22	ठाणे	कर्नाळा स्पोर्ट ॲकॅडमी बार्न्स अँड ज्युनिअर कॉलेज, पनवेल (प्राप्त गुण - 44) जिल्हा: रायगड	40	73	66	समितीने ही शाळा फेटाळून लावली. त्यानंतर श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी शाळेकडून विभागाला निवेदन प्राप्त झाले. त्यानंतर अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नाशिक यांनी शाळांची फेरतपासणी करून 27.01.2022 रोजी गुण 48 वरून 73 केले. 02/02/2022 रोजी सुधारित गुणांना मान्यता देण्यात आली.
8	2018-19	अमरावती	भावना पब्लिक स्कूल, देगाव, तालुका रिसोड, जिल्हा: वाशिम	65	80	23	शाळेच्या श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी दिनांक 18.09.18 रोजी शाळेकडून निवेदने प्राप्त झाली, अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांनी शाळेची फेरतपासणी करून 31.12.2018 रोजी गुण 65 वरून 80 केले. मंजुरी दिनांक 11/01/2019 रोजी सुधारित गुणांना मान्यता देण्यात आली.

अनु. क्र.	वर्ष	अतिरिक्त आदिवासी आयुक्तांचे नाव	शाळेचे नाव	समितीने मंजूर केलेल्या शाळेची मूळ श्रेणी	शाळेची सुधारित श्रेणी	टक्केवारीत वाढ (रकाना 6 - रकाना 5)*100/ रकाना 5	टिप्पणी
1	2	3	4	5	6	7	8
9	2018-19	अमरावती	लिटिल वंडर्स इंग्लिश स्कूल, तालुका: सिल्लोड, जिल्हा: छत्रपती संभाजीनगर	73	85	16	शाळेच्या श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी 14.09.2018 रोजी शाळेकडून निवेदने प्राप्त झाली, अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांनी 31.12.2018 रोजी 73 ते 85 गुणांची फेरतपासणी व फेरमूल्यांकन केले. 11/01/2019 रोजी सुधारित गुणांना मान्यता देण्यात आली.
10	2018-19	अमरावती	वेलिंग्टन इंटरनॅशनल स्कूल, जिल्हा: नांदेड	52	74	42	शाळेच्या श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी विभागाकडे 21.09.18 रोजी शाळेकडून निवेदने प्राप्त झाली. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावतीने शाळेची फेरतपासणी करून 31.12.2018 रोजी गुण 52 वरून 74 केले. सुधारित गुणांना दिनांक 11.01.2019 रोजी मान्यता देण्यात आली

अनु. क्र.	वर्ष	अतिरिक्त आदिवासी आयुक्तांचे नाव	शाळेचे नाव	समितीने मंजूर केलेल्या शाळेची मूळ श्रेणी	शाळेची सुधारित श्रेणी	टक्केवारीत वाढ (रकाना 6 - रकाना 5)*100/ रकाना 5	टिप्पणी
1	2	3	4	5	6	7	8
11	2018-19	अमरावती	एल.के.आर.आर. प्रिन्स इंग्लिश स्कूल, तालुका: सेलू, जिल्हा: परभणी	71	81	14	शाळेच्या श्रेणीच्या फेरमूल्यांकनासाठी विभागाला 20.09.18 रोजी शाळेकडून निवेदने प्राप्त झाली. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांनी शाळेची फेरतपासणी करून 12.02.2019 रोजी गुण 71 वरून 81 केले. सुधारित गुणांना दिनांक 19/03/2019 रोजी मान्यता देण्यात आली.
12	2018-19	अमरावती	सरस्वती इंटरनॅशनल स्कूल, तालुका: कळमनुरी, जिल्हा: हिंगोली	59.5	73	23	शाळेच्या श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी विभागाला 21.09.18 रोजी शाळेकडून निवेदने प्राप्त झाली, त्यानंतर अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांनी शाळांची फेरतपासणी करून 03.12.2018 रोजी गुण 59.5 वरून 73 केले. सुधारित गुणांना दिनांक 11/01/2019 रोजी मान्यता देण्यात आली.

अनु. क्र.	वर्ष	अतिरिक्त आदिवासी आयुक्तांचे नाव	शाळेचे नाव	समितीने मंजूर केलेल्या शाळेची मूळ श्रेणी	शाळेची सुधारित श्रेणी	टक्केवारीत वाढ (रकाना 6 - रकाना 5)*100/ रकाना 5	टिप्पणी
1	2	3	4	5	6	7	8
13	2018-19	अमरावती	इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, विष्णुपूरी, जिल्हा: नांदेड	47	81	72	शाळेच्या श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी विभागाला 11.02.2019 रोजी शाळेकडून निवेदने प्राप्त झाली. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांनी 01.03.2019 रोजी पुन्हा तपासणी करून गुण 47 वरून 81 पर्यंत सुधारित केले. सुधारित गुणांना दिनांक 19/03/2019 रोजी मान्यता देण्यात आली.
14	2018-19	अमरावती	सेंट्रल पब्लिक स्कूल मेहेकर, जिल्हा: बुलढाणा	67	82	22	विभागाने 25.02.2019 रोजी शाळेची फेर तपासणी करण्याचे निर्देश अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांना दिले. त्यानुसार फेर तपासणी केल्यानंतर अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांनी दिनांक 28.02.2019 रोजी गुण 67 वरून 82 पर्यंत सुधारित केले. 06/05/2019 रोजी सुधारित गुणांना मान्यता देण्यात आली.

अनु. क्र.	वर्ष	अतिरिक्त आदिवासी आयुक्तांचे नाव	शाळेचे नाव	समितीने मंजूर केलेल्या शाळेची मूळ श्रेणी	शाळेची सुधारित श्रेणी	टक्केवारीत वाढ (रकाना 6 - रकाना 5)*100/ रकाना 5	टिप्पणी
1	2	3	4	5	6	7	8
15	2018-19	अमरावती	यशवंतराव चव्हाण इंग्रजी प्राथमिक शाळा, मंगरुळपीर, जिल्हा वाशिम	66	81	23	शाळेच्या पुनर्मूल्यांकनासाठी 25/02/2019 रोजी शाळेकडून निवेदने प्राप्त झाली. फेर तपासणीनंतर अतिरिक्त आदिवासी आयुक्ताने 28.02.2019 रोजी गुण 66 वरून 81 पर्यंत सुधारला. 06/05/2019 रोजी सुधारित गुणांना मान्यता देण्यात आली.
16	2018-19	अमरावती	मानसिंग नाईक प्राथमिक शाळा, सायखेडा, जिल्हा: परभणी	43	75 (प्रकल्प अधिकारींद्वारे) 54 (अतिरिक्त आदिवासी आयुक्तांद्वारे)	26	कमी श्रेणीमुळे ही शाळा समितीने नाकारली होती. शाळेच्या श्रेणींच्या पुनर्मूल्यांकनासाठी विभागाकडे निवेदने प्राप्त झाली. अतिरिक्त आदिवासी आयुक्तांनी 17.09.2018 रोजी श्रेणी 43 वरून 54 केले. तथापि, प्रकल्प अधिकारींने दिलेल्या चुकीच्या 75 गुणांच्या आधारावर (03.11.2018) मान्यता देण्यात आली.

अनु. क्र.	वर्ष	अतिरिक्त आदिवासी आयुक्तांचे नाव	शाळेचे नाव	समितीने मंजूर केलेल्या शाळेची मूळ श्रेणी	शाळेची सुधारित श्रेणी	टक्केवारीत वाढ (रकाना 6 - रकाना 5)*100/ रकाना 5	टिप्पणी
1	2	3	4	5	6	7	8
17	2018-19	अमरावती	शांती निकेतन पब्लिक स्कूल, जिल्हा: नांदेड	41	62	51	कमी श्रेणीमुळे ही शाळा समितीने नाकारली होती. शाळेच्या श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी 17.07.2018 रोजी लोकप्रतिनिधींकडून विभागाला निवेदने प्राप्त झाली. आयुक्तांनी 01.11.2018 रोजी श्रेणी 41 वरून 62 केले. 03.11.2018 रोजी सुधारित गुणांना मान्यता देण्यात आली
18	2018-19	नाशिक	ब्रह्म व्हॅली पब्लिक स्कूल ज्युनिअर कॉलेज, अंजनेरी त्र्यंबक, जिल्हा: नाशिक	78	81	4	पुनर्मूल्यांकनासाठी शाळेकडून निवेदन प्राप्त झाल्यानंतर अतिरिक्त आदिवासी आयुक्तांनी, नाशिक ने 10.05.2019 रोजी श्रेणी 78 वरून 81 केले. 04.06.2019 रोजी सुधारित गुणांना मान्यता देण्यात आली.
19	2018-19	अमरावती	स्वामी विवेकानंद इंटिग्रेशन स्कूल,	74	88	19	30.04.2019 रोजी शाळेच्या श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी लोकप्रतिनिधींकडून निवेदन प्राप्त झाल्यानंतर. अतिरिक्त आदिवासी

अनु. क्र.	वर्ष	अतिरिक्त आदिवासी आयुक्तांचे नाव	शाळेचे नाव	समितीने मंजूर केलेल्या शाळेची मूळ श्रेणी	शाळेची सुधारित श्रेणी	टक्केवारीत वाढ (रकाना 6 - रकाना 5)*100/ रकाना 5	टिप्पणी
1	2	3	4	5	6	7	8
			लातूर				आयुक्त, अमरावती यांनी पुनर्मूल्यांकन केले आणि 29.05.2019 रोजी शाळेचे श्रेणी 74 वरून 88 केले. सुधारित गुणांना दिनांक 11.09.2019 रोजी मान्यता देण्यात आली.
20	2019-20	नागपूर	प्रोग्रेसिव्ह इंग्लिश स्कूल, चुलोड रोड, गोंदिया	68	71	4	शाळेच्या श्रेणीच्या पुनर्मूल्यांकनासाठी शाळेकडून दिनांक 1.11.2019 रोजी विनंती प्राप्त झाल्यानंतर अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नागपूर यांनी शाळेची फेरतपासणी करून 24.12.2019 रोजी श्रेणी 68 वरून 71 करण्यात आले. 25.02.2020 रोजी सुधारित गुणांना मान्यता देण्यात आली.
21	2019-20	अमरावती	मातोश्री कमलाबाई ठमके इंग्लिश स्कूल, किनवट, नांदेड	67.5	80.5	19	विभागाने अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांना 02.12.2019 रोजी शाळेचे पुनर्मूल्यांकन करण्यास सांगितले. अतिरिक्त आदिवासी आयुक्तांनी, अमरावती यांनी पुनर्मूल्यांकन केले आणि 02.01.2020 रोजी

अनु. क्र.	वर्ष	अतिरिक्त आदिवासी आयुक्तांचे नाव	शाळेचे नाव	समितीने मंजूर केलेल्या शाळेची मूळ श्रेणी	शाळेची सुधारित श्रेणी	टक्केवारीत वाढ (रकाना 6 - रकाना 5)*100/ रकाना 5	टिप्पणी
1	2	3	4	5	6	7	8
							श्रेणी 67.5 वरून 80.5 पर्यंत सुधारित केली. 16.09.2020 रोजी सुधारित गुणांना मान्यता देण्यात आली.
22	2019-20	अमरावती	रेड्डीज कन्व्हेंट पाटणबोरी, यवतमाळ	68	79	16	विभागाने अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांना 11.06.2019 रोजी शाळेचे पुनर्मूल्यांकन करण्याच्या सूचना दिल्या. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांनी 18.10.2019 रोजी पुनर्मूल्यांकन व सुधारित श्रेणी 68 वरून 79 केले. 16.09.2020 रोजी सुधारित गुणांना मान्यता देण्यात आली.
23	2019-20	अमरावती	यशवंतराव चव्हाण इंग्लिश मीडियम स्कूल, मांगरुळपीर	66	84	27	शाळेने 19.11.2019 रोजी शाळेच्या श्रेणीचे पुनर्मूल्यांकन करण्याची विनंती विभागाकडे केली. अतिरिक्त आदिवासी आयुक्तांनी फेर तपासणी केली आणि 16.01.2020 रोजी श्रेणी 66 वरून 84 पर्यंत सुधारित केले. सुधारित गुणांना 16.09.2020 रोजी मान्यता देण्यात आली.

अनु. क्र.	वर्ष	अतिरिक्त आदिवासी आयुक्तांचे नाव	शाळेचे नाव	समितीने मंजूर केलेल्या शाळेची मूळ श्रेणी	शाळेची सुधारित श्रेणी	टक्केवारीत वाढ (रकाना 6 - रकाना 5)*100/ रकाना 5	टिप्पणी
1	2	3	4	5	6	7	8
24	2019-20	अमरावती	सेंट्रल पब्लिक स्कूल, बुलढाणा	70	86	23	शाळेने 26.06.2019 रोजी विभागाकडे पुनर्मूल्यांकनाची विनंती केली. अतिरिक्त आदिवासी आयुक्तांनी, अमरावती 25.09.2019 रोजी पुनर्मूल्यांकन आणि सुधारित श्रेणी 70 ते 86 पर्यंत केली. सुधारित गुणांना 23.10.2019 रोजी मान्यता देण्यात आली.
25	2019-20	अमरावती	भावना पब्लिक स्कूल, रिसोड, वाशीम	73	80	10	विभागाने अतिरिक्त आदिवासी आयुक्तांनी 21.08.2019 रोजी शाळेचे पुनर्मूल्यांकन करण्यास सांगितले. अतिरिक्त आदिवासी आयुक्तांनी 25.09.2019 रोजी 73 वरून 80 पर्यंत पुनर्मूल्यांकन आणि सुधारित श्रेणी केली. सुधारित गुणांना 23.10.2019 रोजी मान्यता देण्यात आली.

अनु. क्र.	वर्ष	अतिरिक्त आदिवासी आयुक्तांचे नाव	शाळेचे नाव	समितीने मंजूर केलेल्या शाळेची मूळ श्रेणी	शाळेची सुधारित श्रेणी	टक्केवारीत वाढ (रकाना 6 - रकाना 5)*100/ रकाना 5	टिप्पणी
1	2	3	4	5	6	7	8
26	2019-20	अमरावती	इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, नांदेड	55	80	45	विभागाने अतिरिक्त आदिवासी आयुक्तांना 27.08.2019 रोजी शाळेचे पुनर्मूल्यांकन करण्यास सांगितले. अतिरिक्त आदिवासी आयुक्तांनी 25.09.2019 रोजी पुनर्मूल्यांकन करून सुधारित श्रेणी 55 वरून 80 केली. सुधारित गुणांना 23.10.2019 रोजी मान्यता देण्यात आली.

परिशिष्ट 2.2
(संदर्भ: परिच्छेद 2.1.5.2)
शाळेसाठी अनिवार्य निकषांची यादी

अनु. क्र.	निकषांचा तपशील
1	पूर्णवेळ मुख्याध्यापक / प्राचार्य उपलब्ध आहेत किंवा कसे?
2	किमान 90 % शिक्षक इंग्रजी माध्यमात शिकले आहेत किंवा कसे? शिक्षकांची पात्रता नियमांनुसार आहे किंवा कसे?
3	10 वीच्या किमान 3 तुकड्या उत्तीर्ण झाल्या आहेत किंवा कसे?
4	शाळेत प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र वर्गखोली आहे किंवा कसे?
5	प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार पुरेसे बाक उपलब्ध आहेत किंवा कसे?
6	शाळेत भौतिक शास्त्र, रसायन शास्त्र आणि जीवशास्त्र प्रयोगशाळा उपलब्ध आहेत किंवा कसे? पात्र प्रयोगशाळा सहाय्यक उपलब्ध आहे किंवा कसे?
7	वाचनालय, संगणक, खेळ कक्ष, संगीत कक्ष, कला कक्ष (आर्ट रूम) इत्यादींसाठी स्वतंत्र खोल्या उपलब्ध आहेत किंवा कसे?
8	ग्रंथालयात किमान 100 पुस्तके उपलब्ध आहेत का? विद्यार्थ्यांची संख्या 500 पेक्षा जास्त असल्यास प्रत्येक विद्यार्थ्याला किमान 2 पुस्तके उपलब्ध आहेत किंवा कसे?
9	संगणक कक्षात किमान 20 संगणक आहेत का (इंटरनेट आणि इतर आधुनिक सुविधांसह) आणि 5 प्रिंटर उपलब्ध आहेत किंवा कसे?
10	संगणक कक्षात उपस्थित असलेले पूर्णवेळ प्रशिक्षित संगणक तज्ज/प्रशिक्षक उपलब्ध आहेत किंवा कसे?
11	पूर्णवेळ खेळ, संगीत आणि कला शिक्षक उपलब्ध आहेत किंवा कसे?
12	शाळेची इमारत, मैदान, वसतिगृह व खेळाचे मैदान यांचे क्षेत्रफळ महापालिका क्षेत्र/जिल्हा क्षेत्रासाठी दोन एकर, नगरपंचायत/नगरपरिषदेसाठी तीन एकर आणि ग्रामीण भागासाठी चार एकर, इतके आहे का?
13	शाळा आणि वसतिगृहासाठी स्वतंत्र इमारती आहेत किंवा कसे?
14	शाळेत विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार पुरेशी क्षमता असलेले सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी सभागृह आहे किंवा कसे?
15	शाळेत किमान दोन डिजिटल वर्ग आहेत किंवा कसे?
16	विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार पुरेसे जल शुद्धीकरण यंत्र (वॉटर प्युरिफायर) उपलब्ध आहेत किंवा कसे?
17	शाळेत किमान पाच खेळांचे प्रशिक्षण दिले जाते किंवा कसे? त्यापैकी किमान चार मैदानी खेळ आहेत किंवा कसे?
18	आजारी विद्यार्थ्यासाठी आराम खोली उपलब्ध आहे किंवा कसे?

अनु. क्र.	निकषांचा तपशील
19	सीसीटीव्ही बसवले आहेत किंवा कसे?
20	या योजनेंतर्गत निवडलेल्या विद्यार्थ्यांना स्वतंत्र तुकडी तयार करण्याऐवजी इतर विद्यार्थ्यांसह शिक्षण दिले जात आहे किंवा कसे?
21	विद्यार्थी आणि पालकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी शाळेत तक्रार निवारण यंत्रणा आहे किंवा कसे?
22	प्रत्येक मजल्यावर प्रत्येकी 20 विद्यार्थ्यांसाठी एक स्नानगृह आणि शौचालय उपलब्ध आहे किंवा कसे?

परिशिष्ट 2.3

(संदर्भ: परिच्छेद 2.1.5.2)

वसतिगृहासाठी अनिवार्य निकषांची यादी

अनु. क्र.	निकषांचा तपशील
1	मुला-मुलींच्या निवासासाठी स्वतंत्र इमारती आहेत का? जर एकाच इमारतीत राहण्याची सोय असेल तर मुला-मुलींसाठी पक्के विभाजन आहे किंवा कसे? त्यांच्यासाठी प्रवेश-निर्गमनासाठी स्वतंत्र प्रवेशद्वारे आहेत किंवा कसे?
2	वसतिगृहातील स्वयंपाकघर अन्न व औषध प्रशासन आणि अग्निशमन विभागाने मंजूर केले आहे किंवा कसे?
3	खानावळीच्या भोजनकक्षात जेवणासाठीचे बाक (टेबल) आणि खुर्च्या आहेत किंवा कसे?
4	वसतिगृहात टीव्ही आणि वाचनाचे साहित्य असलेले एक सामायिक सभागृह आहे किंवा कसे?
5	वसतिगृहाच्या खानावळीमध्ये प्रत्येक 15 विद्यार्थ्यांसाठी एक हात धुण्यासाठीचे भांडे (वॉश बेसिन) आहे किंवा कसे?
6	वसतिगृहात सॅनिटरी पॅडची विल्हेवाट लावण्यासाठी भस्मक आहे किंवा कसे?
7	वसतिगृहात प्रत्येक विद्यार्थ्यासाठी किमान 24 चौरस फूट चटई क्षेत्र उपलब्ध आहे किंवा कसे?
8	प्रत्येक विद्यार्थ्याला झोपण्यासाठी खाट उपलब्ध आहे किंवा कसे?
9	प्रत्येक मजल्यावर प्रत्येक 20 विद्यार्थ्यांसाठी एक स्नानगृह आणि शौचालय आहे किंवा कसे?
10	आजारी विद्यार्थ्यांसाठी आराम खोली उपलब्ध आहे का? पूर्णवेळ/अर्धवेळ प्रशिक्षित डॉक्टर किंवा नर्स उपलब्ध आहेत किंवा कसे?
11	विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांशी संपर्क साधता यावा यासाठी वसतिगृहात किमान तीन लॅंडलाईन / भ्रमणध्वनी (मोबाईल) उपलब्ध आहेत किंवा कसे?
12	सीसीटीव्ही कॅमेरा बसवला आहे किंवा कसे?
13	किमान दोन पहारेकरी आहेत किंवा कसे?
14	आंघोळीसाठी गरम पाणी उपलब्ध आहे किंवा कसे?
15	वसतिगृहात 24 तास पाणीपुरवठ्याची व्यवस्था आहे किंवा कसे?

परिशिष्ट 2.4

(संदर्भ: परिच्छेद 2.2.5)

मार्च 2024 पर्यंत मंजूर नमुना जिल्हयातील शासकीय वसतिगृहे आणि अनुदानित वसतिगृहांचा तपशील

अनु क्र.	जिल्हा	शासकीय वसतिगृहे	अनु क्र.	अनुदानित वसतिगृहे
1	अहिल्यानगर	संत सखुबाई मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह	1	नवभारत छात्र निवास, राजूर, अकोले,
2		डॉ. भीमराव रामजी आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, लोणी	2	भीमा गौतमी आश्रम, औरंगाबाद रोड,
3	बुलढाणा	अधिक्षक, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, शेगाव	3	मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, दुधा
4		अधिक्षक, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, नांदुरा	4	गजानन महाराज, मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, सिंदखेड राजा
5	धाराशीव	अधिक्षक, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, नळदुर्ग	5	बसवेश्वर विद्यार्थी (मुले) वसतिगृह, अंदूर
6		अधिक्षक, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, वाशी	6	तुळजाभवानी मुलींचे वसतिगृह, उमरगा
7	जालना	अधिक्षक, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, मंठा	7	राजश्री शाहू महाराज मुलींचे वसतिगृह, जाफराबाद
			8	नेहरू मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, गोलपांगरी
8		अधिक्षक, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, जालना	9	ज्ञानदीप मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, बेलोरा, मंथा
			10	महात्मा ज्योतिबा फुले विद्यार्थी वसतिगृह, मोदीखाना
9	लातूर	अधिक्षक मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, अहमदपूर	11	विमुक्त जाती आणि भटक्या जमाती मुलांचे वसतिगृह
10		अधिक्षक, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, देवनी	12	बेगम अख्तर देशमुख मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, निलंगा
			13	नेहरू छात्रालय, मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह

अनु क्र.	जिल्हा	शासकीय वसतिगृहे	अनु क्र.	अनुदानित वसतिगृहे
11	नागपूर	अधिक्षक, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, वनडोंगरी	14	मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, रामटेक
12		अधिक्षक, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, मनीष नगर	15	राजर्षी शाहू महाराज मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, कुही
13	पुणे	250 मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह (मोशी), पिंपरी चिंचवड	16	महिला आश्रम, मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, कर्वे नगर
14		125 वी जयंती मागासवर्गीय शासकीय वसतिगृह (मुली), तळेगाव, दाभाडे	17	युनियन वसतिगृह, मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, रामोशिवाडी
15	सांगली	अधिक्षक, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, जत	18	नाना पाटील विद्यार्थी वसतिगृह कुंडल
16		अधिक्षक, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, चिंचाणी, ता. कडेगाव	19	कमला नेहारू कन्या वसतिगृह, कवठेमहाकाळ
